राष्ट्रधर्म-पुस्तकमाला—७

# सेवाधर्म

: लेखक :

अप्पासाहेब पटवर्धन

महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

[ २७ ]

प्रकाशक—
गोविंद वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

किंमत २ रुपये
१९४५

मुद्रकः— बाळकृष्ण नारायण ठकार
श्री सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
कोल्हापूर.

# ‘ सेवाधर्म ’-पुरस्कार

सेवाधर्मपरायण पूज्य अप्पासाहेब पटवर्धन यांचें ‘ सेवाधर्म ’ प्रवचन माझे मित्र आत्मारामपंत मोडक यांनीं मला वाचून ऐकविलें. ‘ सेवक पाहिजेत ’ हें एकच प्रकरण मी स्वतः वाचलें. माझी विस्मरण-शक्ति इतकी कमालीची झाली आहे कीं, प्रवचनांतील बहुतेक तपशील मी विसरून गेलों आहे. ऐकतांना व वाचतांना ‘ उत्तम ’ ‘ योग्य ’ ‘ अगदीं, बरोबर, ’ ‘ हें सुंदर प्रवचन लवकर लोकांच्या हातीं पडलें पाहिजे ’ असे उद्गार हृदयांत उमटत होते, अजूनहि उमटत आहेत. एक प्रहर झाला आहे वाचन संपवून. ‘ सेवक पाहिजेत ’ या प्रकरणानें प्रवचनाचा शेवट व ‘ सेवा कां करावी ’ या प्रकरणाने आरंभ, अशी दर्शनी अनुक्रमणिका असली तरी ती वास्तविक नव्हे, अप्पासाहेबांच्या सुदीर्घ सेवाकालांत त्यांना सेवकांची वाण सारखी भासत आली, व वेळोवेळीं विशेष तीव्रतेनें भासत आली व ‘ सेवक पाहिजेत ’ ‘ सेवक पाहिजेत ’ अशी ओरड त्यांच्या देशोद्धाराची उत्कंठा लागलेल्या हृदयानें त्यांच्यापाशीं म्हणजे त्यांच्या बुद्धी-पाशीं वेळोवेळीं चालविली म्हणून अखेर हें त्यांचें प्रवचन लिहिलें गेलें. अर्थात् ‘ सेवा कां करावी ’ वगैरे सर्व प्रकरणें ‘ सेवक पाहिजेत ’ या उत्कंठित हृदयांत प्रथम लिहिल्या गेलेल्या प्रकरणाच्या नंतरचीं आहेत.

‘ सेवक पाहिजेत ’ या अप्पासाहेबांच्या हांकेला मी मनापासून दुजोरा देतों. १९१२ सालीं मी काशीस अज्ञातवासांत असतांना स्वामी सत्यदेव ( हे नुकतेच अमेरिकेहून आले होते ) यांचें एक व्याख्यान ऐकलें. “ आम्ही एका दृष्टीनें फार भाग्यवान आहों. आमच्या देशांत कामाचे एवढे ढीग पहाल तिकडे पडलेले आहेत कीं, देशसेवा करूं इच्छिणाराला कामाची वाण कधींही कोठेंही पडणार नाहीं. ” स्वामींच्या व्याख्यानांतील हें विधान माझी विस्मरणशक्ति प्रबळ झाली असली तरी तिनें पुसलेलें नाहीं.

अप्पासाहेबांचें प्रस्तुत प्रवचन अ–सेवकांतून सेवक निर्माण करील व सेवक होतील त्यांना, व आहेत त्यांना क्रमशः एका पायरीवरून वरच्या दुसऱ्या पायरीवर याप्रमाणें चढवीत चढवीत ‘ आपणा–सारिखे ’ करील, प्रवचनकारासारखे करील. मात्र सेवकानें या प्रवचनाचा सक्रिय अभ्यास करावयास हवा. अभ्यासू क्रियावान् सेवकांनीं या प्रवचनाचा अभ्यास करतांना प्रवचनकाराला वेळोवेळीं त्रास देण्यास विसरूं नये. ते दूर असले तर आपल्या शंका, अडचणी पत्र लिहून त्यांस कळवाव्या, जवळ असले तर मोकळेपणें सांगाव्या. असें करण्यानें अप्पासाहेब त्या जिज्ञासू सेवकांवर संतुष्ट होतील व ते जिज्ञासू सेवक सुविचारपुष्ट होऊन अधिक कार्यक्षम होतील.

३५४ सदाशिव पेठ,
पुणें २

पां. म. बापट
१९।७।४४

---

# अथातोधर्मजिज्ञासा

श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांनीं, स्वतः अंगीकृत केलेल्या व्रताचें दोन तपें अेकनिष्ठेने आचरण करून अनेक प्रकारच्या अडचणींना व कष्टांना सामना देत देत शेवटीं त्यांत यश व प्रतिष्ठा संपादन केली आहे. मूलतः विद्याव्यासंगी परंपरेंत जन्म, त्यांत पुन: गुरुजनांकडून लहानपणापासूनच लावली गेलेली स्वाध्यायाची संवय, पुढें तर्कशास्त्र व तत्वज्ञान ह्या विषयांत मिळविलेलें विशेष नैपुण्य, अध्यापकाची मनोवृत्ति, सूक्ष्म चर्चा करणाऱ्या तरुण मंडळींच्या आणि पंडितांच्या संगतीमध्यें नित्य जीवन, जेलच्या निवृत्तिवासांत मनन करण्याला मिळालेली अनुकूलता, आणि स्वतःच्या तसेंच इतरांच्या अनुभवांचा मनांत भरलेला खजिना ! या सर्वांचा परिपाक म्हणून त्यांच्या लेखणींतून आपल्या स्वकर्माचें जणुं काय शास्त्रच असें हें पुस्तक उतरलें यांत आश्चर्य करण्यासारखे कांहीं नाहीं.

"शिप्याचा मुलगा जीव आहे तोंवर शिवील" अशा अर्थाची एक गुजराती म्हण आहे. तिचा अर्थ हाच कीं तो जिवंत आहे तोंवर शिवण्याचें काम करील तरच त्याच्या नसानसांत स्वकर्माचे संस्कार उमटले आहेत असें म्हणतां येईल. शिवणकामांतून त्याला काय मिळतें हा प्रश्न क्षुल्लक नसला तरी तेवढाच एक प्रश्न नाहीं. दुसरें कांहीं आपणाला साधणारच नाहीं, रुचणारहि नाहीं, करतांच येत नाहीं, असें वाटणें ही स्वकर्माचरणाची भावना आहे. या भावनेला वश होऊन कोट्यवधि शेतकरी शेतींत फायदा होत नसतांना देखील आग्रहपूर्वक शेतीला चिकटून राहातात. प्रकृतीच्या गुणांतून उत्पन्न झालेलें हें स्वकर्माचरण वर्ण-धर्माचे मूल तत्त्व आहे. या तत्त्वाचें संशोधित रूप-म्हणजे विशुद्ध भावानें केलेलें स्वकर्माचरण—यालाच आपण आधुनिक कालांत 'सेवा' म्हणून ओळखतों, आणि ह्या अर्थानें लोकसेवा, देशसेवा, सेवक, वगैरे शब्द आज वापरले जातात.

'सेवा' हें स्वकर्माचरणाचेंच संशोधित रूप असल्यामुळें तीसुद्धां एक वृत्तीच आहे. 'वृत्ति' म्हणजे जन्मापासून किंवा तदनंतर प्राप्त झालेल्या

संस्कारांपासून निर्माण झालेली शरीराची, मनाची व बुद्धीची समाजोपयोगी किंवा विश्वोपयोगी पात्रता. वृत्ति म्हणजे उपजीविकेचें साधन किंवा धंदा हा तिच्या परिणामाला महत्व देऊन आरोपित केलेला तिचा लाक्षणिक अर्थ आहे. सर्व नसले तरी समाजाला उपयोगी असलेले पुष्कळसे धंदे आरंभीं समाजजीवनांतील कांहीं उणीवा किंवा दुःखें पाहून उद्भवलेल्या सेवावृत्तींतूनच निर्माण झालेले असावेत. त्या उणीवा किंवा तीं दुःखें दूर करण्याकरितां प्रथम कांहीं परोपकारी वृत्तीच्या भल्या माणसांना ‘ स्वयं सेवा ’ करण्याची प्रेरणा उत्पन्न होते. सेवेच्या मोबदल्यांत स्वतःचा कांहीं फायदा झाला -- नारळ किंवा पानसुपारी मिळाली -- तरी त्यांना तें खपत नाहीं. ही सेवावृत्ति त्यांच्या जीवनांतील इतर कामें व व्यवसाय यांना पुरवणी म्हणून प्रथमतः प्रकट होते. परंतु जेव्हां ह्या उणीवा किंवा दुःखें समाजजीवनाच्या नित्य बाबी होऊन बसतात आणि त्या दूर करण्याकरितां अनेक माणसांची आवश्यकता निर्माण होते तेव्हां दुसरी पायरी ‘ खड्या सेवे ’ ची येते. म्हणजे वर सांगितलेले ‘ स्वयंसेवक ’ तशींच इतरहि कांहीं माणसें आपले नित्यव्यवसाय सोडून त्या उणीवा नि दुःखें दूर करण्याकरितां स्वतः आठहि प्रहर तयार राहातात, आणि त्यांच्या कामाची किंमत जाणणारे समाजांतील इतर लोक त्यांना त्याकरितां आवश्यक अनुकूलता व त्यांच्या जीवननिर्वाहाची सोय करून देतात, त्यांना प्रतिष्ठाहि देतात. सेवाकार्य व तें करणाऱ्यांची उपजीविका यांना बाजारभावाचा सामान्य न्याय लागू पडत नाहीं व बहुतेक तेहि आपलें जीवन आपली कदर करणाऱ्या लोकांच्या उदारपणाला पोषक होईल असें साधें आणि पवित्र ठेवतात.

ज्या उणीवा व दुःखें दूर करण्याकरितां परोपकारवृत्तींतून हें सेवाकार्य उत्पन्न झालें असेल, ते दोष जर समाजांत फारच पसरलेलें व नेहमींच टिकणारे असे असतील आणि ते दूर करण्याकरितां विशेष कुशलता, योजकता, किंवा शिक्षणाची आवश्यकता असेल, तर त्या ‘ खड्या सेवे ’ तून एक नवा वर्ण किंवा धंदा हळूहळू निर्माण होतो. वकील, डॉक्टर, °, धर्मोपदेशक, पुराणिक, कीर्तनकार वगैरे अनेक धंदे आणि त्यांतून

उत्पन्न झालेले उपधंदे अशा प्रकारें मूळ ' स्वयं सेवा ' नंतर ' खडी सेवा ' आणि शेवटी ' धंदा ' या अवस्थेला पोहोचले आहेत.

' स्वयं सेवे ' च्या अवस्थेंत निर्वाहाचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. आर्थिक मोबदल्याच्या छायेलासुद्धां ' स्वयं सेवा ' शिवूं इच्छित नाहीं. ' खड्या सेवें ' त आर्थिक मोबदला असतो, पण तो सेवकाला सेवा करण्याची सोय करून देण्याच्या मर्यादेंत असतो. बाजारभावाशीं त्याचा संबंध कमी असतो. पण जेव्हां धंद्याच्या अवस्थेप्रत हें कार्य प्राप्त होतें तेव्हां तें समाजाच्या गरजा पुऱ्या करीत असलें तरी ' सेवा ' म्हणून त्याची तितकी प्रतिष्ठा राहात नाहीं, आणि अधोगतीला पोहोचलें तर अप्रतिष्ठित देखील होतें.

या प्रकारें ' सेवा ' हें स्वकर्माचरणाचेंच शुद्ध रूप आणि प्रारंभाला एका नव्या वर्णाचें किंवा धंद्याचें प्रारंभस्थान आहे. अर्थात् अज्ञान, रोग, अस्वच्छता, अन्याय, विषमता, संस्कारविहीनता, विद्याकला—विहीनता वगैरे सारख्या समाजजीवनांतील ज्या उणीवा किंवा दुःखें कायम असल्यासारखीं असतील त्यांचें निवारण केवळ ' स्वयं सेवे ' नें दीर्घ काल चालूं शकणार नाहीं हे उघडच आहे. कांहीं काळानें त्यांना ' खड्या सेवे ' चें रूप प्राप्त होईलच. म्हणजे, तींच कामें आठहि प्रहर करणाऱ्या माणसांची आवश्यकता भासेल आणि म्हणून त्यांना तीं तीं कामें करण्याला आवश्यक ती सोय करून देण्याचा प्रश्नदेखील उत्पन्न होईल. ' खड्या सेवे ' च्या अवस्थेंत असेपर्यंतच सेवाकार्याचें रूप शुद्ध आणि प्रतिष्ठापात्र राहाण्याचा संभव आहे, आणि तोंवरच सेवकांना त्या कामांतून स्वकर्मद्वारां उपासनेचें आणि श्रेयःप्राप्तीचें साधन म्हणून संतोष प्राप्त होण्याची शक्यता आहे. पण जेव्हां ' खड्या सेवे ' ला बाजार धंद्याचें रूप येतें तेव्हां त्यांत स्वकर्माचरण किंवा वर्णधर्म पाळला जात असला तरी " स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः " या वाक्याचा अनुभव किंवा संतोष मिळणें संशयास्पद होतें.

स्वकर्माचरण अमुक एका मर्यादेपर्यंत चित्तशुद्धीला साहाय्यक आहे, पण त्यानें ' सिद्धिं विन्दति ' चा अनुभव येणें अशक्यच आहे, असें

ज्यांना वाटलें त्यांनीं श्रेय:प्राप्तीची अन्तिम पायरी म्हणून संन्यासाला अनिवार्य ठरविलें, व गीतेंतील ज्या श्लोकांचा अर्थ यापासून वेगळा दिसतो त्यांचा संन्यासाला अविरोधी होईल असा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. हजार बाराशें वर्षें हिंदु जनता कमी जास्त प्रमाणांत या संस्कारांना चिकटून राहिली.

या हजार बाराशें वर्षांत 'ज्ञानदशा' सिद्ध केल्यानंतर स्वकर्माचरणांत किंवा प्रापंचिक कर्मांत पडणाऱ्या 'सहजस्वरूप ज्ञान्यां'चा एक सांप्रदाय चालू होता हें खरें. पण पुष्कळ वेळां त्यांची ती 'सहजावस्था' म्हणजे दबलेल्या वासनांची तृप्ति करून घेण्याकरितां एक प्रकारच्या दंभाचें आवरणच बनल्याचें आढळून आलें. मूठभर लोक थोडा-वेळ त्यांच्यामागें लागले असले तरी त्यांची प्रतिष्ठा फार काळ टिकूं शकली नाहीं, व हा सांप्रदाय नैसर्गिक प्रेरणेनें स्वकर्माचरण करणाऱ्या मानव-समुदायांना शुद्ध मार्ग दाखवूं शकला नाहीं. गीतेंत म्हटलें आहे कीं, "* जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्" ज्ञान्यानें योग बुद्धीनें 'समाचरण' (सम्यक् आचरण) करून सर्व कर्में शोधावीं परंतु या 'ज्ञान्यांनीं' त्याप्रमाणें कर्मांचें समाचरण करून दाखविलें असें म्हणतां येणार नाहीं, मग 'जोषण' किंवा शोध तर बाजूलाच राहिला. कारण, या 'सहजावस्थे'च्या तत्त्वज्ञानानें कर्मांतील गुणदोष, नीति-अनीति इत्यादि त्रिगुणात्मक विचारांना 'बाल-बुद्धि' ठरविलें आहे, आणि पुष्कळदां स्मृतिधर्मानें घालून दिलेल्या शहाणपणाच्या मर्यादांचेंहि त्यांनीं उल्लंघन केल्याचें आढळतें. यामुळें त्यांचें स्वकर्माचरणहि लोकांना फारसें मार्गदर्शक झालें नाहीं. उलट, त्यापैकीं कांहींच्या जीवनावरून लोक असें समजूं लागले कीं श्रेयार्थ्यांचें व संसारी लोकांचे मार्ग वेगवेगळे असल्यामुळें जे लोक सांसारिक कर्मांना श्रेयार्थी जीवनास तीं अनुकूल होतील अशी बनविण्याचा प्रयत्न करतात ते एक समाजाचें नुकसान तरी करीत असतात किंवा दंभ तरी करतात.

हजार बाराशें वर्षें अशा अनुभवांतून गेलेल्या हिंदुसमाजाला या

* जुष्=विचार करणें, तपासणें

विषयाचा फेरविचार करण्याची जरूर होतीच. लोकमान्य टिळकांनीं आपल्या गीताभाष्याच्या द्वारें या फेरविचाराला आरंभ केला. ' निष्कामते ' ची अट पूर्ण केल्यास संन्यासाची अपेक्षा न ठेवतां केवळ स्वकर्माचरण हें संसिद्धीचें पूर्ण साधन बनूं शकतें असें गीतेच्या उपदेशाचें सार आहे इतकेंच नव्हे तर त्यावरच गीतेचा विशेष भर आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें.

पण ' निष्कामता ' म्हणजे काय? तिची आध्यात्मिक स्वसंवेद्य खूण कोणती? तसेंच तिचीं बाह्य व्यावहारिक रूपें कोणतीं? समाजाच्या विविध कर्मांत तिला कार्यान्वित करावयाचें झाल्यास कोणत्या धर्मांचें आणि मर्यादांचें पालन करावयाला पाहिजे? या साऱ्या तपशीलांचें स्पष्टीकरण करणें शिल्लक राहतें. निष्कामता इतकी सूक्ष्म वस्तु आहे कीं तपशील दिला तरी मनुष्य स्वतःला फसवूं शकेल, व तपशिलाचें थोडें अधिक पालन करून देखील सकाम कर्म करणारा होऊं शकेल. मग तपशील नसल्यास सामान्य बुद्धीच्या श्रेयार्थ्यानें स्वकर्मचरणाच्या द्वारा संसिद्धीची आशा बाळगणें म्हणजे बाहुबलावर समुद्र तरून जाण्याची आशा करणेंच होय. भौतिक सुखाच्या मागें लागलेल्या आणि खऱ्या खोट्याची पर्वा न धरतां भांडण—तंटे—चढाओढ—कपट—कारस्थान यांचा आश्रय करून भौतिक स्वार्थ व सुख शोधणाऱ्या मानव समाजांत स्वकर्मद्वारा—म्हणजे स्वतःच्या व समाजाच्या मुख्यतः भौतिक सुखांच्याच वृद्धीसाठीं प्रयत्न करणाऱ्या माणसाची श्रेयःसिद्धि कशी होईल? लोकमान्यांनीं जुन्या विचारांत परिवर्तन करण्याचें बीजारोपण केलें खरें, पण तदनुसार वर्तमान-कालाला योग्य असें त्याचें शोधन करण्याला ते जगले नाहींत.

हा आरंभ गांधीजींनीं केला. किंवा, अधिक निश्चित शब्दांत बोलावयाचें तर, तो आरंभ त्यांचे गुरु प. वा. गोखले यांनीं केला व विकास गांधीजींनीं केला. आजच्या हिंदी समाजजीवनांतील अनेक उणीवांचें व दुःखांचे त्यांना सूक्ष्म व एकसमयावच्छेदेंकरून दर्शन झालें आणि त्या प्रत्येकावर उपाय योजण्याकरितां सत्य, अहिंसा व इतर यम-नियम यांचेवर आधारलेल्या वेगवेगळया ' सेवा '—म्हणजे विधायक

कार्यक्रमाच्या संस्था—त्यांनीं स्थापन केल्या. या पंचवीस वर्षांच्या अवधींत त्यांतील पुष्कळशा संस्था ‘ स्वयंसेवा ’, ‘ खडीसेवा ’, आणि ‘ धंदे ’ या तीन्ही भूमिका प्राप्त करून तीन्ही प्रकारच्या सेवकांचें आज त्या कार्यक्षेत्र बनल्या आहेत. स्वकर्मयोग हा सेवेचें आणि श्रेयाचें साधन न राहतां धंद्याचें किंवा पोटभरू व्यापाराचें साधन कसा बनूं शकतो हेंहि त्यांच्या अनुभवांतून पहावयास मिळालें. श्री. अप्पासाहेबांनीं आपल्या निरीक्षणाचा लाभ या पुस्तकाच्या द्वारां आम्हांस दिला आहे. समाजोपयोगी कर्ममार्गांत राहून मनुष्य आपल्या स्वकर्माला स्वपरश्रेयाचें साधन कशा प्रकारें बनवूं शकेल याचें या पुस्तकांत त्यांनीं ‘ दर्शन ’ व त्याचें जणूं भाष्यच रचलें आहे.

हें पुस्तक सर्वांगपूर्ण नसेलहि. यांतील कित्येक विचार पुन: विचार करण्यासारखेहि असतील. तसे असले तरी कर्मद्वारां संसिद्धीचा पद्धतशीर मार्ग रुजू करण्याची त्यांनी सुरुवात करून दिली आहे. समाजांतील एखादा धंदा स्वतःच्या भौतिक सुखांची वृद्धि करण्याकरितांच करणें आणि समाजजीवनाची एखादी खरी उणीव किंवा दुःख दूर करण्याकरितां तो करून एका मर्यादेंत राहून त्यांतून आपला निर्वाह करणें या दोहोंत असलेला भेद हाच स्वकर्मछंद आणि स्वकर्मयोग यांतील भेद होय. श्री. अप्पासाहेबांचें भाष्य संपूर्ण नसलें तरी समाजजीवनांतील उणीवा व दुःखे दूर करणारी कोणतीहि प्रवृत्ति जर ‘ सेवाधर्म ’ म्हणून करण्यांत आली तर ती स्वकर्मयोग बनूं शकेल इतकें दाखविण्यापुरतें तें पूर्ण आहे. याच्या उलट, ‘ सेवा ’ म्हणून मानलेली आजची एखादी प्रवृत्ति जर स्वतःची भौतिक सुखें वाढविण्याकरितांच करण्यांत आली तर तिला धंद्याचें रूप येईल. म्हणून हें पुस्तक फक्त ‘ सेवकां ’ करितांच आहे असें कोणी समजूं नये.

‘ सेवक ’ व इतर वाचकहि हें पुस्तक वाचून हा मार्ग अधिक स्पष्ट व उज्ज्वल करतील अशी मला आशा आहे.

सेवाग्राम,
२–४–१९४५

किशोरलाल घ. मशरूवाला

# लेखकाचें निवेदन

वाचकांपुढें स्वत:चे विचार पुस्तकरूपानें मांडण्याचें धाडस मी हें पहिल्यानेंच करीत आहे. हें लिखाण मी १९४२ च्या जुलै ते सप्टेंबर-मध्यें बेळगांवच्या तुरुंगामध्यें केलें. त्यावेळीं त्या लिखाणाविषयीं मी पुढील-प्रमाणें लिहिलें होतें:—

"मी हे विचार छापण्याचा इरादा धरून लिहिलेले नाहींत. मित्रांचा तसा अभिप्राय पडल्यास व साधनांची अनुकूलता असल्यास पुढेंमागें याहून सुधारलेल्या स्वरूपांत हें लिखाण छापण्यास हरकत आहे असें नव्हे, परंतु मुख्यत: मी तें माझ्या निकटच्या मित्रांच्या व सहकाऱ्यांच्या अवलोकनासाठीं केलें आहे......दहा दहा किंवा वीस वीस वर्षें एकत्र काम करूनसुद्धां निकटच्या सहकाऱ्यांबरोबर कार्याचे आदर्श व पद्धति याबाबत स्वस्थ चित्तानें आमूलाग्र सहविचार करण्याची संधि क्वचितच मिळते. प्रथम वेळ पाहिजे, नंतर चित्ताला स्वस्थता पाहिजे व हीं दोन्ही असलीं तरी बुद्धि सज्ज पाहिजे. हें सर्व जुळून येणें कठीण असतें, म्हणून निकटच्या सहकाऱ्यांशीं सहविचार करण्याचें साधन म्हणूनच हें लिखाण तुरुंगाच्या निवांतपणांत करण्याचें मी योजिलें.

"निबंधलेखनानें विद्यार्थ्याला होतो तसा या लिखाणाच्या निमित्तानें माझा स्वत:चा फायदा झाला आहे. विचार अधिक व्यवस्थित व स्पष्ट झाले आणि, मला वाटतें, निष्ठाही अधिक दृढ झाली.

"लिखाणांतील विचार मी गुरुजनांकडून, सोबत्यांकडून व क्वचित् बालमित्रांकडूनही मला समजले तसे घेतले आहेत. मला ते पटले आहेत व ते पचविण्याचा माझा प्रयत्न चालू आहे या अर्थानें ते माझे आहेत. परंतु माझे आहेत तसेच ते सहकाऱ्यांचेही आहेत, आमच्या विचार सरणीचें हें सामुदायिक प्रतिबिंब आहे, अशी माझी समजूत किंवा आशा आहे."

हस्तलिखित अनेक मित्रांनीं काळजीपूर्वक वाचून पाहिलें. त्यापैकीं बरेच जणांनीं तें छापून घेण्याचा आग्रह केला. कित्येकांनीं दुरुस्त्याही सुचविल्या. त्यांतील कांहीं मी स्वीकारल्या परंतु कांहीं अशा होत्या कीं त्यासाठीं सारें लिखाण नव्यानें लिहून काढावें लागलें असतें. तसें करण्यास लागणारा वेळ मला तुर्त मिळण्यासारखा नाहीं. सध्यांच्या कागदाच्या टंचाईच्या दिवसांत पुस्तक छापण्याचा विचारही माझ्या मनाला शिवला नव्हता, परंतु **महाराष्ट्र ग्रंथ भांडारचे चालक** व राष्ट्रीय वाङ्मयाचे उत्साही प्रकाशक **श्री. दादासाहेब कुलकर्णी** यांनीं पुस्तक लगेच छापून प्रसिद्ध करण्याची इच्छा दर्शविली. प्रकाशनाचें वाजवी खर्च भागतील अशा बेतानें पुस्तकाची किंमत शक्य तितकी कमी ठेविण्याचेंही त्यांनीं आनंदानें मान्य केलें. म्हणून ही प्रथमावृत्ति काढण्यास मी त्यांस संमत्ति दिली आहे. दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास ती कमी किंमतींत व तोपर्यंत सुचणाऱ्या सुधारणांसह काढावी अशी इच्छा आहे. सूज्ञ वाचकांनीं आपापल्या सूचना मला कळवून ठेविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन.

श्री. किशोरलाल मश्रूवाला यांची प्रकृति अत्यंत खालावलेली असतांही केवळ माझ्या विषयींच्या वात्सल्यामुळेंच त्यांनीं मार्मिक व मूलग्राही प्रस्तावना लिहून दिली, त्यामुळें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत महत्वाची भर पडली. तथापि त्यांचे आभार मानणेंही शोभणार नाहीं.

साधकाश्रम<br>
कणकवली<br>
एप्रिल १९४५

सीताराम पुरुषोत्तम उर्फ आप्पा पटवर्धन

# —: अनुक्रमणिका :—


| | | |
|---|---|---|
| १ | सेवाधर्म | १ |
| २ | प्रेमाची प्रगति | ९ |
| ३ | जीव जगत् व ईश्वर | १४ |
| ४ | सेवेचें क्षेत्र व प्रकार | २७ |
| ५ | राष्ट्रवाद व जातिवाद | ३७ |
| ६ | नकली सेवा | ५३ |
| ७ | सेवामार्गांतील खांचखळगे | ६१ |
| ८ | सेवकाची साधनसंपत्ति | ७९ |
| ९ | सेवकाचा चरितार्थ | १०२ |
| १० | विविध मुद्दे | १२८ |
| ११ | सेवक पाहिजेत | १५० |
| | पद्यावली | १७३ |



श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांचा—

आगामी ग्रंथ

## अहिंसा आणि स्वराज्य

प्रकाशकः—ग्रामसेवामंडळ, पो. नालवाडी, जि. वर्धा

# :— आमचें प्रकाशन :—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमज पडेल तर | ना. ह. आपटे | २–० |
| २ | बाल सुहृद् | गो. रा. चोळकर | ०–१२ |
| ३ | जांवई | गं. ल. देवधर | १–४ |
| ४ | समाजधर्म | साने गुरुजी | १–८ |
| ५ | पाकिस्तानची छाया | आय. सी. शेख | २–८ |
| ६ | जीवन संस्कृति | काका कालेलकर | १–२ |
| ७ | स्त्रियांशीं हितगुज | महात्मा गांधी | २–८ |
| ८ | मातृमंदीर | सौ. मालतीबाई दांडेकर | २–८ |
| ९ | पद्यमीमांसा | वि. ज. सहस्रबुद्धे | १–४ |
| १० | आघाडीवर | व्यं. रा. खंडाळीकर | २–० |
| ११ | धर्मवीर संभाजी | गणपतराव बोडस | १–० |
| १२ | पहिलें पाऊल | कामत | ०–५ |
| १२ | प्रतिमा | सौ. मालतीबाई दांडेकर | २–० |
| १३ | इच्छा | श्री. वर्टीकर | २–८ |
| १४ | अग्नियान | कुमारी प्रेमा कंटक | ३–० |
| १५ | माझी जमीन | कै. फाटकशास्त्री | १–८ |
| १६ | विवाहितांचे नंदनवन | राजरत्न वा. वि. जोशी | १–८ |
| १७ | राष्ट्रधर्म | साने गुरूजी | २–० |
| १८ | रमण प्रस्थानत्रयी | ना. वा. गुणाजी | १–४ |
| १९ | आह्वान | पं. जवाहरलाल नेहरू | १–८ |
| २० | विद्यार्थ्यांशीं हितगुज | महात्मा गांधी | २–० |
| २१ | महागाई कां ? | श्री. रा. पोतनीस | १–८ |
| २२ | तेजस्विनी | सौ. मालतीबाई दांडेकर | ४–० |
| २३ | तोंडचा घास | शांतीलाल रा. भंडारी | १–१२ |
| २४ | कला आणि कलावंत भाग २ | रा माधवराव बागल | ३–० |
| २५ | विद्युत रेखा | सौ. मालतीबाई दांडेकर | १–८ |

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.**

# शुद्धिपत्र.

विरामचिन्हें, ऱ्हस्वदीर्घ, अनुस्वार, किंवा एखादें अक्षर इत्यादींच्या चुका, कीं ज्यामुळें अर्थाचा विशेष गोंधळ होत नाहीं, त्यांची पुढें दुरुस्ती केलेली नाहीं. पुढे दिलेल्या महत्त्वाच्या दुरुस्त्या करून घेऊन नंतरच पुस्तक वाचण्यास सुरवात करणें सोयीचें होईल.

| पान | परिच्छेद | ओळ | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| ५ | ३ | १ | सेवा=आत्मविस्तार |
| ६ | २ | ५ | शेवटचा पूर्णविराम गाळावा. |
| ८ | १ | १४ | सम्यग्दृष्टिहि प्राप्त होते. ( पूर्णविराम ) |
| २२ | २ | १२ | कधीं कधीं ( अवतरण चिन्हें नकोत ) |
| २३ | १ | १ | ग्रीस ऐवजी ग्रीक |
| २८ | ३ | ३ | जगांत ,, जगाला |
| ३४ | २ | ४ | जिल्ह्याबाहेरील ऐ. जिल्ह्याबाहेरहि |
| ५३ | २ | २ | होऊन ऐ. होतात. |
| ५४ | १ | ६ | आत्मविश्वासाची ऐ. आत्मविस्ताराची |
| ५४ | २ | १ | महत्वाकांक्षा नंतर विरामचिन्ह नको. |
| ५५ | २ | १ | दृष्टीनेंहि ऐ. दृष्टीनें ही |
| ६१ | २ | ५ | इतर महत्त्व ऐ. इतर कार्यांचें महत्त्व |
| ६१ | २ | ६ | कार्यांला ऐ. या कार्याला |
| ६३ | २ | ७ | एकस्त्याच्या ऐ एक त्याच्या |
| ७५ | ५ | ३ | प्रकरणांत ऐ. प्रकरणांत अन्य |
| ९७ | १ | १७ | स्वत:ला फसविणें. ऐ. स्वत:ला फसविणें, |
| १०२ | ४ | ५ | सेवाकार्य, याला ऐ. सेवाकार्य या अर्थानें |
| १०७ | १ | ६ | नांगर जाते ऐ. नांगर-जोत |
| १०८ | १ | २ | ऐक्याचा उच्छेद ऐ. ऐक्याचा विच्छेद |
| ११० | ३ | ४ | क्षुधेनें ऐ. क्षुधेतें |
| ११० | ४ | १ | भोजनाच्छादनें चिंता ऐवजी भोजनाच्छादने चिंता |

| | | | |
|---|---|---|---|
| ११३ | १ | ६।७ | त्याचे किंवा तशाच स्वरूपाचें कार्य ऐ. आणखी हि तशाच स्वरूपाचीं कार्यें |
| ११३ | २ | १० | आटोक्याला ऐ. आटोक्याच्या |
| ११४ | १ | १७ | कार्यांत ऐ. कार्याला |
| ११६ | २ | ७ | मिळविलेलें ऐ. मिळालेलें |
| ११७ | १ | ३ | वाटतो. ऐ. वाटतो, |
| ११९ | ४ | १ | (१) क्रमांक गाळावा पुढील २, ३ इ. क्रमांक अनुक्रमें १, २ इ. करावे |
| १२३ | ४ | ३ | लोक—ऐ. लोक |
| १२९ | २ | १ | सध्याच्या ऐ. संघाच्या |
| १२९ | २ | ४ | तयारी, ऐ. तयारी. |
| १३२ | १ | ४ | पुढारी हा संस्थेची आहे हे वाक्य गाळावें |
| १३६ | ३ | ६ | क्षेपत ऐ. ऐपत. |
| १४१ | १ | ६ | कंस गाळावे |
| १४२ | २ | ३ | दुराचार, ऐ. दुराचार. |
| १४८ | ३ | ४ | दात्यानें ऐ. दाता |
| १४९ | १ | ३ | संस्थेच्याच ऐ. संस्थेच्या |
| १४९ | ३ | ७ | कायाची ऐ. कार्यांची |
| १४९ | ३ | ७ | विश्वा ऐ. विश्वासाई |
| १४९ | ३ | ९ | जगविण्याचा ऐ. जगण्याचा |
| १५० | २ | ४ | घडेना " ऐ. घडेना । |
| १५१ | २ | ३ | स्वतः— ऐ. स्वतः |
| १६२ | ३ | ८ | कर्तव्य ऐ. कर्तृत्व |
| १७५ | शेवटला | १ | ह्रि ऐ. हि |
| १७६ | या पानावर तीन अभंग दिले आहेत, प्रत्येकाच्या माथ्यावर १, २, ३, असे क्रमांक द्यावे. | | |

# सेवाधर्म

## सेवा कां करावी ? : १

**सेवेचे रूढ प्रकार**:—'देशसेवा' हा अलीकडे सर्वमान्य व बऱ्याच अंशीं रूढ कार्यक्रम झालेला आहे. देशसेवेखेरीजही सेवेचे अनेक प्रकार प्रचलित आहेत: समाजसेवा, ज्ञातिसेवा, हरिजनसेवा, आदिवासीसेवा, दलितसेवा, मजूरसेवा, ग्रामसेवा, महारोगीसेवा, गोसेवा इत्यादि. तसेंच नानाप्रकारचीं स्वयंसेवक मंडळें व सेवासमित्या हरएक ठिकाणीं असतातच. हे सर्व लहानथोर सेवक आपापल्या प्रकारें सेवाकार्यामध्यें मग्न असतात. नांवाच्या पाट्या उभारणाऱ्या या मुखर किंवा संघटित सेवकांहूनही संख्येनें अधिक असे निनांवी सेवा करणारे मूकसेवक ठिकठिकाणीं विखुरलेले असतात. जगांत स्वार्थ जसा सर्वव्यापी आहे तशीच ही सेवावृत्तिही सार्वत्रिक आहे याविषयीं शंका नाहीं.

**मिश्र हेतु**:—यांतील पुष्कळशी सेवा हौसेखातर, कौतुकाखातर, मिरविण्यासाठीं, प्रसिद्धीच्या लोभानें, जिज्ञासेखातर, एका महान् संघाचे घटक होण्यांत वाटणाऱ्या मोठेपणासाठीं, इतरांच्या अनुकरणाखातर, व कित्येकदां तर लोभ, ईर्ष्या, मत्सर इत्यादींमुळें व इतरही अनेक प्रलोभ-

नांमुळें घडत असते हें खरें. तरीही पुष्कळशी सेवा केवळ सहज प्रवृत्तीनें, स्वाभाविक ओढीनें, रहावत नाहीं म्हणून, कळकळीनें व जांणीव-शून्य वृत्तीनें घडत असते हेंही मान्य केलेंच पाहिजे. विशिष्ट प्रसंगीं वरीलपैकीं कोणतातरी एकच हेतु कार्याच्या मुळाशीं असतो असेंही नाहीं. अनेक हेतूंची भेसळ भिन्न प्रमाणांत आढळून येईल. तथापि शुद्धसेवा म्हणूनही एक वस्तू आहेच. अस्सल धातू ही खाणीमध्यें नेहमीं अन्य पदार्थांशीं मिश्रित अवस्थेमध्येंच सांपडत असली, व्यवहारांतही नेहमीं आपण तिच्यामध्यें अन्यधातू किंवा द्रव्यें विशिष्ट प्रमाणांत मिसळीत असलों, तरी त्या धातूचें शुद्ध स्वरूप म्हणून कल्पून आपण तिचे गुणधर्म निश्चित करीत असतों. त्याचप्रमाणें स्वाभाविक, शुद्ध किंवा अस्सल सेवेविषयींच आपल्याला विचार करावयाचा आहे, तिचें स्वरूप निश्चित करावयाचें आहे; तिचा अर्थ किंवा तिची उपपत्ति लावावयाची आहे.

**पश्चात्तापः**— "मी दुसऱ्याची सेवा कां करायची ?" असा प्रश्न कार्यकर्त्यांच्या मनामध्यें पुष्कळदां उद्भवत असतो. सेवाकार्य करतांना सेवकाचा पुष्कळदां हिरमोड होतो. तसा हिरमोड झाला म्हणजे मनामध्यें विचार येतात कीं मी दुसऱ्याची सेवा कां म्हणून करावी ? पोटासाठीं, किंवा पगारासाठी (म्हणजे पगार घेऊन), दुसऱ्याची सेवा कां करावी ? असा प्रश्न उद्भवण्याचा विशेष संभव नाहीं, कारण ती सेवा दुसऱ्याची नसून स्वतःचीच असते. परंतु मी "घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचा उपद्व्याप कां करावा ?" असले विचार खुद्द मला सुचण्याचे अगोदरच माझे आप्तेष्ट व हितचिंतक ते माझ्या मनांत भरवून देत असतात !

वर आम्ही म्हटलें कीं शुद्ध किंवा स्वाभाविक सेवा ही जाणीवशून्य असते. परंतु सेवेचे इतर म्हणजे भेसळीचे प्रकारहि सुरवातीला जाणीवशून्य असूं शकतात. एकादा तरुण सहजस्फूर्तीनें स्वयंसेवकदलांत सामील होतो, परंतु पुढें दुसऱ्याला नायकपद मिळून स्वतःला त्याचें

आज्ञापालन करीत रहावें लागलें, किंवा दलाच्या फोटोमध्यें आपल्याला प्रमुख जागा मिळाली नाहीं, म्हणजे त्याचा उत्साहभंग होतो, व "मला कोणी हा नसता उपद्व्याप सांगितला आहे ?" असें तो मनाशीं म्हणूं लागतो. देशाखातर शिक्षण सोडून देणाऱ्या, तुरुंगयात्रा करणाऱ्या किंवा नोकरीचा राजिनामा देणाऱ्या अनेक तरुणांना मागाहून पश्चात्ताप होतो व त्यांच्या मनामध्यें भलभलते विचार येतातः "देशभक्ती म्हणजे बावळटपणा तर नसेल ? किंवा तो महत्त्वाकांक्षेचाच प्रकार असेल. महत्त्वाकांक्षी पुढारी स्वतःच्या महत्त्ववाढीसाठीं आम्हाला भरीला घालतात व आपला कार्यभाग साधल्यावर आम्हांला दगा देतात," इत्यादि. त्या चळवळीपायीं तो तरुण स्वतःच महत्त्वाला चढला तर त्याची निष्ठा दृढावतेही. परंतु अशा आगंतुक कारणांनीं दृढावलेली निष्ठा दांभिक असण्याचाही धोका रहातो.

वरील प्रश्न दुसऱ्या स्वरूपांत मांडतां येईल. "मी स्वार्थत्याग कां करावा ? दुसऱ्यांच्या सुखासाठीं मी कां मरावें ? मानमान्यता, कीर्ति, लाभावी म्हणून ? कीं माझा त्याग भावी फायद्यासाठीं भांडवल म्हणून उपयोगी पडावा म्हणून ?"

**जाणीवेचे दुष्परिणामः**—समाजसेवा, व तिच्यासाठीं स्वार्थत्याग, करणाऱ्या इसमाला कांहीं काळानें तो त्याग झेपेनासा होऊन त्याचेमध्यें एक प्रकारचा स्पष्ट किंवा सूक्ष्म चिडखोरपणा उत्पन्न होतांना आपल्याला पुष्कळदां आढळतो. कित्येक तर पस्तावून विशेषच स्वार्थपरायण बनतात व सेवाकार्याला कायमचा रामराम ठोकतात. तेंही पत्करलें, परंतु कित्येक अनुभवानें शहाणे होत्साते आपल्या पूर्वींच्या 'बावळटपणाचा' वचपा काढण्याच्या हेतूनें स्वार्थसिद्धीसाठींही सेवेचा बहाणा चालवितात.

अशा 'त्यागी' सेवकांना समाजाच्या वतीनें सांगितलें पाहिजे कीं, "नको तुमची सेवा आणि नको तुमचा त्याग. तुम्हांलाही शीण नको, आणि आम्हांलाही तापत्रय नको."

किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं " स्वार्थत्याग ही अनिष्ट गोष्ट आहे. कोणीही स्वार्थत्याग करणें इष्ट किंवा वाजवी नाहीं. "

मग काय सर्वांनीं केवळ आपापल्या स्वार्थातच दंग रहावें ? जगातील सारीं अनिष्टें तर या स्वार्थसाधूपणामुळेंच घडतात.

यासाठीं स्वार्थत्याग किंवा सेवा याचा अर्थ काय ? ती कां करायची ? याचा उलगडा झाला पाहिजे.

**मातेची अपत्यसेवाः**— स्वार्थत्यागाचा किंवा सेवेचा सर्वोत्तम नमुना किंवा आदर्श म्हणजे आईचे मुलांसाठीं कष्ट. माता मुलांसाठीं रात्रंदिवस अविश्रांत कष्ट करीत असते. मुलें तिचे उपकार मानीत नाहींत, उलट तिच्यावरच चरफडतात, तिचा अपमान करतात, पण त्याचें तिला कांहींच वाटत नाहीं. तींच तिचीं सावत्र मुलें असलीं तर मात्र " यांचें मी इतकें करतें पण यांना जरा तरी कृतज्ञता आहे का ? खाल्ल्या घरचे वासे मोजणारे हे ! " यांसारखे विचार व उच्चार नेहमीं आढळून येतात. थोडक्यांत म्हणजे आमच्या सावत्र आईची स्थिति आमच्या वरील पस्तावलेल्या देशभक्तासारखीच असते. सख्या आईला आपण आपल्या मुलांचें इतकें इतकें करतों अशी जाणीवही नसते; उलट बाळांसाठीं हरतऱ्हेची मेहनत करतांना ती स्वतःला विसरून जाते. उजाडलें केव्हां आणि मावळलें केव्हां याचेंही तिला भान रहात नाहीं. सेवेंत तिला इतका आनंद वाटतो कीं, त्या आनंदांतच ती मग्न असते. याच्या उलट सावत्र आईला सावत्र मुलांसाठीं केलेले यत्किंचित् कष्टही भरपूर जाणवतात व त्यांचें सव्वापट फळ आपल्याला मिळालें पाहिजे अशी तिची अपेक्षा असते, आणि तें— सृष्टिनियमास अनुसरूनच—पाऊणपटच मिळालें कीं तिच्या अंगाचा तिळपापड होतो. एकाला सुरवातींपासून शेवटपर्यंत आनंदच आनंद लुटण्यास मिळतो, तर दुसरीच्या नशीबीं एकसारखे कष्टच असतात.

ह्या फरकाचें कारण दोघींच्या वृत्तीमध्यें किंवा दृष्टीमध्यें आहे हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. आईला मुलांची सेवा करतांना आपण

दुसऱ्या कोणाची सेवा करीत आहों अशी कल्पनाही नसते. ती स्वतःचीच सेवा करीत असते. स्वतःची मलशुद्धि करण्याचें जसें कोणालाच कांहीं वाटत नाहीं तसेंच तिलाही आपल्या बाळांची मलशुद्धि करतांना कांहीं वाटत नाहीं. मूल प्रत्यक्ष अंगावर हगलें मुतलें तरी त्याचें कांहीं वाटत नाहीं.

नव्हे, उलट आनंद वाटतो ! "धन्याः तदंगरजसा मलिनीभवंति— मुलाच्या अंगच्या धुळीनें मलीन होणारी आईबापें धन्य होत." * मुलांसाठीं कष्ट करण्यांत मातेला आनंद वाटतो, धन्यता वाटते. आपल्या सेवेचें फळ मिळविण्यासाठीं तिला वाट पहावी लागत नाहीं, तिला तें तत्क्षणींच—किंबहुना क्षणभर अगोदरच—मिळत असतें. सेवेची संधि हेंच तिचें बक्षिस, तिच्या जीविताचें सार्थक.

**सेवाआत्मविस्तारः**— आईला स्वतःच्या देहाच्या सेवेमध्यें धन्यता वाटत नाहीं ती मुलाच्या शुश्रूषेंत वाटते. अर्थात् मुलांची सेवा व स्वतःची सेवा यांचेमध्यें ती फरक करीत नाहीं असें जें वर म्हटलें तें सर्वस्वी खरें नाहीं. फरक असतो, व तो हा कीं मुलांची सेवा ही स्व-सेवाच असली तरी तो 'स्व' अधिक विस्तृत असतो, आणि हा स्व-विस्तारच अत्यंत आनंददायी असतो.

विवाहित स्त्रीला वांझ स्थितींत, म्हणजे मूल होण्यापूर्वी, मरण येऊं नये म्हणतात तें सर्वथैव सत्य आहे. कुमारीपेक्षां विवाहित स्त्री श्रेष्ठ आहे अशीही समजूत आहे, आणि ती यथार्थच आहे. विवाहित स्थिति ही विवाहपूर्व स्थितीहून अधिक उन्नत अवस्था आहे. केवळ आपापल्या पुरतेंच पहाण्यास सवकलेले दोन जीव आपापलें अल्प स्व-त्व एकमेकांना अर्पण करतात; स्वतःसाठीं जगणारा तरुण व तरुणी दुसऱ्यासाठीं

---

* असें सांगतात कीं, कालिदासाची शाकुंतल नाटकांतील ही उक्ति वाचून जर्मन कवि गटे हर्षानें उड्या मारूं लागला.

जगायला, दुसऱ्याच्या सुखांत स्वतःचें सुख शोधायला शिकतात, व तेणें-करून उभयतांही आपापली समृद्धि व समुन्नति साधतात. उभयतांचें स्वत्व अधिक विस्तृत, विशाल, समृद्ध व समुन्नत बनतें. या दृष्टीनेंच कुमारीपेक्षां पत्नी—व कुमारापेक्षां पति—श्रेष्ठ होय. व त्याच दृष्टीनें अपत्यवती स्त्री ही वांझेपेक्षा श्रेष्ठ होय—मग तें अपत्य जन्मतांक्षणींच मृत्यु पावलें तरी फिकीर नाहीं. * कालपर्यंत आळशी, मिजासखोरे, अल्लड, असलेली तरुणी मातृपदाला पोचतांच तत्काल तिचा स्वभाव आमूलाग्र बदलून जातो. उष्णता फॅरनहीटच्या ३२ अंशाला पोचतांच कठीण बर्फाचें जसें क्षणांत पातळ पाणी बनावें त्याप्रमाणें या नवमातेची सारी मिजास एका क्षणांत विरून ती दुसऱ्या जीवासाठीं जगायला—आणि मरायला —सिद्ध होते. केवळ स्त्री या नात्यानें ती क्षुद्र असेल, पण माता या नात्यानें ती धन्य आहे, त्रिभुवनवंद्य आहे ! असो.

अपत्यसंगोपन हा स्वार्थत्याग व सेवा यांचा अस्सल नमुना. यावरून आपण स्वार्थत्यागाचा अर्थ ठरवूं शकतों. स्वार्थत्यागामध्यें त्याग हा केवळ दिखाऊ आहे. किंवा ती भाषेची सोय आहे. स्वार्थत्याग म्हणजे स्वार्थसाधनच, मात्र तो स्वार्थ ज्यास्त उच्च व त्यांतील स्व ज्यास्त विशाल असतो. अर्थात् स्वार्थत्याग म्हणजे आत्म—विस्तार, अधिक. विस्तृत स्वचा शोध.

आतां सेवा कां करावी व कोणाची करावी, स्वार्थत्याग कां करावा व कोणासाठीं करावा, याचा उलगडा सहजीं होतो. छोट्या स्वनें मोठ्या स्वची सेवा करावी , त्याचेसाठीं स्वार्थत्याग करावा, व तेणेंकरून स्वतःचें श्रेय साधावें. अर्थात् यांतील सेवा किंवा त्याग हा नांवाचाच आहे. सेवा करणें म्हणजे मोठें बनणें—लघुपणाचा त्याग केल्याखेरीज मोठें बनतांच येत नाहीं. कॉलेजांत दाखल होण्यासाठीं शाळेचा त्याग करावा लागतो. गृहिणी बनण्यासाठीं माहेराचा त्याग केला पाहिजे. हाच स्वार्थत्यागाचा अर्थ.

---

* " क्षण एक मिळो प्रेमाचा। वर्षाव पडो मरणांचा। मग पुढें. "

**ऐक्यभावना हा सेवेचा पायाः—** सेवा कोणाची करावी ? ज्याच्या विषयीं प्रेम वाटतें त्याचीच करावी. आणि प्रेम म्हणजे ऐक्य-भावना. आपण व आपल्या प्रेमाचा विषय हे एकच आहों, आपलीं सुख-दुःखें एकच आहेत, अशी समजूत प्रेमाच्या मुळाशीं असते. आईला मुला-बद्दल प्रेम म्हणजे आपुलकी वाटते. आपापल्या कुटुंबीयांबद्दल बहुधा सर्वां-नांच आपुलकी वाटते, मात्र कुटुंबामध्यें कोणाकोणाला गणावयाचें याबाबत भिन्न इसमांची दृष्टि भिन्न असते. उदा० वृद्ध आजीबाईला आपले मुलगे, मुली, नातवंडें, भाचे, पणतोंडें सर्वच आपलीं वाटतात, व म्हणून ती सर्वांसाठींच हरतऱ्हेचे कष्ट करीत असली तरी त्यांत आपली कांहीं हानि झाली, आपण कांहीं स्वार्थत्याग केला, अशी तिची भावना होत नाहीं. उलट तिच्या सुनेला मात्र जावेच्या मुलांसाठीं घेतलेले कष्ट जाणवल्याखेरीज रहात नाहीं.

कांहींना आपल्या जाती किंवा जमातीबद्दल आपुलकी वाटते; ते ज्ञातीसेवेला प्रवृत्त होतात. तर कित्येक देशसेवा हें आपलें ध्येय ठरवितात. कांहीं थोर मनाच्या गृहस्थांची विश्वकुटुंबी भावना असते; तर गीतेनें योग्याचें वर्णन ‘ सर्वभूतात्म भूतात्मा ’ व ‘ सर्व भूतहिते रतः ’—भूतमात्रांबद्दल आपुलकी बाळगणारा व सर्वांच्या हितासाठीं झटणारा— असें केलें आहे. आणि असा योगी हाच आदर्श सेवक होय. ज्याप्रमाणें परमेश्वराची— एकमेवाद्वितीय अशा विश्वकर्त्या गुणातीत ईश्वराची— भक्ति हीच खरी भक्ति, एरवीं तेतीस कोटी देवांपैकी आपापल्या वहिवाटीनुसार किंवा आवडी-नुसार कोणी शंकराला तर कोणी विठोबाला, कोणी मारुतीला तर कोणी महाकालीला भजणारे नाना श्रद्धांचे भक्त असले तरी त्यांच्या सर्वांच्या भक्तीचें अखेरचें निधान, किंवा समर्थन, ज्याप्रमाणें परमेश्वरच होय, त्या-प्रमाणें आपल्या प्रियकराची, मुलाबाळांची, आप्तेष्टांची, सग्यासोयऱ्यांची, ज्ञातिबंधूंची, समाजाची, गांवाची, देशाची, किंवा अखिल मानवजातीची सेवा करणाऱ्या सेवकाचें अखेरचें उपास्यदैवत भूतमात्र किंवा परमेश्वरच होय.—स्पष्टपणें असतें असें नाहीं, परंतु असलें पाहिजे.

**ज्ञानाची आवश्यकताः**—ज्ञान–भक्ति–कर्म ही साधनेची सांखळी आहे. सेवेचा समावेश कर्मामध्यें होतो हें उघडच आहे. मुंबईच्या सोशल सर्व्हिस लीग ( समाजसेवासंघा ) नें स्वीकारलेलें ब्रीदवाक्य " नो, लव्ह, सर्व्ह " —माहिती करून घ्या, कळवळा बाळगा, सेवा करा—या साधन-मार्गाला अनुसरूनच आहे. सेवा–मार्गाच्या अनुशीलनासाठीं योग्य माहितीची, ज्ञानाची किंवा दृष्टीची आवश्यकता आहे. तसेंच भक्ति किंवा योग्य प्रेमही पाहिजे. प्रेम म्हणजे मोह किंवा उमाळा नव्हे तर विवेकयुक्त, निःपक्षपाती व अनासक्त निष्ठा. अशा ज्ञान–भक्तींतून सेवा किंवा सत्कर्म निष्पन्न होणारच. ज्ञान–भक्ति--कर्म हा क्रम केवळ विवेचनाच्या किंवा विचाराच्या सोयीसाठीं लावलेला आहे. वस्तुतः अगोदर पूर्ण ज्ञान, मग पूर्ण भक्ति आणि मग सत्कर्म अशीं क्रमाक्रमानें उत्पन्न होतात असा अर्थ नव्हे. ज्ञान-भक्ति-कर्मांपैकीं प्रत्येक घटक आपापल्यापरी स्वतंत्र, परंतु त्याचबरोबर इतरांना पोषक व इतरां-पासून पोषण मिळविणारा असा आहे. ज्ञानभक्तीखेरीजही सत्कर्म घडूं शकतें व सत्कर्मांमुळें भक्ति अधिक प्रगल्भ बनते व सम्यग्दृष्टिही प्राप्त होते तसेंच भक्ति ज्ञानाखेरीजही आढळते, व ती एका बाजूनें सत्य-ज्ञानाला व दुसऱ्या बाजूनें सत्कर्माला पोषक आहे. तरीही तिच्या पूर्ण प्रगल्भतेसाठीं ज्ञानाची आवश्यकता आहे, व सत्कर्माखेरीज ती वांझ आहे. भक्ति-सेवा-रहित ज्ञान, किंवा माहितगारी, असूं शकते--किंबहुना असली नादान माहित-गारीच जगांतील अनेक आपत्तींचें मूळ आहे--परंतु भक्ति-सेवेखेरीज ज्ञानाचे सार्थक नाहीं व ज्ञानाच्या कंदिलाच्चे अभावीं भक्ति व कर्म हीं आडरानांत शिरून मार्ग चुकण्याची धास्ती असते. अशी ही आत्मोन्नतीची सांखळी म्हणण्यापेक्षां त्रिवेणी आहे. म्हणून सेवक हा ज्ञानी असला पाहिजे व भक्तही असला पाहिजे.

—×—

# प्रेमाची प्रगति : २

**आत्मविस्ताराची उत्कंठाः**—सर्वस्वी स्वार्थी, म्हणजे केवळ आपल्या देहाच्या सुखाच्याच मागें लागलेला, असा कोणीच मनुष्य नाहीं. मनुष्य हा समाजप्रिय व समाजनिष्ठ प्राणी आहे. त्याला एकलकोंडें जीवन रुचत नाहीं. सोबतीखेरीज त्याच्या जीवनाला पूर्णता येत नाहीं व म्हणूनच सोबतीखेरीज माणसाला चैन पडत नाहीं. दुष्टां दुष्ट मनुष्यालासुद्धां स्वत-खेरीज आणखी कोणावर तरी प्रेम करणें, त्याला सुखी करण्यासाठीं झटण, आवश्यक वाटत असते. प्रेम करण्यास कोणी माणूस मिळालें नाहीं तर अखेरीस तो एकाद्या कुत्र्यामांजरावर तरी प्रेम केल्याखेरीज, त्याची हरतऱ्हेची सेवाचाकरी व लाड केल्याखेरीज, रहाणार नाहीं.

एवंच प्रत्येक मनुष्य आपली स्वत्वभावना आपल्या साडेतीन हात देहापलीकडे पसरवूं पहात असतो. तो त्याचा स्वभावच आहे. तें त्याच्या स्व-रूपाला अनुसरूनच घडत असतें. जीव हा मुळांत शिवस्वरूप आहे. त्याला देहामध्यें कोंडला तरी तो तेथें स्वस्थ चित्तानें राहूं शकत नाहीं, तुरुंगाच्या मर्यादा ओलांडून विस्तीर्ण क्षेत्रामध्यें स्वैरसंचार करण्याची स्वाभाविक उत्कंठा तो दाबूं शकत नाहीं. या उत्कंठेचेंच नांव प्रेम व त्या प्रेमाचें फळ सेवा होय.

**प्रगतीचे टप्पेः**—परंतु या प्रेमाच्या परी, पायऱ्या किंवा इयत्ता असतात. थोर इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी हा स्वतः ब्रह्मचारीच होता परंतु त्यानें एके ठिकाणीं मार्मिक तऱ्हेनें म्हटलें आहे कीं "मातेचें पवित्र चुंबन मुलाला प्रेमाचा पहिला पाठ देतें. आपल्या प्रियकरिणीच्या पहिल्या पवित्र चुंबनानें तरुणाला जीवनाबद्दल श्रद्धा वाटूं लागते." हें एका दृष्टीनें खरेंही आहे, परंतु प्रेम म्हणजे आसक्ति, मोह, उमाळा किंवा

विकार नव्हे. प्रत्यक्ष व्यवहारांत आढळणारे प्रेमाचे नमुने हे असेच उमाळ्याच्या स्वरूपाचे असतात हें खरें. मातृप्रेमाची सरी दुसऱ्या कशाला येईल ? तथापि तेंहि आदर्श प्रेम नव्हे, आदर्शाकडे प्रगति करण्याचा तो एक जोराचा परंतु अडाणी प्रयत्न आहे; किंवा प्रेमाच्या पाठशालेंतील तो पहिला पाठ आहे. मातृप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम, पतिपत्नीप्रेम हे आत्मविकासाच्या मार्गातील प्राथमिक टप्पे आहेत, परंतु अंतिम उद्दिष्ट मात्र नव्हेत. या टप्प्यांशींच जर आपण 'अखेर गांठली' अशा भावनेनें थबकून राहिलों तर आपली स्थिति 'ज्ञानलवदुर्विदग्धासारखी' (अल्पज्ञानानें शेफारून गेलेल्यासारखी) होईल. प्रेमाचा प्रवाह हा एकसारखा पुढेंपुढें वहाता राहिला पाहिजे. कुटुंबाकडून सग्यासोयऱ्यांकडे, आप्तेष्टांकडे, शेजापाजाऱ्यांकडे ग्रामस्थांकडे, ज्ञातिबंधूंकडे, देशबांधवांकडे, अखिल मानवजातीकडे व अखेरीस भूतमात्राकडे तो पुढें पुढें सरत गेला पाहिजे. तो मध्येंच थबकला तर सांचीव पाण्याप्रमाणें कलुषित व अनर्थावहही होऊं शकतो.

पत्नी, माता या धन्य आहेत असें आपण मागील प्रकरणांत म्हटलें व तें अगदीं खरेंही आहे. पहिली यत्ता पास होऊन दुसरींत बसणारा बालक अभिनंदनास पात्र आहे; एम्. ए. ची डिग्री मिळविणाऱ्या इतकाच पात्र आहे. परंतु दुसऱ्या यत्तेंत प्रवेश म्हणजे विद्वत्तेची इतिमर्यादा असें त्या बालकाने समजता नये व पदवीधरानेंही समजतां नये. त्यांनीं आपापला विद्याव्यासंग अखंड पुढें चालविणेंच विहित आहे. त्याच न्यायानें मुलाबाळांच्या भरणपोषणासाठीं रात्रंदिवस झटणारीं आईबापें आदरणीय असलीं तरी त्यांनीं निःस्वार्थपणाची कमाल मर्यादा गांठली असें नाहीं किंबहुना ही त्यांची कुटुंबसेवा त्यांच्याच श्रेष्ठ कर्तव्याला बाधकही होऊं शकेल. नव्हे, प्रत्यक्ष अनुभव असाच आहे कीं आपल्या मुलांची निष्ठापूर्वक सेवा करणारीं आइबापें परक्या मुलांचे हाल करण्यासही मागेंपुढें पहात नाहींत. वांझेहून माता श्रेष्ठ असली तरी मातेहून संन्यासिनी हजारपटीनें श्रेष्ठ आहे, कारण ती जगदंबा ( जगाची आई ) आहे. येशू ख्रिस्ताची गोष्ट

सांगतात कीं तो धर्मप्रवचनें करीत फिरत असतां एकदां त्याची आई त्याला भेटण्यास आली. " तुमची आई तुम्हांला भेटण्यासाठीं आली आहे " असें कोणी येऊन सांगतांच ख्रिस्त म्हणाला " माझी आई ? मी आई बिई कोणी ओळखीत नाहीं ! "

**प्रेमाच्या पायऱ्याः**—अपत्यप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम, या प्रेमाच्या चढत्या पायऱ्या आहेत. परंतु पायऱ्या ज्याप्रमाणें उन्नतीचें त्याचप्रमाणें अवनतीचेंही साधन होऊं शकतात. कोणत्याही एका पायरीवर उभा असलेला मनुष्य चढतही असेल किंवा उतरतही असेल. प्रेमविकासाची कोणतीही मर्यादा—कुटुंब, गांव, जात, देश इत्यादि—प्रगतीचा एक टप्पा या दृष्टीनें स्तुत्य आहे, परंतु त्याच ठिकाणीं कायमचा मुक्काम ठोकून राहण्यास परवानगी नाहीं. आणि तो मुक्काम जर पिछेहाटीचा असेल—देशाकडून जातीकडे किंवा जातीकडून कुटुंबाकडे परतलेला असेल—तर तो विशेषच शोचनीय व निषेधार्ह आहे.

आपण जीं दुष्ट किंवा निर्दयपणाचीं कृत्यें समजतों तींही मुळांत प्रेमांतूनच उद्भवतात. तें प्रेम संकुचित असतें इतकेंच. दरवडेखोर जो लूट व लुटीसाठीं मारहाण व खूनही करण्यास प्रवृत्त होतो तोही बहुधा प्रेमामुळेंचः आपल्या मुलाबाळांना सुख व्हावें, किंवा आपल्या प्रियकरणीची दागिन्यांची हौस पुरी करावी या ( त्याच्या समजुतीनें ) निःस्वार्थी हेतूनेंच तो प्रेरित झालेला असतो. हिटलर इतर राष्ट्रांना राक्षससा वाटो, परंतु तोही आपल्या जर्मन राष्ट्राला वैभवाला चढविण्याच्या ' उच्च व निरपेक्ष ' हेतूनेंच स्वतःच्या सुखसोयीची किंवा वैयक्तिक स्वार्थाची तिळमात्र पर्वा न करतां व स्वतःच्या जिवावरही उदार होऊन अविश्रांत झटत आहे. ज्ञातिनिष्ठ पुढारीही ज्ञातिहितासाठीं आपल्या ' सर्वस्वाची आहुति ' देण्यास सदैव सिद्ध असतात. अशा तऱ्हेनें कुटुंबनिष्ठा, ज्ञातिनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा हे आत्मीयतेच्या विकासाचे टप्पे आहेत. कुटुंबनिष्ठेपेक्षां ज्ञातिनिष्ठा व ज्ञातिनिष्ठेपेक्षां राष्ट्रनिष्ठा श्रेष्ठ आहे हें खरें, पण अशा संकुचित निष्ठांतून—मग त्या निष्ठा कितीही विस्तृत असोत—अनर्थच उद्भवतात.

**व्यापक कीं संकुचित ? :**—महत्त्वाचा प्रश्न निष्ठा किती विस्तृत आहे हा नसून तिचें तोंड कोणत्या बाजूला वळलेलें आहे, ती प्रसरणशील आहे कीं संकोचशील आहे, पूर्वाभिमुख आहे कीं पश्चिमाभिमुख आहे, हा आहे. कारण एका बाजूनें जें प्रेमसें दिसतें तें दुसऱ्या बाजूनें वैरही असतें. प्रेमाच्या नाण्याच्या मागील बाजूवर द्वेषाचाही छाप असतो. असें वैर-युक्त प्रेम हें खऱ्या प्रेमाचें विकृत किंवा गढूळ स्वरूप आहे. प्रेमाचें किंवा सेवेचें क्षेत्र कितीही मर्यादित असलें तरी हरकत नाहीं, आपापल्या आवांक्याप्रमाणें कोणी आपल्या कुटुंबाची, सग्यासोयऱ्यांची, आप्तेष्टांची, ज्ञातीची, गांवाची, पंचक्रोशीची, जिल्ह्याची, प्रांताची किंवा राष्ट्राची सेवा पत्करली तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. असली सर्व सेवा स्पृहणीयच आहे, पण ही निष्ठा श्रेष्ठ निष्ठेला बाधक असतां नये. आपली ज्ञातिनिष्ठा ही ज्ञातिव्यापक असावी, ज्ञातिसंकुचित असूं नये. मुलावरील प्रेम हें पुतण्याभाच्यांच्या द्वेषाला कारणीभूत होऊं नये, उलट "आपलीं मुलें तशींच इतरांचीं" या विचारानें इतरांच्या मुलांवरही तितक्याच कळकळीनें प्रेम करण्यास शिकण्याचें तें साधन व्हावें. मित्रप्रेम हा ही मनुष्यमात्राविषयीं मित्रबुद्धि मनांत ठसविणारा धडा व्हावा. "नदीमुखेनैव समुद्रमाविशेत्" या न्यायानें जिल्ह्याच्या किंवा प्रांताच्या सेवेच्या मार्गानेंच आपण देशसेवेकडे प्रगति करावी. परंतु देशसेवा हाही झाला तरी समुद्रच आहे, महासागराचा तो एक हिस्सा आहे. हा महासागर म्हणजे अखिल मानवसमाज होय. परंतु हिंदी महासागर व प्रशांत, अटलांटिक इत्यादि महासागर हेही मुळांत एकमेकाशीं जोडलेले एकाच विश्वसागराचे फांटे आहेत. त्याचप्रमाणें मानवसमाज हाही भूतमात्रांचा एक अवयव आहे. म्हणून आपल्या प्रेमाची व सेवेची परिसमाप्ति सर्वभूतहितसाधनेमध्येंच झाली पाहिजे, व त्याचे अलीकडील प्रत्येक टप्पा या अंतिम साध्याला अविरोधी व पोषक असाच असला पाहिजे.

**आत्मा वारे द्रष्टव्यः**—किंवा अपत्य, बंधु, मित्र देशबांधव यांस त्या विश्वात्म्याच्या प्रतिमा समजूनच त्यांची उपासना केली पाहिजे. पर्व-

ताच्या माथ्यावर पडलेलें पाणी तात्पुरतें गटार, नाला, वहाळ नदी इत्यादींना जाऊन मिळतांना दिसत असलें तरी त्याचें अंतिम ध्येय ज्याप्रमाणें विश्वसागराला पोंचून तद्रूप होण्याचेंच असतें व त्या ध्येयाच्या पूर्ततेसाठींच तें गटारं नाले-नद्यांचा तात्पुरता आश्रय घेत असतें, त्याचप्रमाणें कुटुंब, ज्ञाति, राष्ट्र इत्यादींच्या सेवेचा अंतिम हेतु—मग तो हेतु सेवकाच्या मनामध्यें व्यक्त असो वा अव्यक्त असो—विश्वात्म्याची सेवा व त्याशीं तद्रूपता साधणें हाच आहे. यालाच कोणी ईश्वरप्राप्ति किंवा आत्मदर्शन अशींही नांवें देतात. पति, पुत्र, बंधु, मित्र हे ईश्वराचे प्रतिनिधि या नात्यानेंच प्रेम- व सेवापात्र आहेत. उपनिषदांमध्यें तर स्पष्ट सांगितलें आहे. कीं "नवा रे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति, आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति—पतीवरील प्रेम हें पतिमूलक नसून परमात्ममूलक आहे." पतीप्रमाणेंच बाप, भाऊ इत्यादि प्रियजनांच्या बाबतींत सर्व प्रेमाचें मूळ आत्मा किंवा परमेश्वरच असल्याचें सांगून शेवटीं शिफारस केली आहे कीं तो "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मंतव्यः निदिध्यासितव्यः" त्या प्रियतम आत्म्याचें दर्शन, श्रवण, मनन, चिंतन करा.

सेवायोगाचें रहस्य पूर्णपणें समजून घेण्यासाठीं आपल्यालाही जीव, जगत् व ईश्वर यांचें स्वरूप व परस्परसंबंध जाणून घेणें अवश्य आहे.

—×—

# जीव, जगत् व ईश्वर : ३

**देहाचें ऐक्यः**—आपल्या देहाचे निरनिराळे अनेक अवयव आहेत. हे अवयव व भाग बाहेरून भिन्न व अलगसे दिसले तरी आंतून सर्व एकत्र जोडलेले, परस्परावलंबी व परस्परपोषक व या अर्थानें एक, आहेत. हात, पाय, डोळे इत्यादि तुटक अवयव एका टोपलींत एकत्र केले तर तो देह होणार नाहीं, फक्त एक ढीग होईल. ढिगांतील वस्तु परस्परां शेजारीं असल्या तरी परस्पर–संबद्ध नसतात. देहाचें तसें नाहीं. देहाच्या भिन्न भागांमध्यें किंवा अवयवांमध्यें परस्परसंबंध असतो, विशिष्ट रचना असते, एकच तत्त्व—प्राण—साऱ्या शरीरामध्यें वावरत असतो. म्हणजेच देह हा अनेकपेशी, ग्रंथी, अणू इत्यादींचा बनलेला असला तरी एक आहे.

सर्व जिवंत वस्तूंचें असेंच आहे. जिवंत झाड हें एक आहे. तें तोडून त्याच्या लाकडांचा ढीग केला तर तीं लाकडें एकत्र असलीं तरी एक नाहींत. भिन्न वस्तूंच्या अभिन्नत्वाचा, अनेकांतील ऐक्याचा, हा एक अजब नमुना आहे. हा सर्वांत मोठा सृष्टि–चमत्कार आहे.

**ऐक्याच्या परीः**–परंतु या ऐक्याच्या परी असतात. दूर्वांसारख्या वनस्पतीपेक्षां आंब्याचा वृक्ष अधिक प्रमाणांत एक आहे. दूर्वांचा एक तुकडा तोडून मातींत रोंवला तर तो स्वतंत्रपणें जगूं शकतो. दूर्वांमध्यें पाळें, खोड, पानें यांसारखे अवयवभेद व प्रत्येक अवयवाचीं स्वतंत्र कार्यें असतात. परंतु दूर्वांहून साध्या स्वरूपाच्या, शेवाळासारख्या किंवा सांचीव पाण्यावर तरंगणाऱ्या 'कऱ्या' सारख्या, वनस्पतींमध्यें हे अवयवभेद इतके स्पष्ट किंवा तीव्र नसतात, व एक भाग आपल्या जीवनासाठीं इतर भागांवर विशेषसा अवलंबून नसतो. दूर्वांमध्यें हा भेद, व त्याबरोबरच परस्परावलंबित्व

म्हणजे अभेद, अधिक असतो. आंब्याच्या झाडामध्यें पाळें, खोड, फांद्या, डहाळ्या, पानें, फुलें, फळें व बीजें यांमधील भेद अधिकच स्पष्ट होतो व तीं एकमेकांवर विशेषच अवलंबून असतात, एकाशिवाय दुसऱ्याचें चालणार नाहीं अशी स्थिति असते. तथापि हें परस्परावलंबित्व आंब्याच्या झाडामध्येंहि मर्यादितच असतें. आंब्याच्या वृक्षाच्या मोठमोठ्या फांद्या तोडून टाकल्या तरी बाकीचा भाग तसाच जिवंत व वाढत राहतो; तसेंच आंब्याच्या डहाळ्यांचीं कलमें करून तीं कापून निरनिराळीं लावली तर आपापला स्वतंत्र संसार थाटूं शकतात. कित्येक झाडांचे तुकडेही जमिनींत लाविल्यानें तितकीं स्वतंत्र झाडें बनतात. पशु किंवा मनुष्य यांच्या देहाचें तसें नाहीं. पशुदेहाचा एक अवयव कापून काढला तर शिल्लक भाग स्वतःला कमी पडणारे अवयव निर्माण करून घेऊन आपलें स्वतंत्र जीवन संभाळूं शकत नाहीं. ( सत्ययुगांतील दिव्य औषधींच्या प्रभावाची गोष्ट सांगतात कीं एका मांजराची शेपटी तुटली तेव्हां एक औषधी जखमेवर लावतांच तेथें लगेच शेपटी फुटली ! आणि तुटून पडलेल्या शेपटीच्या मुळाला औषधि लावतांच तेथें मांजर फुटलें ! परंतु कलियुगांतील भ्रष्टाकारामुळें औषधींचाही पूर्वींसारखा गुण राहिलेला नाहीं ! ) मनुष्याच्या किंवा पशूच्या देहामध्यें प्रत्येक अवयवाचें कार्य भिन्न व इतर अवयवांवर सर्वस्वी अवलंबून असतें. त्या देहाचीं शकलें स्वतंत्रपणें जगूं शकत नाहींत. तथापि या देहाचे हातपाय, डोळे, कान, नाक यांसारखे एक किंवा अधिक अवयव जाया झाले तरी बाकीचा देह अनुगमन न करतां व्यंगजीवनही चालवूं शकतो. नखें, केस या सारख्या फालतू अवयवांची तर तो मुळींच पर्वा करीत नाहीं व मूळचे दांत पडले तरी विकत दांत घेऊनही काम चालवितो. तरी पण मनुष्यदेह हा प्रमाणांत बऱ्याच अंशीं एक आहे. या ऐक्याची एक खुबी अशी आहे कीं त्याचा प्रत्येक अवयव किंवा भाग हा विशिष्ट स्वरूपाचाच असतो—हुबेहुब त्याच्यासारखी दुसरी वस्तु त्रिभुवनांत दुसरीकडे सांपडणार नाहीं. दोन माणसाचे तोंडवळे कधीं एकसारखे

आढळत नाहींत असें आपण म्हणतों—चेहरा पाहिला कीं सबंध देह आपण ओळखूं शकतों, हातपाय, पोट-पाठ, नाक-कान सर्वांची आपल्याला चेहऱ्या-वरून ओळख पटते. परंतु केवळ चेहरेच नव्हत तर दोन माणसांचे कोणतेही अवयव किंवा भाग एकसारखे असत नाहींत. आंधळे लोक इतरांना केवळ हस्तस्पर्शानें ओळखूं शकतात. चांभार माणसाला पावलांवरून ओळखतो. स्वरावरून, चालण्याच्या ढबीवरून, पावलांच्या आवाजावरून खाकरण्यावरून आणि अशा अनेक किरकोळ चिन्हांवरून परिचितांना माणसाचीं ओळख पटूं शकते. धूर्त माणसें चेहऱ्यावरून स्वभाव, दृष्टीवरून वृत्ति, स्वरावरून शिक्षण, चालीवरून श्रीमंती—गरीबी, ओळखतात हा तर नित्याचा अनुभव आहे.

**साऱ्या सृष्टीची एकता:**—मनुष्यदेह जसा एक आहे तशी सारी सृष्टिहि एक आहे असें ज्ञानी लोकांचें सांगणें आहे. किंबहुना मनुष्य देहापेक्षांही अधिक पूर्णपणें अखिल सृष्टि ही एकजीव आहे. मातीच्या एका गणपतीची सोंड काढून दुसऱ्या गणपतीला जोडून देणें कारागिराला शक्य आहे, पण एका माणसाचें नाक दुसऱ्या माणसाला लावून देणें शस्त्रवैद्यांनांहि (अद्याप तरी) शक्य नाहीं. त्याचप्रमाणें, मात्र त्याहून किती तरी अधिक कांटेकोरपणानें, सृष्टींतील प्रत्येक गोष्ट ही निश्चित वेळीं, निश्चित जागीं, मूलभूत योजनेला अनुसरून विशिष्ट प्रकारेंच घडत असते. सृष्टीमध्यें कांहींही फालतू नाहीं, कोणतेंही व्यंग नाहीं; सर्व कांही व्यवस्थित, नियमित, यथाकाल, यथायोग्य, यथास्थान रचिलेलें आहे. एकासारखें दुसरें नाहीं, एकाची जागा दुसऱ्यानें भरून निघणार नाहीं; प्रत्येक कस्पटालाहि विशिष्ट आत्यंतिक महत्त्व आहे. प्रत्येक वस्तु अपरिहार्य आहे, तिच्या-खेरीज जगरहाटी खोळंबून पडेल. घड्याळाचा एकादा बारीकसा स्क्रू गेला तरी सेकंड काट्याची चपल चाल अडकून पडते. कदाचित् एकादा हिक-मती वॉचमेकर स्क्रू ऐवजीं तारेचा तुकडा रोवूनही काम चालवून घेईल. पण या सृष्टीच्या घड्याळांतील स्क्रू गळून पडला तर दुसरा तारेचा तुकडा

सृष्टीबाहेरून आणाल कोठून ? परंतु या घड्याळामध्यें ढिला स्क्रूच आढळणार नाहीं—कालाच्या अंतापर्यंतच्या गॅरंटीचें हें घड्याळ आहे. किल्ली सुद्धां त्याला एकदांच कायमची दिलेली आहे !

ही सृष्टिव्यवस्था अज्ञानी माणसाला समजूं शकत नाहीं. परंतु ज्ञानाची जसजशी प्रगति होते तसतसे सृष्टपदार्थांतील परस्पर-संबंध क्रमाक्रमानें खुलूं लागतात. उदा०:—वनस्पतींच्या पानांच्या आकृतीवरून त्याच्या बियांची आकृति ताडतां येते, बियांवरून झाडाचें खोड, पानें, मुळें कशीं असतील तें सांगतां येतें. गुलाबाला कांटे कां ? नारळीच्या झाडाला फांद्या कां नाहींत ? आंबा मधुर कां व काजरा कडू कां ? या सर्वांचीं कारणें व सभोवारच्या परिस्थितींशीं असलेले त्यांचे अनिवार्य संबंध ज्ञानाच्या प्रगतीबरोबर अधिकाधिक स्पष्ट होत जातात. वनस्पतिशास्त्रज्ञ नारळाचें फळ पाहून नारळीच्या झाडाचें चित्र रेखाटूं शकेल, किंवा तें जेथें वाढतें तेथील जमिनीचें किंवा हवापाण्याचें वर्णन करूं शकेल. मनुष्याला आपण त्याच्या चेहऱ्यावरून ओळखतों, परंतु अधिक परिचयानें ज्याप्रमाणें त्याच्या कोणत्याहि एका अवयवावरून ओळखतां येतें त्याचप्रमाणें एखाद्या प्रदेशाची ओळख त्यांतील एखाद्या झाडावरून किंवा प्राण्यावरूनहि करतां येईल. प्रत्येक झाड किंवा प्राणी हा त्या प्रदेशाचा एकेक चेहराच आहे, व सर्व मुलूख हा एक देह आहे.

परंतु पूर्ण देह मात्र नव्हे, मोठ्या देहाचा तो एक अवयव मात्र आहे. सारें विश्व हा पूर्ण देह आहे, व विश्वांतील प्रत्येक वस्तु त्या देहाचा एक चेहराच आहे. या साऱ्या विश्वाला गीता व उपनिषदांमध्यें पिंपळाच्या वृक्षाची—अश्वत्थाची—उपमा दिलेली आहे. इंग्लिश कवि वर्ड्स्वर्थ एका पडक्या भिंतीवर रुजलेल्या गवताला उद्देशून म्हणतोः—"अरे गवता, तुझ्याविषयीं मला पूर्ण ज्ञान झालें तर मला जीव, जगत् व ईश्वर यांचेंहि संपूर्ण ज्ञान होऊन जाईल."

**विश्व चेतन आहे**:—वृक्षाची किंवा देहाची जी एकता आहे ती त्याच्या जिवंतपणामुळें, सचेतनत्वामुळें आहे. मृतदेह हा एक नाहीं. थोड्याच अवधींत त्याची माती होऊन जावयाची आहे, किंवा माती, पाणी, हवा,

इत्यादि पंचमहाभूतांमध्यें तो विरून जावयाचा आहे. या महाभूतांना एकत्र धरून त्यांचा देह बनविणारा त्या देहांतील प्राणच आहे, तो प्राणच हवा, पाणी, माती इत्यादींतून तो देह घडवीत असतो.

विश्वरूप अश्वत्थ किंवा देह, हा सुद्धां चेतनच आहे. कारण चैतन्या-खेरीज ऐक्य, व्यवस्था, रचना, योजना हीं संभवत नाहींत. सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे, ग्रह यांच्या गती, ऋतुचक्र, पीकपाणी, सृष्टीच्या विविध शक्ती व त्यांचे धर्म यांचा जसजसा अभ्यास करावा तसतशी या विश्वदेहाची सुयंत्रता अधिकाधिक प्रत्ययाला येऊं लागते. या विश्वदेहांतील जें चैतन्य, या पसाऱ्यांतील जें ऐक्यतत्त्व, त्याचेंच नांव ईश्वर.

अश्वत्थ वृक्षाच्या अनंत मुळांतून व पानांतून, खोड, शाखा व फांद्यांतून, फुलांतून व फळांतून ज्याप्रमाणें एकच मध्यवर्ती व सर्वव्यापी चैतन्य संचरत असतें त्याचप्रमाणें या विश्वाच्या अनंत पसाऱ्यामध्येंहि एकच चैतन्य व्यापलेलें आहे; व सर्वांना तगवून धरीत आहे. विशाल अश्वत्थ वृक्षसुद्धां राईएवढ्या एका बियामध्यें सामावलेला असतो, त्याचप्रमाणें हा विश्वव्यापी परमेश्वरहि " अणोरणीयान् महतो महीयान् "—अणुहूनहि बारीक व विशालाहून विशाल आहे.

त्या ईश्वराचें वर्णन करण्यास " पृथ्वीएवढा कागद व सागराइतकी शाईहि पुरणार नाहीं. " परंतु येथें आपल्याला फाऊन्टनपेनांतील शाईनें सध्यांच्या युद्धकालीन महागाईच्या कागदावर थोडक्यांतच सेवकाच्या सेवाचरणाला आधारभूत असलेली श्रद्धा स्पष्ट करावयाची आहे. हें जग म्हणजे निव्वळ गोंधळ किंवा गलबला नव्हे; ती एक सुसंघटित रचना आहे; तिला शास्ता आहे; तिच्यामध्यें विकल्प नाहींत, अपघात नाहींत. सृष्टिकर्ता चिन्मय ईश्वर सर्वत्र भरलेला आहे, तो आम्हां सर्वांचा आधार आहे, त्यानें आम्हांला निर्माण केलें, तोच आम्हांला पोषण देतो, कांहीं कालानें आम्ही परत त्याच्यामध्येंच विरून जाऊं. आम्ही नश्वर असलों तरी तो शाश्वत आहे, आम्ही दुर्बल असलों तरी तो सर्वशक्तिमान् आहे, आम्ही अपूर्ण असलों तरी तो पूर्ण आहे, आम्ही दुःखी असलों तरी तो आनंदघन आहे, आम्ही स्खलनशील असलों तरी तो योगेश्वर आहे. परंतु तो आमच्याहून

वेगळा नसल्यानें आम्हीच शाश्वत, पूर्ण, आनंदमय, सर्व कांहीं आहों ईश्वर म्हणजे आमचेंच सर्वोच्च व व्यापक स्वरूप. त्या स्वरूपाच्या साधनेलाच धर्म, नीति, इत्यादि नांवें आहेत.

**मानवी कुटुंबः**—आपण सर्व माणसें त्या ईश्वराची लेकरें, म्हणून परस्परांचीं भावंडें आहों.—भावंडेंच कां ? आपण सर्व सर्वस्वीं एकच आहों. एकाच ग्रंथाच्या जशा अनेक प्रती असतात, किंवा एकाच छापाचीं अनेक नाणीं असतात, त्याचप्रमाणें निरनिराळीं माणसें हीं एकाच मनुष्यत्वाच्या असंख्य प्रती आहेत. एकाच ग्रंथाच्या अनेक आवृत्ती निघतात, त्याप्रमाणें माणसांचेहि अनेक वंश निर्माण झालेले आहेत. किंवा या ग्रंथांच्या कागदांत फरक जाणवत असले तरी आंतील मजकूर सगळीकडे एकच आहे. माणसांमाणसांमध्यें नानाप्रकारचे फरक असतात हें अगदीं खरें, पण एका झाडाच्या पानामध्येंहि फरक असतात, एका पानाच्या हुबेहूब सारखें दुसरें पान सांपडणार नाहीं. ईश्वराच्या सृष्टींतील प्रत्येक वस्तूला—काडी कस्पटालासुद्धां वैशिष्ट्य आहे. व्यावहारिक कामचलाऊ दृष्टीनें एका माणसाऐवजीं दुसरा माणूस, एका कारकुनाऐवजीं दुसरा कारकून, किंवा एका हमालाऐवजीं दुसरा हमाल चालूं शकतो. परंतु त्या हमालाच्या कुटुंबीयांना एकाच्या ऐवजीं दुसरा चालेल का ? सारांश, माणसांमाणसांमध्यें कितीहि पृथक्पणा असला तरी वृक्षाचीं जशीं पानें तशीं आपण सारीं माणसें एकाच मानववंशवृक्षाचीं पानें आहों.

मानवी कुटुंब हा अलंकारिक शब्दप्रयोग आहे असें समजण्याचें कारण नाहीं; तो वस्तुस्थिति-निदर्शकच आहे. मनुष्य हा सर्वस्वी समाजनिष्ठ व समाजावलंबी प्राणी आहे. पशुजीवनापेक्षां मनुष्याचें जीवन कितीतरी अधिक समृद्ध आहे, आणि या समृद्धतेचा आधार परस्पर सहकार्यावर आहे. माझें घर व आहार; घरांतील सामान, कपडेलत्ते व दिवाबत्ती; चष्मा, घड्याळ व फौंन्टनपेन; पुस्तकें व वर्तमानपत्रें; सिनेमा व नाटकें; रस्ते, पूल, मोटारी, आगगाड्या व आगबोटी; टपाल, तार, टेलिफोन व रेडिओ—सुखसोयींनीं पूर्ण अशा या आपल्या समृद्ध जीवनाच्या मुळाशीं साऱ्या मानवजातीचे युगानुयुगांचे सहकारी श्रम साठविलेले आहेत.

मनुष्याला कळत असो वा नसो, इच्छा असो वा नसो, तो समाजाची सेवा घेत असतो व करीत असतो, समाजापायीं स्वतः दुःखें भोगतो व स्वतःपायीं समाजाला दुःखें भोगण्यास लावीत असतो. ज्यांनीं आजवर वाफेचें एंजिन, वीज, फोटोग्राफी, ध्वनिमुद्रण इत्यादि क्रांतिकारक शोध लावले ते पूर्णपणें स्वार्थी इसम होते असें क्षणभर मानलें तरी त्यांच्या शोधाचा फायदा जगाला मिळाल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. स्वतःच्या फायद्यासाठीं तरी त्या शोधांचा फायदा इतरांना देणें त्यांना अनिवार्य होतें. एवढ्या महत्त्वाचे शोध इतरांना सांगितल्याखेरीज त्यांना चैन पडलें नसतें तें निराळेंच. माणसांचें जीवन हें परस्परसंमिश्र असल्यानें अत्यंत स्वार्थी मनुष्यहि आपला स्वार्थ इतरांच्या स्वार्थाखेरीज साधूंच शकत नाहीं. मी सहज स्फूर्तीनें किंवा स्वतःच्याच करमणुकीसाठीं गायिलों तरी माझा कंठ सुस्वर असेल तर मी आसपासच्या लोकांनाहि आनंदित करीन व कर्कश असेल तर लोकांचीं डोकीं उठवीनहि. व्यापार हा माणसांमाणसांमधील सहकार्याचा एक महत्त्वाचा विभाग आहे. अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे कीं विनिमय—म्हणजे कसलीहि खरेदीविक्री ही उभयपक्षांना फायदेशीर असते. हा सिद्धांत सहजीं लक्ष्यांत येण्यासारखा आहे. घाटवरील माणसाला मासळीची व कोकणच्या माणसाला तंबाकूची अपूर्वाई वाटते, म्हणून प्रत्येकजण आपल्याजवळील फालतू माल दुसऱ्याला देऊन दुसऱ्याचा फालतू माल आपण घेतो. प्रत्येकाचा कचरा तें दुसऱ्याचें ऐश्वर्य बनतें.

**सुखदुःख समाईक:**—आपलीं व आपल्या कुटुंबांतील माणसांचीं सुखदुःखें एकत्र मिसळलेलीं असतात हें आपल्याला चटकन् पटतें. परंतु समाज हें सुद्धां एक मोठें कुटुंबच आहे, व त्याचीं सुखदुखेंहि संलग्न आहेत हि थोडक्याशा विचारांतीं लक्षांत येण्यास अडचण पडणार नाहीं. छोट्या कुटुंबांत एक माणूस आजारी पडलें म्हणजे इतर सर्व मंडळी ज्याप्रमाणें अस्वस्थ होते त्याचप्रमाणें गांवांत प्लेग, पटकी, देवी यांसारखी सांथ आली म्हणजे माझा जीवहि धोक्यांतच असतो. क्षयरोगाचा प्रसार मुलखांत झाला तर मला किंवा माझ्या प्रियतमांना तोच घातक रोग केव्हा जडेल याचा नेम नाहीं. दारिद्र्य व पौष्टिक आहाराचा अभाव हें क्षय-

रोगाचें मूळ कारण आहे. परंतु एकदां रोगाचें बीज तयार झाल्यानंतर तें पौष्टिक आहार खाणारावरहि हल्ला करूं शकतें. देवींचें मूळ कारण गलिच्छपणाच होय, परंतु गलिच्छ वस्तींत देवीची सांथ उसळल्यानंतर आसपासचे स्वच्छ राहणीवाले लोकहि निर्धास्त राहूं शकत नाहींत. समाजांत दारिद्र्य असेल तर मलाहि क्षय होईल, आणि गलिच्छपणा असेल तर मलाहि देवी येतील; म्हणून मला माझ्याच आरोग्यरक्षणासाठीं समाजांतील दारिद्र्य, अस्वच्छता व अज्ञान यांचें निवारण केलें पाहिजे. गांवांत व्यसनी लोक असतील तर त्यांची संगत माझ्या मुलाला केव्हां बाधेल तें सांगतां येत नाहीं. माझे देशबांधव निर्माल्यवृत्तीचे असतील तर पारतंत्र्यापायीं भोगावी लागणारी कुचंबणा व अपमान माझ्याहि वांट्याला येतील. माझ्या भावांपैकीं एकानें दुष्कृत्य केल्यास लोकांत जशी माझीहि मानखंडना होते त्याचप्रमाणें माझ्या देशबांधवांच्या दोषांपायींसुद्धां जगांत माझी छी:थू होते. पारशी लोक आपल्या जमातीपैकीं कोणालाहि भिक्षा मागूं देत नाहींत. कारण एका पारशाची अप्रतिष्ठा तीच साऱ्या पारशांची. हिंदुस्थानांतील कांहीं जाती मुर्दाड मांस खातात. तें बरें कीं वाईट हा प्रश्न सोडला, तरी परदेशांत "हिंदी लोक मुर्दाड मांस खातात" म्हणून साऱ्याच हिंदीलोकांना दूषण लागतें. ग्रामस्थ निरक्षर व अडाणी असतील तर माझ्या प्रामाणिक सावकारीवरहि ते हरतऱ्हेचे संशय घेतील. आसपासचे लोक दुष्काळग्रस्त असतील तर माझ्या घरावरहि केव्हां दरोडा पडेल याचा नेम नाहीं.

घरचीं माणसें जशीं हरघडी माझ्या उपयोगी पडतात तसेच शेजारीपाजारी, मित्र व पुष्कळदां तर अनोळखी लोक सख्ख्या भावापलीकडेहि आपल्या मदतीला धांवून येतात याचा अनुभव कोणाला आलेला नाहीं ? विभक्त राहणारा भाऊहि विशेष अडचणीच्या प्रसंगीं माझ्या मदतीला धांवून येतो, त्याचप्रमाणें माझ्या घराला आग लागली असतां गांवचे यच्चयावत् लोक ती विझवण्यास धांवून येत नाहींत का ? बिहारमध्यें, किंबहुना जपानमध्यें, भूकंप झाला तर आपल्याला कळवळा येऊन आपण इकडून तिकडच्या आपद्ग्रस्तांना मदत पाठवितो. मलबारांत महापुरानें

गांवें वाहून गेलीं तर बंगालहून रामकृष्ण मिशनची मंडळी मदतीला धांवून येते. मनुष्यजात हें एक मोठें कुटुंबच आहे, या नात्याची पुनः पुनः जाणीव देण्यासाठींच तर ईश्वर असले प्रसंग मधून मधून घडवून आणीत नसेल ना ?

**सहानुभूतिः**—सहानुभूति ही एक विलक्षण चीज आहे. ती मला इतरांच्या सुखांनीं सुखी व दुःखांनीं दुःखी करते. वडील माणसांना रडतांना पाहून लहान मुलें, त्यांना त्या रडण्याचें कारण कळत नसतांनाहि स्वतः रडूं लागतात. परंतु प्रौढ माणसें हीं सुद्धां या बाबतींत मोठ्या आकाराचीं मुलेंच आहेत. घरवाली दुर्मुखलेली असेल तर घरधन्याला जेवण गोड लागत नाहीं. परंतु मलाहि बॅकबेवर सहल करतांना सारींच माणसें खिन्न मुद्रेचीं दिसलीं तर मी बिऱ्हाडीं परत न जातां तेथल्या तेथें समुद्रांत आत्महत्याहि करीन असा संभव आहे. उलटपक्षीं आत्महत्या करावयाला चाललेले इसम वाटेंत एखाद्या छबकड्या निष्पाप मुलांचें सहज-हास्य पाहून परतल्याचींहि उदाहरणें घडलेलीं आहेत. या सहानुभूतीचा व्यापार जात, वंश, वर्ण, वर्ग, हुद्दा, इत्यादि नाना कृत्रिम भेद कल्पून आपण थांबवून धरण्याचा प्रयत्न करीत असतों. परंतु ' कधीं कधीं ' हे पडदे अचानक गळून पडतात व जीवाजीवांची समक्ष भेटी होतेच; धनी आणि नोकर, काळा आणि गोरा, मॅजिस्ट्रेट आणि आरोपी—सारे एकाच मातीचे पुतळे असल्याची ओळख पटतेच.

पुष्कळ श्रीमान् लोक आपल्या बंगल्याभोंवतीं पुष्कळ खर्च करून फुलबाग तयार करतात. तें उच्च अभिरुचीचेंच लक्षण आहे. तरी पण त्यांनीं आपल्या आसपास प्रसन्न व प्रफुल्ल अशा मानवी मुखकमलांचा बाग फुलविला तर तो किती तरी अधिक शोभून दिसणार नाहीं का, आणि त्यांत त्यांची उच्चतर अभिरुचिच दिसून येणार नाहीं का ?

**खरी संपत्तिः**—खरी श्रीमंती तरी कशाला म्हणावयाचें ? बॅकेमध्यें मोठमोठ्या रकमा ज्यांच्या नांवानें जमा असतील तो श्रीमंत, कीं ज्यांच्या कोठारांत सोन्याचांदीचीं भांडीं कुलूपबंद असून खडा पहारा असतो तो श्रीमंत, कीं ज्याच्यापाशीं हत्ती, घोडे, दासदासी असतील तो श्रीमंत ? एका

ग्रीस मातेची गोष्ट सांगतात—तिच्याकडे एक 'श्रीमंत' पाहुणी आली होती; तिनें तिला आपल्या पेटींतील उंची दागिने दाखवून 'तुझे दागिने मला पाहूं दे' म्हटलें, तेव्हां त्या सुज्ञ मातेनें आपल्या सुशील गोजीरवाण्या पुत्रांकडे बोट करून म्हटलें, 'हे पहा माझे दागिने'! पाहुणी खजील झाली किंवा नाहीं तें गोष्टींत सांगितलेलें नाहीं, झाली नसेल तर मंदबुद्धी-बद्दल तिची कींवच केली पाहिजे.

सन्मित्राहून श्रेष्ठतर संपत्ति जगांत कोणती आहे? सन्मित्राचें मोल कुबेराच्या संपत्तीला आणि इंद्राच्या ऐश्वर्याला तरी येईल का? मग खरें व्यवहारी कोण? माणसें तोडून नाणीं जोडणारे ते खरे व्यवहारी कीं,

"सर्व जन मज। झाले लोकपाळ ॥
सोयरे सकळ। प्राणसखे ॥"

अशा तऱ्हेचे ऐश्वर्य संपादणारे तुकाराम महाराज व्यवहारी? सेवा म्हणजे असली श्रेष्ठ संपत्ति संपादिणारा व्यापारच नव्हे का?

जीवन कलहः—परंतु या जगांत सर्वांचीच सोय लागणें पुष्कळांना अशक्य वाटतें. 'जगांत अन्न थोडें' व तोंडें फार, नोकऱ्या थोड्या व उमेदवार फार, जागा थोडी व उतारू जास्त अशी स्थिति आहे. सर्वांनीं वांटून खावयाचें तर कोणाचेंच पोट भरणार नाहीं. म्हणून शहाण्या माणसानें जगाची काळजी करीत न बसतां आपला कार्यभाग कसा साधेल याचीच फिकीर करावी. परोपकाराच्या गोष्टी बोलाव्या, मात्र त्या फक्त दुसऱ्यांना झुकविणासाठींच. भोळसट इसमाचा या जीवनकलहांत टिकाव लागावयाचा नाहीं असें पुष्कळांना वाटत असतें आणि असें वाटलें म्हणजे, प्रत्यक्ष अनुभवहि तसाच येऊं लागतो. आगगाडींत गर्दी होईल या भयानें प्रत्येक पॅसेंजर स्टेशनवर दोन दोन तास आगाऊ येऊन सर्वांच्या अगोदर डब्यांत घुसून अधिकांत अधिक जागा अडवून ठेवण्याची धडपड करीत असतो. त्यामुळें कांहींना धड उभें राहण्यासहि जागा उरत नाहीं हें खरें. तथापि रेल्वेचें अधिकारी उतारूंच्या प्रमाणांत गाडीला डबे जोडतील असा विश्वास सर्वांना असेल, किंवा तसे जोडावे यासाठीं दाद लाविण्याचें सुचेल, तर धडपड कोणालाच करावी लागणार नाहीं, आणि प्रत्येकाला आवश्यक

तेवढी जागा मिळू शकेल, व कांहींनीं झोपेचें मिष करून पाय ताणून पडणें व कांहींनीं उभें राहणें असे प्रकार होणार नाहींत.

या जगांत स्पर्धा, कलह, धडपड, विषमता, अजीर्ण-उपासमार सर्व कांहीं आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. परंतु हें सर्व अनावश्यक आहे. आपण आपल्या अधीरेपणानें, भित्रेपणानें, फाजील लोभानें, बेशिस्तपणामुळें व संयमाच्या अभावामुळें जिकीर करून घेतों. ही वसुंधरा आपल्या साऱ्या लेकरांस पोसण्यास समर्थ आहे. ईश्वराच्या दुनियेंतील पशु, पक्षी, कीडमुंगी कोणीच उपाशी राहत नाहीं. माणसालाच तेवढी उपासमारी काढावी लागते याचें कारण अनावर लोभ, बेपर्वाई व विघ्नसंतोषी नासधूस याखेरीज दुसरें संभवत नाहीं. यामुळेंच आपण जें खरोखरी स्नेहसंमेलन झालें पाहिजे त्याचें रणांगण बनवून घेतों.

स्पर्धा हा दुनियेचा कायदा आहे खरा, परंतु सहकार हा त्याहून अधिक स्थिर, व्यापक, प्रभावी व श्रेष्ठ कायदा आहे. भेद आहे तेथें त्याबरोबरच स्पर्धाहि येतेच. एका झाडाच्या निरनिराळ्या फांद्यांमध्येंसुद्धां परस्पर स्पर्धा असते, कारण बाकीच्या फांद्या तोडून टाकून एकदोनच फांद्या शिल्लक ठेवल्या तर त्या खूप जोरानें वाढतात. फुलें फळें तोडून टाकलीं तर पालवी अधिक बळावते हें खरें असलें तरी फांद्यांफांद्यांमध्यें सहकार्यहि असतें, पालवीच्या बळावरच फुलाफळांची उत्पत्ति व वाढ होते, व फळाच्या परिपक्वतेनेंच बीज तयार होऊन झाडाचा वंश कायम टिकतो, हें अधिक खरें आहे. माणसाच्या दोन्ही हातांमध्यें व दोन्ही डोळ्यांमध्यें तर नित्य जिव्हाळ्याचें सहकार्य असतें, तरीहि हातांमध्यें व डोळ्यांमध्यें परस्पर स्पर्धा असते हेंहि मान्य करावें लागेल; कारण एक हात तुटून गेला किंवा एक डोळा फुटला तर शिल्लक हाताची किंवा डोळ्याची शक्ति कांहींशी वाढते. एवंच स्पर्धा असली तरी ती गौण आहे. सहकार हा श्रेष्ठ सिद्धांत आहे. स्पर्धा ही सहकाराच्या पोटीं असते.

**अमरत्वः**—झाडाचीं पानें अल्पायुषी असतात, वसंत ऋतूंत जन्मतात व पुढील हिवाळ्यांत गळून पडतात. परंतु झाड कायम राहतें, आणि त्या झाडाच्या आश्रयानें पानें पुनः जन्मतात, टिकतात, वाढतात व

आ-
253



८८५०७ १८१२१ भा१७५ आभा२८३

गळतात. उलट प्रत्येक पानहि झाडाच्या आकारामध्यें अल्पशी वाढ करतें व शिवाय स्वतः गळून पडण्यापूर्वी तें आपल्या देठाच्या मुळाशीं फांदीवर एक डोळा ठेवून जातें. हा डोळा म्हणजे एक भावी शाखाच असते. पुढील वसंतांत त्या डोळ्यांतून अंकूर फुटून त्याची क्रमाक्रमानें डहाळी व फांदी बनते. कलम करून ती डहाळी निराळी लावल्यास तिचा वृक्षहि होतो. पान कांहीं महिनेच जगून मृत्यू पावलें, तथापि त्याचें जीवनकार्य संपलेलें नाहीं. तें अव्याहत चालूच आहे.

आम्ही माणसें हीं असलीं पानेंच आहों. पानांच्या पूर्व पिढ्यांच्या कर्तृत्वाच्या बळावर आपण अधिकाधिक उंचावर जन्मास येतों, मानववंशवृक्षाकडून आपल्याला पोषण व शिक्षण मिळतें; आमचें जीवन समृद्ध बनतें. जगरहाटीनुसार आमचेंहि 'पिकलें पान' गळून पडतें, तथापि आमचें जीवनकार्य नष्ट होत नाहीं, त्याचा कोणीच नाश करूं शकत नाहीं. मृत्यूंतूनच पुनर्जन्म होत असतो; पुढील पिढ्यांच्या रूपानें आपण अमरच राहतों. त्यासाठीं औरस संततीचीच आवश्यकता आहे असें नाहीं, तर आपलें कार्य, आपल्या आकांक्षा, आपले विचार, आपल्या संस्था या अखंड प्रगति करीत राहणारच अशी खात्री असल्यामुळें आपण वस्तुतः अमरच आहों. पुत्र हा पित्याचा व शिष्य हा गुरूचा पुनर्जन्मच आहे.

आपण सारीं माणसें एकाच वंशवृक्षाचीं पानें आहों, आपल्याला या वंशाकडून व परस्परांकडून पोषण मिळतें व आपण त्या वंशवृक्षाला आपल्या कर्तृत्वानें, अल्पांशानें का होईना, परंतु समृद्ध करून जातों. सर्व माणसें एकमेकांचीं भावंडें आहेत, एकाच दलांतील सैनिक आहेत, ईश्वर आपणां सर्वांचा पोशिंदा व पाठिराखा आहे—यासारख्या विचारांनीं माणसामध्यें एक तऱ्हेचा निर्धास्तपणा, विनययुक्त आत्मविश्वास, निर्भयपणा, प्रयत्नवाद, सोशिकपणा, समाधान व स्वतःच्या अमरत्वाबद्दल विश्वास हीं उत्पन्न होतात.

दिक्-कालः—तसेंच मनुष्य दिक्कालांचे अडाणे ओलांडून जातो. सत्कर्मांचें फल यथाकाल मिळणारच, बीजाचा यथाकाल वृक्ष होणारच, याची त्याला खात्री असते. गारुड्यानें बीजाचें पांच मिनिटांत झाड करून

दाखविण्यांत कांहीं विशेष कौतुक आहे, आणि त्याच क्रियेला शंभर वर्षें घेण्यांत ईश्वराचा कांहीं कमीपणा आहे, असें त्याला वाटत नाहीं. जागेपणचें आपलें मिनिट तें स्वप्नामध्यें महिन्याएवढेंहि वाटतें. भुकावलेल्या बाळाला मिनिट प्रहरासारखें वाटतें, व सोशीक माऊलीला कष्टाचा प्रहरहि मिनिटासारखा वाटतो. पन्नास वर्षांतील घडामोडी नाटकांत तीन तासांत आटोपून जातात. आणि नाटककाराच्या मेंदूत तर सारें कथानक क्षणार्धांत चमकून जातें. काल ही स्वतंत्र वस्तु नाहीं, तो एक क्रम आहे, ताल आहे. पद वेगानें गाईलें तर कडवीं लवकर लवकर येतील, सावकाश गायिलें तर सावकाश येतील. परंतु गाण्यांतील संथ ताल व द्रुत ताल दोन्ही आपापल्यापरी आल्हाददायकच होतात. म्हणून सुजाण मनुष्य कालावधीची मुळींच फिकीर करीत नाहीं.

कालाप्रमाणेंच दिक्‌अंतर, लांबीरुंदी, उंची, खोली यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं. काल म्हणजे ज्याप्रमाणें क्रम त्याचप्रमाणें अंतर म्हणजे रचना किंवा ठेवण होय. सारें जग—आपलीं शरीरें, कपडे, डोळे, मापाचा वार, फूटपट्टी, या सर्वांसुद्धां—एकाएकीं आकारानें निम्में झालें तर तो फरक आपल्याला जाणवणार सुद्धां नाहीं. पारमार्थिक दृष्टीनें ‘ जवळ आणि दूर ’ ‘ लवकर आणि उशीरां ’ यांना विशेष महत्त्व नाहीं.

—×—

# सेवेचें क्षेत्र व प्रकार : ४

जगाची सेवा:–मी म्हणजे केवळ माझा साडेतीन हातांचा देह नव्हे. देह हें माझें सर्वस्व नव्हे. माझें स्वत्व माझ्या देहापलीकडे पसरलेलें आहे. माझे आईबाप, भावंडें, मुलेंबाळें, सगेसोयरे, मित्र, जातिबंधु, देशबांधव, मनुष्यमात्र किंबहुना भूत मात्र, सारें जग माझें आहे, मी सारें विश्व आहें. मी लहान असलों तरी मोठाहि आहें, मर्यादित आहे तथा व्यापकहि आहे. किंबहुना माझें मूळ स्वरूप विशाल असून लघुरूप हें मला तात्पुरतें मिळालेलें, किंवा माझ्यावर लादलेलें आहे. मी मूळचें गगनविहारी पांखरूं असतां पिंजऱ्यांत कोंडला गेलों आहे. सेवा म्हणजे माझा लहानाचा मोठा, अल्पाचा विशाळ, मर्यादिताचा अमर्याद, बिंदूचा सिंधू, पिंडाचा ब्रह्मांड बनण्याचा प्रयत्न आहे. सेवा म्हणजे आत्मविस्तार, आणि या आत्मविस्ताराची अंतिम मर्यादा परमात्मा होय. इच्छया वा अनिच्छया, कळत वा नकळत, मनुष्याचे सारे कार्यक्रम, सारे उद्योग, विद्या, कला, चळवळी, सुधारणा, संशोधनें, भांडणतंटे, युद्धें, या मूलस्वरूपाच्या प्राप्तीचे नानाविध प्रयत्नच आहेत. तेच स्वेच्छेनें करणें म्हणजे सेवा होय.

सेवकाचा आत्मविस्ताराचा प्रयत्न ऐच्छिक असतो, तरी ज्ञानपूर्ण, म्हणजे ज्ञानानें प्रकाशित असतोच असें नाहीं. सेवकाची आत्मविस्ताराची भावना कुटुंब, गांव, जात, देश, यासारख्या कोठल्या तरी टप्प्याशीं अटकून पडलेली असते. सेवेचें अंतिम निधान जग किंवा परमेश्वरच आहे याची प्रत्येक सेवकाला जाणीव असते असें नाहीं. परंतु आदर्शसेवा म्हणजे जगाची किंवा भूतमात्राची स्वेच्छेनें, ज्ञानपूर्वक, आत्मभावनेनें केलेली सेवा होय.

माझ्यावर जगाचे उपकार आहेत; साऱ्या जगाचा मी ऋणी आहे. माझें आजचें जीवन, मला मिळालेलें शिक्षण व ज्ञान, व मी भोगीत असलेल्या हरतऱ्हेच्या सुखसोयी ह्या, पृथ्वीतलावर मनुष्याची वसाहत झाल्यापासून होऊन गेलेल्या हजारों पिढ्यांच्या–माणसांच्या आणि जनावरांच्या,

वनस्पतींच्या व मातीपथ्थरांच्या–संचित कर्माचें फळ होत. पूर्वजांनीं कष्ट-पूर्वक संपादिलेल्या संपत्तीचा वारसा मला अनायासें मिळाला आहे. पूर्वजांच्या व समकालीनांच्या श्रमाचीं मधुर फळें मी चाखीत आहे. या ऋणाची फेड करण्याचा प्रयत्न करणें, या वारशामध्यें थोडीतरी भर घालून आपल्यामागून येणाऱ्या लोकांसाठीं अधिक चांगलें जग ठेवून जाण्याकरितां सर्व शक्तिनिशीं झटणें माझें परम कर्तव्य आहे. अद्यापहि या जगामध्यें दैन्य, दुःख, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, वैर, कलह, मत्सर, व्यसनें, दुर्गुण, अन्याय, इत्यादि खूप भरलेलीं आहेत. या सर्व दुरितांचें निवारण करून अधिक सुखी, संतुष्ट, समृद्ध, समर्थ, निरोगी, निर्व्यसनी, सुशील, सुजाण, न्यायी, प्रेमळ असा मनुष्य–समाज निर्माण करणें–म्हणजे पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करणें–हें माझें जीवितकर्तव्य होय. हेंच माझ्या जीविताचें सार्थक आणि माझ्या कल्याणाचें साधन.

परंतु साऱ्या जगाची सुधारणा मी कशी करणार? जग किती अफाट आणि माझी शक्ति किती अल्प ?

**सद्वर्तन=जीवमात्राची सेवा:**—परंतु साऱ्या जगाचीसुद्धां अचूक सेवा करण्याचा एक प्रकार मला मोकळा आहे. सच्छील व सद्वर्तन ही साऱ्या जगांत—चालू व भावी पिढ्यांना— पोंचणारी सेवा आहे. जगाची सेवा करण्यासाठीं लोकोत्तर बुद्धिमत्ता किंवा असामान्य कर्तृत्वच पाहिजे असें नाहीं. जगाचा नागरिक या नात्यानें मी माझें स्वतःचें अल्प वैयक्तिक जीवनच निर्दोष रीतीनें, कोणालाहि उपद्रव न देतां, चोरी चहाडी, मत्सर, दगलबाजी न करतां, भूभार न होतां घालविलें, निर्दोष साधनांनीं व इतरांचें शोषण न करतां स्वतःचाच केवळ उदरनिर्वाह साधला, तरी जग जिंकलें ! नीतिनियमांचें पालन ही सेवेची अनिवार्य शर्त आहे; किंवा नीतिशुद्ध वैयक्तिक जीवन ही मूक परंतु अत्यंत महत्त्वाची, भरीव व मूलभूत अशी समाजसेवाच आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, संयम, इत्यादि हे मनुष्याच्या सामाजिक जीवनाचे आधारभूत नियम आहेत. त्यांचा भंग करणें म्हणजे समाजाच्या मूळावरच कुऱ्हाड घालण्याप्रमाणें आहे. मी माझ्या शेजाऱ्याची एखादी वस्तु चोरली तर मी त्या केवळ शेजाऱ्याचाच

नगर वाचनालय, सातारा.


गुन्हा करून थांबत नाहीं; तर कायद्यानेंहि तो सरकारचा म्हणजे साऱ्या राष्ट्राचा गुन्हा ठरतो. खरोखरी तो साऱ्या मानवजातीचाच गुन्हा आहे. व्यभिचार हाहि साऱ्या समाजाचा द्रोह आहे. असत्य भाषण हें तर माणसा-माणसांमधील परस्पर व्यवहारालाच मारक आहे.

" वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिःसृताः ।
तांहि यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः ॥ "

मनुष्याच्या वाणीमध्यें नानातऱ्हेचे अर्थ [शब्दार्थ किंवा संपत्ति] नेमलेले आहेत, वाणींतूनच ते उद्भवतात व प्रकट होतात. ती वाणीच जो चोरतो त्यानें काय चोरायचें ठेवलें ? "

म्हणून सत्य--अहिंसादि सनातन नीतितत्त्वांची पायमल्ली करून जो मनुष्य दानधर्म किंवा 'ट्रस्ट' करणें, मंदिरें किंवा हॉल उभारणें, इत्यादि मार्गांनीं 'समाजसेवा' करण्यास धांवतो तो झाडाचें मूळ छाटून पालवीवर पाणी शिंपडून टवटवी आणण्याची धडपड करीत असतो. नीतिशुद्ध निष्पाप आचरण ही अल्पबळ माणसाच्याहि आटोक्यांतील परंतु आवश्यक, निश्चित, महत्त्वाची व विश्वव्यापी अशी सेवाच आहे. बुडत्या माणसाला वांचविण्यासाठीं शक्ति, हिंमत व पोहण्याच्या कलेवर प्रभुत्व पाहिजे; परंतु विहिरीच्या कांठावर उभ्या असलेल्या माणसाला विहिरींत न लोटणें हें निर्बलालाहि झेपण्यासारखें आहे, किंबहुना भ्याड व निर्बल माणसालाच तें अधिक सुलभ आहे.

देवा, मला दुराचरण-दुर्बलच ठेव ! पापभीरूच राहूं दे.

**खासगी कर्तव्यें:**—सदाचार ही अमूर्त, गूढ व अप्रत्यक्ष सेवा असली तरी तिचा आटोका अमर्याद आहे. उलटपक्षीं प्रत्यक्ष किंवा मूर्त सेवेच्या प्रकारांचें क्षेत्र कितीहि विस्तृत असलें तरी समर्याद किंवा सांतच असणार. या सेवेचेहि खासगी व सार्वजनिक असे दोन प्रकार कल्पितां येतील. मी साऱ्या जगाचा ऋणी आहें हें सत्य असलें तरी प्रत्यक्षपणें विशिष्ट व्यक्तींचें किंवा व्यक्तिसमुदायाचें माझ्यावर विशेष ऋण असतें व तें फेडणें माझें विशेष कर्तव्य ठरतें. भूमातेचा मी बालक आहें हें खोटें नसलें तरी ज्या औरस मातेनें मला जन्म दिला व लहानाचा मोठा केला त्या मातेचे

आवक ३८ ८-९-५७

उपकार माझ्यावर कितीतरी पटींनीं आहेत. आईप्रमाणेंच बाप, आजा-आजी, काका, मामा, बंधुभगिनी, आप्तेष्ट, मित्र, शिक्षक, इत्यादि अनेक व्यक्तींच्या नानाप्रकारच्या उपकारांच्या बळावरच माझी जीवनयात्रा सुखानें चाललेली असते. ईश्वर तरी आईबाप, इष्टमित्र, शेजारी व क्वचित् अपरिचित व्यक्तींच्या रूपानेंच माझें लालनपोषण करीत असतो; म्हणून मी ईश्वराचें ऋण फेडण्याचा जो प्रयत्न करावयाचा तोहि ईश्वराच्या त्या त्या प्रतिनिधींमार्फतच केला पाहिजे. सर्व ईश्वरच आहे हें तत्त्वतः खरें असलें, तरी व्यवहार हा तारतम्यपूर्वकच चालवावा लागतो. म्हणूनच "मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव; आईबाप, गुरु, अतिथि यांना देवासमान मान," हा उपनिषदांतील गुरुनें शिष्याला केलेला उपदेश यथायोग्य आहे. मी समाजसेवक, देशसेवक, इत्यादि सर्व कांहीं बनलों तरी मी माझीं मातापितरें, भावंडें, पत्नी व मुलेंबाळें, शेजारी पाजारी व मित्र यांच्याबद्दलच्या आपल्या कर्तव्यांची हेळसांड करतां कामा नये. देशभक्तीच्या नशेमध्यें निकटच्या माणसांची आबाळणा करणें यांत वाखाणण्याजोगें किंवा फुशारकी मानण्याजोगें कांहीं नाहीं. मातेनें आपल्या अर्भकाला दाईच्या किंवा मोलकरणीच्या हवालीं करून 'क्लब', 'भगिनीमंडळ' किंवा इतर सार्वजनिक कार्यक्रमांत दंग होणें यांत सेवावृत्तीपेक्षां मिरविण्याची हौसच अधिक असण्याचा संभव आहे.

एवढें मात्र खरें कीं कुटुंबीयांची सेवा ही मोह-ममता--मूलक असतां नये, तर कर्तव्यदृष्टीनेंच करावयाची आहे. आईबरोबर राहणें मला आवडतें म्हणून तिच्या सेवेला रहावयाचें नसून तिची शुश्रूषा हें खास माझेंच कर्तव्य आहे, तो माझा स्वधर्म आहे, म्हणून ती करावयाची आहे. कुटुंबसेवा करावयाची ती इतर समाजाला बाधक होणार नाहीं अशा तऱ्हेनेंच केली पाहिजे. कारण आईनें माझें लालनपोषण केलें, किंवा माझे अनेक इष्टमित्र जे हरप्रकारें माझ्या उपयोगी पडतात, ते तरी मोठ्या समाजाच्या, मातृभूमीच्या, किंवा जगाच्या मदतीनें किंवा अनुकूलतेमुळेंच तसें करूं शकतात. गवळ्यानें चोख दूध दिलें नसतें, वैद्यानें योग्य औषध दिलें नसतें, गांवांत देवींची किंवा डांग्या खोकल्याची सांथ आली असती, किंबहुना

शेजारणीनें 'दृष्ट' घातली असती, तर मातेचें बालसंगोपन अशक्य, निदान बिकट तरी झालें असतें. तसेंच देशावर परचक्र आलें व त्याचें निवारण होऊं शकलें नाहीं तर मी तरी आपल्या वृद्ध आईची शुश्रूषा कशी करूं शकणार? वरून पडणाऱ्या बॉंबचें निवारण झालें नाहीं तर खाटेखालचा केर लोटल्यानें काय साधणार? म्हणून देशरक्षणासाठीं बेपर्वा राहून मी कुटुंबरक्षण करूं शकत नाहीं; तशी इच्छा करणें मला उचित नाहीं. उलट कुटुंब-द्रोह करून देशसेवा करण्यामध्येंहि स्वारस्य नाहीं.

हीं 'खासगी' कर्तव्यें ज्याप्रमाणें कौटुंबिक किंवा घरोब्याच्या स्वरूपाचीं असतात तशींच तीं प्रसंगीं अगदीं अपरिचित अशा व्यक्तींबाबतहि उभीं होऊं शकतात. प्रवासामध्यें आपल्याला अगदीं परिचित अशा सह-प्रवाश्याला कांहीं अपाय किंवा अपघात झाल्यास त्याला मदत करणें हें खास माझें अनिवार्य कर्तव्य ठरतें. त्यासाठीं सार्वजनिक किंवा जीं माझ्या अभावीं इतरहि करूं शकतील अशा, कर्तव्यांना फांटा द्यावा लागला तरी चिंता नाहीं. असलीं प्रसंगानें चालून आलेलीं कर्तव्यें म्हणजे जणूं कांहीं ईश्वरानें खास मलाच नेमून दिलेली कामगिरी होय. अशी नेमलेलीं कामें चुकवून, न नेमलेलीं किंवा न सांगितलेलीं कामें बळेंच अंगावर घेण्याची लुडबुड व धडपड करण्यांत अर्थ नाहीं.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।

" आपलें कर्तव्य क्षुल्लकसें असलें तरी तें करणेंच योग्य. दुसऱ्याचें काम मी चांगल्या तऱ्हेनें करूं शकत असलों तरीहि तिकडे धांव घेणें बरें नाहीं. " ( भगवद्गीता )

म्हणून निकटचीं खासगी कर्तव्यें व व्यापक सार्वजनिक कर्तव्यें, तसेंच किरकोळ परंतु निकडीचीं कर्तव्यें आणि महत्वाचीं परंतु सवडीचीं कर्तव्यें यांचा त्या त्या प्रसंगानुसार किंवा परिस्थित्यनुसार तारतम्यपूर्वक समन्वय साधणें हें सेवकाला उचित आहे.

**सार्वजनिक सेवा:—** येथवर सेवकाचे खासगी ऋणानुबंध व त्यांतून उद्भवणारीं कर्तव्यें यांचा विचार झाला. सर्वसामान्य लोकांच्या

सेवेला सार्वजनिक कार्य किंवा सेवा म्हणतां येईल. सार्वजनिक सेवेच्या क्षेत्राचा आतां आपल्याला विचार करावयाचा आहे.

सार्वजनिक सेवा म्हणजे जगाचीच सेवा; परंतु येथेंहि सेवेच्या क्षेत्रावर व्यवहारतः कांही मर्यादा घालणें सोइस्कर व आवश्यक असतें. सेवकाला आपल्या कुवतीला व कार्याच्या प्रकाराला अनुसरून गांव, पंचक्रोशी, तालुका, जिल्हा, प्रांत, देश यांसारखें कोणतें तरी लहान मोठें क्षेत्र निवडावें लागतें. राज्यकारभारामध्यें ज्याप्रमाणें तलाठी, मामलेदार, कलेक्टर, गव्हर्नर व व्हाईसरायासारखे लहान मोठ्या क्षेत्रांचे अंमलदार असतात, त्याचप्रमाणें सेवकहि स्वतःसाठीं क्षेत्र आंखून घेत असतो. मामलेदार ज्याप्रमाणें तालुक्याचाच कारभार पहात असला तरी कलेक्टरच्या व तद्द्वारा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञेंत राहूनच काम करतो त्याप्रमाणें सेवकाच्यावर कोणी ' बडा साब ' किंवा हुकूमशहा नसला तरी सेवकाची स्वतःच्या क्षेत्राविषयींची निष्ठा ही व्यापक निष्ठेची अंकित राहिली पाहिजे, त्याची ग्रामसेवा ही देशसेवेला पोषक असली पाहिजे, देशहिताशीं विसंगत असतां नये.

**स्वदेशी धर्मः**—हा स्वदेशी धर्मच होय. सारें जग माझें आहे हें खरें पण प्रत्यक्ष सेवा मी कोणाची करावी ? तर मला जे जवळचे आहेत त्यांचीच अगोदर किंवा विशेषेंकरून करावी आणि दूरच्यांची नंतर करावी. " charity begins at Home " ' सद्वृत्तीची सुरवात स्वतःच्या घरापासून होते ' या वचनाचा हाच अर्थ. ( ' सुरवात ' घरापासून होते ' असें म्हटलें आहे, ' अंत ' हि घरींच व्हावयाचा नसतो, हें पुष्कळ जण विसरतात. ) दिवा आपले प्रकाशकिरण चारी दिशांनीं पोंचवितां येतील तेथपर्यंत पोंचवीत असतो. जवळच्या भागांत खूप प्रकाश पडावा म्हणून तो ' विशिष्ट हद्दीबाहेर किरण जाऊं देणार नाहीं ' असेंहि म्हणत नाहीं, तसेंच दूरपर्यंत आपला प्रभाव पोचावा यासाठीं जवळच्या प्रदेशाची हेळसांडहि करींत नाहीं. त्याचा प्रकाश जवळच्या भागांत अधिक प्रखर, व दूर जाईल तसतसा फिका पडत जातो. मोठ्या दिव्याचे किरण दूरपर्यंत पोंचतील तर पणतीची मजल चार पावलांपर्यंत पोचेल, परंतु पणती

जवळच्यांना प्रकाश देण्यासाठीं दूरच्यांना अधिक काळोख करीत नाहीं. दीपराज सूर्याचे किरण विशाल अंतरापर्यंत प्रकाश व ऊब पुरवितात. तरी त्याच्याहि शक्तीला मर्यादा आहेतच. सूर्याच्या प्रकाशाची धांव ही सूर्यमालेपुरतीच. सूर्यमालेबाहेरील अनंत दिग्विस्तार त्याच्या आटोक्याच्या बाहेर राहतो; तथापि तेथेंहि तो अधिक मर्यादित स्वरूपाचें काम करूं शकतो. उदाहरणार्थ, ध्रुव तारा हाहि आमच्या सूर्यासारखाच एक सूर्य आहे. दीर्घ अंतरामुळें तो आम्हांला प्रकाश किंवा ऊब पोंचवूं शकत नसला तरीहि तो आपल्याला दिशा व मार्ग दाखवितो; ही त्याची सेवासुद्धां कमी महत्त्वाची नाहीं.

× दिव्याचा दृष्टांत आणखी एका दृष्टीनेंहि उचित आहे. दिवा घरभर प्रकाश देत असतो. घरांतील साऱ्या माणसांची सेवा करण्याची त्याची तयारी असली तरी तो कोणावरहि आपली सेवा लादूं इच्छित नाहीं. झोंपलेल्यांना तो सक्तीनें उठवीत नाहीं. डोळे उघडतील तेवढ्यांनाच तो प्रकाश देतो. सूर्य साऱ्या जगासाठीं प्रकाशतो, परंतु तो कोणाच्याहि घरांत सक्तीनें घुसत नाहीं. ज्यांनीं आपल्या घराचीं कवाडें झांकून घेतलीं असतील त्यांच्या घराबाहेर तो निमूटपणें तिष्ठत राहतो. त्यांनीं खिडकी उघडतांच तत्काल आंत प्रवेश करतो. त्याचप्रमाणें सेवकानें आपल्या शक्तिनुसार आंखलेल्या क्षेत्रापैकीं, जेवढ्या लोकांची त्याची सेवा स्वीकारण्याची मर्जी असेल तेवढ्यांचीच समबुद्धीनें सेवा करावयाची आहे. माझें प्रवचन सर्व ग्रामस्थांसाठीं असलें तरी देवळांत येतील तेवढ्या-श्रोत्यांपुढेंच मला तें द्यावें लागतें. माझ्या केशकर्तनालया ( सलून ) बाहेरील 'सुस्वागतम्'ची पाटी रस्त्यानें जाणाऱ्या यच्चयावत् लोकांना निमंत्रण देत राहिली तरी अखेरीस 'आमच्या खास आश्रयदात्यांसाठींच मी तें चालवितों. प्रेसिडेंट रूझवेल्टनें साऱ्या जगासाठीं

---

× दिव्याचा दृष्टांत श्री. विनोबा भावे यांच्या एका प्रवचनांतून घेतला आहे.

नभोवक्तृत्व केलें तरी आपापला रेडिओ सज्ज करून कान टवकारून बसतील तेवढयांनाच त्याचे शब्द पोंचणार.

**प्रादेशिक क्षेत्र:**—सेवा अखेरीस, किंवा प्रत्यक्षतः, पोचते या ना त्या विशिष्ट व्यक्तींनाच, तथापि ती योजलेली असते विशिष्ट टापूसाठीं. उदा० एखादें वर्तमानपत्र जिल्ह्यासाठीं योजलेलें असतें. जिल्ह्यांतील एकूण रहिवाशांपैकीं हजारांत एखादाच तें वाचतो, व जिल्ह्याबाहेरील त्याला कांहीं वाचक भेटतात, तरीहि तें 'जिल्हा-पत्र' मानलें जातें. पुण्याचा केसरी हें बृहन्महाराष्ट्राचें, मुंबईचा टाईम्स हें उभ्या हिंदुस्थानचें व गांधींचा 'यंग इंडिया' किंवा 'हरिजन' किंवा लंडनचा टाईम्स् यांसारखीं पत्रें साऱ्या जगाचीं म्हणतां येतील. त्याचप्रमाणें एका सेवकाचें योजलेलें कार्यक्षेत्र केवळ त्याचा गांव किवा गांवाचा भाग असूं शकेल, किंवा जिल्हा, प्रांत, इत्यादि असेल, आणि क्वचित् एखाद्या लोकोत्तर पुरुषाचें कार्यक्षेत्र सारें जगहि असूं शकतें.

**देशसेवा:**—या सर्वच क्षेत्रांना 'देश' व सर्वच सेवेला 'देशसेवा' असें नांव देण्यास हरकत नाहीं. कारण 'देश' हा ज्या त्या सेवकाच्या आवाक्यानुसार कितीहि लहान आणि कितीहि मोठा—पृथ्वीएवढाहि—होऊं शकतो. महत्त्वाचा मुद्दा हा कीं तो भौगोलिक किंवा प्रादेशिक विभाग असावा. देश हें नैसर्गिक किंवा ईश्वरनियुक्त कार्यक्षेत्र आहे; म्हणून 'स्वदेशी' किंवा देश-सेवा हा धर्म आहे.-मातापितरें, भावंडें किंवा मुलेंबाळें हीं जशीं मला देवानें दिलेलीं आहेत, त्याचप्रमाणें देश हाहि मला देवानेंच नेमून दिलेला आहे. म्हणून कुटुंबाबाबत जशीं माझीं खासगी कर्तव्यें असतात त्याप्रमाणें माझीं सार्वजनिक किंवा जाहीर कर्तव्येंहि 'देशा' विषयीं आहेत.

'देश' म्हणजे देशांतील समाज-देशसेवा म्हणजे दगड, माती, हवा-पाणी, इत्यादींची सेवा नव्हे हें उघडच आहे. ज्याची सेवा करावयाची

तो समाज किंवा संघ देशविशिष्ट, सलग व निसर्ग-निर्मित असा असावा, कृत्रिम असू नये. सहकारी पतपेढी, जमीनदार सभा, ट्रेडयुनियनें हे कृत्रिम संघ होत. असे संघ बनविण्याचें स्वातंत्र्य सर्वांना असलें पाहिजे. व अशा संघांची आवश्यकताहि असते. परंतु अशा संघांचें कार्य हें सामुदायिक स्वार्थसाधनाच्या स्वरूपाचेंच असतें. तो स्वार्थ न्याय्य असूं शकेल किंवा अन्याय्यहि असूं शकेल. स्वार्थ न्याय्य असेल तर ती संघटना आक्षेपार्ह नाहीं एवढेंच, पण ती निरपेक्ष समाजसेवा नव्हे.

**राजकीय देश**:–'देशा'च्या मर्यादा लवचीक आहेत व त्या सोयी-प्रमाणें ऱ्हस्वदीर्घ होऊं शकतात असें आम्ही म्हटलें, तरी पण पृथ्वीचे ठोकळ भौगोलिक विभाग पडतात. नद्या, पर्वत, समुद्र, यांसारख्या नैसर्गिक अडथळयांमुळें एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशांपासून तुटक होतो. अशा विभागांतील समाजाचे अंतर्गत व्यवहार विशेष गाढ व परस्परावलंबी असतात; व इतर प्रदेशांतील प्रजेपासून हा समाज भाषा, पेहराव, रीतिरिवाज इत्यादींच्या भिन्नतेमुळें व दळणवळणाच्या अडचणींमुळें वेगळा पडतो. चीन, हिंदुस्थान, ब्रह्मदेश, अरबस्तान हे अशा तऱ्हेचेच नैसर्गिक भूविभाग किंवा देश होत.

मनुष्याच्या सामाजिक जीवनामध्यें राजसंस्थेला व राजकारणाला सर्वोच्च महत्त्व असतें. ॲरिस्टॉटलनें तर मनुष्याची व्याख्याच 'राजकारणी प्राणी' अशी केली आहे. मनुष्यनिर्मित सार्वजनिक संस्थांमध्यें राजसंस्था ही सर्वांत महत्त्वाची व जीवनाचा अधिकांत अधिक भाग व्यापणारी, तसेंच जीवनाचें अधिकांत अधिक नियंत्रण करणारी संस्था आहे. राज्यांच्या ताब्यांतील मुलखांच्या मर्यादाहि बहुधा भौगोलिक विभागांना अनुसरूनच असतात. देश तेंच बहुधा राज्यहि असतें. अशा तऱ्हेनें एका देशांतील व एका राज्याखालील प्रजेचें सामाजिक जीवन विशेषच गाढ व इतर प्रदेशांहून भिन्न बनतें. एका राज्याच्या प्रजेचे हितसंबंध एकवटलेले असतात व इतरांहून निराळे व क्वचित् विरोधीहि असतात. राजकीय--भौगोलिक देश

हेच मनुष्यजातीचे स्वाभाविक व परस्पर–विभक्त असे विभाग असल्यामुळें समाजसेवा ही मुख्यतः देशसेवेचेंच रूप घेते. देशाच्या खालीं गांव व कांहीं अंशीं प्रांत हे नैसर्गिक गट आहेत, परंतु तालुका, जिल्हा व इलाखा हे तर राज्यकारभाराच्या सोयीसाठीं मर्जीप्रमाणें पाडलेले विभाग होत.

अलीकडे दळणवळणाचीं साधनें अधिकाधिक सुलभ, जलद व सर्वगामी होत असल्यानें अंतरें ह्स्व बनत आहेत व पर्वत–समुद्रासारख्या अडथळयांनाहि महत्त्व राहिलें नाहीं. त्यामुळें साऱ्या पृथ्वीचा एक देश, एक समाज, एक राज्य बनण्याला काल अनुकूल आहे.

—×—

नासकें दूधः—देशसेवा हें आपलें ईश्वरानें नेमून दिलेलें कर्तव्य आहे, तो आपला जन्मसिद्ध धर्म आहे, असें आपण मानलें आहे. देशसेवा ही पवित्र वस्तु आहे. परंतु पवित्र वस्तूंमध्येंच विकृति उत्पन्न होण्याचा धोका विशेष असतो, व पवित्र वस्तूची विकृति विशेष अनर्थकारकहि होत असते. दूध हा हलका पौष्टिक आहार आहे, परंतु दुधाची नीट काळजी घेतली नाहीं तर तें अनेक घातुक रोगांचें मूळ बनतें. धर्मांच्या नांवाखालीं आजवर जितके अत्याचार झाले आहेत व होत आहेत तितके गुन्ह्यांच्या नांवाखालींहि होत नसतील. यज्ञाच्या निमित्तानें आजवर निरुपद्रवी व उपयुक्त अशा प्राण्यांची जेवढी हत्या झाली आहे तेवढी शिकारीच्या निमित्तानें हिंस्र श्वापदांचीहि झाली नसेल. महात्मा गांधींनीं खादीची चळवळ सुरू केली तर लगेच देशीविदेशी गिरणीवाले जाड्याभरड्या कापडावर खादीचा छाप मारून व तें महाग विकून फायदा उकळण्यास पुढें सरसावले. धर्मानें एकादा स्तुत्य उपक्रम केला तर त्याचा गैरफायदा घेण्यास षड्रिपु सदैव टपलेले असतात.

देशाभिमानाचा धिंगाणाः—देशाभिमान ही किती उदात्त भावना आहे! पण तीच आज मनुष्यजातीच्या प्रगतीच्या मार्गांतील मोठ्यांत मोठी अडचण होऊन बसली आहे. किंबहुना मनुष्यानें आजवर कमाविलेल्या संस्कृतीच्या नाशालाच देशाभिमान आज उद्युक्त झालेला दिसत आहे. माझा देश हा ईश्वराचा लाडका देश, तो वैभवाला चढावा, त्याची सरशी व्हावी, मग इतर देशांचें कांहींहि होवो, किंबहुना इतर राष्ट्रें माझ्या राष्ट्राच्या परिचर्येसाठींच असल्यानें त्यांना जिंकल्याखेरीज, किंवा तीं माझ्या राष्ट्राचे दुष्मन् असल्यामुळें त्यांना चिरडल्याखेरीज, माझा देश ऊर्जितावस्थेला येणेंच शक्य नाहीं, जणूं कांहीं माझा देश तेवढा देवानें निर्माण केला आणि बाकीचे देश सैतानानें केले, अशा भावनेनेंच लक्षावधि शूर, बहादूर,

दिलदार योद्धे-प्रत्येक देशाच्या मनुष्यबळाच्या दुधावरील सायी—निःसीम त्यागाला, परंतु त्याबरोबरच अनन्वित कृत्यांना, सिद्ध होत आहेत. हिटलर आम्हां बिगर-जर्मनांना राक्षससा वाटतो, तथापि तो निःसीम देशाभिमानानें प्रेरित झालेला आहे, हें उघड आहे. आपलें जर्मन राष्ट्र हें साऱ्या मनुष्यजातीमध्यें श्रेष्ठ आहे, जगाचें प्रभुत्व करण्यासाठींच दयाघन प्रभूनें तें निर्माण केलें, त्याची सेवा बजाविण्यासाठीं इतर राष्ट्रें केलीं, परंतु तीं राष्ट्रें सृष्टिकर्त्याच्या मूळ उद्देशाविरुद्ध जाऊन जर्मनीला पाण्यांत पाहूं लागलीं; त्यांनीं जर्मनीच्या केलेल्या तात्पुरत्या पाडावाची भरपाई करण्यासाठीं व जर्मन राष्ट्राला मूळ ईश्वरी योजनेनुसार श्रेष्ठस्थान प्राप्त करून देण्यासाठीं ईश्वरानें मला धाडलें, अशा स्वार्थरहित, उदात्त भावनेनेंच हिटलर आपल्या ईश्वरदत्त असामान्य शक्तीनिशीं निरलसपणें, अविश्रांतपणें, सुखाची व देहाची पर्वा न करतां, जर्मन राष्ट्राचें नेतृत्व करीत आहे. (आम्ही कबूल करतों कीं आम्हांला हिटलरची प्रत्यक्ष माहिती नाहीं. वर्तमानपत्रद्वारां मिळणाऱ्या माहितीला व आमच्या प्रस्तुत विवेचनाच्या सोयीला अनुसरूनच वरील चित्र रेखाटलेलें आहे.) जी स्थिति हिटलरची तीच प्राचीन काळापासून साऱ्या आक्रमक राष्ट्रांच्या नेत्यांची होती व आहे. जगांतील पुष्कळसे अनर्थ, झटापटी, रक्तपात, जुलूम, कुचंबणा, शोक व दुःखें या राष्ट्राभिमानालाच आभारी आहेत.

संकुचित राष्ट्रवाद किंवा "मी माझ्या देशाची उन्नति साधणार व त्यासाठीं इतर देशांना चिरडून टाकणार" असें म्हणणारा 'राष्ट्रपूजाधर्म' हा आज पाश्चात्य देशांना मोठा शाप होऊन बसला आहे, आणि त्याचा संसर्ग आम्हां पौर्वात्यांनाहि बाधल्याखेरीज राहिलेला नाहीं. आम्ही पौर्वात्य तेवढे सज्जन आणि पाश्चिमात्य तेवढे सारे दुर्जन असें आमचें म्हणणें नाहीं. अलीकडे यूरोप-अमेरिका हींच जगाच्या राजकारणाचीं केंद्रें बनलीं होतीं. पौर्वात्य देशांना जणूं स्वतःचें स्वतंत्र राजकारणच नव्हतें,—याच अर्थानें वरील विधान केलेलें आहे. सध्यां जपान कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्राला या राष्ट्रवादाच्या बाबतींत हार जाणार नाहीं. आम्हां मराठ्यांची सद्दी होती तेव्हां आम्हीहि चारी दिशांनीं मुलुखगिरी करण्यास कमी केलें नव्हतें. संभव आहे

कीं पाश्चात्य आणि पौर्वात्य यांच्यामध्यें कांहीं फरक असेल तर तो जित व जेते, यशस्वी व अपेशी, प्रभावी व निष्प्रभ, प्रबल व निर्बल यांच्यामध्यें सहजीं पडणारा फरकच आहे.

जातिवादः—हिंदुस्थानाच्या राशीला तर आणखी एक दुष्ट ग्रह—जातिवाद—लागलेला आहे. आम्ही सबंध गांवाला किंवा मुलखालाहि आपला म्हणण्यास तयार नाहीं. एक म्हणतो "मी हिंदू; हिंदूहिंदूमध्यें कसलेहि भेद मानण्यास मी तयार नाहीं, पण 'हिंदी' म्हणून कोणता वर्ग आहे हें आपण कबूल करण्यास तयार नाहीं." तर दुसरा त्याचाच भाऊ म्हणतो "मी ब्राह्मण, आज सारें जग ब्राह्मणांवर उलटलेलें आहे, अशा परिस्थितींत ब्राह्मणांनीं मजबूत संघटना केल्याखेरीज त्यांना जगण्याची आशा नाहीं. मी माझें शक्तिसर्वस्व खर्च करून ब्राह्मणेतरांच्या आक्रमणाला तोंड देणार." तिसरा म्हणतो "मी चित्पावन. पेशवाई बुडाल्यापासून आमचा जो ऱ्हास सुरू झाला तो किती खोलापर्यंत जाऊन थांबणार तें समजत नाहीं. इतर साऱ्या जाती आपापली संघटना करून आपापल्यापुरतें पहात असतांना आम्हीच तेवढे भोळसटपणें स्वस्थ बसून कसें चालेल?" *

राष्ट्रवाद म्हणतो लगतच्या प्रदेशांतील लोक तेवढेच माझे, बाकी दूरचे ते माझे दुष्मन्, तर जातिवाद शेजाऱ्यांनाहि आपले म्हणण्यास तयार नाहीं. तो म्हणतो साऱ्या मुलखांत ठिकठिकाणीं तुटक तुटक विखुरलेले जातभाई तेवढे 'माझे', बाकीचे 'परके' किंवा शत्रु. माझा लगतचा शेजारी, माझ्या घरांत वावरणारी मोलकरीण, दुधाचा रतीब देणारा गवळी, धान्य पुरविणारा वाणी, हजामत करणारा न्हावी, माझे कपडे धुणारा धोबी, माझ्या मुलांना शिकविणारा मास्तर, माझें घर बांधणारे सुतार व गवंडी, भांडीं घडून देणारे तांबट व कुंभार, पायतणें शिवून देणारा चांभार, घरासमोरील रस्ता झाडणारा झाडूवाला व घरामागील पायखाना साफ करणारा भंगी, दुखण्यांतून बरा करणारा डॉक्टर, हे सारे मला परके व दूरचे, आणि

* लेखकानें स्वतःचीच जात व पोटजात दृष्टांतासाठीं घेतली, यांत त्या जाती विशेष जातिनिष्ठ आहेत असें सुचविण्याचा उद्देश नाहीं.

माझ्यापासून हजारों मैलांवर रामेश्वर, तंजावर, नागपूर, इंदूर, काशी, दिल्ली इत्यादि ठिकाणीं रहाणारे जातभाई—ज्यांना मी कधीं काळेगोरे पाहिले नाहीं आणि पहाणारहि नाहीं—ते म्हणे माझे आप्तेष्ट !

मुळांत 'माझें' व 'परकें' हा सारा भेदच नवलपूर्ण आहे. खरें पाहिलें तर जगांत सगळेच सगळयांचे आहेत; प्रत्येक मनुष्य विश्वकुटुंबाचा घटक आहे. परंतु मनुष्याचें तेवढ्यावर समाधान होत नाहीं. भरल्या घरांत त्याला एकलकोंडें वाटतें, भीति वाटते. सर्वांतून कांहींना 'खास माझे' म्हणून अडवून धरल्याखेरीज त्याला चैन पडत नाहीं, धीर वाटत नाहीं. विश्व-कुटुंबाचे पोटांत मनुष्य छोटें कुटुंब रचतो. आईबाप, भाऊ, पत्नी, मुलें हीं 'माझीं', त्यांनीं माझ्यावर प्रेम करावें व मी त्यांच्यावर करावें, त्यांनीं माझ्या उपयोगीं पडावें व मी त्यांच्या उपयोगीं पडावें, असा त्यांचे माझेमध्यें अलिखित संकेत ठरलेला असतो. माझें कुटुंब, घराणें, तसेंच जवळचे, दूरचे व संभाव्य सगेसोयरे मिळून माझी जात बनते. जातभाई तेवढे मला 'माझे' वाटतात. परकी मुलखांत मला माझ्या जातीचा किंवा आडनांवाचा किंवा माझ्या मुलखांतला कोणी भेटला म्हणजे मला प्राणसखा भेटल्यासारखें, माझ्या जिवांत आणखी जीव भरल्यासारखें वाटतें, येथपर्यंत ठीक आहे; परंतु अशा तऱ्हेनें पांचांना 'माझे' म्हणून जोडतांना मी पन्नासांना 'परके' म्हणून तोडतों, शेर मिळविण्यासाठीं खंडी घालवून बसतों, तें मात्र ठीक नाहीं.

**संकुचित वृत्तिः**-राष्ट्रवाद व जातिवाद हे सारे 'मूढग्राह'—बळेंच उराशीं बाळगून धरलेल्या अडाणी कल्पना—आहेत. देवानें तुला मनुष्य केला; तुला असंख्य बंधु दिले. जगभर पसरलेल्या बंधूंची तुला ओळखहि असणें अशक्य असलें तरी तुझ्या गांवचे, तुझ्या नित्य परिचयांतलेहि हजारों बंधु तुला लाभले आहेत. देवानें तुला थोर वारसा दिला, सबंध मुलुख इनाम दिला, पण तूं तो करंटेपणानें लाथाडून देऊन एक कोपराच धरून बसतोस आणि म्हणतोस कीं "एवढीच माझी जागा; हिच्या बाहेर सारें जंगल असून त्यांत हिंस्र श्वापदें फिरतात, मी माझ्या हद्दीबाहेर पाऊल टाकणार नाहीं. किंवा टाकलें तर बंदुकीनिशीं शिकार करण्यापुरतें टाकीन." तूं आहेस महासागर, पण

तुझ्या डोक्यांत वेड शिरलें आहे कीं "मी सागर नाहीं, मी डबकें." नशीब तुझें! तूं म्हणशील "मी सुद्धां सागर व्हायला तयार आहें, पण माझ्या शेजारचीं डबकीं अगोदर आपापला डबकेपणा सोडून सागर बनण्यास कबूल असतील तरच. त्यांचा तर सर्वांचा आपापल्याला डबकींच म्हणवून घेण्याचा आग्रह आहे. मग मीच काय गुन्हा केला आहे कीं, मीच तेवढें सागर बनावें!" तेंहि खरेंच! हें खरे आहे कीं जातिवाद, राष्ट्रवाद, इत्यादि सारेच संकुचित वाद संसर्गजन्य आहेत आणि परस्परपोषकहि आहेत. तेल्यांनीं स्वतःची संघटना केली कीं माळ्यांनाहि आपली जाति-संघटना हवीशी वाटते, व तिच्यामुळें तेल्यांच्या मूळच्या संघटनेचेंहि समर्थन होतें. मराठा लीग आणि ब्राह्मण सभा, कऱ्हाडे संमेलन आणि चित्पावन परिषद, हिंदुसभा आणि मुस्लीमलीग, एकमेकांच्या आधारानेंच काम करतात. एकाचा क्षयरोग दुसऱ्याला लागतो. परंतु मागाहून आजारी पडला त्याच्या आजाराची अवस्था अलीकडचीच असेल असें नाहीं, त्याची प्रगति अधिक जलदहि असूं शकेल.

**खाऊसाठीं आत्माहुतिः**—विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं लोक राष्ट्राच्या किंवा जातीच्या कामीं आत्यंतिक त्याग करण्यास तयार होऊन, स्वतःच्या जिवावरहि उदार होतात. खरोखर पहातां मनुष्यानें आत्यंतिक त्याग हा परमार्थ प्राप्तिसाठींच करणें उचित आहे. तात्पुरत्या फायद्यासाठीं आत्मबलिदान देण्यामध्यें शहाणपणा नाहीं, उदात्तता किंवा पावित्र्यहि नाहीं. ईर्ष्या, मद, दर्प, द्वेष, क्रोध, क्षोभ, इत्यादींमुळें उद्‌भवणाऱ्या मोहाचा, अंधतेचा किंवा माथेफिरूपणाचाच तो परिणाम होय. तें शांत, विचारी, सात्त्विक, नम्र, प्रसन्न किंवा प्रेमळ वृत्तीचें लक्षण नव्हे. फारच तर त्याला भोळसपणा म्हणतां येईल. पूर्वीं आपल्यामध्यें सतीची पद्धत होती. सती 'जाणाऱ्या' विधवा किती असत, आणि 'दिल्या जाणाऱ्या' किती असत त्यांचें परस्पर प्रमाण ठरविण्याची आतां शक्यता नाहीं, तथापि तर्क असा आहे कीं इहलोकीची कीर्ति, परलोकींचें ऐश्वर्य आणि आप्तेष्टांचें उत्तेजन यांना भुलून आणि वैधव्याच्या दुःखांना भिऊन कांहीं विधवा सती जाण्याचा 'संकल्प' सोडीत असाव्या. प्रत्यक्ष पेटत्या चितेचा सामना

करावा लागतांच त्यांची स्वतःच्या संकल्पाचा फेर विचार करण्याचीहि तयारी होत असावी; परंतु धार्मिक विधिपूर्वक सोडलेला संकल्प पुरा करणें अत्यावश्यक मानलें जात असे. संकल्पभ्रष्ट सतीच्या नशिबीं इहलोकीं नाचक्की आणि परलोकीं रौरव नरकच असणार. त्यांपासून त्या साध्वीचें रक्षण करण्याकरितां तिचे आप्तेष्टसुद्धां तिला पेटल्या चितेंतच स्थिर रहाण्यास 'मदत' करीत असावे. * कोणीकडूनहि एवढें खास कीं शोकावेग, भोळसरपणा किंवा क्रूरपणा यांखेरीज आणखी कसलीहि उदात्त तत्त्वज्ञानाची किंवा अध्यात्माची भूमिका सतीच्या प्रथेच्या मुळाशीं नव्हती.

शेतकरी ' जमिनीसाठीं जान ' देण्यास तयार होतो. कनक आणि कांता यांचेसाठीं पुष्कळ प्राण घेतले व प्रसंगीं दिलेहि जातात. लहान मुलें तर आवडीचा खाऊ मिळण्यासाठीं अन्न-त्याग करतात. आपल्या राष्ट्राची किंवा जातीची इतर राष्ट्रांबरोबरच्या किंवा जातींबरोबरच्या स्पर्धेमध्यें सरशी व्हावी एवढ्यासाठीं मी जीवावर उदार होणें हाहि त्याच मासल्याचा अविचार होय.

मनुष्यानें आत्यंतिक त्याग करावयाचा तो तत्त्वासाठीं किंवा सिद्धांतासाठीं करावा; सत्याच्या शोधासाठीं किंवा सत्याच्या स्थापनेसाठीं करावा; कर्तव्य पालनासाठीं किंवा शील रक्षणासाठीं करावा; अन्यायाच्या किंवा जुलमाच्या प्रतिकारार्थ करावा. हीं सारीं परममूल्यें आहेत, आणि परममूल्यासाठीं प्राणाचें मोल देणें हा फायद्याचाच सौदा आहे. तसेंच, दुसऱ्याचे प्राण वांचविण्यासाठीं जरूर तर आपलें प्राण द्यावे, किंबहुना दुसऱ्याचें दुःख निवारण्यासाठीं किंवा सुखवृद्धिसाठींहि द्यावे. अर्थात् ती जगाच्या सात्त्विक सुखाची निर्भेळ वाढ असली पाहिजे, एकाला लुबाडून दुसऱ्याची भर करण्याच्या स्वरूपाची असतां कामा नये. मनुष्याच्या शारीरिक दुःख—निवारणाला साहाय्यभूत होणारे शोध लाविण्यासाठीं अलीकडे बेडूक, बकरे इत्यादींना जिवंत चिरण्यांत येतें, किंवा प्लेग-

* राजा राममोहनराय यांची भावजय सती [ दिली ] गेली त्या प्रसंगाचें त्यांनीं वरीलप्रमाणेंच वर्णन केलेलें आहे.

प्रतिबंधक लस तयार करण्यासाठीं घोड्यांचा बळी देतात; त्याऐवजीं संशोधन प्रेमी इसमानें स्वतःचेंच शरीर असल्या प्रयोगासाठीं देणें योग्य होईल.

परंतु नायगाराच्या धबधब्यांतून पोहून जाण्यासाठीं, किंवा सर्कशीचे अचाट खेळ करून दाखविण्यासाठीं, जीव धोक्यांत घालणें यांत साहस असलें तरी शहाणपणा नाहीं. असल्या गोष्टी दुसऱ्यानें केल्यास त्याचें फुकटचें कौतुक करावें, परंतु शहाण्या माणसानें त्यांचें अनुकरण मात्र करूं नये!

**"स्वराज्यासाठीं मरावें?"** — १९३० सालची गोष्ट. सत्याग्रहाच्या लढयाची पूर्व तयारी चालू होती. एका सभेंत वक्त्यांनीं जोरदार वक्तृत्वानिशीं तरुणांना देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आत्मबलिदान करण्यास सिद्ध होण्याचा संदेश दिला. सभेचे अध्यक्ष हे प्रौढ व व्यवहारी होते, वक्तृत्वाच्या पुरांत वाहून जाणारे नव्हते. समारोपाच्या भाषणांत त्यांनीं वक्त्यांच्या बेछूट विचारसरणीचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले "देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मरणें हा वेडेपणा नव्हे काय? मेल्यानंतर स्वातंत्र्याचा उपभोग कोण घेणार?"

**गांधींचें आश्वासनः**—याच्या थेट उलट १९२१ सालअखेर अमदाबाद मुक्कामीं भरलेल्या कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून महात्मा गांधींनीं ब्रिटिश सरकारला आश्वासन दिलें कीं "हिंदुस्थानावर केवळ बाहुबळानें जुलमी सत्ता गाजविण्याचाच तुमचा हेतु असेल तर मीहि आश्वासन देतों कीं ती सत्ता नष्ट होईल; मग त्या प्रयत्नांत यच्चयावत् हिंदी लोकांना प्राणास मुकावें लागलें तरी बेहेत्तर!"

आमचे अध्यक्ष स्वातंत्र्यासाठीं रक्ताचा थेंब द्यायला तयार नाहींत. तर गांधींना स्वतंत्र हिंदुस्थान निर्मनुष्य असलें तरी फिकीर नाहीं; दोघेहि देशभक्त, दोघांनाहि स्वातंत्र्य पाहिजे. मग स्वातंत्र्यासाठीं उभयतांनीं देऊं केलेल्या किंमतींत एवढी तफावत का?

कारण एवढेंच कीं अनेक व्यवहारी लोकांच्या मनांत जी विचारसरणी अस्पष्ट व अनिर्णीत स्थितींत असते तीच अध्यक्षांनीं उघडी करून मांडली,

या विचारसरणीनुसार " स्वराज्य ही उपभोगाची वस्तु आहे. देशबांधव किंवा ज्ञातिबंधु हे मी माझ्या सुखसोयीसाठीं जोडलेले साथीदार होत. जात व राष्ट्र म्हणजे आत्मसंरक्षणार्थ व आक्रमणार्थ बनवलेली जूट [ ऑफेन्सिव्ह ॲन्ड डिफेन्सिव्ह अलायन्स ] किंवा सहभागीदारीची कंपनीच होय. त्या कंपनीच्या उत्कर्षासाठीं इतरांच्या बरोबरीनें मीहि भांडवल गुंतवीन, परंतु कंपनीच्या व्यवहारांत फायदा सुटावा म्हणून प्राण अर्पण करणें हा शुद्ध वेडेपणा होईल. "

किंवा असें म्हणतां येईल कीं, " जग ही एक रणभूमि आहे, तींत सगळे सगळ्याशीं लढत आहेत, सगळे सगळ्यांचें वैरी आहेत. एकी म्हणजे कंपू होय. शत्रूंपैकीं कांहींचा सामना करण्यासाठीं इतर कांहीं शत्रूंना तात्पुरते जोडावे लागतात. आगगाडीचा डबा लहान आहे, उतारू जास्त आहेत. प्रत्येक उतारूची इतर साऱ्या उतारूंशीं स्पर्धा आहे. तरी पण मी त्यांपैकींच चारदोन पॅसेंजरांशीं संगनमत केलें तर ते व मी परस्पर सहकार्यानें आम्हां पांचचार जणांसाठीं डब्यांतील एक सबंध खण अडवूं शकतों. अर्थात् त्याचबरोबर त्यांतल्या त्यांत खिडकीजवळची, सोयीस्कर व अधिकांत अधिक जागा मला मिळावी असा स्वतःचा कटाक्ष असणारच. त्यासाठीं मी माझ्या दोस्तांनाहि चकविण्याची चलाखी करतों, किंवा ती साधण्यासारखी नाहीं अशी खात्री पटते तेव्हांच स्वस्थ राहतों. अलीबाबाच्या गोष्टींतील चोरांच्या नायकालाहि अशाच तऱ्हेनें चाळीस दोस्त जोडावे लागले होते. या सनातन सर्वव्यापी महायुद्धामध्यें आक्रमण हाच आत्मरक्षणाचा मार्ग आहे, आणि शांतता म्हणजे हल्ल्यांच्या मध्यंतरीची सुटी आहे. येथें कोणी कोणाचा नाहीं, माझा मी; मित्र, आप्तेष्ट हे सारे कामापुरते मामा होत. राष्ट्रांमधील परस्पर व्यवहारामध्यें हा न्याय चालू असलेला आपल्याला उघड दिसतो. व्यक्तींव्यक्तींमधील व्यवहारांत तो पुष्कळ अंशीं झाकलेला असतो. एवढेंच, परंतु मुळांत प्रकार तोच. "

**युक्तता आणि उपयुक्तता:**—या विचारसरणीला आपण उपयुक्ततावाद म्हणूं या. याच्या उलट वरील दृष्टांतांतील महात्मा गांधींची विचारसरणी ही 'युक्ततावादी' आहे. " हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हीं युक्त गोष्ट

आहे, ती ईश्वरी योजना आहे. पारतंत्र्य ही अयोग्य, गैरवाजवी, गोष्ट आहे; ईश्वरी योजनेचा तो भंग आहे, आणि ईश्वराच्या प्रतिबिंबाच्या स्वरूपाची आपल्याला लाभलेली जी माणुसकी तिचा तो द्रोह आहे. स्वराज्य हा गोड खाऊ नसून आत्म्याची ती एक उन्नत व स्पृहणीय अशी अवस्था आहे. ती अवस्था गांठण्यासाठीं या जन्मींचा हा एकच देह काय, पण जन्मोजन्मीं अनेक देह सांडावे लागले तरी त्यांत कसलेंच नुकसान नाहीं. त्या थोर ध्येयापुढें आपले देह हे क:पदार्थ आहेत. स्वराज्यसंपादनार्थ मी प्राण अर्पण करतों तो त्या सहभागीदारीच्या व्यापारी कंपनीसाठीं नव्हे, तर परमेश्वरासाठीं, त्याच्या योजनेच्या सिद्धीसाठीं."

यांत उपयुक्तता ही साधतेच. जें युक्त आहे तें उपयुक्तहि असणार, मात्र ती उपयुक्तता सुद्धां शाश्वत, व्यापक, सार्वभौम अशी आहे. ती मोजमापांत मावणारी नाहीं. ती अतींद्रिय आहे. जसें, पृथ्वीवरील बारीक-सारीक पदार्थांना वजन आहे, पण साऱ्या पृथ्वीला वजन म्हटलें तर खूप आहे, नाहीं तर मुळींच नाहीं. पदार्थांच्या वजनाचें मूळच पृथ्वीचें आकर्षण आहे, पण पृथ्वी स्वत:लाच कशी आकर्षूं शकणार ! आणि तिचें वजन तरी कोणत्या तराजूत कोणत्या वजनांनीं करणार ! त्याचप्रमाणें युक्तता हा साऱ्या मूल्यांचा आधार आहे; उपयुक्ततेची जननी आहे. तिची स्वत:ची उपयुक्तता कोण मोजूं शकणार !

माझा स्वत:चा साडेतीन हात देह हा माझ्या अस्मितेचा प्रस्थान-बिंदु आहे. ही अस्मिता विस्तार पावूं पहाते. कुटुंब वंश, देश हे तिच्या प्रगतीचे टप्पे आहेत, परंतु अंतिम ध्येय विश्व किंवा ईश्वरच आहे. तेथें पोंचेपर्यंत या अस्मितेला विश्रांति नाहीं. मानवी जीवनाचीं हीं अपर व परम टोकें आहेत. उपयुक्ततावाद हा कोठेंहि घोटाळतांना दिसत असला तरी त्याची ओढ मागच्या बाजूला आहे, तो अपरनिष्ठ आहे. युक्ततावाद कोठेंहि उभा असला तरी त्याची नजर अंतिम ध्येयावर खिळलेली असते, तो परमनिष्ठ आहे. या निष्ठांनाच वाटल्यास स्वार्थ व परमार्थ अशींहि नांवें देतां येतील. उपयुक्ततावाद स्वार्थी आहे, युक्ततावाद परमार्थी आहे.

**संघटनेंतून विघटना:**—देशसेवा व ज्ञातिसेवा या परमार्थपर असल्या पाहिजेत. परंतु वर ज्या राष्ट्रवादाचा व जातिवादाचा आम्ही उल्लेख केला ते परमार्थपर नसून स्वार्थपर असतात, म्हणूनच आमची त्यांच्या विरुद्ध तक्रार आहे. " परके ठक आहेत, ते आपल्याला ठकविण्यासाठीं टपलेले आहेत. सबब त्यांना ठकविण्यासाठीं आपणहि संघटित झालें पाहिजे. " अशा भावनेनें केलेल्या या संघटनांतून विघटनाच पैदा होणार. जो न्याय जगाला लावावा तोच न्याय स्वत:वरहि उलटल्याखेरीज रहात नाहीं. राष्ट्रवादांतून जातिवाद आणि जातिवादांतून पोटजातिवाद, किंवा दुसऱ्या बाजूनें राष्ट्रवादांतून प्रांतवाद व प्रांतवादांतून विभागवाद उद्भवल्याखेरीज रहात नाहीं. बीज तसें फळ: ज्या कारणासाठीं हिंदु-मुसलमानांना परस्परांविरुद्ध संघटना करावी लागते, नेमक्या त्याच कारणासाठीं ब्राम्हण–ब्राम्हणेतर, शिया–सुनी इत्यादींनाहि परस्परांविरुद्ध संघटित व्हावें लागते. पुढें क्रमाक्रमानें ब्राम्हणा–ब्राम्हणांमध्यें, तेल्या--तेल्यांमध्यें, महारां--महारांमध्येंहि त्याचतऱ्हेचे तट पडत जातात. समाजाचा चुरा चुरा होणें हीच या संकोचवादाची व फाटाफुटीची परमावधि होय.

स्वार्थासाठीं जोडलेले दोस्त त्याच स्वार्थाच्या परिपूर्ततेसाठीं तोडावे लागतात. दोन चोर डल्ला मारून परत जात असतां फराळ करण्यासाठीं गांवाबाहेर एका विहिरीपाशीं थांबले. एक चोर गावांत फराळाचें सामान खरीदण्यासाठीं गेला असतां त्याला विचार सुचला कीं आपण आपल्या जोडीदाराला विष घालून ठार करावा म्हणजे सारा ऐवज मलाच एकट्याला मिळेल. असा विचार करून तो अर्ध्या मिठाईत विष मिसळून परत विहिरीपाशीं आला. पाणी काढण्यासाठीं तो विहिरीवर वांकतो तों त्याच्या मित्रानें त्याला विहिरींत ढकलून दिला ! कारण " सारा ऐवज आपल्या एकट्यालाच मिळणें श्रेयस्कर " या बाबतींत त्याचें पहिल्या चोराशीं पूर्ण एकमत होतें ! मिठाईसुद्धां अर्धीच नव्हे तर सर्वच त्याला एकट्याला खायला मिळाली. त्यापायीं मृत्यूचाहि पुरा वांटा त्याच्या पदरांत पडला. आणि अखेरीस चोरीचा ऐवजहि उभयतांना तंतोतंत समसमान मिळाला !

**आपुलकीचें कौतुक:**— " सर्व:कांतमात्मीयं पश्यति — आपला

तो बाब्या आणि दुसऱ्याचा तो कारटा " ही दुनियेची ( एक ) रीत आहे. एकप्रकारें ही ईश्वरी कृपा आहे. ज्याला त्याला आपली भाषा मधुर वाटते, आपलें घर टुमदार वाटतें, आपलीं मुलें सर्व मुलांत गोजिरवाणी वाटतात, आपली स्त्री रंभा वाटते; म्हणून तर प्रत्येक जण आपापल्या स्थितींत समाधानानें व आनंदानें रहात असतो. परंतु कमळाखालीं सुसरहि असते त्याप्रमाणें या सद्वृत्तीबरोबरच 'दुसऱ्याचा तो कारटा' ही दुष्ट-वृत्तिहि असते, एवढेंच वाईट. इतरांचे देश, त्यांचे रीतिरिवाज, त्यांचा धर्म, त्यांची भाषा, त्यांचें संगीत, त्यांच्या कला यांबद्दल मला घृणा वाटते. ही एक तऱ्हेची नास्तिकता आहे. या वृत्तीमुळें दोन माणसेंहि एकत्र नांदू शकणार नाहींत. " मी तसेच इतर, माझ्या हृदयांत वास करणारा ईश्वरच दुसऱ्याच्या हृदयांतहि वास करीत आहे. इतरांतील दोष मला दिसतात तसें माझ्यांतील मला न कळणारे दोष इतरांच्या डोळ्यांत खुपत असतील. इतरांनीं माझे दोष चालवून घ्यावे असें ज्याप्रमाणें मला वाटतें त्याप्रमाणें इतरांना संभाळून घेणें हें माझेंहि कर्तव्य आहे—" अशा तऱ्हेची वृत्ति परस्परांमध्यें असल्यानंतर दोन माणसें जशीं नांदतील तशीं दोन राष्ट्रेंहि नांदू शकतील. ज्या सिमेंटानें दोन विटा सांधता येतात त्याच सिमेंटानें नद्यांचीं पात्रें ओलांडणाऱ्या विस्तीर्ण कमानीहि उभारतां येतात.

**दोन प्रवृत्तिः**—जो इसम देशावर निरपेक्ष प्रेम करूं शकत नाहीं त्या इसमाचें स्वतःच्या कुटुंबावरहि निरपेक्ष प्रेम नाहीं असा बराच संभव आहे. देशाला जो आपल्या सुखाचें साधन मानतो तो आपल्या मुलांबाळां-नाहि स्वतःच्या सुखाचीं साधनेंच मानतो आणि स्वतःच्या सुखासाठीं त्यांचा बळी देण्यास मागें पुढें पहात नाहीं. उलटपक्षीं जी आई आपल्या बाळावर निरपेक्ष प्रेम करते, तिला तिचें अपत्यप्रेमच इतरांबद्दलहि वात्सल्य-वृत्ति बाळगण्यास शिकवील. जो सच्चा देशसेवक आहे तोच विश्वसेवकहि होईल.

स्वार्थ आणि परमार्थ या दोन प्रवृत्ति आहेत. त्या सनातन व सर्वस्पर्शी आहेत. संकुचित निष्ठावाल्या प्रत्येक इसमाच्या मनांत वरील एकांतिक स्वार्थी भूमिका स्पष्ट झालेली असते असें नव्हे, तर ती त्याच्या

वृत्तीची उपपत्ति आहे. निरपेक्ष वृत्तीनें कार्य करणाऱ्या सेवकाला विश्वैक्याची किंवा सर्वभूतात्मभावाची स्पष्ट जाणीव असते असेंहि नाहीं. त्याच्या वृत्तीचें तें विशदीकरण आहे. कोणतीहि एक व्यक्ति एकाच प्रवृत्तीनें सर्वस्वी भारलेली असते असेंहि नाहीं. प्रत्येकामध्यें दोन्ही प्रवृत्ति प्राबल्यासाठीं झगडत असतात. कांहीं माणसांत एका प्रवृत्तीचें तर कांहींत दुसऱ्या प्रवृत्तीचें प्राधान्य असतें. एकाच व्यक्तीमध्यें सुद्धां कांहीं काळ एक तर कांहीं काळ दुसरी प्रवृत्ति कमी अधिक प्रमाणांत प्रभावी होत असते. प्रत्येकाच्या हृदयांतील कुरुक्षेत्रावर हें सनातन युद्ध चालू आहे. त्यांत सत्पक्षाची सरशी होण्यास यथार्थ ज्ञानाच्या प्रकाशाची फार मदत होईल.

**ईश्वरार्पण कर्म:**—ज्ञातिनिष्ठा किंवा राष्ट्रनिष्ठा यांचेशीं आमची मूलत: तक्रार नाहीं. सेवेचें क्षेत्र कितीहि लहान मोठें असो, सेवकाची दृष्टि व्यापक किंवा ईश्वराभिमुख असावी, संकुचित किंवा ईश्वरपराङ्मुख असतां नये. स्वतःच्याच देहाचे चोजले पुरवीत रहाण्यापेक्षां आपलीं मुलेंबाळें, आप्तेष्ट यांचे सुखासाठीं झटणें केव्हांहि अभिनंदनीयच आहे; मात्र इतर कुटुंबांचा द्रोह करून स्वतःच्या कुटुंबाचें भरणपोषण करण्यांत श्रेय नाहीं. कुटुंबीय वृत्ति गांवापर्यंत किंवा पंचक्रोशीपर्यंत विस्तार पावली तर ती गोष्टहि स्तुत्यच आहे, मात्र मुलखाची लूट करून माझ्या गांवानें श्रीमंत व्हावें अशी बुद्धि नसावी. ब्राह्मण-संघटना ही ब्राह्मणांब्राह्मणांमधील विषमता नष्ट करून अंतर्गत बंधुभाव व समानता स्थापण्यासाठीं व समाजाच्या सेवेसाठीं ब्राह्मणांना सज्ज करण्याकरतां असेल तर ब्राह्मणेतरहि तिला मदत करतील. हिंदुसंघटनासुद्धां व्यापक दृष्टि ठेवून हरप्रकारें करावयास पाहिजेच आहे. सामाजिक समता, अस्पृश्यता निवारण, कुप्रथांचें निर्मूलन, धर्मजागृति यांसारखीं नानाविध कार्यें आवश्यक आहेत, राष्ट्रसेवा ही तर पवित्र वस्तुच आहे; मात्र तिच्यामध्यें परकीयांचा द्वेष लेशमात्र नसेल, व परक्यांची हानि न होईल अशा तऱ्हेनें ती केली तरच.

कुटुंबाची, गांवाची, जातीची किंवा राष्ट्राची, सेवा ही ईश्वरार्पण बुद्धीनें, ईश्वराच्या सेवेचा आपल्या हिश्शाला आलेला अल्प अंश म्हणूनच करावयाची आहे. ज्याप्रमाणें राजनिष्ठ शिपाई हा आपल्या हवालदाराचे

हुकूम मानण्यांत आपल्या बादशहाचीच नोकरी बजावीत असतो, बंडखोर हवालदाराचे हुकूम मानल्यास तो स्वत:हि ज्याप्रमाणें बंडखोर ठरेल, त्याचप्रमाणें कुटुंबनिष्ठा किंवा राष्ट्रनिष्ठा ही विश्वद्रोही असतां कामा नये.

**तात्त्विक व व्यावहारिक निष्ठाः**—नीतिनियमांचें पालन ही विश्वनिष्ठेची कसोटी आहे हें मागील प्रकरणांतील विवेचनावरून लक्ष्यांत आलेंच असेल. परंतु केवळ विश्वनिष्ठा पुरेशी नाहीं. त्या तात्त्विक निष्ठेच्या जोडीला व्यावहारिक अंमलबजावणीसाठीं देशनिष्ठाहि पाहिजे. तात्त्विक ऐक्य किंवा समता व व्यावहारिक ऐक्य किंवा समता यांमधील फरक लक्ष्यांत घेणें आवश्यक आहे. "शुनि चैव श्वपाकेच पंडिताः समदर्शिनः (ब्राह्मण), कुत्रा आणि चांडाळ यांमध्यें ज्ञानी इसमाला भेद दिसत नाहीं" (गीता.) अशा तऱ्हेची वेदांती समता आपल्यामध्यें पुरेपूर आहे, परंतु तोच गीतापाठक ब्राह्मण, भिन्न पोटजातीच्या ब्राह्मणाचें आतिथ्य करावें लागल्यास त्याचें पान दूर मांडील आणि उष्टें शेण त्याचें त्यालाच करायला लावील. हिंदुसभेच्या एका थोर पुढाऱ्यानें एकदां आम्हांला सांगितलें कीं, "हिंदुसभेची दृष्टि मुळींच संकुचित नाहीं. हिंदूंचा अभ्युदय साधणें व तद्द्वारा अखिल मानवाची सेवा करणें हेंच आमचें ब्रीद आहे." हिंदू आणि मनुष्यजात यांच्या दरम्यान हिंदुस्थानचा टप्पा असल्याची त्याला खबरच नाहीं! मग "माध्यंदिन शुक्लयजुर्वेदीय देशस्थ ब्राह्मणसंघानें" हि आपल्या ज्ञातीची व तद्द्वारा भूतमात्रांची सेवा करण्याचें ध्येय ठेविल्यास तें तरी संकुचित कसें म्हणावें?

म्हणून आम्हांला मुद्दाम म्हणावयाचें आहे कीं, सेवकाची दृष्टि तत्त्वतः विश्वनिष्ठ असावी, तशीच ती देश, प्रांत, विभाग, इत्यादि स्वाभाविक विभागांस अनुसरूनच कार्यान्वित झाली पाहिजे.

निरनिराळ्या प्राण्यांच्या तसेंच वनस्पतींच्या आकाराच्या किमानकमाल मर्यादा ठरलेल्या असतात. बोकड किती माजला तरी हत्तीची बरो-

बरी करीत नाहीं आणि वांगें किती पोसलें तरी भोपळयाच्या जोडीला याव- याचें नाहीं. त्या त्या प्राण्याच्या किंवा फळाच्या कुवतीला अशा हद्दी असतात. त्याचप्रमाणें व्यावहारिक ऐक्य मी किती लोकांशीं साधूं शकतो तेंहि माझ्या कुवतीवर अवलंबून आहे. फरक एवढाच कीं ही कुवत निस- र्गाधीन नसून माझ्याच हातीं आहे. महंमद पैगंबराचें जीवनकार्य सुरू होण्याचेवेळीं अरबस्थानांत अनेक छोट्या छोट्या राष्ट्रांचा गलबला होता, त्या सर्वांचा एकजीव करून महंमदानें महान अरब राष्ट्र रचलें. इंग्लंड- स्कॉटलंड-वेल्स् हीं पूर्वी निरनिराळीं राष्ट्रें होतीं, त्यांचा क्रमानें मिलाफ होऊन 'थोर ब्रिटन' बनलें आहे. याच्या उलट यूरपमध्यें पावलापावलाच्या अंतरावर अलग अलग राष्ट्रें बनलेलीं आहेत. आम्हां हिंदी लोकांची व्याव- हारिक ऐक्यभावना देशव्यापी व्हावी असें म्हणतांना आमचा हेतुहि हाच आहे कीं आमच्या संघशरीराची वाढ एरंडाएवढी न रहातां वडाएवढी व्हावी. मनुष्याचा ऐहिक उत्कर्ष त्याच्या या सांघिक अस्मितेच्या कुवती- वर पुष्कळ अंशीं अवलंबून आहे.

**विशाल दृष्टि व अल्पकृतिः**–सेवकाची दृष्टि विशाल असली पाहिजे या मुद्यावर येथवर आम्ही जोर दिला, परंतु विशाल दृष्टीबरोबरच प्रत्येकानें आपल्या आवांक्यानुसार सेवेसाठीं मर्यादित क्षेत्रच आंखून घेणेंहि आवश्यक आहे. एरवीं विश्व-सेवेचा जप करीत मनुष्य केवळ आकाशाकडे — शून्या- कडे—पहात भरकटेल. बायबलमध्यें ईश्वराच्या तोंडीं शब्द घातले आहेत कीं "मी तुझ्या दाराशीं गरिबाच्या रूपानें आश्रयार्थ आलों परंतु तूं मला घरांत घेतलें नाहींस; मी जखमी होऊन आलों परंतु तूं माझ्या जखमेवर पट्टी बांधली नाहींस; भुकावलेला आलों परंतु तूं मला खाऊं घातलें नाहींस; उघडा आलों परंतु तूं मला झांकलें नाहींस, इत्यादि." आणि दुसरीकडे, "माझ्या लहानांत लहान प्राण्याची तूं जी कांहीं सेवा करशील ती मलाच पोंचेल." समर्थ रामदासांनींहि सांगितलें आहे कीं,

"तो नारायण असे विश्वीं। त्याची सेवा करीत जावी।
त्या कारणें तोषवावी। कोणी तरी काया॥"

देश, समाज, गांव हीं उपास्य दैवतें सुद्धां अमूर्तच आहेत. देशांतील चाळीस कोटी लोकांची सेवा तरी कशी करणार? नांव देवाचें, देशाचें किंवा गांवाचें घेतलें तरी सेवेचें अंतिम पात्र या ना त्या व्यक्तीच होत. टॉलस्टॉयनें एका गोष्टीमध्यें हा मुद्दा फार मार्मिक तऱ्हेनें मांडला आहे. सर्वांत महत्त्वाचा मनुष्य कोण? सर्वांत महत्त्वाचें कार्य कोणतें? सर्वांत महत्त्वाचा काल कोणता? टॉलस्टॉयचें उत्तर आहे. आपल्यासमोर असलेला माणूस हा सर्वांत महत्त्वाचा माणूस, हातांतील काम हें सर्वांत महत्त्वाचें कार्य आणि चालू क्षण हा सर्वांत महत्त्वाचा काल; आपली सेवावृत्ति, कर्तबगारी, योजकता यांच्यावर दाखवा.

LU400 ५१०९४६ ३१।५१।२६३

नाहींपेक्षां मी देशसेवा करणार, माझें कार्य केवढें विशाल आणि किती उदात्त आहे! अशा तऱ्हेच्या भ्रमाखालीं मनुष्य आपल्या घरच्या माणसांची आबाळ करतो, आईबापांची व मित्रांची सेवा हरतऱ्हेनें घेतो, परंतु त्या सेवेची फेड करणें त्याला आवश्यक वाटत नाहीं. देशभक्ताला घरच्या म्हातारीचे पाय चेपीत बसण्यास कोठून फुरसत असणार! देशासाठीं फांसावर लटकूं इच्छिणारे आमचे एक मित्र आपल्या देहाचे चोजले नानापरींनीं पुरवीत असतात. "देशावरून ओवाळून टाकलेला हा देह देशासाठीं फांसावर चढण्याचा तो धन्य क्षण येईपर्यंत दरम्यानच्या काळांत चैन भोगीना! तोच एक क्षण धन्य, तेंच एक पवित्र कर्तव्य! तों पर्यंतचा काळ सारा अधन्यच, त्यांत कर्तव्यें तरी कसलीं पार पाडायचीं असणार?" अशा तऱ्हेनें हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागणें हा भ्रम आहे. सेवकानें तो टाळावा. ईश्वराच्या या सृष्टींत कोणताच काळ, कोणताच मनुष्य, कोणतेंच कार्य क्षुल्लक नाहीं. त्याचें मनोभावानें, आस्थेनें, सर्वशक्तीनिशीं पालन करण्यांत यशाची गुरुकिल्ली आहे. एक इंग्रजी सुभाषित आहे कीं, "आपलें

जीवन क्षुल्लक प्रसंगांनींच भरलेलें आहे, परंतु खुद्द जीवनाला क्षुल्लक कोण म्हणेल* ! ”

तात्पर्य, आपली दृष्टि विशाल व अंतिम ध्येयावर खिळलेली असावी, मग कृति किती का अल्प असेना ! किंबहुना ती अल्प—अल्पच असली पाहिजे. पंढरीच्या वारकऱ्यांनो,

“ मार्गी हळूहळू चाला । वाचे विठ्ठल बोला ” ॥

---

*“ लाईफ् इज मेड ऑफ् ट्रायफल्स् बट् लाईफ् इट्सेल्फ इज् नॉट् ए ट्रायफल ”

# नकली सेवा : ६

धर्माच्या नांवाखालीं अनेक अधर्म्य प्रकार चालतात त्याचप्रमाणें सेवेच्या नांवाखालींहि अनेक अनर्थ चालतात, त्यांपैकीं राष्ट्रवाद आणि जातिवाद यांचा विचार झाला. आणखीहि असेंच अनेक प्रकार संभवतात. यांतील कांहीं अनर्थ सेवकाच्या गैरसमजुतीनें, अस्पष्ट कल्पनांमुळें, भोळे-पणामुळें, अननुभवामुळें, किंवा आत्मवंचनेमुळें घडतात, तर कित्येक दांभिक-पणामुळें घडतात. कोणत्याहि प्रकाराच्या मुळाशीं केवळ दांभिकपणा असतो असें नाहीं, तर दोन्ही कमी अधिक प्रमाणांत असतात. दांभिकपणा हा तरी अज्ञानाचाच परिणाम आहे आणि अज्ञानाच्या किंवा दूषित दृष्टीच्या मुळाशींहि दांभिकपणा दडलेला असण्याचा संभव असतो. तथापि सेवेच्या विकृत प्रकारांचें दंभप्रधान व अज्ञानप्रधान असें स्थूल वर्गीकरण करतां येईल. अशा कांहीं प्रकारांचें आतां विवेचन करावयाचें आहे. त्यांतील हेतु सेवामार्गी यांच्या आत्मसंशोधनाला मदत व्हावी व त्यांस धोक्यांची आगाऊ सूचना मिळावी हा आहे. प्रथम सेवेच्या नकली प्रकारांचा विचार करूं.

(१) हौस, कौतुक, जिज्ञासा इत्यादिः—विद्यार्थी, तरुण यांसारखी मंडळी निरनिराळ्या स्वयंसेवक दलांमध्यें सामील होऊन, त्यांत निरपेक्ष सेवेपेक्षां हौस, कौतुक, जिज्ञासा इत्यादींचाच अधिक अंश असतो. कॉंग्रेसचें अधिवेशन, थोर पुढाऱ्यांचा दौरा, दूरच्या प्रदेशांतील महापूर, भूकंप यांसारख्या आपत्तींचें निवारण इत्यादि प्रसंगीं पुष्कळ उत्साही तरुण मनोभावनेनें श्रम करतात; परंतु तेच परिचितांची सेवा करण्यास तितकेसे उत्सुक नसतात. " अतिपरिचयादवज्ञा "—नित्यपरिचित वस्तूंचें किंवा माणसांचें विशेष कांहीं वाटत नाहीं. स्वयंसेवक होण्यापासून नवीन माणसें, नवीन प्रदेश, अपूर्व प्रसंग, कांही नवनलाई पहायला मिळावी, इतरांपुढें ज्यांचें रसभरित वर्णन करतां येईल असे अनुभव मिळावे, प्रवास घडावा;

ओळखीदेखी व्हाव्या, गणवेष वापरायला मिळावा, आपला फोटो निघावा व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध व्हावा, यांसारख्या अस्पष्ट आकांक्षा उत्साही तरुणांच्या मनामध्यें घोळत असतात. आपल्या कर्तबगारीला एक नवीन क्षेत्र मिळालें, संधि मिळाली याबद्दलहि एक सूक्ष्म व सात्त्विक समाधान वाटतें. तसेंच एका मोठ्या कार्याचें, संघाचें किंवा दलाचें घटक बनण्यांत जी आत्मविश्वासाची जाणीव असते तीहि विलोभनीय असते. त्यांतून स्वत:ला नायकाची पदवी, जबाबदारीचें काम किंवा स्वतःच्या कामगिरी-बद्दल प्रशंसा मिळाली म्हणजे तर कार्यकर्ता विशेषच खुलतो. या वृत्ती अनिष्ट किंवा गर्हणीय आहेत असें म्हणण्याचा हेतु नाहीं. त्या स्वाभाविक असल्या तरी या कामगिरींतील मुख्य हेतु सेवा किंवा कर्तव्यबुद्धि नसतो एवढेंच स्पष्ट करावयाचें आहे. म्हणूनच कार्याचें नाविन्य नाहींसें झालें कीं त्याबद्दलचा उत्साह व आस्था हीं सुद्धां गळत जातात. यत्किंचित् कारणा-वरून स्वयंसेवक नाउमेद होऊन जातो; तसेंच महत्वाच्या प्रसंगीं तमाशा पहाण्याच्या उत्सुकतेपायीं कर्तव्याचा पार विसर पडून जातो. कॉंग्रेसच्या अधिवेशनांसाठीं स्वयंसेवकदलें उभारण्यांत येतात. त्यांची कामगिरी अगोदर शिस्तीनें चालते, परंतु पुढारी आले, गर्दी जमली, अध्यक्षांची मिरवणूक निघाली आणि अधिवेशनाला रंग चढला कीं दलनायकांना स्वयंसेवकांचा तलास लावणेंहि मुष्किलीचें होऊन जातें !

(२) **महत्त्वाकांक्षाः**—किंवा मानमान्यता, प्रसिद्धि, कीर्ति, इत्यादींचा हव्यास, हा तर सार्वजनिक कार्याच्या मुळाशीं बहुधा असायचाच. इंग्रजींत या वृत्तीचें वर्णन करणारा एक मार्मिक शब्दप्रयोग आहे. " गेट ऑन्—गेट ऑनर—गेट ऑनेस्ट—प्रथम पोटोबा मग मानपान, त्यानंतर पाप-पुण्याची चौकशी. व्यापारधंदा, वकीली, वैद्यकी, इत्यादींमध्यें चांगला जम बसून आर्थिक स्वास्थ्य मिळालें म्हणजे मग माणसाला सामाजिक प्रतिष्ठेची इच्छा उत्पन्न होते. कांहीं ( प्रमाणांत ) निःस्वार्थी लोकांना द्रव्यापेक्षां किंवा द्रव्याच्या अगोदरहि मानमान्यतेचें महत्त्व वाटतें. त्यासाठीं तें कसलें तरी ' सेवाकार्य ' अंगावर घेतात. बहुधा प्रसिद्धीच्या दृष्टीनें राजकीय, किंवा सरकारमान्य कामच विशेष सोईचें असतें. शिष्टसंमत व

ज्यांसाठीं प्रसंगविशेषीं उदात्त विचार बोलून दाखविण्यापलीकडे कसलीहि अंगमोड किंवा पदरमोड करावी लागत नाहीं अशा तऱ्हेचे सामाजिक सुधारणेचे कार्यक्रमहि चालू शकतात. लोकलबोर्ड, म्युनिसिपालिट्या, कायदेमंडळें, सरकारनियुक्त समित्या हींच बहुधा असल्या मानधन कार्यकर्त्यांच्या ‘ सन्माननीय ’ कार्याचीं क्षेत्रें असतात. तथापि कॉंग्रेसमध्यें किंवा जातिनिष्ठ संस्थांमध्येंहि त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळत नाहीं असें नाहीं. एकादा आश्रम, छात्रालय, अनाथालय किंवा रुग्णालय चालविण्यासारख्या सतत जबाबदारीच्या कामाकडे अशा लोकांचा ओढा नसतो. “ कांहींतरी करणें । जगीं या प्रसिद्धिला येणें ॥ ” हें या मंडळींचें ब्रीदवाक्य असेंत. त्यांचें नांव व फोटो नित्य वर्तमानपत्रांत झळकलीं पाहिजेत. दौरे, व्याख्यानें, परिषदा हे त्यांच्या आवडीचे कार्यक्रम. ज्या संस्थेंत किंवा ज्या पक्षांत पुढारी होऊन राहतां येईल ती संस्था किंवा तो पक्ष ते मान्य करतात, मग त्या पक्षाचीं मतें किंवा त्या संस्थेचे कार्यक्रम कोणतेही असोत. एका पक्षाशीं किंवा संस्थेशीं न पटल्यास ते दुसरा पक्ष किंवा संस्था काढतील “ स्वर्गांत दास होऊन राहण्यापेक्षां नरकांत राजा होऊन रहाण्यांत ” त्यांना अधिक शोभा वाटते. अध्यक्षाचीं किंवा पुढाऱ्याची जागा स्वतःला मिळत नसेल तर ते ती संस्था किंवा पक्षच सोडून देतील व विरोधी पक्ष स्थापन करतील.

सामान्य प्रजेच्या हिताच्या दृष्टीनेंहि महत्त्वाकांक्षी वृत्ति पुष्कळदां फार हानीकारक होते. ती सेवेचा बहाणा करते त्यामुळें तर विशेषच घातुक होते. या वृत्तीमुळें पवित्र व लोकहितकारक अशा अनेक सत्कार्यांचा विचका उडून जातो, लोकांची दिशाभूल व पुढाऱ्यांच्या परस्पर स्पर्धेपायीं ओढाताण होते.

कायदेमंडळाच्या व स्थानिक संस्थांच्या निवडणुकांतील आणि अलीकडे तर कॉंग्रेसच्या निवडणुकांतीलहि—चुरस, सत्यापलाप, लांचलुचपत, भाडभीड, जात्यंधतेचा आश्रय व भरमसाट खर्च हीं सर्व या महत्त्वाकांक्षी वृत्तीमुळेंच होत असतात. ज्याला खरोखरच सेवा करावयाची आहे, त्याला हे सर्व प्रकार सर्वथैव वर्ज्य आहेत.

(३) प्रभुत्वः—लोकांचा ‘सेवक’ उमेदवारीचा कांहीं काळ काढल्या-

नंतर हळूहळू लोकांचा ‘ पुढारी ’ बनतो. पुढारी हा एकप्रकारें प्रभुच आहे. त्याला कित्येकदां ‘ अनभिषिक्त राजा ’ असा किताबहि बहाल करण्यांत येत असतो. त्यामुळें प्रभुत्व किंवा सत्ता गाजविण्याची इच्छा ही सुद्धां फार सूक्ष्म परंतु परिणामकारक तऱ्हेनें सेवकाच्या मनामध्यें वास करीत असण्याचा संभव असतो. मानमान्यतेच्या इच्छेशीं कांहीं अंशीं मिळती अशीच ही लालसा आहे. शिक्षक विद्यार्थ्यांची ‘ सेवा ’ करतो, परंतु विद्यार्थ्यानें आपली आज्ञा किंवा सूचना मान्य केली नाहीं तर त्याचा संताप, निदान मनोभंग तरी होतो हा या सत्तालोभाचाच परिणाम होय. एखादी अपत्यहीन स्त्री किंवा पुरुष एखादें अनाथ अर्भक दत्तक घेऊन त्याचें मनोभावानें वात्सल्यपूर्वक संगोपन करील, पण त्या मुलानें वडिलांच्या ठिकाणीं आपलें नांव लावावें, आपल्या वचनांत वागावें, अशी त्यांची अपेक्षा रहातेच. प्रेम आणि मत्सर हीं तर प्रकाश आणि छायेप्रमाणें परस्पर संलग्न असलेलीं नित्यशः आढळतात. मत्सर हा सत्ता-लोभांतूनच उद्भवतो.

सेवेच्या मुळाशीं आपुलकी असते, जो आपलासा वाटतो त्याचीच आपण सेवा करतों, हें आपण मागें पाहिलेंच आहे. सत्तेमध्येंहि आपुलकी असते. परंतु आपुलकीचे हे दोन्ही प्रकार परस्परविरुध्द आहेत. सेवा म्हणजे ‘ मी तुझा, ’ सत्ता म्हणजे ‘ तूं माझा. ’ अभेद स्थितीकडे पाहण्याचे हे दोन भिन्न दृष्टि-बिंदु आहेत. ते परस्पर पूरक व अखेरीस एकत्र मिळणारेच आहेत. मी निखालसपणें, निरपेक्षपणें तुझा झालों कीं मग तूंहि निःसंशयपणें माझा होणारच; आणि मी तुझा झाल्याखेरीज तूं माझा होणें शक्य नाहीं, द्यावें तसें घ्यावें. ‘ दयाघन भक्तीं आकळिला–’ आपण देवाचे दास बनलों कीं देव आपला दास बनणारच. जो न्याय देवाला तोच प्रत्येक माणसालाहि लागू आहे. सेवकाचें कर्तव्य आत्म-निवेदन, आत्मार्पण एवढेंच आहे. पूजेच्या अंतीं प्रसाद मिळणारच, परंतु प्रथमपासून पुजाऱ्याचें लक्ष प्रसादाकडेच लागून राहिल्यास पूजा यथासांग घडत नाहीं आणि प्रसादहि मिळत नाहीं; शीण, निराशा आणि मनोभंग मात्र पदरांत पडतात.

निरपेक्ष सेवा ही सेव्यावर कसलीच सक्ती करूं इच्छित नाहीं, आपला मोलाचा सदुपदेश ऐकण्याचीहि सक्ति करीत नाहीं. " तेन त्यक्तेन भुंजीथाः " हा उपभोगाचा सुवर्ण नियम आहे. ज्याचा उपभोग घ्यायचा असेल त्याचा प्रथम त्याग करा, त्याला पूर्ण मुभा, स्वातंत्र्य, द्या. खरें प्रेम आपल्या फेडीची अपेक्षा करीत नाहीं, त्यामुळें त्याला कधीं निराशा सहन करावी लागत नाहीं, त्याला आनंदी आनंदच लुटायला मिळतो.

पोपटावर आपण 'प्रेम' करतों, त्याची सेवासुद्धां करतों, पण त्यासाठीं त्याला पकडून पिंजऱ्यांत अडकवून ठेवतों. जी गत पोपटाची तीच आपण सेव्य इष्ट-मित्रांचीहि करीत असतों. सेवेवर सत्तेचा गंज चढतो.

(४) स्वार्थः—हा सेवेच्या मार्गावरील फारच दुष्ट वाटमाऱ्या आहे. पुष्कळ सार्वजनिक कार्यकर्त्यांचे चावण्याचे दांत व दाखविण्याचे दांत निरनिराळे असतात. स्थानिक संस्था किंवा कायदेकौन्सिलें यांच्या निवडणुका लढविण्यांत व त्यापायीं खर्च करण्यांत केवळ महत्त्वाकांक्षा किंवा प्रतिपक्षीयावर विजय मिळविण्याची ईर्षाच असूं शकते असें नाहीं, तर तो भांडवल गुंतविण्याचा एक प्रकारहि असूं शकतो. झाल्या खर्चाची सव्याज वसूली करण्याचेहि प्रकार चालतात म्हणे ! कांहीं कार्यकर्त्यांची आपल्या संस्थेच्या उत्कर्षाविषयींची कळकळ व एरवीं अप्रशस्त दिसणाऱ्या गोष्टी संस्थे खातर करण्याची तयारी, ही आपल्या संस्थेसाठीं नसून आपल्या संस्थेसाठीं—ज्या संस्थेवर आपला कब्जा आहे, जी आपल्याला वेतन, सुखसोयी, प्रतिष्ठा व वशीला पुरविते त्या संस्थेसाठीं—असते. जो आपल्या संस्थेची. निरपेक्ष सेवा करूं इच्छितो तो त्या संस्थेच्या उत्कर्षासाठीं म्हणून भलभलतीं सदोष कृत्यें करण्यास कधींच तयार होणार नाहीं.

सेवा व अनासक्तिः—'निष्काम, 'निरपेक्ष', 'निःस्वार्थ', 'अनासक्त', 'ईश्वरापण' हीं एकाच वस्तूचीं निरनिराळीं नांवें आहेत. निष्काम किंवा अनासक्त बुद्धीनें कर्म करावें अशी गीतेची शिकवण आहे. लोकमान्य टिळकांनीं तिचें कर्मयोग या नांवानें तर गांधीजींनीं अनासक्ति योग या नांवानें विवेचन केलें आहे. निरपेक्ष सेवा व कर्मयोग किंवा अनासक्ति योग हीं भिन्न नाहींत. विशिष्ट कार्य हें मुळांतच इष्ट व आवश्यक आहे या कर्तव्य-

बुद्धीनें, आपल्याला तें सुख, धन, प्रतिष्ठा, सत्ता किंवा अन्यलाभ मिळवून देईल म्हणून नव्हे—कार्याला प्रवृत्त होणें याचेंच नांव निष्काम कर्म व त्याचेंच नांव निरपेक्ष सेवा. अशा निरपेक्ष सेवेमध्यें ' अमुक योजलेलें कार्य पार पडलें पाहिजे, किंवा माझ्या हातूनच पार पडलें पाहिजे, " असा आग्रह असणार नाहीं. अर्थात्‌च सेवक अंगीकृत कार्याच्या सिद्ध्यार्थ मुळांत सदोष किंवा अयोग्य अशीं इतर कामें करण्यास तयार होणार नाहीं; स्तुत्य साध्य प्राप्त करण्यासाठीं निंद्य साधनें वापरणार नाहीं. येनकेन प्रकारेण कार्यभाग साधण्याचा अट्टाहास जेथें दिसून येतो तेथें मुळांतच-- कार्यकर्त्यांच्या हेतूमध्येंच—कांहीं तरी दोष आहे अशी शंका घेण्यास मुळींच हरकत नाहीं.

अमेरिकन महात्मा अब्राहम लिंकन याचें एक वचन मननीय आहे:—' विजयाची जबाबदारी माझ्यावर नाहीं, सच्चेपणाची मात्र आहे; मी सफल होण्यास बांधलेला नाहीं, मला मिळालेल्या प्रकाशानुसार पावलें टाकण्यास मात्र मी बांधलेला आहे. "

सेवावृत्ति गंजतेः—सेवेच्या बुरख्याखालीं प्रतिष्ठा, सत्ता, स्वार्थ हींच पुष्कळदां धुमाकूळ घालीत असतात हें खरें असलें तरी नेहमींच मनुष्य सत्तेचा किंवा स्वार्थाचा हेतु दृष्टीपुढें स्पष्टपणें मांडून ठेवून त्याच्या पूर्ततेसाठीं सेवेचा केवळ बहाणा करतो असें म्हणण्याचा हेतु नाहीं. प्रत्यक्ष वस्तुस्थितीमध्यें मनुष्य मिश्रहेतूंनीं कार्यप्रवृत्त होत असतो. सेवेचीहि कळकळ असते आणि त्याबरोबरच सत्ता, कीर्ति, स्वार्थ हीं सुद्धां नकोशीं नसतात. मनुष्याला स्वतःच्या मनाची पुरी ओळखच असत नाहीं. असेंहि होऊं शकतें कीं मुळांत काय कळकळीनें सुरू होतें. परंतु कळकळीच्या सेवकाकडे कीर्ति, सत्ता, सुखसोयी आपण होऊन चालून येतात. आणि एकदां त्यांची संवय लागली कीं त्यांच्याबद्दल आसक्ति उत्पन्न होते. मग ही आसक्ति मूळच्या कार्यासक्तीची जागा हळूहळू पटकावूं लागते. मूळची निरपेक्षवृत्ति ढिली पडते व कायामुळें प्रतिष्ठा चालून येण्याऐवजीं प्रतिष्ठेसाठीं कार्य करण्याची प्रवृत्ति होते. आद्य शंकराचार्य अत्यंत वैराग्यशील होते, त्यामुळें त्यांच्या मठाला मोठमोठ्या देणग्या मिळाल्या. आतां त्या मिळकतीची वहि-

वाट पहाण्यासाठीं कोणाला तरी शंकराचार्य 'बनवावें' लागत आहे, आणि हे बनावटी शंकराचार्य इष्टेटीच्या रक्षणार्थ कोर्टबाजी करण्यांतच इतिकर्तव्यता मानीत आहेत.

(५) पाद्रीवृत्तिः–हाहि नकली सेवेचाच एक प्रकार आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांची स्वधर्मनिष्ठा व धर्मप्रसाराबद्दलची त्यांची उत्कटता खरोखरच प्रसंशनीय आहेत. विरोध, उपहास किंबहुना प्राणसंकट इत्यादींची पर्वा न करतां आपलें पवित्र कर्तव्य निर्धारानें चालविण्याची त्यांची कार्यपद्धति कोणाच्याहि मनामध्यें निरतिशय आदरच उत्पन्न करील. धर्म–प्रचाराबरोबरच शिक्षण, रुग्णालयें, दलितसेवा यांसारखीं विविध कार्येंहि मोठ्या कुशलतेनें ते ठिकठिकाणीं चालवीत असतात. परंतु या सेवेच्या मागें त्यांचा वैयक्तिक स्वार्थ किंवा सत्ता–प्रतिष्ठा–लोभ नसला तरी धर्मप्रसार करण्याचा आध्यात्मिक लोभ असतो. त्यामुळें धर्मप्रसार तर होत नाहींच, पण सेवा कार्यालाहि कमीपणा येतो. धर्मांचा प्रसार उपकारांच्या व ओशाळगतीच्या बळावर करूं पहाणें म्हणजे धर्मांचा अपमान करणें आहे, धर्म हा त्याच्या स्वतःच्याच बळानें पटवून देतां येणार नाहीं असें मानण्याप्रमाणें आहे. परंतु जो स्वतः पटत नाहीं, दुसऱ्याच्या भाडभीडेस्तव स्वीकारावा लागतो तो धर्म कसला ? भाडभीडेनें किंवा लागीवगीनें धर्मप्रसार शक्य तरी कसा आहे ?

म्हणूनच धर्मप्रचारकांच्या हेतूविषयींच शंका उद्‍भवते. धर्मप्रसाराच्या नांवाखालीं पक्षप्रसार—स्वतःच्या कंपूमध्यें नवीन एकेका इसमाला सामील करून घेणें—हेंच करण्याचा हेतू तर नसेल ?

आम्ही ख्रिस्ती मिशनऱ्यांचा दृष्टांत घेतला, परंतु इस्लाम–प्रचारकांना तसेंच हिंदु 'शुद्धि'–पुरस्कर्त्यांनाहि तीच सूचना लागू आहे.

(६) व्यतिरिक्त हेतूः–ही पाद्रीवृत्ति धर्मप्रसाराच्या कामींच आढळते असें नाहीं. राजकीय, सामाजिक इत्यादि हरतऱ्हेच्या प्रचारकार्यांमध्येंहि दिसून येत असते. उदा०ः–कॉंग्रेसला बळकटी यावी, स्वराज्याच्या चळवळींत अधिकाधिक लोक सामील व्हावे या हेतूनें अस्पृश्यता–निवारण, चरखाप्रसार किंवा आपत्तिनिवारण करणें हें अप्रामाणिकपणाचें आहे.

चरखा प्रसाराच्या हेतूनें अस्पृश्यता-निवारण किंवा अस्पृश्यता-निवारणाच्या हेतूनें चरखाप्रसार करणें हेंहि तितकेंच अनुचित आहे. आपली छाप लोकांवर पडून त्यांच्यामध्यें विधायक कार्यक्रमाचा प्रचार करणें सुलभ व्हावें या हेतूनें कॉंग्रेसमध्यें किंवा कायदेभंगामध्यें सामील होणें ही सुद्धां धोकेबाजीच. त्यामुळें बहुधा हेंहि नाहीं आणि तेंहि नाहीं अशीच स्थिति होते.

(७) ढोंगबाजी:-याच प्रवृत्तीचें आणखी एक स्वरूप म्हणजे स्वतः-कडे—अर्थात् आपल्या कार्याकडे—लोकांना आकर्षून घेण्यासाठीं ज्योतिष सांगणें, मंत्रतंत्र करणें, जटादाढी वाढविणें, भगवीं वस्त्रें—किंवा अलीकडे शुभ्र खादी, वापरणें यासारखीं ढोंगबाजी होय. आमच्या एका भाविक मित्रांनीं ग्रामसेवक कसा असावा त्याचें विवेचन करतांना "त्यानें ज्योतिष शिकून घ्यावें म्हणजे तो सर्व लोकांच्या उपयोगी पडून त्यांच्या मनावर छाप बसवूं शकेल" असें मनःपूर्वक प्रतिपादिलें होतें !

पैशाचा जसा स्वार्थ असतो व त्यासाठीं मनुष्य जसा नानातऱ्हेचीं नाटकें करीत असतो, त्याचप्रमाणें सेवाकार्याबद्दलची फाजील आसक्ति म्हणजेहि स्वार्थच होय. त्याच्या सिद्धीसाठींहि मनुष्य नानातऱ्हेच्या बतावण्या करण्यास प्रवृत्त होतो. सेवाकार्याचा हा स्वार्थ कर्तव्यनिष्ठेचें रूप धारण करतो, त्यामुळें तर तो अधिकच भयंकर ठरतो. "हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्"—सत्याचा चेहरा सोनेरी वर्खानें झांकला गेला म्हणजे त्याचें यथार्थ ज्ञान होणें अधिकच दुरापास्त बनतें.

विशिष्ट सत्कार्यासाठीं धनसंग्रह करण्याचें सुलभ साधन म्हणून लॉटरी काढणें, किंवा धर्मार्थ नाट्यप्रयोग मिळवून त्याचीं तिकिटें लोकांच्या गळ्यांत बांधणें, लोकशिक्षणार्थ चालविलेल्या वृत्तपत्राच्या निभावासाठीं अश्लील किंवा खोडसाळ जाहिराती घेणें यांसारखे सत्कार्यासाठीं अकार्यें करण्याचे नानाप्रकार आढळून येतात. परंतु त्यांना ढोंग म्हणण्यापेक्षां भूल म्हणणेंच अधिक युक्त दिसतें, कारण तीं अकार्यें स्वतःच सेवाकार्य असल्याचा बहाणा करीत नाहींत. ते नकली सेवेचे प्रकार म्हणण्यापेक्षां सेवामार्गांतील धोके आहेत. त्यांचा विचार निराळ्या प्रकरणांत करणेंच योग्य होईल.

—×—

# सेवामार्गांतील खांचखळगे : ८

(१) अभिनिवेश किंवा कार्यवेड.

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पंच तत्तामसमुदाहृतम् ॥ —गीता १८-२२

जें ज्ञान यथार्थ वस्तुस्थिति लक्ष्यांत न घेतां व प्रयोजन नसतां 'हें एक कार्य म्हणजेच जणूं कांहीं सर्वस्व' अशा समजुतीनें कोणत्याहि एकाच कार्यामध्यें आसक्त होऊन जातें तें ज्ञान तामस होय.

एकाच कार्याला प्रमाणाबाहेर महत्त्व देण्याचा दोष हा स्वार्थामुळेंहि घडूं शकतो, पण तो बुद्धिमांद्याचाच परिणाम असणें अधिक संभवनीय आहे. विशिष्ट कार्य अंगावर घेऊन त्याचेंच अहर्निश चिंतन व त्याच्या सिद्धीसाठींच हरप्रयत्न करण्यांत मनुष्याची शक्ति वेधली कीं मग त्याच एका कार्याचा त्याला ध्यास लागतो, त्याचें अतोनात महत्त्व वाटूं लागतें व इतर महत्त्व वाटेनासें होतें. कार्याला मदत करील किंवा या फंडाला पैसे देईल तोच खरा कळकळीचा मनुष्य, बाकीचे ढोंगी, बेपर्वा किंवा स्वार्थी आहेत, असें त्याला वाटूं लागतें. त्याच्या दृष्टींतील व्यापकता व प्रमाणबद्धता नष्ट होते. मनाची उदारता किंवा खिलाडू-पणा जाऊन कुढेपणा येतो. त्या कार्याबद्दल एक तऱ्हेची ईर्ष्या उत्पन्न होते. कार्यामध्यें अडथळे आले कीं तो बेचैन होतो. कसेंहि करून कार्य सिद्धीस नेलेंच पाहिजे असें त्याला वाटूं लागतें. त्यासाठीं तो आपलें सर्वस्व पणाला लावतो आणि प्रसंगीं अपकृत्यें करण्यास तयार होतो.

ही कार्यासक्ति एकपरीनें कौतुक करण्यासारखी आहे खरी. ज्या ज्या संशोधकांनीं आजवर महत्त्वाचे शोध लावले त्यांनीं जुगाऱ्याप्रमाणें आपलें सर्वस्व इरेला घातलें म्हणूनच ते यश संपादन करूं शकले हें खरें आहे. परंतु दुसऱ्या दृष्टीनें हा मनाचा दुबळेपणाहि आहे. त्यामुळें असहिष्णुता, इतर आवश्यक किंवा इष्ट कार्यांबद्दल अनास्था, व प्रसंगीं वैताग व नैराश्य उद्भवतात.

(२) नैराश्य:–हा सेवामार्गातील एक विशेष जपण्याजोगा धोका आहे. कित्येक भावनाप्रधान सेवक विशिष्ट कार्यासाठीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. एवढें करूनहि लोकांच्या निष्क्रिय उदासीनतेमुळें, सक्रिय विरोधामुळें किंवा कांहींच्या स्वार्थसाधूपणामुळें कार्यामध्यें अपयश आलें कीं मग सेवक कायमची कच खातो व निराशावादी बनतो. उलट मग दुसरा कोणी नवीन योजना घेऊन नव्या उमेदीनें कार्याला पुढें सरसावला तर त्यालाहि नाउमेद करण्याकडेच त्याची प्रवृत्ति होते. अपयशाच्या दोषाचें खापर तो इतरांच्या माथीं मारण्याचा प्रयत्न करतो. आपला स्वार्थत्याग वृथा गेला याची टोंचणी लागून त्याच्या भरपाईसाठीं तो यापुढें अधिक स्वार्थी बनण्याचाहि संभव असतो. अशा तऱ्हेचे योगभ्रष्ट सेवक फारच घातक ठरतात. अशांच्या मालिकेंत जाऊन बसण्याचा प्रसंग आपल्यावर येऊं नये अशाबद्दल नवीन सेवकानें अवश्य दक्षता घ्यावी. स्वत:ला झेपेल तेवढेंच कार्य व तेवढाच स्वार्थत्याग पत्करावा.

या बाबतींत शुद्ध दानत किंवा निष्ठा हीच महत्त्वाची बाब आहे. ती असली म्हणजे अडचणींबरोबर त्यांचा सामना करण्याची सेवकाची शक्तिसुद्धां वाढत जाते. कोणत्याहि कार्याचें यश हें केवळ कर्त्याच्या कळकळीवर किंवा कर्तबगारीवरच अवलंबून नसतें. त्या कार्याचा काळ आलेला असला पाहिजे, परिस्थितीची अनुकूलता, अनेकांचें सहकार्य इत्यादींखेरीज कोणतीहि चळवळ यशस्वी होत नसते. म्हणून समंजस सेवक अपयशानें खट्टू न होतां आपल्या प्रयत्नांमध्यें अधिकाधिक व्यापकता व सूक्ष्मता आणीत जातो.

त्रासिकपणा किंवा चिडखोरपणा हा त्याच मासल्याचा, परंतु तात्पुरत्या स्वरूपाचा धोका आहे. कामाळू मनुष्य पुष्कळदां त्रासिक बनतो याचें कारण तें काम त्याला झेपत नाहीं हेंच होय. पण त्रासिकपणाचें कारण आपली अल्पबलता आहे, जगाचा दोष नव्हे, एवढें लक्षांत आलें कीं त्या जाणीवेनेंच कष्ट सहन करण्याची सेवकाची शक्ति वाढते. झेपेल तितकेंच काम अंगावर घेणें हाहि दुसरा उपाय आहे. त्रासिकपणानें खूप काम करण्यापेक्षां हसतमुखानें कमी करण्यांत स्वत:बरोबर जगाचेंहि भलें

आहे. " मी इतके कष्ट करतों, पण लोकांना त्याची किंमत आहे का ? " असली वृत्ति सेवकाला शोभा देत नाहीं; त्याला स्वतःबद्दल असंतोष वाटावा, " माझ्यांत अद्याप आळस, दुर्लक्ष, निष्काळजीपणा, इत्यादि आहेत, तीं नष्ट करून मला अधिक तत्तर बनलें पाहिजे. मी अद्याप अंगीकृत कार्यासाठीं घ्यावी तेवढी मेहनत घेतलेली नाहीं. आणखी काय करावें ? "–अशी विवेचना त्याला लागलेली राहील तों पर्यंतच त्याची प्रगति होत राहणार. तो उलट लोकांचेच दोष काढूं लागला म्हणजे समजावें कीं त्याची पुच्छ प्रगति सुरू झाली !

( ३ ) साध्य व साधनः—आपल्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं कार्यकर्त्यांना वाटेल तसले भलेबुरे उपाय योजण्याचा मोह होतो. ते म्हणतातः— " मी अमुक कृत्य करतों तें नैतिक कीं अनैतिक, हितावह कीं हानीकारक, तें माझ्या हेतूवर अवलंबून आहे. मारामारीमध्यें एकानें दुसऱ्याचा हात छाटून टाकला तर तो गुन्हा होईल, परंतु शस्त्र वैद्यानें रोग्याचा जीव बचाविण्यासाठीं त्याचा जखमी हात कापून काढला तर तें सत्कृत्य ठरतें. बाह्यतः सारख्या दिसणाऱ्या कृत्यांपैकीं एकत्र्याच्या कर्त्याच्या हेतूला अनुसरून अनैतिक ठरेल तर दुसरें नैतिक ठरेल.

" म्हणून माझें साध्य किंवा ध्येय चांगलें असेल तर त्याच्या सिद्धीसाठीं प्रसंगीं प्रथम दर्शनीं वाईट वाटणारें असें कृत्य करणें आवश्यक झाल्यास तसें करण्यांत कांहीं वावगें नाहीं. उदाहरणार्थ, अमुक इसमानें अमुक गुन्हा केलेला आहे याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. त्या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा होणेंहि आवश्यक आहे. एरवीं तो अधिकच शेफारून जाऊन लोकांना अधिकाधिक पीडा देत राहील. परंतु डोळ्यांनीं पाहिलेले इसम त्या गुंडाच्या धाकामुळें कोर्टापुढें येऊन खरी साक्ष देण्यास धजत नाहींत. अशा स्थितींत खोटे साक्षीदार तयार करूनहि त्यांचे तोंडून खऱ्या हकीकतीची कोर्टापुढें शाबिती करणें कर्तव्य नाहीं का ? मी असत्य करविलें तरी तें सत्यप्रस्थापनेसाठींच आहे. शिवाय माझें त्यापासून वैयक्तिक नफा-नुकसान कांहीं नसून दुष्टाचें पारिपत्य व्हावें व तेणेंकरून लोकांना स्वास्थ्य लाभावें एवढा एकच माझा हेतू आहे. वाकड्या मेढीला वाकडें नेम

पाहिजे, तरच ती सरळ उभी राहणार. कांट्यानें कांटा काढतात, किंवा विषबाधा झाल्यास औषधहि विषारीच द्यावें लागतें. त्याचप्रमाणें केवळ सरळ चालीनें दुष्टांचा बंदोबस्त होण्यासारखा नाहीं जशास तसें किंवा ‘ शठं प्रति शाठ्यम् ’ च पाहिजे.

“ लबाडाला फसविणें जसें आवश्यक असतें तसेंच अडाण्यालासुद्धां–ज्याला सांगून समजत नाहीं त्यालाहि–त्याच्या, समाजाच्या किंवा उभयतांच्याहि हितासाठीं फसविल्याखेरीज गत्यंतर नसेंत; किंवा प्रसंगीं धाकदपटशाहि दाखवावा लागतो.

“ सारांश, आपले हेतु, ध्येय किंवा साध्य हीं चांगलीं व स्वार्थरहित असावीं. त्यांच्या सिध्दीसाठीं करावे लागतील ते ते उपाय करण्यास कार्यकर्त्यानें बिचकतां कामा नये. बिचकेल तर ती तत्त्वनिष्ठा नसून मनोदौर्बल्य होय. ”

वरील तऱ्हेची अनुभवसिद्ध व मार्मिक विचारसरणी समाजामध्यें बरीच रूढ आहे व तिची अंमलबजावणी नित्य घडत असते. आणि “ दि वे टु हेल् इज पेव्हड् वुइथ् गुड इंटेन्शन्स्–नरकाच्या मार्गाला सदिच्छांची फरशी केलेली असते ”–या वचनानुसार जगांतील बरेचसे अनर्थ व उत्पात सध्देतुमूलकच असतात.

परंतु साध्य व साधन यांचा सांगोपांग विचार केला म्हणजे त्यांच्यामध्यें प्रथम दर्शनीं दिसतो तसा अलगपणा नाहीं हें आपल्या लक्षांत येईल. समजा कीं अंगांतून घाम काढणें हें माझें साध्य आहे, हें साध्य मला निरनिराळ्या मार्गांनीं साधतां येईल. (१) व्यायाम केल्यानें; (२) श्रमाचें काम केल्यानें; (३) आगीशीं शेकत बसल्यानें, (४) विंचवाच्या दंशानें; (५) घाबरल्यानें, किंवा (६) घामाचें औषध घेतल्यानें. परंतु यांपैकीं जें साधन वापरलें जाईल तदनुसार निरनिराळ्या तऱ्हेचें साध्य पदरांत पडेल. पहिलीं दोन साधनें आरोग्यावह आहेत, पुढचीं तीन अनिष्टपरिणामकारक आहेत. व सहाव्याचा परिणाम इष्ट होईल कीं अनिष्ट होईल तें माझ्या प्रकृतीच्या त्या वेळच्या विशिष्ट अवस्थेवर व औषधाच्या प्रकारावर अवलंबून राहील.

" अंगांतून घाम काढणें एवढें एकच माझ साध्य आहे, त्यापरतें मला दुसरें कांहीं नको." अशी स्थिति कधींच नसते. तें माझें तात्पुरतें ध्येय आहे. तें पलीकडील श्रेष्ठ ध्येयाचें-या ठिकाणींआरोग्याचें-साधन म्हणूनच मला पाहिजे आहे. आरोग्य हेंहि परम साध्य नव्हे; सुखी व समाजोपयोगी जीवनाचें साधन म्हणूनच मला आरोग्यहि पाहिजे असतें. श्रेष्ठ जीवन हें साध्य, त्यासाठीं आरोग्य हें साधन; आरोग्य हें दुय्यम साध्य, त्यासाठीं घाम काढणें हें साधन; घाम काढणें हें तिसऱ्या दर्जाचें साध्य, त्यासाठीं व्यायाम हें साधन. व्यायाम हेंहि पुन्हां चौथ्या दर्जाचें साध्य बनेल व मल्लखांब, क्रिकेट, आट्यापाट्या हीं साधनें बनतील. अशी ही साध्यसाधनपरंपरा वरती व खालीं पसरलेली असते. ' निवळ घाम काढण्याला ' व्यायामाइतकाच विंचूहि उपयोगी पडेल; परंतु ' आरोग्यार्थ घाम काढण्याला विंचू बाधकच ठरेल. " समाजोपयोगी जीवनाचें साधन म्हणून आरोग्य व त्यासाठीं घाम काढणें " हें साध्य असेल तर कसरतीपेक्षां उपयुक्त श्रम अधिक श्रेयस्कर ठरतील.

अशा तऱ्हेनें कोणत्याहि ध्येयाच्या प्राप्तीसाठीं साधन-योजना करते वेळीं मागचा पुढचा विचार करणें आवश्यक असतें. तात्कालिक ध्येयाच्या पलीकडे, त्याचप्रमाणें उजवी-डावीकडे, नजर पोचवावी लागते. हें विशिष्ट अभीष्ट साधतांना आणखीहि कांहीं अवांतर अभीष्टें साधतील तर साधावीं, व अनिष्टें टाळावीं, अशी माझी दृष्टि असते. मुलाला गणित शिकविण्यासाठीं मास्तर ठेवायचा तो कोण ठेवावा ? तर गणिताबरोबरच जो त्याला सहजीं योग्य रीतभातहि शिकवील आणि विडी-तंबाकूसारख्या संवयी शिकविणार नाहीं, असाच तो असला पाहिजे.

सारांश, साध्य-साधन परंपरा ही नदीच्या प्रवाहाप्रमाणें आहे. प्रवाहाचा पुढील भाग तें साध्य व अलीकडील भाग तें साधन. मागचेंच पाणी वहात पुढें जात असतें. अलीकडील प्रवाह गढूळ झाल्यास तो दोष जसा पुढील भागाला पोचतो, त्याचप्रमाणें वाईट साधनांतून चांगलें साध्य निष्पन्न होणें दुरापास्त आहे.

आतां खोट्या साक्षीदारांकडून खरा पुरावा शाबीत करण्याच्या

दृष्टांताचा विचार करूं या. पुराव्यासाठीं खऱ्या साक्षीदारांनाच त्यांच्या नागरिकत्वाच्या कर्तव्याची जाणीव देऊन व धैर्य देऊन साक्ष देण्यास लावणें इष्ट आहे. तसें केल्यानें दुष्टाच्या पारिपत्याबरोबरच नागरिकत्वाच्या भावनेचाहि प्रचार घडेल. नाहींपेक्षां उंदीर मारण्यासाठीं घरांत सर्प घेतल्याप्रमाणें होईल. कोर्टापुढें प्रतिज्ञेवर खोटें बोलण्याचें शिक्षण दिल्या-नंतर ती विद्या नेहमीं सत्कार्यासाठींच वापरली जाईल असें कोणी सांगावें ?

नेपोलियन बोनापार्ट हा शूर व कर्तृवान् परंतु निर्दय व सत्तालोभी पुरुष होऊन गेला अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु ॲबट नांवाच्या त्याच्या चरित्रकाराचें तर म्हणणें आहे कीं तो लोकसत्तेचा अनन्यभक्त होता. आणि जन्मभर त्या ध्येयाच्या स्थापनेसाठींच त्याचे सारे प्रयत्न चालू होते. फ्रान्सच्या राज्यक्रांतीनंतर बेबंदशाही माजली तेव्हां देशांत शांतता प्रस्थापित होऊन लोकसत्तात्मक राज्यघटना उभारतां यावी एवढ्यासाठीं त्यानें तोफखाना सुरू करून पॅरिसमध्यें व क्रमानें साऱ्या फ्रान्सभर आपला दरारा बसविला. परंतु युरोपांतील सम्राटांनीं त्याला लोकसत्ता स्थापण्यास अवधिच दिला नाहीं. त्यांच्याशीं त्याला सतत युद्धें करावीं लागलीं; त्यांचें सहकार्य साधण्यासाठीं त्यानें त्यांच्याप्रमाणें स्वत:लाहि बादशहा म्हणून पुकारून घेतलें. त्यांची मोहबत जोडण्यासाठीं त्यानें आपल्या पहिल्या पत्नीशीं, ती गरीब कुलांतील होती म्हणून, त्याचें तिच्यावर नि:सीम प्रेम होतें तरीहि, काडीमोड केली आणि आस्ट्रियाच्या राज्यकन्येशीं लग्न केलें. एवढ्यावरहि ‘ दुष्टांनीं ’ त्याला स्वस्थता लागूं दिली नाहीं. स्वस्थता मिळती तर तो लोकसत्ताक घटना तयार करून स्वतः सत्तात्याग करणार होता. परंतु नाइलाजानें त्याला अखेरपर्यंत लढतच रहावें लागलें व आयुष्याची अखेरी शत्रूच्या बंदीवासांत कंठावी लागली. यांत त्याचा दोष नाहीं, त्याचीं सारीं युध्दें युद्धसंस्था समूळ नष्ट व्हावी एवढ्याच एका पवित्र हेतूनें केलेलीं होतीं !

हें खोटें तरी कोणी म्हणावें ? मनुष्याच्या मनांत काय आहे तें ओळखण्याचें आपल्यापाशीं साधन नाहीं. कसेंहि असलें तरी लोकशाहीसाठीं दडपशाही वापरण्यांत त्यानें सुरवातच चुकीची केली आणि तो साधनांचा

स्वामी न रहातां त्यांच्याच आहारीं गेला.

यावरून सेवकानें बोध घेऊन साधनाच्या निवडीबाबत सावधान रहावें. साध्य हें बहुधा आपल्यापासून दूर अंतरावर तसेंच अनिश्चित, संदिग्ध व अमूर्त असें असतें. साधन हेंच निश्चित, स्पष्ट व आपल्या हातचें असतें. तें आपण शुद्ध राखलें म्हणजे भावी साध्यहि तदनुरूप योग्य असेंच उद्‌भवेल असा विश्वास आपण बाळगूं शकतों.

पुष्कळ लोक म्हणतात " आम्हां साऱ्या हिंदवासीयांचें ध्येय स्वराज्य आहे, मग ते काँग्रेसवाले असोत, हिंदुमहासभावाले असोत, सोशलिस्ट असोत, किंवा कम्युनिस्ट, क्रांतिकारक कोणीहि असोत. मार्ग निरनिराळे असतील, पण ध्येय एकच आहे. " परंतु हा भ्रम आहे; प्रत्येक पक्षाची स्वराज्याची कल्पनाच भिन्नभिन्न आहे, आणि त्याच्या कल्पनतील स्वराज्याला त्यानें योजलेला तेवढाच एक मार्ग आहे. म्हणूनच प्रत्येक पक्ष अट्टाहासानें प्रतिपादित असतो कीं " एष पंथाः, एतत्कर्म; नान्यः पंथा विद्यते अयनाय—हाच मार्ग; हाच कार्यक्रम; यांखेरीज दुसरा मार्ग ध्येयास जाण्याकडे नाहीं. "

साध्यसाधनांच्या अलगपणाचा जो हा भ्रम उत्पन्न होतो, त्याला साध्याबाबतची संकुचित दृष्टि, विशिष्ट कार्याबाबत उत्पन्न होणारा अभिनिवेश, व परिणाम त्वरित घडवून आणण्याचा अधिरेपणा हींच कारणीभूत होत असतात. तारतम्य, दीर्घदृष्टि, योजकता, सावधानता व धीर एवढीं असल्यानंतर कार्यकर्ता भलतींच साधनें वापरण्याच्या मोहाला बळी पडणार नाहीं.

(४) फंडासाठीं लॉटरी:—कोणतेंहि सार्वजनिक कार्य करायचें तर त्यासाठीं द्रव्याची आवश्यकता बहुधा असतेच; त्यामुळें फंड जमविणें हें सार्वजनिक कार्यकर्त्यांचें एक नित्याचें व अवघड कार्य होऊन बसतें. हा फंड कसा जमवावा यासंबंधीं विवेचन पुढें करूं. तूर्त तो कसा जमवूं नये या बाबतींत कांहीं ठळक नियम सांगण्याचा इरादा आहे.

निधिसंग्रहाचा अत्यंत परिणामकारक मार्ग म्हणून बंगालांतील क्रांतिकारक दरोडे घालीत. दरोड्याबरोबर मारामारी, खून हींसुद्धां

पत्करावींच लागतात. हा पंथ अद्याप व इतरत्रहि हयात असल्याचें आढळतें. हे सेवाकार्यासाठीं दरोडे असतात कीं दरोडेगिरी झाकण्यासाठीं सेवाकार्य असतें तें सांगणें मुष्किलीचेंच आहे. खरोखरच कोणी सेवाकार्या-साठीं दरोडे घालीत असतील तर त्यांना युक्तिवादानें वळविण्याची आमची शक्तिहि नाहीं !

फंडासाठीं लॉटरी काढण्याचा मोह अधिक सौम्य परंतु त्याच जातीचा आहे; दरवड्याऐवजीं फूसलावणी एवढाच फरक आहे. गोव्यां-तील एक प्रसिद्ध मोफत रुग्णालय लॉटरीच्या उत्पन्नावर चालतें म्हणे ! अलीकडे तर वॉरफंडासाठीं लॉटऱ्या काढण्याची फॅशनच पडून गेली आहे.

रुग्ण-परिचर्या ही इष्ट गोष्ट आहे. गोरगरीबांना ती लाभावी या-साठीं मोफत दवाखाने काढण्याचें ठरेल तर सरकारनें ते चालवावे, किंवा धनिकांनीं लॉटरींत खूप पैसे विनायास मिळविण्याच्या अन्याय्य व मूर्ख-पणाच्या लोभानें नव्हे तर कार्यप्रेमानेंच देणग्या द्याव्या. गरीब लोकहि आशाळभूतपणामुळें आपल्या तुटपुंज्या कमाईतून लॉटरीचीं तिकिटें खरीदून उधळपट्टी करूं शकतात, त्याअर्थीं त्यांनींहि दवाखान्यांसारख्या सत्कार्याला सीधी मदत करण्यास हरकत नाहीं. अशा लहान मोठ्या देणग्या मिळ-विण्यासाठीं दवाखान्याच्या चालकांना पायपिटी करावी लागेल, दवाखा-न्याच्या सुव्यवस्थेबाबत समाजाचें समाधान करावें लागेल, व देणग्या मिळतील त्या प्रमाणांतच कार्याचा विस्तार मर्यादित करावा लागेल, एवढें मात्र खरें. लॉटरीमुळें हा सारा त्रास वांचतो. दवाखान्यांत पांच पन्नास माणसें आजाऱ्यांची बरीं होतात. पण तेवढ्यासाठीं असंख्य धड-धाकट लोकांना पुरुषार्थहीन बनविण्यांत लाभ कोणता ? मेहनतीखेरीज लॉटरीवर पैसा मिळविण्याची इच्छा धरणें ही हीन वृत्ति आहे. तिच्यामुळें समाजांतील पुरुषार्थ-वृत्ति नष्ट होते व नामर्दपणा वाढीस लागतो. म्हणून लॉटरीवर हॉस्पिटल चालविणें हें थंडींत शेकण्यासाठीं नोटा जाळण्याजोगें आहे.

**(५) निधियाचने ऐवजीं धंदा:**—पुष्कळ सार्वजनिक कार्यकर्ते फंडासाठीं लोकांचे उंबरठे झिजविणें व भलभलतीं उत्तरें ऐकून घेणें याला कंटाळून स्वावलंबनाचा उपाय म्हणून असा विचार करतात कीं आपणच

एकादी एजन्सी घ्यावी, किंवा तसलाच कोणतातरी अल्पश्रमानें विपुल धन मिळविण्याचा धंदा करावा व त्याच्या उत्पन्नांतून सेवाकार्य चालवावें. यांत लॉटरीप्रमाणें लोकांना दैववादाची शिकवण देण्याची आपत्ति उभी होत नसली तरी अल्प श्रमानें बहुत कमाई करण्याची दृष्टि अपरिहार्यच आहे. कारण तसें नसेल तर कार्यकर्त्यांची बहुतेक शक्ति धंद्यातच खर्च होऊन सेवाकार्यासाठीं शक्तिच उरणार नाहीं. परंतु अल्प श्रमानें बहुत कमाई करण्याचे धंदे हे बहुधा स्पर्धेनें भरलेले व कांहीं वेळां लबाडीचेहि असतात. समाजसेवकानें स्पर्धेमध्यें उतरणें इष्ट नाहीं, लबाडी करणें तर विशेषच निषिद्ध आहे.

एकाद्या तिऱ्हाईत व्यक्तीनें आपली कमाई सार्वजनिक सेवाकार्याला देण्याचा संकल्प करून एकादा प्रामाणिक धंदा प्रामाणिकपणें केला तर त्यांत वावगें कांहींच नाहीं, तें स्तुत्यच आहे. परंतु सेवाकार्यामध्यें गुंतलेल्या सेवकानें मात्र आपली सर्व किंवा कांहीं शक्ति कार्यांतून काढून धंद्यांत गुंतविणें प्रशस्त नाहीं. तन-मन हीं धनाहून श्रेष्ठ आहेत. सेवक कार्याला तन-मन देत असतो त्याऐवजीं तीं धंद्याला देऊन मोबदल्यांत धंद्याकडून धन घेणें हा कार्याच्या दृष्टीनें आंतबट्ट्याचा सौदा आहे. तो धंदाच सेवाकार्याला पोषक असेल तर तेंच सेवाकार्य म्हणून तो धंदा अवश्य करावा. उदाहरणार्थ, राष्ट्रीय वाङ्मयाची विक्री. यांत कमाई होईल, परंतु तें मुळांतहि इष्ट सेवाकार्य आहे म्हणून सेवकानें तें करण्यास हरकत नाहीं. त्यांतील कमाई त्यानें स्वतःच्या चरितार्थाला वापरण्यासहि हरकत नाहीं. त्याला तिची आवश्यकता नसेल तर त्यानें ती प्रथम राष्ट्रीय वाङ्मयप्रसाराच्या कामींच अर्पण करावी. एका सेवाकार्यांतील कमाई दुसऱ्या सेवाकार्यावर खर्च करण्यांत औचित्य नाहीं. ज्या कार्याची कमाई त्याच कार्यावर खर्च करण्याची शक्यताच नसेल तर गोष्ट निराळी.

सेवकापाशीं स्वतःचें धन व त्या धनाच्या बळावर इष्टकार्य घडवून आणण्याची सत्ता हीं असूंच नयेत. विशिष्ट कार्याला देणगी देणें हा सत्ता गाजविण्याचाच एक प्रकार आहे. सेवकाला त्याचें वावडें आहे. सेवक निरहंकारी व निराग्रही असावा. त्यानें आपले हेतु समाजापुढें मांडावे,

समजावून द्यावे व समाज मंजूर करील तेवढ्याच रकमेचा उपयोग इष्ट कार्याकडे करावा.

जो न्याय सेवकाला तोच सार्वजनिक सेवासंस्थेलाहि लागू आहे. अशा संस्थांनींहि स्वतःच्या खर्चासाठीं धंदा करूं नये. त्यांना अनायासानें किंवा अल्पायासानें कमाई करण्याचीं साधनें उपलब्ध असतांना तीं हातचीं घालविणें हा निष्काळजीपणा आहे असेंहि कांहींना वाटण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ खादीसंघ किंवा दलित सेवासंघ यांसारखी एकादी संस्था आहे. तिच्या सभासदांपैकीं पुष्कळजण आपापल्या आयुष्याचा विमा उतरतात व त्यांचे पॉलिसींवर धंदेवाईक विमा एजंटांना किती तरी कमिशन मिळत असतें. त्यापेक्षां संस्थेच्या नांवानें एकाद्या चांगल्याशा विमाकंपनीची एजन्सी घेतली आणि संघाच्या सभासदांनीं संघाच्या एजन्सीमार्फतच विमा उतरावा अशी सभासदांना विनंति केली तर त्यांना ती मान्य करण्यांत कांहीं अडचण वाटणार नाहीं. संस्थेला कमिशनच्या रुपानें अनायासानें पुष्कळ धन मिळूं शकेल, व सेवकांवर फंडासाठीं लोकांचीं आर्जवें करण्याचे प्रसंग तेवढ्या प्रमाणांत कमी येतील.

अशा तऱ्हेचे विचार संस्थाचालकांच्या मनामध्यें उद्भवण्याचा संभव असतो, सबब या विचारसरणीचा येथें परामर्श घेणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेचे सोपे मार्गच परिणामीं अत्यंत बिकट ठरत असतात; जवळची आडवाटच परिणामीं फार दूरची ठरते. वरील उदाहरणांतील 'चांगल्याशा' विमा कंपनीची निवड कशी करायची? संस्था छोटीशी, चार दोन प्रमुख व्यक्तींच्या वळणानेंच चालणारी व जिनें बहुजनसमाजाचें लक्ष्य वेधून घेतलेलें नाहीं अशी असेल तोंवरच ही निवड कशीहि केली तरी तिचा बोभाटा होणार नाहीं. परंतु आपली संस्था अशीच खुजट रहावी अशी तर चालकांची इच्छा नसणारच; खरीखुरी सार्वजनिक व्हावी अशीच त्यांची दृष्टि असली पाहिजे, व त्याच विशाल दृष्टीनें संस्थेचे कारभार ती लघु स्वरूपांत असतांनाहि चालले पाहिजेत. मग आमच्या संस्थेच्या सभासदांतच निरनिराळ्या विमा कंपन्यांचे चालक असतांना (असावे अशी आपली दृष्टि असतांना) विशिष्ट कंपनीलाच मान्यता देणें अवघड तर आहेच, पण तें

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

वादाचें मूळ होऊन बसेल. त्यापेक्षां सर्वच बऱ्यावाईट कंपन्या व त्या कंपन्यांचे लहानथोर सारे एजंट हे आपलेच आहेत, आपल्या संस्थेचे विद्यमान नसले तरी संभाव्य सभासद, निदान देणगीदार आहेत अशीच दृष्टि आपण ठेवावी. त्यांना होणाऱ्या कमाईचा योग्य अंश संस्थेचा तिजोरींत—त्या संस्थेचा मगदूर व आपल्या कार्याची आवश्यकता लोकांना पटवून देण्याची तिची शक्ति यांच्या प्रमाणांत—येऊन पडणारच असा भरंवसा संस्थेनें बाळगला पाहिजे. तिनें एकाच विमा कंपनींत राज्य करण्याऐवजीं सर्वच विमा कंपन्यांवर—आणि विमा कंपन्यांवरच नव्हे तर द्रव्यप्राप्तीच्या यच्चयावत् धंद्यांवर व धंदेवाईकांवर–चक्रवर्ती साम्राज्य गाजवून खंडणी वसूल करण्याचीच महत्त्वाकांक्षा बाळगावी.

(६) प्रत्यक्ष सेवा व परोक्ष–घातः–"आमचे बंडोपंत फार भले मनुष्य ! मुंबईहून आगगाडीनें नागपूरला जाण्यास निघाले म्हणजे स्वतःला स्टेशनवर पोचविण्यासाठीं बरोबर चार दोन मित्रांना घेऊन जातात. ते मित्रहि जणू सहप्रवासीच असावे अशा तऱ्हेनें सर्व मिळून गाडींत बरीचशी जागा अडवून धरतात. ऐन गाडी सुटण्याच्या वेळीं पोंचवायला आलेले मित्र उतरून गेले तरी एकदां आंथरूण पसरून अडविलेल्या ऐसपैस जागेवर अतिक्रमण करण्यास इतर पॅसेंजर सहसा धजत नाहींत. पुढें कल्याण स्टेशनवर गाडींत गर्दी होते, आणि आधींच्या वतनदारांनीं सारीं बाकें अडविलेलीं असल्यानें बाहेरून आलेल्या लोकांना जागा मिळणें मुष्किलीचें असतें. परंतु बंडोपंतांच्या ओळखी फार. कोणी तरी ओळखीचे गृहस्थ जागेच्या अडचणींत असलेले आढळले कीं बंडोपंत त्यांना मोठ्यानें हांका मारून आपल्या अंथरुणावर आणून बसवितात. ओळखीचा पाहिजे असेंहि नाहीं. एकादा कुटुंबवत्सल गृहस्थ आपल्या बायकामुलांसह डब्यांत चढतो आणि बिचाऱ्यांना टेकण्यापुरतीहि जागा मिळत नाहीं. बंडोपंतांची त्यांचेवर नजर गेली तर ते मात्र आपली फालतू जागा लगेच त्या मंडळीला देऊन त्यांची सोय लावतात. मग गाडी चालू झाल्यावर फराळाचा डबा काढून पाहुण्यांना व विशेषतः मुलांना खायला देऊन मग आपण फराळ करतात. पुढील स्टेशनांवर बाहेरील गर्दी डब्यांत घुसूं नये एवढ्या-

साठीं गाडीचा कल्याण दरवाजा लढविण्याच्या कामींहि ते कधीं कसूर करीत नाहींत !"

"आमचे अण्णासाहेब देशपांडेहि थोर मनाचे परोपकारी पुरुष होऊन गेले ! डेप्युटी कलेक्टरच्या जागेपर्यंत चढले होते. त्यांनीं आपल्या खात्यांत आमच्या भागांतील पुष्कळ लोकांना नोकरीला लावलें आणि त्यांच्या मुलाबाळांचा दुवा घेतला. मॅट्रिक नापास झालेले असेहि कांहीं इसम त्यांच्या धर्मानें आज मामलतीपर्यंत पोंचले आहेत."

वरील प्रकारचे गुणानुवाद पुष्कळदां ऐकायला मिळतात व ते ऐकून "आपणहि त्यांच्यासारखेच व्हावें, व त्यांच्यासारखीच कीर्ति मिळवावी" अशी आकांक्षा श्रोत्यांच्या मनांमध्यें उत्पन्न होते.

आपल्या लठ्ठ पगाराचें, वकिलींतील बेसुमार कमाईचें किंवा व्यापारांतील नफेबाजीचें समर्थन दानधर्माच्या नांवानें करण्याची प्रवृत्ति तर सार्वत्रिक आहे. परंतु दहांना लुबाडून एकावर उपकार करण्यांत बढाई मारण्याजोगें कांहींच नाहीं; दानापेक्षां त्याग श्रेष्ठ आहे.

"प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम्—
चिखल धुवून टाकण्याची यातायात करण्यापेक्षां, चिखल लागणारच नाहीं अशी काळजी घेणें बरें नाहीं का ?"

अन्याय्य कमाईच्या पापाचा डाग दानाच्या साबणानें फारतर फिका पडेल, साफ धुवून निघणें शक्य नाहीं.

वरील उदाहरणांतील बंडोपंत प्रथम इतर पॅसेंजरांच्या वाट्याची जागा हिकमत, रुबाब, धाक, इत्यादींच्या बळावर बळकावून बसले, तसेंच आमच्या परोपकारी डेप्युटी कलेक्टरांनीं आपल्या लोकांना वशिल्याच्या जागांवर लावून देण्यांत इतर अधिक लायक उमेदवारांचा हिरमोड केला, यांतील अन्याय आपल्या नजरेंत तितक्या तीक्ष्णतेनें भरत नाहीं. प्रत्यक्ष तें आपल्या नजरेंत भरतें, परोक्षाकडे लक्ष्य जात नाहीं. उपकार तेवढे दिसतात, उपकारांच्या मागें दडलेले दसपट अपकार लक्ष्यांत येत नाहींत.

**(७) राजा रंक जयां सरिसे**—सेवा म्हणजे आत्मविस्तार, प्रथम परके वाटणाऱ्या लोकांच्या ठिकाणीं आत्मौपम्याचा अनुभव, हें आपण

पाहिलेंच. परंतु सेवा ही विशेषतः ज्यांना सेवेची आवश्यकता आहे त्यांची --अर्थात् दीन, दलित, दरिद्री, अडाणी, अनाथ, पतित, रंक, दुबळे अशांचीच करणें उचित आहे. दीनदुबळे लोकहि आपल्यासारखेच माणूस आहेत, त्यांनाहि आत्मा आहे, हृदय आहे, आकांक्षा आहेत, त्यांच्या आत्मविश्वासाला भरपूर वाव मिळाला पाहिजे, त्यांच्या सुकलेल्या जीवनामध्यें टवटवी आली पाहिजे, यासाठींच निःस्वार्थ समाजसेवक नाना परीनीं झटत असतात. परंतु कार्याच्या विशिष्ट प्रकाराविषयीं ज्याप्रमाणें अभिनिवेश उत्पन्न होतो असें मागें दाखविलें, त्याचप्रमाणें सेव्य विषया-बाबतहि दृष्टीमध्यें संकुचितता येऊं शकते. दीनदलितांमध्यें, भंग्याच्या झोपडीमध्येंहि ईश्वर वास करीत असतो याचा साक्षात्कार करूं जातां राजे रजवाड्यांमध्यें आणि आचार्यांच्या मठामध्येंहि तो वास करीत असतो ही गोष्ट नजरेआड होते. राजाच्या किंवा ब्राह्मणाच्या ठिकाणींच ईश्वर आहे, रंकाच्या किंवा चांडाळाच्या ठिकाणीं ईश्वर नाहीं ही समजूत जितकी नास्तिकपणाची आहे, तितकाच ईश्वर गरिबांमध्यें आहे परंतु श्रीमंतांमध्यें नाहीं, दलितांमध्यें आहे परंतु जालिमांमध्यें नाहीं, हाहि नास्तिकपणाच आहे. आपल्याला दोन्ही तऱ्हेच्या नास्तिकपणांपासून बचावायचें आहे.

"संत दयाळ कसे ? । राजा रंक जयां सरिसे ॥"—

खरे संत केवळ रंकावरच दया करीत नाहींत, राजावरहि दया करतात.

नारदमुनि हे या बाबतींत आदर्श सेवक होते. त्यांचा प्रवेश तिन्ही लोकांमध्यें सारख्याच मोकळेपणानें होत असे. उच्च वर्ग (स्वर्ग), मध्यम वर्ग (पृथ्वी) व कनिष्ठ वर्ग (पाताळ) या सर्वांहिमध्यें ते मोकळेपणें मिसळत व एकमेकांच्या दुःखांची किंवा तक्रारींची दाद एकमेकांकडे लावीत.

**(८) सक्ती व फसवणूकः**—सेव्याच्या बऱ्यासाठींच त्याच्यावर सक्तीहि करावी लागते, धाक दाखवावा लागतो, किंवा फुस लावून काम करावें लागतें अशी कांहीं सेवकांची समजूत असते. "मुलांच्या वाईट खोड्या सोडविण्यासाठीं ज्याप्रमाणें त्यांना शिक्षा करावी लागते त्याप्रमाणेंच जनता हें सुद्धां एक अज्ञान मूलच आहे; त्याच्याशीं मुलाप्रमाणेंच वागावें लागतें; कधीं चुचकारून, कधीं फुस लावून तर कधीं दटावून काम घ्यावें

लागतें; " असें त्यांचें म्हणणें असतें. परंतु मुळांत मुलांना सुधारण्यासाठीं सुद्धां शिक्षा करणें अनावश्यकच नव्हे तर अनिष्ट आहे, त्यामुळें सुधारणा उलट अधिक दुःसाध्य होते, हें तत्त्व शिक्षणक्षेत्रांत आतां सर्वमान्य झालेलें आहे. वडील माणसांची कल्पना असते त्याहून लहान मुलांना अधिक कळत असते. वडिलांची फसवेगिरी तीं अचूक ओळखतात आणि तिचें अनुकरणहि करतात. सेवकानें समाजाला अज्ञ किंवा अन्यायी ठरविणें ही सेवकाची आत्मवंचना आहे व समाजाचा द्रोह आहे. सेवकानें असा द्रोह कधींच करतां नये. आपल्या संस्थेमध्यें कांहीं घोटाळे झालेले असतील तर ते जनतेपासून लपविले पाहिजेत, नाहींतर जनतेचा भलताच ग्रह होऊन आपल्या संस्थेच्या सेवेला जनता मुकेल व तिचेंच नुकसान होईल अशा तऱ्हेची आत्मप्रौढीची व खोडसाळपणाची भावना सेवकामध्यें असतां नये. सेवकालाच जनतेबद्दल अविश्वास वाटत असेल तर जनतेला तरी सेवकाबद्दल आपलेपणा कसा वाटावा ? खरी स्थिति अशी आहे कीं जनताहि आपल्या सच्च्या सेवकांच्या खऱ्याखुऱ्या अडचणी समजून घेण्याइतकी समंजस व त्यांच्या हातून अज्ञानानें घडणाऱ्या सर्व चुकांची क्षमा करावी इतकी उदार असते, तिच्याशीं लपंडाव करण्यांत सेवकाचें हित नाहीं.

(९) **आत्मसंभावना**:–सेवकाच्या मनामध्यें आपण इतर जनाहून भिन्न, थोर, पवित्र, पुण्यात्मे आहों अशा तऱ्हेची आत्मपावित्र्याची जाणीव उत्पन्न होऊं नये. भेदभाव हा सेवेला विघातकच आहे. अशा सेवकाचा लोक दुरून आदर करतात, परंतु त्याचें अनुकरण किंवा सहकार्य करण्यास राजी नसतात. सच्चा सेवकालां लोकच आदरानें वागवितात व त्याचें आदरातिथ्यहि भावपूर्वक करतात. परंतु त्यामुळें त्यानें फुलून जातां कामा नये. आपल्याला लाभणाऱ्या मानमरातबाची संवय लागून त्याबद्दल अपेक्षा किंवा आसक्ति त्याचेमध्यें उत्पन्न होतां कामा नये. सेवकामध्यें आत्मसंभावना उत्पन्न झाली कीं तिची उलट प्रतिक्रिया लोकांवरहि झाल्याशिवाय रहात नाहीं. आणि " लोक मला माझ्या लायकीप्रमाणें मानीत नाहींत " अशा तऱ्हेचा असंतोष एकदां सेवकामध्यें उत्पन्न झाला कीं त्याच्या साऱ्या सेवेवर बोळा फिरलाच समजावें.

८८५००  किरल
दा. नं. ........
५१।१९५६
गा।७।२८३



उलट सेवकाला नेहमीं असें वाटत असलें पाहिजे कीं, लोक मला एवढ्या आस्थेनें वागवितात, माझा खर्च चालवितात, माझ्या चुका पदरांत घालतात, लोकांच्या अन्नावरच हा देह पोसला आहे, अनेकांच्या सहकार्यानेंच माझ्या हातून अल्पस्वल्प सेवा घडत आहे, तरी मी लोकांच्या या प्रेमाला, विश्वासाला व आश्रयाला अधिकाधिक लायक बनलें पाहिजे.

लोकांप्रमाणेंच सहकाऱ्यांच्या बाबतींतहि सेवकानें नम्र असलें पाहिजे. " संघे शक्तिः कलौ युगे "—संघाच्या साह्याखेरीज महात्मेहि कांहीं कार्य करूं शकत नाहींत, मग सामान्य सेवकाची काय कथा ! अमुक कार्य मी केलें, त्याचा मी चालक, अशा तऱ्हेचा अभिमान सेवकामध्यें असूं नये. कारण तो वस्तुस्थितीला सोडून आहे. संघापासून तुटलेला सेवक हा वृक्षापासून तुटलेल्या फांदीप्रमाणें आहे--अल्पावधींतच कोमेजून व सुकून जावयाचा आहे.

(१०) प्रस्तुत-त्यागः—महान कार्यें करण्याच्या धुंदीमध्यें किंवा प्रौढीमध्यें सेवकानें प्रत्यहीं करावयाचीं किरकोळ सहजप्राप्त कर्तव्यें विसरून जाऊं नये. उद्यां करावयाच्या थोर कर्तव्यासाठीं आजचें क्षुद्र कर्तव्य हातचें घालवूं नये.

श्री. किशोरलाल मश्रूवाला यांनीं एकदां म्हटलेलें स्मरतें कीं, " मोठेपणीं तोच देशसेवक होऊं शकेल कीं जो लहानपणीं मातृ-पितृ-सेवक, पुढें गुरुसेवक व मित्रसेवक असेल. "

आमचे पुष्कळसे देशसेवक याच्या उलट घरच्या म्हातारीला काय किंवा मोलकरणीला काय तुच्छपणें वागवून जनता माउलीची सेवा करयला धांवतात. या मुद्याचें थोडें विवेचन मागील प्रकरणांत संदर्भामध्यें येऊन गेलेंच आहे, म्हणून येथें अधिक विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं.

(११) सेव्याचे लाडः—लोकांच्या उपयोगी पडण्याची सुद्धां फाजील लालसा सेवकामध्यें असूं नये. या लालसेपायीं लोकांच्या हीन किंवा सदोष वासनांची तृप्ति करण्यास त्यानें प्रवृत्त होऊं नये. सेवक म्हणजे गुलाम नव्हे, कीं त्यानें मालक करील तो हुकूम विचार न करतां मानावा. सेवक हा समाजाचा शिक्षक आहे, त्यानें लोकांच्या प्रवृत्तींचें नियमनहि

केलें पाहिजे. उदाहरणार्थ, गांवकऱ्यांनीं गांवांत पसरलेल्या कॉलऱ्याच्या सांथीच्या निवारणार्थ देवीला रेडा बळी देण्याचा कार्यक्रम योजला तर त्या समारंभाची व्यवस्था करणें ग्रामसेवकाचें काम नव्हे, त्यांत शक्य तेवढीं विघ्नें आणणेंहि कर्तव्य ठरेल. प्रस्तुत लेखक ब्राम्हण आहे. तो एका दूरच्या खेड्यामध्यें चरखा प्रसारानिमित्त रहात असतां प्रवासाहून शिवाशिव होऊन आलेले ब्राम्हणेतर ग्रामस्थ स्वतःच्या शुद्धीसाठीं त्याचेकडे 'भटाच्या हातचें पाणी' मागायला येत. लोकप्रियता संपादिण्याच्या लोभानें त्यानें कांहीं वेळां पाणी दिलेंहि, परंतु लवकरच पाणी देण्याचें बंद केलें. लोकांना वाटे "कोण दुष्ट भट हा! एवढासुद्धां उपयोगी पडत नाहीं!"

सेवकानें सेवेच्या योगानें स्वतःची आत्मोन्नति साधावयाची असते, तसाच सेव्यांचाही उच्च, शुद्ध, स्व जागृत करून त्यांची सेवा करावयाची आहे. सेव्यांच्या मूढ किंवा दुष्ट हेतूंशीं सेवकानें असहकारच केला पाहिजे. अर्थात् असहकरामागील दृष्टि त्यानें लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न करावा.

(१२) वशिलेबाजी:—सार्वजनिक कार्यकर्त्याचा अनेक वजनदार लोकांशीं व अधिकाऱ्यांशीं परिचय घडत असतो. त्याच्या निस्पृह वृत्तीमुळें त्यांना त्याच्याबद्दल आदर वाटतो, किंवा ते त्याला वचकून असतात. त्यामुळें इष्टमित्रांचा नोकरीचाकरीसाठीं किंवा अन्य कार्यसिद्धीसाठीं वशिला लावणें सेवकाला सुलभ असते. परंतु सेवकानें त्या लोभाला बळी पडून आपल्या पुण्याईचा क्षय करून घेऊं नये. तसेंच लोकांच्या खासगी हितसंबंधांमध्यें त्यानें ढवळाढवळ करूं नये. उमेदवार लायक असल तर अधिकारी न्यायतःच त्याची निवड करतील; अर्थात् आपलें वजन खर्च करणें अनावश्यक आहे; आणि आवश्यक असेल तर तसें करणें अनुचित आहे; हें सेवकानें नीट ध्यानांत धरावें. त्यानें उमेदवारांना सामान्य शिफारसपत्रें देण्यास हरकत नाहीं, परंतु वैयक्तिक पत्रें देऊं नये. सेवकाचा हरएक कारभार नेहमीं उघडा असावा; त्यानें असें कोणतेंहि कृत्य करूं नये कीं जें उघडकीस आल्यास त्याला शरमिंदा व्हावें लागेल.

(१३) कींव नको:–सेव्याचे लाड करूं नये तशीच त्याची खोटी कींवहि करूं नये. सेव्याला स्वावलंबी बनविणें, त्याला आपल्या सेवेची गरजच राहणार नाहींसें करणें ही सर्वांत मोठी सेवा होय; दुसऱ्याला स्वतः स्वतःस मदत करूं लावणें हीच आपली त्याला श्रेष्ठ मदत होय. सेवकानें स्वतःला सेवेचा आनंद किंवा मोठेपणा मिळावा या लोभानें सेव्याला दुबळा, पंगू किंवा परावलंबी बनवूं नये. त्याला स्वतःला करतां येण्याजोगीं कामें त्याच्यासाठीं आपण करूं नये. कित्येक प्रसंगीं तर तसें करण्यानें सेव्याला आपला अपमान झाला असेंहि वाटण्याचा संभव आहे. हरिजन-सेवकांनीं हरिजनांच्या वस्तीची सफाई करण्यास जावें हा अशांतीलच प्रकार आहे. झाडूवाल्यांकडून स्वतःची वस्ती प्रत्यहीं साफ करून घ्यायची आणि वर्षांतून एखादे प्रसंगीं त्यांची वस्ती झाडण्यास आपण जायचें यापेक्षां तेवढा एक दिवस आपण आपल्या हातानें आपलीच वस्ती साफ करावी व त्यांना त्यांच्या रोजच्या कामांतून तेवढी विश्रांति द्यावी व स्वतःची वस्ती साफ करण्यास फुरसत द्यावी, हें काय वाईट ! त्यांना स्वतःच्या वस्तीच्या सफाईचें अगत्य वाटत नसलें तरीहि सेवकानें शक्य तोंवर त्यांचें त्यांनाच आपली साफसफाई करण्यास उद्युक्त करावें. एके दिवशीं स्वयंसेवकांची टोळी तुमचेंच घर किंवा कंपौंड साफ करायला आली तर तुम्हांला काय वाटेल ?

सेवकानें इतरांच्या दुःखानें अस्वस्थ व्हावें म्हणजे त्यांच्या बरोबरीनें आपणहि आराम सोडून दुःख निवारण्याच्या उपाययोजनेला लागावें; परंतु त्यांची कींव मात्र करूं नये. दुःख किंवा अडचण हें माणसाची कर्तबगारी दाखविण्यास आव्हान आहे असें समजावें, तें कृतिशून्य शोकाचें कारण होऊं नये. कींव करणें हा दुसऱ्याचा अपमान आहे. स्वाभिमानी माणसाला कसल्याहि विपत्तींत दुसऱ्यानें आपली कींव केलेली खपणार नाहीं. दुसऱ्यानें केलेली कींव सहन करणें किंवा आपलीच आपण कींव करणें हा मनाचा दुबळेपणा आहे. असल्या दुबळेपणाला सेवकानें पुष्टि देतां कामा नये. म्हणून गरिबाला किंवा आपदग्रस्ताला मदत करायची ती ‘ तुम्ही आम्ही मिळून या अडचणीचा उपाय करूं या. या वेळीं माझी तुम्हाला मदत

झाली तर पुनः कधींकाळीं मलाहि तुमची मदत घ्यावी लागेल ! अशा भावनेची असावी. दुसऱ्याला भार वाटेल अशा तऱ्हेचे ‘ उपकार ’ करण्यापेक्षां स्वस्थ बसलेलें अधिक बरें. तसेंच ज्यामुळें दुसरा नेभळा, दुबळा, आशाळभूत, ऐतखाऊ किंवा परावलंबी बनतो ती सेवा नसून तो अपकारच होय.

(१४) सेवसाठीं दुष्कृत्यें:—परंतु सेवामार्गांतील अत्यंत मोठा धोका किंवा सर्वांत शोचनीय प्रमाद हाच होय कीं, सेवक स्वार्थासाठीं जी दुष्कृत्यें करणार नाहीं, तीं सेवाकार्याच्या निमित्तानें करण्यास उद्युक्त होतो. जो स्वतःच्या फायद्यासाठीं खोटें बोलण्यास धजत नाहीं तो परोपकारार्थ खोटें बोलण्यास कचरत नाहीं. जो पोटासाठीं चोरी, लबाडी, वचनभंग किंवा फितुरी करणार नाहीं तो देशभक्तीच्या नांवानें या साऱ्या गोष्टी करण्यांत भूषण मानतो. याचा अर्थ असा कीं, आमच्या खासगी जीवनाचे आदर्श व सांघिक जीवनाचें आदर्श हेच मुळांत भिन्न, किंबहुना परस्पर-विरुद्ध आहेत. आपली अशी समजूत असल्याचें दिसतें कीं नीति—अनीतीचीं बंधनें खासगी जीवनालाच केवळ लागू आहेत आणि संस्थांच्या कारभारांत किंवा राजकारणांत सांघिक स्वार्थ हीच नीतीची एक मात्र कसोटी आहे. परोपकार हा खासगी जीवनाचा आदर्श आहे तर संस्थांचा किंवा संघांचा आदर्श जणूं स्वहितार्थ परघात हाच आहे.

परंतु हा भ्रम आहे व ती सेवामार्गाची विटंबना आहे. नीतिनियमांचा भंग करुन कोणीहि सेवा करूं शकत नाहीं. स्वामी नारायण सांप्रदायाच्या ‘शिक्षापत्री’मध्यें (श्लोक ७३) सांगितलें आहे:—

“ अपि भूरिफलं कर्म धर्मापेतं भवद्यदि ।
आचर्यं तर्हि तन्नैव धर्मः सर्वार्थदोऽस्ति हि ॥

एखादें कार्य पुष्कळ फळ मिळवून देणारें असूनहि जर तें नीतिधर्माशीं विसंगत असेल तर तें आचरूं नये, कारण धर्मापासून पुष्कळ कार्यच नव्हे तर संपूर्ण कार्य सिद्ध होतें. ” पुष्कळ फायद्यासाठीं संपूर्ण फायदा टाकून देणें बुद्धिमांद्याचें लक्षण आहे.

—×—

# सेवकाची साधनसंपत्ति : ९

साधकवृत्ति:—सेवक म्हणजे केवळ 'कार्यकर्ता' नव्हे. ज्याच्या हातून पुष्कळसें कार्य घडतें तो थोर सेवक असें तर कोणीच म्हणणार नाहीं. तें कार्य सत्कार्य असलें पाहिजे, लोककल्याणकारी असलें पाहिजे, केवळ कांही माणसांच्या हिताचें व इतरांच्या अहिताचें असेंहि असतां नये. असें सत्कर्म सद्भावनांच्या प्रेरणेखेरीज बहुधा संभवू शकत नाहीं, आणि सद्भावना किंवा सद्वृत्ति यांना यथार्थ ज्ञानाचा टेकू असणेंहि आवश्यक असतें. व्याप व धडपड हें सेवकाचें मुख्य लक्षण नव्हे तर सद्वृत्ति व योग्य दृष्टि हें अधिक जिव्हाळ्याचें लक्षण आहे. अमुक एक दृश्य कार्य किंवा परिणाम घडवून आणणें यांतच सेवकाची इतिकर्तव्यता होत नाहीं, तर आत्म्याची उन्नति व तन्मूलक शांति, समाधान, आनंद हेंच सेवेचें ध्येय होय. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें तर सेवक हा मुळांत साधक आहे. परंतु व्यक्तीला समाजा-वेगळें अस्तित्व नाहीं. व्यक्तीचें सुखदुःख, हिताहित व उन्नति–अवनति हीं समाजाच्या सुखदुःखांशीं, हिताहिताशीं व उन्नति–अनवतीशीं निगडित आहेत. त्यामुळें साधकाचा कार्यभाग गुहेंत ईशचिंतन केल्यानें साधत नाहीं; त्याला समाजांत राहून समाजाला आपल्याबरोबर न्यावा लागतो. मूळचा साधक अशा तऱ्हेनें सेवकाचें रूप घेतो. त्याला स्वत:चें व समाजाचें खरेंखुरें, म्हणजे पारमार्थिक, हित साधावयाचें असतें. परमार्थ-साधन हाच त्याच्या जीविताचा मध्यबिंदु असून त्याचे सारे कार्यक्रम त्या मध्यबिंदूभोवतीं घिरट्या घालीत असावे लागतात. योगी अरविंदांच्या आश्र-मांतील श्री दिलीपकुमारराय यांचें पुढील अवतरण (कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया-प्रकाशक, रामकृष्ण मिशन, ग्रंथ ३ पान ५९७) या बाबतींत अत्यंत मननीय आहे:—

"श्रीरामकृष्ण पुनः पुनः म्हणत असत:–ईश्वरी आज्ञेनुसार कार्य करण्यास धांवण्यापूर्वी सेवकाला अगोदर ईश्वरी आदेश (चपरास) मिळाला

पाहिजे. कळकळ उदंड असेल परंतु जोंपर्यंत तिला आकाशस्थ वैद्यराजाकडून सहीसूद सनद मिळाली नाहीं तोंपर्यंत ती दुःखितांना सुखवूं शकणार नाहीं. ईश्वराच्या लेकरांची खरीखुरी व टिकाऊ सेवा करण्यापूर्वी सेवकानें ईश्वराची प्राप्ति केलेली असली पाहिजे." साधकाची साधना खरी असेल तर इतरांस तिचा लाभ आपोआपच मिळेल, व ती खरी नसेल तर सारा परोपकार व्यर्थ आहे. विश्व विसरून आत्म्याचा शोध केला तरच विश्वाचा आत्मा हातीं लागतो.

कित्येक देशभक्तांना सर्व प्रकारच्या नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक किंवा पारमार्थिक प्रश्नांविषयीं बेपर्वाई किंवा तिरस्कार बाळगण्यांत भूषण वाटत असतें; परंतु ही त्यांची दिशाभूल आहे. त्यांना स्वतःचीच ओळख नसते. आपल्याला कोठें जावयाचें आहे याची फिकीर न करतां आपण खूप वेगानें धांवत गेलों कीं झालें असें बिचाऱ्यांना वाटत असतें. त्यामुळ त्यांचे पदरीं केवळ शीण मात्र पडतो. हा व्यर्थ शीण—व त्याबरोबरच जगालाहि होणारा उपद्रव—टाळावयाचा तर सेवकामध्यें साधकवृत्ति असणें ही पहिली आवश्यकता होय. साधकवृत्तीच्या सेवकाकडूनहि चुकीनें जगाला उपद्रव पोंचणार नाहीं असें नाहीं, पण चूक लक्ष्यांत येतांच तो ती सुधारूं शकतो; जगाच्या हिताहिताविषयीं बेपर्वा असण्याची मूलभूत चूक तरी तो करीत नाहीं.

**खुलासाः**-आम्हांला यापुढें ज्या सद्‌गुणांचें वर्णन करायचें आहे ते सर्व या साधकवृत्तींतून निष्पन्न होणारे उपसिद्धांतच आहेत. परंतु तत्पूर्वी एक खुलासा करणें इष्ट वाटतें.

आपल्याला ज्या सेवकाचें स्वरूप रेखाटावयाचें आहे तो आदर्श सेवक होय. सर्वच आदर्शांची स्थिति अशी असते कीं ते प्रत्यक्ष वस्तुस्थितींत उतरलेले बहुधा कोठेंच आढळणार नाहींत. आपण भक्त, ज्ञानी, स्थितप्रज्ञ इत्यादींचीं वर्णनें वाचतों तीं आदर्श भक्त इत्यादींचींच वर्णनें असतात. तसा आदर्श भक्त सद्यःकालीं एकहि सांपडणार नाहीं, पूर्वी झालेला नसेल व निकट भविष्यामध्यें तरी होणार नाहीं. तथापि भक्ताचें भक्तत्व त्या आदर्शातच आहे, तें त्याच्या शरीराच्या उंचींत शरीरकांतींत किंवा कलाकौशल्या-

दिकांत नाहीं. अशा तऱ्हेनें आदर्शाला वास्तविक अस्तित्व नसलें तरीहि आदर्श हाच वास्तविक सृष्टीचा नियंता आहे. आदर्श सेवक हा सर्व दोषांच्या पलीकडे आहे, तर वास्तविक सेवक हे हरतऱ्हेच्या दोषांनीं कमीज्यास्त प्रमाणांत भरलेले असणार. आदर्श सेवक हा सिद्ध आहे, वास्तविक सेवक हे साधक आहेत. तो पूर्ण आहे, हे अपूर्णच असणार. वास्तविक सेवक अनेक आहेत, तर आदर्श सेवक एकच आहे—किंवा एकहि नाहीं. तथापि सर्व वास्तविक सेवकांची धडपड त्या अवास्तविक आदर्शाला गांठण्याचीच असते, या अर्थानें आदर्श सेवक हाच अस्सल व वास्तविक सेवक हे त्याच्या नकला होत.

चित्रकारानें रंग व कुंचला यांच्या साह्यानें कागदावर किंवा कापडावर काढलेलें चित्र हें त्याच्या कल्पनेंतील अस्सल चित्राची अपूर्ण नक्कलच असते. मूर्तिकाराच्या कल्पनेंतील मूर्ति ही त्यानें बनविलेल्या दगडाच्या मूर्तीहून किती तरी पटींनीं सुंदर असते. गवयाच्या कंठांतून निघणारे आलाप हे त्याच आलापांच्या रेकार्डाहून ज्याप्रमाणें अधिक 'खरे' आहेत त्याचप्रमाणें कल्पनेंतील चित्र किंवा मूर्ति प्रत्यक्ष चित्रापेक्षां किंवा मूर्तीपेक्षां अधिक खऱ्या आहेत, आणि त्याच न्यायानें आदर्श सेवक हा वास्तविक सेवकांपेक्षां अधिक खरा आहे.

भूमितीच्या 'खऱ्या' बिंदूला विशिष्ट स्थान असतें पण लांबीरुंदी मुळींच नसते; तसेंच 'खऱ्या' रेषेला लांबी असते पण रुंदीमात्र बिलकुल नसते. खरोखरीच्या सृष्टींत हा 'खरा' बिंदु किंवा 'खरी' रेषा कुठेंच आढळत नसली तरी भूमितिशास्त्राचीं सारीं प्रमेयें या काल्पनिक म्हणूनच खऱ्या बिंदूंवर व रेषांवरच आधारलेलीं असतात. विद्यार्थी कितीहि हुषार असला तरी त्यानें काढलेला प्रत्येक बिंदु हें वर्तुळ व प्रत्येक रेषा हा लंब चौकोनच असणार. परंतु तेवढ्यामुळें भूमितीच्या मूळ व्याख्याच ढिल्या करून चालणार नाहीं; तसें केल्यानें शास्त्राची प्रगतिच खुंटून जाईल.

सेवकाचा आदर्श हाहि कोणत्याहि व्यक्तीमध्यें पूर्ण उतरलेला आपल्याला आढळणार नाहीं. श्रेष्ठांत श्रेष्ठ सेवकामध्येंहि कांहीं दोष किंवा न्यूनें असणारच. परंतु आपण आदर्शाला पोंचू शकत नाहीं एवढ्यासाठीं

आदर्शालाच खालीं ओढणें वाजवी होणार नाहीं.

आदर्श सेवकाचें पुढील वर्णन वाचतांना एवढा खुलासा लक्ष्यांत ठेवणें आवश्यक आहे. सेवक हा साधक आहे असें आपण वर म्हटलें, पण वर्णन आम्हांला सिद्धाचेंच करावें लागेल. कोणाहि साधकानें सिद्धाचे गुण व स्वतांतील न्यूनें यांमधील तफावत पाहून नाउमेद होण्याचें कारण नाहीं; तसेंच स्वतःच्या न्यूनांतच संतोष मानणेंहि युक्त नाहीं. आपल्यामध्यें हर-तऱ्हेचीं न्यूनें आहेत हीच तर त्यांच्याशीं झगडून स्वतःचा पुरुषार्थ दाखवि-ण्याची नामी संधि आहे. आणखी एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे ती ही कीं, सेवक ही कोणी स्वतंत्र जात किंवा पेशा नाहीं. खानेसुमारींत जे सेवक म्हणून नोंदले असतील तेवढ्या 'शिक्क्याच्या' सेवकांनींच पुढील लक्षणें अंगीं बाणवून घ्यावीं असें नाहीं. प्रत्येक मनुष्य हा कमीजास्त प्रमाणांत सेवक आहेच, जसा तो 'भक्त', 'ज्ञानी' किंवा 'गृहस्थ' आहे.

**आस्तिक्य किंवा श्रद्धा**:-आस्तिक्य, ईश्वरावर किंवा मांगल्यावर श्रद्धा हें सेवकाच्या अंगांतील चिलखत आहे. निराशेच्या, विफलतेच्या, आणीबाणीच्या प्रसंगीं तें त्याचें रक्षण करील. जीवन हा एक सततचा लढा आहे. सद्वृत्ति व दुर्वृत्ति, सत्य व असत्य, ज्ञान व अज्ञान, प्रकाश आणि अंधार, चैतन्य आणि जाड्य, जागृति आणि निद्रा यांमध्यें असंख्य आघा-ड्यांवर असंख्य चकमकी चालू आहेत. त्यांत सत्पक्ष पुष्कळदां हरलासें दिसेल; अन्याय, जुलूम, दंभ, स्वार्थ यांची सरशी होईल, सज्जनांचा छळ आणि दुर्जनांचा उदोउदो चाललेला दिसेल, पण सैनिकानें घाबरण्याचें किंवा नाउमेद होण्याचें मुळींच कारण नाहीं. **सत्यमेव जयते नानृतम्**—सत्या-चाच जय होणार, असत्याचा कदापि नाहीं—अशी त्यानें खात्री बाळगावी.

विश्व ही एक बेबंदशाही किंवा केवळ गलबला नसून ती एक सुव्यव-स्थित, सुनियंत्रित, सुसंघटित रचना आहे. तें वेड्याचें असंबद्ध बरळणें नसून एका महाकवीचें मधुर काव्य आहे. विश्वाचा नियंता, विधाता, आत्मा, प्राण म्हणून कांहीं आहे. त्यालाच पुष्कळसे लोक ईश्वर म्हणतात. तो सत्य-शिव-सुंदर, सर्वव्यापी, सर्वदर्शी व सर्वशक्तिमान् आहे; न्यायी व कृपाळु आहे; तो अत्यल्प वस्तूचीहि उपेक्षा करीत नाहीं; प्रत्येकाच्या यथायोग्य

पोषणाची चिंता वाहणारा आहे. तोच आम्हांला जन्म देतो, पोसतो, त्याचप्रमाणें योग्य वेळीं देह-मुक्तहि करतो.

तो आम्हां जीवांचा शिक्षक आहे. विश्व ही त्याची पाठशाला आहे. तो विद्यार्थ्यांना कठीण कठीण व मति गुंगविणारे प्रश्न घालतो, परंतु प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सतत प्रगतीची जबाबदारी त्यानें उचललेली आहे. "न मे भक्तः प्रणश्यति—माझ्या भक्ताला मरण नाहीं." असा त्याचा जाहीरनामा आहे. असली श्रद्धाच अपयशाच्या व कसोटीच्या प्रसंगीं सेवकाला धीर देईल. तरबेज पोहणाऱ्याला समुद्राच्या उसळत्या लाटांमध्यें पोहण्यांत जशी विशेषच मौज वाटते त्याप्रमाणें धीरोदात्त वृत्तीच्या सेवकाला संकटें चारी बाजूंनीं घेरीत असतां, द्विगुणित उत्साहानें प्रयत्नाला लागण्याची ईर्ष्या वाटत असते. महान् ध्येयांच्या पूर्तीसाठीं संकटाशीं झगडण्यांत जो आनंद किंवा जी धन्यता आहे ती ध्येयहीन सुखी जीवनांत नाहीं. बर्नार्ड शॉनें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें "जीवनांतील खरा आनंद तो हाच कीं, स्वतः मनोभावानें मान्य केलेल्या थोर ध्येयासाठीं जीवित अर्पण करणें; जराजीर्ण बनून जाण्यापूर्वी थकून दमून झिजून जाणें. बहुतेक लोक आपापल्या अल्प प्रपंचांत व त्या प्रपंचाच्या क्षुल्लक दुःखांत आणि गाऱ्हाण्यांतच चूर असतात जगानें माझ्या सुखासाठीं झटावें अशी त्यांची अपेक्षा असते; व जग तसें करीत नाहीं म्हणून ते मनांत कुढत असतात. पण असल्या क्षुद्र, स्वार्थी, कष्टी जीवनापेक्षां विश्वशक्तीच्या हातचें हत्यार बनून रहाणें किती तरी अभिलषणीय आहे."

**गांभीर्यः**—या श्रद्धेमुळें सेवकामध्यें गांभीर्य येईल. नरदेह हा एक थोर ठेवा आपल्याला मिळाला आहे, त्याचें आपण सार्थक केलें पाहिजे. या जन्माचा प्रत्येक क्षण फार मोलाचा आहे. इतर माणसें, आपले शेजारीसोबती हे ईश्वराच्या मूर्तीच आहेत. त्यांना स्वतःला त्याची जाणीव असो वा नसो, परंतु आपण त्यांचें सत्यस्वरूप ओळखूं शकतों. म्हणून सेवक कोणाहि माणसाविषयीं बेपर्वा किंवा निष्काळजी असणार नाहीं, कोणत्याहि गोष्टीची उपेक्षा किंवा तिरस्कार करणार नाहीं.

सर्व माणसें हीं ईश्वराचीं लेंकरें आहेत, सर्वांच्या अंतरांमध्यें एकच आत्मा खेळत आहे. मनुष्यमात्रामध्यें–दुष्टांत दुष्टामध्येंहि–धर्मबुद्धि आहे. प्रत्येक मनुष्य ज्ञान, भक्ति व सत्कर्म यांचे बळावर आत्मप्राप्ति किंवा ईश्वर-साक्षात्कार करून घेण्यास पात्र आहे नरदेह हें मोक्षाचें साधन आहे; त्याचा महिमा फार मोठा आहे. या नरदेहाचें आपण सार्थक केलें पाहिजे; नरदेहधारी प्रत्येक आत्म्याबद्दल आदरबुद्धि बाळगली पाहिजे. या अखंड जाणीवेचें नांव गांभीर्य.

**प्रसन्नता:**–अर्थात् हें गांभीर्य छाती दडपणारें, दुर्मुखलेलें, उदास-वाणें, असणार नाहीं. गांभीर्याबरोबरच प्रसन्नताहि परिपूर्ण असेल. ईश्वराच्या सृष्टींत सर्व कांहीं यथायोग्यच आहे. या विश्वग्रंथामध्यें पदोपदीं निरनिराळ्या स्वरूपाचीं कोडीं सोडवावीं लागतात, परंतु प्रत्येक कोड्याचें उत्तर शेवटीं निघतेंच. कोडें सुटेपर्यंत थोडी बेचैनी रहाते, परंतु तिच्याखेरीज कोडें सोडविण्याचा आनंद तरी कोठून मिळणार ?

जगांत दुःख आहे, परंतु तेंहि जीवित संरक्षणार्थ आवश्यकच असतें. आपला हात अग्नीला लागला असतां चटका बसून कळ लागते ती आपल्या बऱ्यासाठींच आहे. दुखलें नाहीं तर हात जळून जाईपर्यंतहि मनुष्य आगीपासून दूर होणार नाहीं. अति खाण्यामुळें पोटांत दुखलें नाहीं तर एकदम प्राणावर बेतेपर्यंत माणसें खाणें थांबविणार नाहींत. अशा तऱ्हेनें जगांतील दिखाऊ अनिष्टें हीं ईश्वरानें परिणामीं आमच्या हितासाठींच योजलेलीं असतात. त्याच्या योजना नेहमींच आपल्या लक्ष्यांत येत नाहींत इतकेंच.–कळकळी बरोबरच सेवकामध्यें थोडीशी विवेकीवृत्ति, खिलाडूपणा, अलिप्तवृत्तिसुद्धां असली पाहिजे, सुखाच्या किंवा दुःखाच्या, सन्मानाच्या किंवा अपमानाच्या, कर्तव्यपालनाच्या किंवा ऐषआरामाच्या, थोडक्यांत म्हणजे बऱ्या वाईट हरएक प्रसंगामध्यें माणसानें सर्वस्वी गुंतून गढून, बुडून न जातां त्या त्या गोष्टींच्या मर्यादांची जाणीव व त्या त्या प्रसंगाकडे अलिप्त किंवा तटस्थ दृष्टीनें पाहण्याची शक्ति हीं कायम टिकविलीं पाहिजेत. या शक्तीमुळें मनुष्य प्रत्येक प्रसंगाचें 'अति तरण' करूं शकतो; कितीहि खोल पाणी असो त्याचें डोकें प्रवाहाच्या वरच राहतें.

नम्रता:-सर्व माणसें एकाच ईश्वराच्या मूर्ती आहेत, ते सर्व आत्मे आहेत. बाह्यतः लहान-मोठे, काळे-गोरे, सुरूप-कुरूप, श्रीमंत-गरीब, कितीहि भेद असले तरी मुळांत एकच चैतन्य सर्वांमध्यें खेळत आहे, या जाणीवेनें सेवकाच्या मनामध्यें समबुद्धि उत्पन्न होईल, या समबुद्धींतूनच नम्रता उद्‌भवते. नम्रता म्हणजे मिंधेपणा, नेभळेपणा, बावळटपणा किंवा न्यूनगंड नव्हे, तर नम्रता म्हणजे मनुष्यमात्राबद्दल आदर. नम्रतेमध्यें आत्मविश्वास, स्वाभिमान किंवा आत्म-आदर पूर्णपणें असेल. स्वतः-बद्दल आदर असल्यामुळेंच इतरांबद्दल असेल, आणि इतरांबद्दल असल्यामुळें स्वत:बद्दलहि असेल. नम्र मनुष्य हीन-दीनांचा तिरस्कार करणार नाहीं, त्याचप्रमाणें बड्या लोकांच्या रुबाबानें दिपूनहि जाणार नाहीं. हीनदीनामध्येंहि चातुर्य, दिलदारपणा व शालीनता पुष्कळ प्रमाणांत असतात आणि रुबाबाच्या मुखवट्याखालीं भ्याडपणा, कृपणता, मत्सर, इत्यादि दडलेली असतात. सेवकाची भेदक दृष्टि दिखाऊ दैन्य व दिमाख भेदून जाऊन मुळांतील सामान्य माणुसकीचें दर्शन घेईल. नम्रतेमध्यें निर्भयताहि असेल. " दुर्जनं प्रथमं वंदे सज्जनं तदनंतरम्-दुष्टाला अगोदर वंदन करावें, सज्जनाला सावकाश केलें तरी चालेल. " ही रीत नम्रतेमध्यें मोडत नाहीं.

सेवक हा गुलाम नव्हे, मालकहि नव्हे, तो मित्र आहे. आपल्या बायका-मुलांचा नोकरां-चाकरांचा तसाच राजा-बादशहांचाहि मित्रच आहे. तो शिक्षक किंवा पालक असला तरी आपल्या ताब्यांतील आत्म्यांचा पुजारी आहे, उमलत्या फुलांची जोपासना करणारा माळी आहे, नवख्या प्रवाशांचा वाटाड्या आहे. हे प्रवासी या विशिष्ट मुलखाशीं अपरिचित असले तरी त्यांचें एकंदर जगाचें ज्ञान वाटाड्याच्या स्थानिक ज्ञानाहून किती तरी श्रेष्ठ दर्जाचें असणें असंभवनीय नाहीं, याची जाणीव या सेवक वाटाड्याला असेल. सेवक हा वरिष्ठ अंमलदार असला तरी अधिकाराचा ' अंमल ' त्याच्यावर चढणार नाहीं. माझ्या हाताखालच्या कामगारांचा मी सेवक आहें या भावनेनेंच तो आपला अधिकार चालवील. अनंतकोटी ब्रह्मांडें चालविणाऱ्या ईश्वराच्या सृष्टींमध्यें आपलें हें ऐहिक जीवन

म्हणजे एका प्रहराचें नाटक आहे. या नाटकामध्यें मला राजाचा पार्ट मिळाला म्हणून मी माझ्या हुजऱ्याला कमी लेखण्याचें कारण नाहीं. राजा–हुजऱ्या भेद तात्पुरते व दिखाऊ आहेत, आणि राजाचा पार्ट करील तो कुशल नट आणि हुजऱ्याचा पार्ट करणारा तो अडाणी अशां-तलाहि न्याय नाहीं.

नम्रतेचा अर्थ महत्त्वाकांक्षेचा संपूर्ण अभाव. सेवकाला कार्याची आकांक्षा असावी, " अवघाची संसार । सुखाचा करीन ।। " " ज्ञानदीप लावूं जगीं, " " पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळाशीं दरारा " या तऱ्हेच्या अमर्याद आकांक्षा सेवकानें अवश्य बाळगाव्या. परंतु वैयक्तिक प्रतिष्ठा, प्रसिद्धि, नांवलौकीक, मानपान, सत्ता इत्यादींची तिळमात्र लालसा असतां नये; नाहींपेक्षां सेवेच्या नांवाखालीं नाना तऱ्हेचे अनर्थ घडत असतात, म्हणून नम्रता व निरपेक्षता हा सेवायोगांतील पहिला धडा आहे.

**अक्रोधः**—नम्रतेंतून अक्रोध साहजीकच उदभवतो. क्रोधामध्यें गुर्मी असते, सत्तेची किंवा वरिष्ठपणाची भावना असते. सेवक हा कोणाचाच वरिष्ठ नसल्यानें तो रागावणार तरी कोणावर ?

तसेंच सेवक हा कर्मयोगी आहे; आणि " योगः कर्मसु कौशलम्-" कर्मयोग म्हणजे कार्यकुशलता. क्रोध येणें हें अडाणीपणाचें किंवा दुर्बल-तेचें लक्षण आहे. विद्यार्थ्याला उदाहरण समजत नाहीं याचा अडाणी शिक्षकाला चटकन् राग येतो. कुशल शिक्षक त्याला समजाविण्याच्या निरनिराळ्य युक्त्याप्रयुक्त्या योजूं शकतो, त्यामुळें त्याला राग येत नाहीं. अडाणीपणामुळें क्रोध येतो व उलट क्रोधामुळें बुद्धि लुली पडते, दृष्टि अंध होते. दुर्बलपणामुळें क्रोध येतो व उलट क्रोधामुळें शक्तीचा क्षय होऊन दुर्बलता वाढते. सावधानता व शक्तिसंग्रह याला क्रोध फार बाधक आहे. " एकदां क्रोध आला कीं बारा वर्षांची तपश्चर्या फुकट जाते " असें म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. सेवकाला स्वतःची कार्य-शक्ति क्रोधापायीं वायां दवडणें परवडण्याजोगेंच नाहीं.

वात्सल्य:—न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम्।
कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ॥
अर्थ—नको मोक्ष नको स्वर्ग नको मान नको धन।
दीन दु:खित जीवांची सांत्वना हेचि कामना ॥

जगांत जुलूम, कलह, झगडे, वितुष्टें भरपूर आहेत व तीं दुःखाला कारण होतात हें खरें आहे. तथापि मुळांत बहुतेक दुःख काल्पनिकच असतें. ज्याला त्याला वाटत असतें कीं, "मी दु:खी आहें, जग मला छळीत आहे." ही कल्पनाच बहुतेक दुःखांचें मूळ आहे. शाळेंत मुलें जशीं पीडलेलीं असतात तसेंच शिक्षकहि आपल्यापरी पीडलेले असतात. खाणावळींतील गिऱ्हाइकांचीं जशीं गाऱ्हाणीं असतात तशींच मालकांचींहि असतात. प्रत्येकाला स्वतःचीं दुःखें व दुसऱ्यांचा जुलूम एवढेंच दिसतें. धन्यांचीं गाऱ्हाणीं नोकरांच्या दुःखांहून तिळभरहि कमी नसतात. सासू आणि सून, जेलर आणि कैदी, रेल्वेचा तिकिटमास्तर आणि पॅसेंजर सारेच आपापल्या परीनें गांजलेले असतात. सर्वांचीच विनापराध छळणूक चाललेली असते. याला अपवाद एक सेवक मात्र आहे. तो मात्र सदा संतुष्ट, सदा प्रसन्न, सदा हंसत-मुख असतो. जुलूम व छळ त्याच्या वांट्यालाच येत नाहीं.

खरा दुःखी कोण ! तर 'मी दु:खी आहें' असें ज्याच्या मनानें घेतलें तो. सेवकाला अडचणी भेटतील, परंतु दुःख मात्र भेटणार नाहीं, कारण दुःख हा कल्पनेचा खेळ आहे. अडचणीमुळें जो हाय घेतो त्यालाच दुःख बाधतें. जो त्या अडचणींशीं सामना करून त्यांच्यावर शांत चित्तानें उपाय-योजनाच करतो त्याच्यावर दुःखाची मात्रा चालत नाहीं. दुःख ही नव-रचनेची आवश्यक पायरी आहे असें समजून जो त्याचें हर्षपूर्वक स्वागत करतो, त्याला दुःखच सुखरूप बनतें. लोक मौजेखातर प्रवासाला जातात; त्या प्रवासाची मुख्य मौज हरतऱ्हेच्या नव्या नव्या अडचणी व गैरसोयीमध्येंच असते. उमदा प्रवासी त्यांमुळें कष्टी होत नाहीं.

चिडखोरपणा हें निर्बलतेचें लक्षण आहे. अशक्त किंवा जिवापाड श्रम करणारीं माणसेंच बहुधा चिडखोर असतात. बलवान् क्षमाशील

असतो. ' क्षमा ' याचा अर्थच सामर्थ्य असा आहे. लबाडी, जुलूम यांसारखे दोषसुद्धां भीति, गांगरलेली वृत्ति, ' माझें कसें होईल ? ' अशी धास्ती, इत्यादींतूनच उद्भवतात. आत्मरक्षणाच्या अडाणी धडपडीचींच तीं लक्षणें आहेत. ज्यांना जीवनाची कला साधलेली नाहीं तेच असली धडपड करतात. ज्याला पोहतां येत नाहीं तो पाण्यांत पडला असतां हातपाय खूप आपटीत असतो, एवढें करूनहि गटंगळ्याच खातो व जवळच्या माणसाला मिठी मारून स्वतःबरोबर त्यालाहि बुडवितो. परंतु ज्याला पोहतां येतें तो शांत व समाधान-पूर्ण रहातो, स्वतः लीलेनें तरतो व इतरांसहि आधार देऊं शकतो.

संसाररूपी महासागरामध्येंसुद्धां सेवक हा अशा तऱ्हेनेंच सायासाखेरीज पोहतो व इतरांना धीर व आधार देतो. मनुष्यमात्राबद्दल त्याच्या मनामध्यें कारुण्य व वात्सल्य वसत असतें. त्याच्याशीं दुसऱ्यानें दुर्वर्तन केलें तरी तें अज्ञान, दुर्बलता, भीति, कष्टी मनस्थिति, इत्यादींचाच परिणाम आहे हें ओळखून तो त्या इसमाशीं विशेषच हळुवारपणानें वागतो व त्याच्या दुःखाचें सांत्वन करण्याचा विशेष प्रयत्न करतो. सेवक हा ' सहनशील ' असेल असें म्हणणेंहि अस्थानीं आहे. कारण सहनशीलता दाखविण्यास अगोदर क्लेशाची जाणीव पाहिजे. सेवकाला क्लेश जाणण्याचें इंद्रियच नसल्यानें तो सहनशीलता चालविणार तरी कोणावर ?

" भूतांची दया हें । भांडवल संतां । आपुल्या ममता । नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख । पराविया सुखें । अमृत तें मुखें । स्रवतसे ॥

तसेंच " तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ॥

अपरिग्रहः—सर्व समाज हेंच सेवकाचें कुटुंब. सर्व लोकच त्याचे व तो सर्व लोकांचा. जेथें अशा तऱ्हेचा अभेद झाला तेथें सेवकाची स्वतःची, खासगी अशी चीजवस्त किंवा मालमत्ता कोठून असणार ? आणि असण्याची आवश्यकता तरी काय ? घरोघरच्या कुटुंबांमध्येंहि प्रत्येक मुलाचे नेमलेले किंवा राखीव—म्हणजेच एक प्रकारें स्वतंत्र मालकीचे—कपडे, बिछाने, पुस्तकें, घड्याळ, फौंटनपेन, भांडीं, इत्यादि

असतात; परंतु आईची राखीव खोली, राखीव बिछाना, राखीव भांडीं, कोणी पाहिलीं आहेत का ? सेवक हा समाजाचा नोकर, शिक्षक, पुढारी, प्रसंगीं राजाहि आहे, तसाच तो समाजाची माता आहे. आईनें स्वतःची चीजवस्त कुलपांत ठेवणें म्हणजे मुलांचा द्रोह आहे. त्याचप्रमाणें सेवकापाशीं खासगी मिळकत असणें हेंहि प्रशस्त नाहीं. त्याचा धनी समाज त्याची पडेल ती ती गरज भागविण्यास समर्थ आहे. " नुपेक्षी कदा राम दासाभिमानी " असा थोर धनी असतांना सेवकाला उद्यांची फिकीर कशाला ? त्याला जेव्हां जें पाहिजे तें त्यावेळीं मिळतच जाईल. जें मिळेल तेवढ्यांत त्याचें समाधानहि असेल. आपले उपभोग अन्न, वस्त्र, बिछाना, घर, पुस्तकें, मानमान्यता हीं सारीं — योग्य वेळीं योग्य प्रमाणांत आपल्याकडे चालून येणारच अशी त्याची खात्री असल्यानें तो संतुष्ट व निर्धास्त असतो.

**भोग-मर्यादाः**—वरील विधानांत एवढीच दुरुस्ती आवश्यक आहे कीं आपल्याकडे चालून येणारे उपभोग **पुरेसे** आहेत असें सेवक मानील, परंतु ते चालून आले त्या अर्थी ते **आवश्यक** आहेत किंवा ते भोगणें योग्यच आहे, असें मात्र मानणार नाहीं. अनेकदां जनता इतकी उदार असते कीं ती सेवकाचे लाड करते, त्याच्या आवश्यकते पलीकडेहि अनेक तऱ्हांचे किंवा अधिक प्रमाणांत उपभोग ती त्याचेपुढें आणून मांडते. परंतु यजमानीण आग्रहानें वाढील तेवढें सारें खाणें जसें पाहुण्याला हितावह नसतें त्याचप्रमाणें अनायासानें मिळणारेहि सारेच उपभोग भोगणें सेवकाला विहित नाहीं. अपेक्षित सुखसोयीमध्यें कांहीं कमी पडल्यास त्यानें आपली अपेक्षा दुरुस्त करून 'तेवढेंच माझें' म्हणून संतोष बाळगावा. परंतु आपण भोगावयाच्या उपभोगांची कमाल मर्यादा त्यानें आंखून ठेवावी.

कुटुंब, शिबिर, शाळा, छात्रालय, पलटण, इत्यादि जिव्हाळ्याच्या सांघिक जीवनामध्यें सुद्धां माणसाची प्रवृत्ति स्वत:साठीं उत्तम जागा, उत्तम कपडे, उत्तम भांडीं, इत्यादि निवडून घेण्याची असते. उत्कृष्ट तेवढें मला मिळावें, गाळसाळ आपल्या जोडीदारांना—'यतो रत्नभुजो वयम्'=

रत्नें तेवढीं आमच्या उपभोगासाठीं—ही वृत्ति सेवकाची नसणार. "गाळसाळ कोणाला तरी पत्करावाच लागणार, आणि सारे आपलेच आहेत" असें म्हणून सेवक स्वतःसाठींच गाळसाळ निवडून घेईल व स्वतःची योजकता लढवून त्यांतच सोय व शोभा निर्माण करील.

सेवकानें अडचणींत व उपासमारींतच आनंद मानावा असा या म्हणण्याचा अर्थ नव्हे. सेवकानें स्वतःच्या वाजवी गरजांबाबत भिडस्तपणाहि मुळींच धरूं नये. स्वजनांशीं भिडस्तपणा कसला?

**साधी राहणी:**—सेवकाची राहणी साधी व सर्वांना लाभूं शकेल अशीच असावी. तिच्यामध्यें उच्चपणाचा देखावा नसावा. आपण इतरांहून निराळे, उच्च दर्जाचे, आहों असें सुचविण्यासाठीं आपला पोशाख, आपलें सामान, आपला आहार हीं इतरांहून वरच्या दर्जाचीं किंवा निराळ्या प्रकारचीं असलीं पाहिजेत असें मानणें किंवा म्हणणें सेवकाला मुळींच शोभत नाहीं. (पुष्कळसे 'प्रतिष्ठित' लोक तेवढ्यासाठींच महाग वस्तु वापरीत असतात!) दर्जा किंवा प्रतिष्ठा ही वस्तुच सेवकाला लागूं नाहीं. "हमालानें माझा बोजा उचलावा आणि मी फक्त छत्री किंवा रुप्याच्या मुठीची काठी, घेऊन चालावें" असें सेवक कधींच म्हणणार नाहीं तो कोणालाच आपला नोकर, शागीर्द, मजूर किंवा पट्टेवाला मानणार नाहीं.

सेवकानें प्रतिष्ठेसाठीं, मोठेपणासाठीं किंवा आपल्यापाशीं साधनें आहेत एवढ्याचसाठीं, इतरांहून वरच्या दर्जाची रहाणी ठेवूं नये; त्यानें इतरांच्या बरोबरीनेंच रहावें, वागावें, खावें प्यावें, ल्यावें इत्यादि. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं त्यानें आपल्या प्रकृतीच्या दृष्टीनें किंवा कर्तव्यें पार पाडण्याच्या दृष्टीनें विशेष प्रकारचा आहार घेण्यास, कपडे वापरण्यास, सोयी भोगण्यास किंवा इतरांकडून स्वतःची सेवाचाकरी करून घेण्यास हरकत आहे. त्यानें प्रकृतीसाठीं दूधतूप खावें, गरम कपडे वापरावे किंवा आपले कपडे इतरांस धुण्यास द्यावे, रिक्षांत, डोलींत किंवा दुसऱ्याच्या खांद्यावरहि बसून जावें; मात्र हें सर्व थोरवीच्या भावनेनें करतां नये, तर सहकार्याच्या व कृतज्ञतेच्या भावनेनेंच केलें पाहिजे, व ज्यांची आपण सेवा घेत आहों त्यांची तशाच प्रसंगीं स्वतः सेवा करण्याची त्याची तयारी असली

पाहिजे. तसेंच प्रकृतीसाठीं किंमती आहार घेतेवेळीं सुद्धां आपल्या बरोबरच्या इतर अशक्त किंवा आजारी माणसांची त्याच तऱ्हेची गरज भागत आहे कीं नाहीं तें पाहून तदनुसारच आपली वाजवी गरजहि पुरविली पाहिजे.

सेवकाची दृष्टि आपली राहणी शक्य तेवढी साधी व कमी खर्चाची व आपल्या गरजा शक्य तेवढ्या कमी करण्याची असावी. साधेपणा म्हणजे दरिद्रीपणा नव्हे. साधेपणा म्हणजे चैनीचा व अनावश्यक उपभोगांचा त्याग. माणसाचें आरोग्य व कार्यशक्ति जेणेंकरून वाढतात त्या जीवनावश्यक वस्तु; बाकीच्या वस्तु अनावश्यक किंवा चैनीच्या; त्यांच्या उपभोगानें आरोग्य व कर्तृत्व हीं उलट क्षीण होतात. ज्यांच्या उपभोगानें कार्यशक्ति वाढतहि नाहीं व क्षीणहि होत नाहीं अशा कांहीं 'तटस्थ' वस्तुहि असण्याचा संभव आहे. त्याहि वर्ज्यच समजाव्या; कारण त्या वस्तु पैदा करण्यासाठीं स्वतःला किंवा इतरांना करावे लागलेले श्रम वायां जातात, या अर्थानें तेवढी कार्यशक्ति क्षीण झाली असेंच समजलें पाहिजे. अनावश्यक 'गरजा' व खर्च यांमुळें सेवकाचा समाजावरील भार तेवढ्या अंशानें वाढतो व त्याच्यांतील आत्मविश्वास व वाटेल तसल्या प्रसंगाला तोंड देण्याची धमक हीं कमी होतात.

**शरीर-श्रमः**-सेवक हा कोठेंहि टाकला तरी सेवकच. सर्व काळीं, सर्व प्रसंगीं, सर्व संभाव्य प्रकारें, पडेल ती ती कामगिरी करण्यास तो तत्पर असणार. आपली कार्यक्षमता अधिकांत अधिक असावी, इतरांना आपला अधिकांत अधिक उपयोग व्हावा व स्वतःचा भार इतरांवर कमींत कमी पडावा, अशी उत्कंठा सेवकाला असणार. म्हणून निरलसता हें सेवकाचें प्रमुख लक्षण आहे. तो आपल्या आयुष्याचा क्षणहि व्यर्थ दवडणार नाहीं. (चैन व आवश्यकता यांमधील फरक वर दाखविला, तसाच फरक आळस व विश्रांति यांमध्यें आहे. आळसानें शक्ति घटते, विश्रांतीनें भरून येते. सेवकाला आळस वर्ज्य असला तरी विश्रांति पाहिजेच.) 'वेळ कसा घालवावा' अशी फिकीर कधींच पडूं नये अशा बेतानेंच त्याचे कार्यक्रम आंखलेले असावे. लेख, व्याख्यानें, मुलाखती, सल्लामसलत एवढ्याच केवळ

मार्गांनीं उपयुक्त बनण्याचा त्याचा आग्रह नसणार, तर आपल्या सर्व प्रकारच्या शक्ती तो समाजाच्या कार्याला लावील. या शक्तींमध्यें शरिराची, हातापायांची शक्ति ही फार महत्त्वाची आहे. बुद्धिबलाला महत्त्व नाहीं असें नाहीं, परंतु शरीरबल व तद्द्वारा उपयुक्त, उत्पादक शरीरश्रम हा सर्वांच्या आटोक्यांतील सेवामार्ग आहे; सेवक त्याची कधींच उपेक्षा करणार नाहीं. तो बौद्धिक कामें, लेख, योजना, ठरावांचे मसुदे, यांत्रिक शोध, इत्यादि करील, तितक्याच तत्परतेनें व हौसेनें हरतऱ्हेचीं शरीरश्रमाचीं कामेंहि करील. शरीरश्रम करणें हें बहुधा हलक्या दर्जाचें लक्षण मानलें जातें, हा एक अत्यंत घातुक लोकभ्रम आहे. या भ्रमाचें निरसन करणें ही सुद्धां महत्त्वाची (बौद्धिक) समाजसेवा होईल. स्वत: कर्तव्यबुद्धीनें व हौसेनें हरतऱ्हेचीं शरीरश्रमाचीं कामें करणें—केवळ स्वत:चींच किंवा दुसऱ्याचीं स्वयंसेवक म्हणून नव्हे, तर पोटासाठींहि करणें–हा त्या भ्रमनिरासाचा अत्यंत परिणामकारक उपाय आहे. म्हणून सेवक कसल्याहि समाजोपयोगी श्रमाची खंत मानणार नाहीं वकंटाळा किंवा आळस करणार नाहीं. स्वत: श्रम करणें हा श्रमोपजीवी बहुजनसमाजाशीं एकतानता अनुभविण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. तसेंच नम्रता अंगीं आणण्याला शरीरश्रमाची फार मदत होते.

**ब्रह्मचर्य:**--सेवक वळेल तेथें तेथें त्याला आईबाप, भावंडें, आप्तेष्ट, मुलें बाळें यांची रेलचेल असते. "मी या जगांत एकटा आहे. आपल्याला कोणीतरी प्रेमाचा सोबती पाहिजे, त्याविना जीवन उदासवाणें होणार" अशा प्रकारची भूक विवाहाच्या मुळाशीं असते. 'सर्व भूतात्मभूतात्मा'– सर्व जीव ज्याला आपल्यासारखेच झाले त्या नित्यतृप्त सेवकामध्यें अशा तऱ्हेची अपूर्णता व उत्कंठा कोठून संभवणार ? तो निराश्रयहि * असणार.

तसेंच विशिष्ट व्यक्तींवरच ज्याचें सर्वस्व गुंतून गेलें त्याच्यापाशीं इतरांना द्यायला शिल्लक प्रेम कोठून राहणार ! बेकननें आपल्या निबंधांत म्हटलें आहे कीं, "ज्याला तळी भरून काढायची आहे त्याचेपाशीं

---

*गीता. ४–२० 'नित्यतृप्तो निराश्रय:' हीं योग्याचीं लक्षणें म्हणून दिलीं आहेत. निराश्रय– सर्वांचाच आश्रय असलेला.

बागेला द्यायला पाणी कोठून उरणार!"

सेवावृत्तीमुळें विवाह अनावश्यक बनतो व उलट अविवाहामुळें विश्वप्रेम व सेवावृत्ति हीं अधिक उत्कट बनतात. मनुष्याच्या प्रेमाला पात्र पाहिजे असतें. औरस मुलांबाळांच्या अभावीं सारा समाज सेवकाला आपलासा वाटूं लागतो.

सेवकाला जशी सोबतीची गरज भासणार नाहीं. तशीच प्रजोत्पत्तीची-हि भासणार नाहीं. असलेल्या प्रजेचीच योग्य व्यवस्था लावण्याकडे त्याचें शक्तिसर्वस्व वेधलेलें असतांना अधिक मेंबर दाखल करण्याचा खटाटोप कशासाठीं? आणि प्रजननाची इच्छा नसतां भोग करणें अनुचित आहे हें तर उघडच आहे, ईश्वरदत्त शक्तीचा तो अपव्यय आहे.

भगवद्गीताकारांनीं " प्रजनश्चास्मि कंदर्पः—" प्रजोत्पत्तिकर्ता काम ही ईश्वराचीच विभूति किंवा देणगी आहे असें म्हणून कामाला सशर्त मान्यता दिली आहे. परंतु हें वचन " हत्वापि स इमां ल्लोकान्न हन्ति न निबध्यते–" लोकांना ठार करूनहि योगी त्या हत्येचा कर्ता होत नाहीं किंवा बंधनांत पडत नाहीं—या वचनाच्याच मासल्याचें आहे. जो गुणातीत आहे, तो दोषातीतहि असेल. एक तऱ्हेनें सर्वच काम प्रजन आहे, कारण तो बीजोत्पत्ति करतोच, मग बीजांतून प्रजा होवो किंवा न होवो. अशा तऱ्हेनें शरीर–धर्मानुसार साराच काम प्रजन असला तरी बुद्धया प्रजन असा काम फारच दुर्मिळ किंबहुना अशक्य आहे. भोगसमयींची अवस्था योजकतेपेक्षां कामुकतेची, आत्मवशतेपेक्षां विकारवशतेचीच असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आदर्शस्थितीशीं तिचा मेळ बसत नाहीं. सेवक हा जितेंद्रियच असला पाहिजे.

आदर व कामुकता यांचाहि मेळ घालणें कठीण आहे. ज्या व्यक्ती-बद्दल आपल्याला परम आदर वाटतो त्याचे विषयींची कामुकता लुप्त झालीच पाहिजे. प्रेमामध्यें आदराचें प्रमाण वाढेल तसतसें कामुकतेचें प्रमाण कमी होणें अनिवार्य आहे; दांपत्यप्रेमाचा अनुभवहि तसाच आहे. सेवकाला व्यक्तिमात्राबद्दल शुद्ध आदरच वाटणार, त्या अर्थी त्याचे ठिकाणीं कामुकता संभवत नाहीं.

आपल्याला येथें आदर्श सेवकाचा विचार कर्तव्य आहे. वास्तविक सेवक हे आदर्शापासून कमीजास्त प्रमाणांत दूर असणार हें उघड आहे, परंतु त्यामुळें आदर्शाला बाध येत नाहीं. कामविकार हा सार्वत्रिक किंवा सर्वसामान्य आहे, आणि ' जें सामान्य आहे त्याला विकृति कां म्हणतां? ती प्रकृतिच समजली पाहिजे" असें कित्येकांचें म्हणणें असतें. "तंबाकूचें व्यसन सार्वत्रिक आहे यावरून ती मानवी जीवनाची आवश्यकता आहे असें ठरतें" असें म्हणण्याप्रमाणेंच हें आहे. ब्रह्मचाऱ्याच्या जीवनाचा उगमच कामवासनेंतून आहे हें खरें, परंतु त्यावरून त्या जीवनाचें उद्दिष्टहि कामोपभोगच असलें पाहिजे असें निष्पन्न होत नाहीं. "सारेच ब्रह्मचारी झाले तर मनुष्यजात नष्ट होईल व ईश्वराचा सृष्टिक्रम आपण भंगिल्याप्रमाणें होईल" अशीहि कित्येकांना धास्ती वाटते. परंतु सारे ब्रह्मचारी झालेच व त्यामुळें मनुष्यजातीचा निर्वंश झाला म्हणून तरी काय बिघडलें? खुद्द ब्रह्मचाऱ्याचें तरी निर्वंशामुळें कितीसें नुकसान होत असतें? मनुष्यजात नाहींशी झाल्यानें सृष्टीचें नुकसान होईल कीं फायदा होईल तें तरी कोणी सांगावें? आणि सध्यांच्या माणसांचा निर्वंश झाला तरी तेवढ्यानें मनुष्यजात नाहींशीच होईल असेंहि सांगतां येत नाहीं. उलट मग पूर्वीप्रमाणें माकडांचे मनुष्य झरझर बनण्यास मोकळीक होणार नाहीं कशावरून? माकडांचे मनुष्य झाले कीं माकडांची जागा खालच्या योनी घेतील व हाच क्रम पुढें चालून यच्चयावत् योनींच्या उत्क्रांतीचा मार्ग खुला होईल. वरिष्ठ यत्तेचे विद्यार्थी त्याच यत्तेंत गर्दी करून स्वतःबरोबर खालच्या यत्तांची प्रगतिहि कुंठित करीत आहेत. ब्रह्मचर्यामुळें मनुष्य जात नष्ट नव्हे तर उत्तीर्ण होईल, मुक्त होईल.

**व्यावहारिक ब्रम्हचर्य**—आदर्श ब्रह्मचर्याचा विचार 'अव्यवहार्य' म्हणून सोडून दिला तरी सेवकानें व्यावहारिक ब्रह्मचर्य म्हणजे संयम तरी पाळलाच पाहिजे. सर्वांशीं, अर्थात् स्त्री जातीशींहि त्याचें वर्तन उदात्त, आदरयुक्त, गंभीर असेंच असेल. स्वपत्नीखेरीजच्या सर्व स्त्रिया त्याला माता किंवा भगिनीच वाटतील. कोणाहि इसमाला त्याच्याबद्दल शंका किंवा भय वाटणार नाहीं. परस्त्रियांशीं अशा तऱ्हेचे निर्मल संबंध राखण्याच्या

दृष्टीनें स्वस्त्रीशींहि त्याचे संबंध प्रमाणांत संयमशील असणें आवश्यक आहे.

आदर्श सेवक ब्रह्मचारी असेल असें आम्ही म्हणतों तेव्हां तें ब्रह्मचर्य स्वयंस्फूर्त असलें पाहिजे हें उघडच आहे. वासनांचा हठात् निग्रह करण्यामध्यें शोभा नाहीं, समाधान नाहीं व सेवाहि नाहीं. म्हणून महंमद पैगंबरानें ब्रह्मचर्याचा निषेध केला तो तत्कालीन व तद्देशीय समाजाला अनुरूप होता म्हणूनच केला.

विवाहाची इच्छा असूनहि केवळ कार्याच्या सोयीसाठीं, किंवा वैवाहिक जीवनाचा खर्च झेंपणार नाहीं म्हणून अविवाहित राहणें हेंहि इष्ट नाहीं. विवाहामुळें कार्यकर्त्याला एक निकटचा सहकारी लाभून त्याची कार्यशक्ति द्विगुणित होणेंहि शक्य आहे. प्रश्न विवाह कीं अविवाह हा नसून भोगवृत्ति कीं संयमवृत्ति हा आहे. अडचण पत्नीची नसून वृत्तीची आहे. पत्नी ही सेवकाच्या पायांतील बेडी होण्यापेक्षां त्याची टेकण्याची काठी किंवा त्याच्या जीवननौकेचें सुकाणूंहि होऊं शकेल.

येथवर सेवक हा पुरुषच आहे असें कल्पून आपण चाललों, पण त्याचा अर्थ सेवा व ब्रह्मचर्य यांचा केवळ पुरुषांना मक्ता आहे असें नव्हे. सेविकांनाहि वरील विवेचन आवश्यक शाब्दिक फेरफारांसह लागू आहे. स्त्रियांना ब्रह्मचर्याचा अधिकार आहे एवढेंच नव्हे तर त्यांना ब्रह्मचर्यापलन अधिक सुसाध्य आहे असाच बहुतेक स्मृतिकारांचा म्हणजे समाजशास्त्रकारांचा अभिप्राय दिसतो. कारण ते स्त्रियांवर पुरुषांपेक्षां अधिक कडक निर्बंध घालतात व त्यांचेकडून अधिक संयमाची अपेक्षा करतात.

**अस्वादः**—अस्वाद वृत्तीचा ब्रह्मचर्याशीं फार निकटचा संबंध आहे. '**जितं सर्वं जिते रसे**'—जीभ जिंकली कीं सर्व जिंकलें. तसेंच आरोग्य व बल यांचेशीं सुद्धां अस्वादाचा निकट संबंध आहे. '**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्**'— शरीर हें धर्मपालनाचें प्रथम साधन आहे, यासाठीं सेवकानें आपलें शरीर निरोगी व कार्यक्षम ठेवण्याची पूर्ण दक्षता ठेवली पाहिजे. त्यासाठीं शरिराची इतर प्रकारांनीं काळजी घेतलीच

पाहिजे. पण शरीराला योग्य आहार, योग्य प्रमाणांत व योग्य वेळीं देत जाणें याला विशेष महत्व आहे. अशा कर्तव्यभावनेनें व शास्त्रीय दृष्टीनेंच सेवक आपल्या खाद्य पेयादिकाचा विचार करील. गोड लागेल तें भरपूर खावें व आवडत नसेल तें टाकून द्यावें अशी त्याची रीत नसेल; तर जें शरीराराला पथ्य व आवश्यक असेल तेंच, योग्य तेवढ्याच प्रमाणांत, तो घेत जाईल. आणि त्यांत सात्त्विक स्वादहि भरपूर मिळेल. अस्वाद म्हणजे स्वादाचा अभाव नव्हे, तर शुद्ध स्वाद. स्वार्थत्याग म्हणजे ज्याप्रमाणें स्वार्थविकास किंवा उच्च स्वार्थच असतो, त्याप्रमाणें अस्वाद म्हणजे उच्च, सात्त्विक व आरोग्यपर स्वाद होय. ज्यानें आपल्या रूची बिघडवून घेतलेल्या नाहींत अशा निरोगी इसमाला पथ्य तेंच स्वादिष्ट वाटेल व स्वादिष्ट लागेल तें पथ्यही असेल. रानटी पशूंचें असेंच असतें. फक्त मनुष्यानें आपल्या मूळच्या निरोगी प्रेरणा बिघडवून घेतल्या असल्यामुळें स्वादिष्ट व पथ्य यांमध्यें तफावत उत्पन्न झाली आहे. माणसाच्या संगतीनें गुरें, कुत्रीं, मांजरें, घोडे इत्यादि प्राण्यांचींहि स्वादेंद्रियें रोगट बनलीं आहेत आणि अनेक तऱ्हाच्या रोगांचें फावलें आहे.

दारू, अफू, गांजा, तंबाकू यांसारखे घातुक व किळसवाणे पदार्थ मनुष्याला सरावानें अन्नापलीकडेहि प्रिय व आवश्यक वाटूं लागतात, परंतु आरोग्याची चाड बाळगणाऱ्या सेवकानें हीं सारीं वर्ज्य समजलीं पाहिजेत हें स्पष्टच आहे. चहा, मसाले व तीव्र स्वादाचे इतर अनेक पदार्थहि त्याज्य समजले पाहिजेत.

युक्ताहाराइतकेंच मिताहारालाहि महत्त्व आहे. हें वरील विवेचनावरून लक्ष्यांत येईलच. स्वादलोभानें शरीराच्या आवश्यकतेपेक्षां अधिक खाणें ही एक तऱ्हेची चोरी आहे—विधात्यानें तें अन्न अन्य तोंडांसाठीं निर्माण केलेलें असतां मी तें लुबाडून घेतलें असें होतें. तेंहि सेवकाला शोभत नाहीं.

**सत्य व अहिंसाः**—सेवेचा हेतु जीवमात्राशीं ऐक्याचा साक्षात्कार साधणें हा आहे. या ऐक्याच्या क्षेत्राला कसलीच मर्यादा नाहीं. 'जीवमात्राशीं ऐक्य' असें आम्ही म्हटलें तरी विश्वाशीं ऐक्य हाच अभिप्रेत

अर्थ आहे सेवकाचें प्रत्येक कृत्य हें विश्वप्रीत्यर्थ असलें पाहिजे. त्याहून मर्यादित अशा कोणत्याहि समूहासाठीं कार्य करणें-जाति, वर्ग, प्रांत, देश इत्यादिसाठीं तेंच सर्वस्व म्हणून, झटणें—म्हणजे या उपास्य देवतेचा तेवढ्या अंशीं द्रोह आहे. क्षेत्रमर्यादेबरोबर निरपेक्षतेलाहि बाध येतोच. मर्यादित समूहाची सेवा म्हणजे एक परस्पर सहकार्याचा करारच असतो हें आपण पूर्वी पाहिलें आहे. म्हणजेच अशी सेवा कांहीं अंशीं स्वार्थी असते. आपले व परके असा भेद कल्पून आज त्यांचा फायदा कोठूनहि साधायचा असा विचार ठरला म्हणजे त्यासाठीं भल्याबुऱ्या साधनांचा—असत्य, हिंसा इत्यादींचा-आश्रय करावा लागणें साहजिक आहे. परंतु आदर्श सेवक हा कोणत्याहि मर्यादित समूहाचा सेवक नसून विश्व-सेवक आहे. अशा सेवकासाठींच गीताईचा उपदेश आहे: —

**जें खाशी होमिशी देशी जें जें आचारिशी तप ॥**
**जें कांहीं करिशी कर्म तें करी मज अर्पण ॥**

मज म्हणजे परमेश्वराला. शुद्ध सेवा म्हणजे ईश्वरार्पण बुद्धीनें, खासगी ममता, मोह इत्यादीपासून अलिप्त राहून, केलेलें कर्म. निर्मम, निर्मोह, अनासक्त बुद्धीच्या सेवकाला कोणालाहि फसविण्याचें प्रयोजनच रहात नाहीं. फसविणें म्हणजे स्वतःलाच फसविणें. ईश्वराला फसविण्याचा वृथा प्रयत्न करणें, हें त्याला समजत असतें. असा मनुष्य हिंसा तरी कोणाची, कशा-साठीं करणार ?

असत्य भाषण, असत्याचरण, लबाडी, फसवणूक हीं ऐक्यानुभवाच्या मार्गांतील सर्वांत मोठी विघ्नें आहेत. मी कोणापाशीं खोटें बोललों कीं तत्क्षणींच त्याच्या माझ्यामध्यें मोठा खंदक पडतो. माझें स्वतःचें जीवन तेवढ्या अंशीं संकुचित बनून जातें. कोणालाहि फसविणें म्हणजे त्याचा द्रोह करणें. आणि त्याचा द्रोह म्हणजे आत्मद्रोहच.

बुद्धीचा प्रांजलपणा हाहि सत्यनिष्ठेचाच भाग आहे. स्वतःच्या चुका पदरांत घेण्याची व सुधारण्याची सेवकाची सदैव तयारी असली पाहिजे. आपण जें मत एकदां जाहीर केलें किंवा प्रतिपादिलें व तदनुसार कार्याची

उभारणी केली तें मत मागाहून चुकीचें ठरल्यास आपलें आजवरचें कार्य निष्फळ किंवा नुकसानकारकहि ठरणार व आपली नापत होऊन पुढें कार्य करणेंहि दुष्कर होऊन जाणार या भयानें कार्यकर्ता आपल्या विचारसरणीची व कार्यपद्धतीची फेरतपासणी करण्यास धजतहि नाहीं. परंतु हा हट्टाग्रह अनर्थावह होत असतो; म्हणून सेवकानें निराग्रही असावें; त्याची वाढ कधीं खुंटतां कामा नये. स्वीकृत मार्ग अनुभवाचे व विचाराचे कसोटीवर सतत तपाशीत रहाण्याची दक्षता, चुका मान्य करण्याचा प्रांजलपणा व त्या सुधारण्याची दक्षता त्याचेमध्यें असली पाहिजे.

क्रोध, द्वेष, हिंसा यामुळें जीवाजीवांची, आत्म्याआत्म्यांची ताटातूट होते. हिंसा म्हणजे प्रतिआत्म्याचा अपमान होय. त्यामुळें आपलाहि आत्मा अपमानित होतो. ऐक्यानुभवी किंवा ऐक्येच्छु सेवक आपण होऊन दुसऱ्याला दूर लोटणार नाहीं. अर्थातच त्याला कोणावरहि सक्ती किंवा दडपशाही करणें, कोणालाहि भेदरवून त्याच्याकडून विशिष्ट कार्य करवून घेणें रुचणारच नाहीं.

हिंसेला असत्याचा आश्रय घ्यावाच लागत असतो. प्रतिपक्षीयाला न फसवितां, न चकवितां त्याला विश्वासांत घेऊन त्याची हिंसा करूं पाहणारा बावळटच म्हटला पाहिजे. अनासक्त सेवकाला असत्य व हिंसा यांचें वावडें आहे या मुद्याचें विवेचन गांधीजींनीं आपल्या अनासक्तियोगाच्या प्रस्तावनेमध्यें चांगल्या तऱ्हेनें केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पहावें.

**सत्याग्रहाश्रमांचीं व्रतें**—१९१५ सालच्या सुरवातीला गांधीजींनीं अमदाबादनजीक सत्याग्रहाश्रम स्थापिला. आश्रमाचें ध्येय देशसेवेचें शिक्षण देणें हा होता. कित्येक नियमांचें किंवा व्रतांचें अनुशीलन हा प्रमुख अभ्यासक्रम मानलेला होता. १९३० सालीं येरवडा तुरुंगांतून आश्रमवासीयांस उद्देशून लिहिलेल्या पत्रांमध्यें गांधीजींनीं या व्रतांचें मननीय विवेचन केलें असून तीं पत्रें मंगलप्रभात या नांवानें पुस्तकरूपानें गुजराथींत प्रसिद्ध झालीं असून त्यांचें मराठी भाषांतरहि प्रसिद्ध झालेलें आहे. श्री. विनोबा भावे यांनीं त्या व्रतांचीं नांवें पुढील सोप्या

अनुष्टुपांमध्यें गोविलीं आहत—

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीरश्रम, अस्वाद सर्वत्र भयवर्जन ॥
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥

पहिल्या श्लोकांतील व्रतें व स्वदेशी व्रत हीं सार्वत्रिक व सनातन स्वरूपाचीं आहेत आणि सर्वधर्मसमभाव व अस्पृश्यतानिवारण हीं विशेषतः हिंदुस्थानाच्या सद्य:स्थितीला अनुलक्षून आहेत. ज्याला देशसेवा करायची आहे त्यानें वरील गुण आपल्या अंगीं बाणवून घेणें आवश्यक आहे. अशा तयारीखेरीज प्रसिद्धि, प्रतिष्ठा इत्यादींच्या लोभानें, ईर्षेमुळें, इतरांचें पाहून किंवा केवळ रिकामें बसवत नाहीं म्हणून जो देशकार्याला उद्युक्त होतो त्याचे हातून देशाची मोठी हानीहि होण्याचा धोका असतो. मात्र सेवा-वृत्तीचें शिक्षण देण्याच्या शाळा, विशिष्ट मुदतीचा अभ्यासक्रम व तो पसार केलेल्यांना प्रमाणपत्रं किंवा पदव्या देणें यांपैकीं कशाचीच शक्यता किंवा आवश्यकता नाहीं. सेवक हा स्वयंशिक्षकच असला पाहिजे. तो सत्प्रवृत्त व जागृत असला म्हणजे प्रत्यक्ष सेवाकार्य करतां करतांच चुका करीत करीतहि आपलें शिक्षण साधून घेईल. त्या कामीं त्याला अधिक अनुभवी लोकांकडून वेळोंवेळीं मार्गदर्शनहि मिळूं शकेल.

**अभय**—वरील सामान्य व्रतांपैकीं अभय व स्वदेशीखेरीज सर्व इतर व्रतांचें विवेचन यापूर्वी येऊन गेलेंच आहे. सेवकाला निर्भयवृत्तीचेंहि फार महत्त्व आहे. निर्भयतेखेरीज त्याला सेवामार्ग चोखाळतां येणार नाहीं. जगामध्यें अन्याय व अज्ञान, जुलूम व जुलमापुढें वाकण्याची हीन वृत्ति, गर्व व न्यूनगंड भरपूर प्रमाणांत आहेत, आणि त्यांच्याशीं सेवकाला पदोपदीं झगडावें लागेल. उपहास, लोकनिंदा, वियोग, राजभय, दारिद्य, इत्यादींचें तर त्यानें भय मानतां कामा नयेच, पण ज्यांची आपण सेवा करतों त्यांची मर्जी मोडण्याचीहि त्यानें क्षिति बाळगतां कामा नये. स्वतःची मनःप्रेरणा हीच त्यानें सर्वोच्च सत्ता मानली पाहिजे.

अन्याय व जुलूम यांचेहि नाना प्रकार किंवा रूपें असतात. रुबाब, दिमाख, थोरवी, शिष्टाचार, कुलीनता, इत्यादींच्या गोंडस बुरख्याखालींहि अनेक सूक्ष्म अन्याय लपलेले असतात, त्यांना सेवकानें दिपून जातां नये. त्यानें सेवा करावयाची तीं गरजूंची, अनाथांची करावी; जालिमांची, त्यांच्या दिमाखाला भिऊन किंवा भुलून जाऊन करूं नये. नाहींतर चिंध्या पांघरलेल्या भिक्षेकऱ्याला आपण दुरुत्तरें बोलून तांदळाची चिमटी घालतो आणि स्वामींची किंवा महाराजांची मात्र भपक्याला दिपून जाऊन पाद्यपूजा करतो व त्याच्यावर पैसा उधळतो.

निर्भयता हा सर्व नीतीचा पाया आहे. भीति आणि नीति यांचा उभा दावा आहे. भीतीनें किंवा धाकानें केलेल्या सदाचाराला नैतिक दृष्ट्या कवडीचीहि किंमत नाहीं. त्यापासून कर्त्याची अधोगतिच आहे. स्वखुषीनें व प्रीतिपूर्वक केलेलें कार्यच नैतिक दृष्टया मोलाचें व कर्त्याला उन्नतिप्रद असते. म्हणून सेवक स्वतः भयवश होण्याचें टाळील आणि इतरांकडूनहि धाकाच्या जोरावर कसलेंच काम घेऊं इच्छिणार नाहीं. याचेंच नांव अहिंसा.

स्वदेशी:—घरच्या देवाची पूजा सोडून पंढरपुराला धावण्याची चूक अनेक कार्यकर्त्यांकडून घडत असते. देशसेवेच्या नगाऱ्यापुढें शेजाऱ्याच्या अडचणीची टिमकी त्याला ऐकूं येत नाहीं. दूरच्याला गवसणी घालण्याच्या त्याच्या प्रयत्नांत हातांतील गळून पडतें आणि दूरचें तें दूरच रहातें. म्हणून सेवकाची दृष्टि विशाल असावी परंतु त्याचे कार्यक्रम निकटवर्तीच असले पाहिजेत.

स्वदेशी म्हणजे स्वार्थ नव्हे, तर स्वधर्म, स्वतःला नेमून मिळालेलें काम मनोभावानें करणें व स्वतःच्या वाट्याला आलेल्या सुखसोयींत संतोष मानणें. मी कोकणवासी असेन तर मनुकांऐवजीं करंदे, सफरचंदांऐवजीं आंबे आणि टरबुजांऐवजीं चिबूड हाच मी माझा मेवा समजावा. तसेंच मी कोकणाबद्दल, कोंकणवासीयांबद्दल, कोकणी भाषेबद्दल किंवा स्वतःबद्दल लाज किंवा तिरस्कार न मानतां अभिमान बाळगावा. कुटुंबवत्सल गृहस्थानें हॉटेलांत जाऊन चहा-चिवडा खाणें, नीच (मानलेल्या)

५१५०८ ५१४ ५।१२।६३



जातीच्या सुशिक्षितांनीं आपली जात लपविणें, स्वतःच्या साध्या किंवा वेड्यावाकड्या नांवाचीहि लाज वाटणें, कॉलेज-तरुणाला आपल्या गांवढळ बापाची लाज वाटणें, श्रीमंतानें आपल्या गरीब मित्राचें, शेजाऱ्याचें किंवा भावाचें नातें तोडणें, सुशिक्षित (!) हिंदी गृहस्थांनीं मोडक्या इंग्रजींत किंवा इंग्रजीमिश्रित स्वभाषेंत बोलण्यांत मोठेपणा मानणें, हे सारे स्वदेशीच्या भंगाचे नमुने आहेत.

असल्या प्रकारांमध्यें आपलें व आपण यांच्याबद्दल तिरस्कार, अनादर, शरम किंवा अनास्था दिसून येते. हा आत्मद्रोह आहे. गर्व किंवा प्रौढी यांच्या इतकाच आत्म-अनादरहि त्याज्य आहे. तो ईश्वराचाहि द्रोह आहे. त्यांत अहंकार आहे. निरहंकारी इसम वस्तुस्थिति असेल तशी कबूल करण्यास कचरत नाहीं, कारण वस्तुस्थिति त्याच्या पदरची थोडीच आहे! तो सुद्धां इतरांप्रमाणें त्या वस्तुस्थितीचा प्रेक्षकच आहे. तो ती वस्तुस्थिति सुधारण्याचा प्रयत्न अवश्य करील पण तेंहि एखादा डॉक्टर रोग्याचें दुखणें बरें करण्याचा प्रयत्न करतो तितक्याच अलिप्त बुद्धीनें करील.

आपण व आपले जसे आहों त्याहून निराळे किंवा अधिक चांगले दिसण्याचा प्रयत्न करणें यांत एक प्रकारें सत्यापलापहि आहे, सत्य दडविण्याचा प्रयत्न आहे. सेवकानें अधिक चांगलें दिसण्याचा नव्हे तर होण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

समारोपः—सेवकाच्या साधन संपत्तीचें आतांपर्यंत पुष्कळ विवेचन झालें; परंतु तें कितीहि केलें तरी संपूर्ण होणार नाहीं. आतांपर्यंत उल्लेखिलेल्या सद्वृत्तीहि परस्पर स्वतंत्र नसून मूळच्या सेवावृत्तीचींच भिन्न भिन्न नांवें आहेत. या सेवावृत्तीचीं प्रमुख लक्षणें ईश्वरशरणता, कार्याचा निदिध्यास व आत्मनिरीक्षण हीं आहेत. समर्थ रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें:—

पहिलें हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्वा ठायीं॥

---

# सेवकाचा चरितार्थ  १०

" सुखवस्तूंनींच सेवा करावी " ?—सेवा म्हणजे सार्वजनिक कार्य. सार्वजनिक कार्याला लागल्यानंतर सेवकाला स्वतःच्या प्रपंचाचीं कामें करण्यास फुरसत मिळत नाहीं, अशा स्थितींत सेवकानें स्वतःचा व अवलंबियांचा योगक्षेम कसा चालवावा ? यावर कित्येक जण उत्तर देतात कीं " कार्यकर्त्यानें अगोदर निर्वाहाची चिंता उरणार नाहीं इतका धनसंग्रह करावा व नंतरच सार्वजनिक कार्यांत पडावें. असें केल्यानें सेवकाला पश्चात्तापाची पाळी येणार नाहीं, कुटुंबियांचे हाल होणार नाहींत व स्वतः त्याचेवर दुसऱ्याचे तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग येणार नाहीं. " आधीं प्रपंच करावा नेटका " असें समर्थ रामदासांनींसुद्धां सांगितलेलें आहे.

" अशा तऱ्हेनें प्रपंचाबाबत निश्चित होऊन सार्वजनिक कार्यांत पडल्यानें कार्यकर्त्याची लोकांवर छाप चांगली पडते, त्याचा निःस्वार्थीपणा शाबीत होतो, व त्याच्या स्वाभिमानालाहि बाध येत नाहीं; सार्वजनिक काम हें निर्वेतन केलेलेंच शोभतें; त्यामुळें कोणाचा मिंधेपणा पत्करावा लागत नाहीं.

" म्हणून शहाण्या इसमानें अगोदर आपल्या धंद्याचा व प्रपंचाचा नीट जम बसवून उरल्या आयुष्यांत व फावल्या वेळांत सार्वजनिक कार्य करावें " इत्यादि.

पूर्वीं उल्लेखिलेल्या " गेट ऑन्-गेट ऑनर-गेट ऑनेस्ट " प्रथम धन, नंतर मान, व शेवटीं पुण्य—या आपमतलबी धोरणाला हा सल्ला पूर्ण साजेसाच आहे. सार्वजनिक कार्याचा हेतु प्रसिद्धि, प्रतिष्ठा, मानमरातब इत्यादि मिळविण्याचाच असेल तर वरील मसलत यथायोग्य आहे. यासाठींच सेवाकार्य, याला ' ऑनररी वर्क '—सन्मान्य कार्य – असा शब्दप्रयोग रूढ झाला आहे.

सेवेला अग्रस्थानः—परंतु सेवाकार्यांतील दृष्टि मानलाभाची नसून जर पारमार्थिक म्हणजे खरीखुरी असेल तर सेवकानें आपलें कर्तव्-

गारीचें वय व आपली उत्तमोत्तम शक्ति सेवाकार्याला अर्पण करावी. आणि तसें करायचें तर त्याला स्वतःचा प्रपंच थाटण्यास फुरसतच राहणार नाहीं. आपण व समाज यांमधील अभेदभाव हा तर सेवायोगाचा आधार आहे. यांत समाजाचें हित व आपला प्रपंच असा भेदच रहात नाहीं.–

खासगी धंदा, खासगी कमाई व खासगी मिळकत यांमुळें सेवक व समाज यांच्यामध्यें फारखत पडते. अगोदर असा अलगपणा किंवा दुजाभाव स्थापित करून नंतर वेतन न घेतां उपकारभावनेनें सार्वजनिक कार्य करण्यानें सेवा घडत नाहीं, उलट अपकारच घडतो. स्वतःकडे श्रेष्ठपणा घेऊन व सेव्याला कनिष्ठ बनवून त्याचेवर केलेला उपकार त्या उपकृताला अपमानास्पद व जाचक होत असतो. ‘ उप–कार ’ याचा मूळ अर्थ ‘ जवळ करणें ’ असा आहे. उपकारामुळें उपकर्ता व उपकृत यांमधील अंतर कमी होऊन ते एकमेकांना जवळचेसे झाले पाहिजेत; उपकारामुळें उपकृत हा ओशाळा होऊन किंवा भारानें अस्वस्थ बनून दुरावणार नाहीं अशा बेतानेंच केला तरच तो खरा उपकार. उपासना म्हणजे ज्याप्रमाणें ( ईश्वराच्या ) जवळ जाऊन बसणें, त्याप्रमाणें उपकार म्हणजे दुसऱ्याला जवळचे होऊन, किंवा जवळचे होतां येईल. असें वागणें. याचे उलट अप–कार म्हणजे दुसरा दुरावेल असें वर्तन.

सारांश, सेवक समाजावर खोटे उपकार करूं इच्छित नसतो, म्हणून तो अभेदबुद्धीनें आपल्या सर्व शक्तीनिशीं समाजाचें कार्य करील व समाज आपल्याला आपल्या चरितार्थापुरता मोबदला देईलच अशी खात्री बाळगील.

**सेवकांचे तीन प्रकार**— परंतु हें सेवकाच्या मनोवृत्तीचें चित्र झालें. त्याचा प्रत्यक्ष कार्यक्रम व त्याच्या निर्वाहाची प्रत्यक्ष व्यवस्था काय असेल? प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें सेवकांचे तीन प्रकार कल्पितां येतील:–

(१) बैठे सेवक किंवा ‘ नागरिक ’–या ना त्या धंद्याच्या रूपानें समाजसेवा करणारे;

(२) खडे सेवक किंवा ‘ सैनिक ’—कसलाहि खासगी धंदा न करतां केवळ सार्वजनिक–कार्याला वाहिलेले;

(३) स्वयंसेवक–निर्वाहासाठीं खासगी धंदा करून फावल्या वेळांत सार्वजनिक कार्य विनावेतन करणारे;

**बैठी सेवा:**—साधारणतः सेवकाविषयीं आपली कल्पना असते कीं तो ‘ सोजिरा ’ प्रमाणें समाजाचा फालतू घटक आहे. ‘ सार्वजनिक कार्यकर्ता ’ हा सर्वसामान्य लोकांहून निराळा असा स्वतंत्र वर्गच आपण कल्पितों. सर्वसामान्य नागरिकांना कोणता तरी उद्योगधंदा किंवा पेशा असतो, तर सेवकानें कोणताहि पेशा करावयाचा नसून त्यानें लोकांचा पुढारी, किंवा पोलीस, या नात्यानें सामान्य पेशांव्यतिरिक्त अशीं–संघटना, प्रचार, चळवळ, लोकशिक्षण, आपत्तिनिवारण यांसारखीं–कामें करावयाचीं असतात. सामान्य नागरिक हा गृहस्थ तर सेवक हा यति, नागरिक हे प्रापंचिक तर सेवक हा पारमार्थिक, नागरिक हा बैठा व विशिष्ट धंदा करणारा तर सेवक हा फिरता व बांधलेलें काम नसलेला, अशा तऱ्हेचा भेद स्थूल मानानें आपण करीत असतों.

परंतु नागरिक आणि सेवक, गृहस्थ आणि यति, प्रापंचिक आणि पारमार्थिक, बैठा आणि फिरता, जबाबदाऱ्यांवाला आणि बिन–जबाबदार अशा तऱ्हेचा हा भेद भ्रामक आहे. सेवा हा मुख्यतः वृत्तीचा प्रश्न आहे. प्रापंचिकानें स्वार्थीच असल पाहिजे किंवा सेवक भटक्याच असावयाचा असें मुळींच नाहीं. प्रपंच व परमार्थ, धंदा आणि सेवा याची अशा तऱ्हेनें फारकत करणें हानिकारक आहे. धंदा हाच सेवाशील पाहिजे, तसेंच सेवा ही उद्यमशील व जबाबदारी ओळखणारी अशीच असली पाहिजे. “ आधीं प्रपंच करावा नेटका । मग साधावें परमार्थ विवेका ॥ ” यांतील आशय हाच कीं प्रपंच हा पारमार्थिक व परमार्थ हा प्रापंचिक असला पाहिजे.

शेती, मजुरी, व्यापार, वकिली, वैद्यकी, खासगी किंवा सरकारी नोकरी यांचा सेवावृत्तीशीं विरोध तर नाहींच, उलट हीं सर्व कामें सेवा-वृत्तीनेंच करण्यांत यावी हें इष्ट, उचित व आवश्यक आहे. खासगी धंद्याचें धोरण नीतिहीन स्वार्थाचें असलें पाहिजे असें मुळींच नाहीं, तें समाजाच्या सेवेचेंच असलें पाहिजे. व्यापाऱ्याचें काम ठकबाजी करून

कोठूनहि संपत्ति सांठविण्याचें नसून गिऱ्हाइकांच्या वाजवी गरजा भागविण्यासाठीं जरूर त्या स्थानिक जिन्नसांचा संग्रह करणें, जरूर त्या परमुलखांतून आणविणें, व त्या गिऱ्हाइकांना जरूर लागेल तसतशा योग्य दरानें पुरविणें; तसेंच आपल्या मुलखांत आवश्यकतेहून अधिक प्रमाणांत तयार होणाऱ्या जिन्नसा जेथें त्यांची विशेष आवश्यकता असेल अशा परमुलखाला पाठविणें व अशा तऱ्हेनें समाजाच्या भरणपोषणाची तरतूद करणें हें होय. चांभाराचें काम वहाणांच्या पोटांत जुनी चामडी किंवा चुरा घालून गिऱ्हाइकांना ठकविणें हें नसून नरम व टिकाऊ चामड्याच्या मजबूत व सोइस्कर अशा वहाणा लोकांना पुरवून त्यांच्या पायांचे कांटे, खडे, उन्हाचा ताप किंवा कडक थंडी यांपासून रक्षण करणें हेंच आहे. कोष्ट्याचें काम थंडीचें निवारण व अब्रूचें रक्षण यांसाठीं त्या त्या ऋतूंत सुखावह होतील असे नरम, गरम, जाड किंवा तलम, टिकाऊ कपडे तयार करून लोकांना पुरविणें हें आहे पोलीसाचें काम लोकांना तंग करण्याचें नसून दंगेधोपे, चोरीमारी, बलिष्ठांचा दुर्बलावर जुलूम, इत्यादि नानाविध अनिष्टांचें निवारण करणें हें होय. अशा तऱ्हेनें प्रत्येक पेशा हा केवळ चरितार्थाचें किंवा कमाईचेंच साधन नसून तो समाजसेवेचाच एकेक प्रकार आहे. हे सारे धंदे म्हणजे श्रमविभागपूर्वक आपापल्या परीनें समाजाची सेवा करण्याचेच अचूक मार्ग आहेत. लोकांच्या गैरवाजवी गरजा पुरविणारे धंदे उदाहरणार्थ—वेश्याव्यवसाय, मद्यविक्री, जुगारी, इत्यादि, हे मात्र निषिद्ध आहेत; तसेंच चोर, मारेकरी यांना धंदेवाईक म्हणणेंहि योग्य नाहीं. अशा तऱ्हेचे नीतिबाह्य धंदे सोडून दिल्यास बाकीचे नीतिशुद्ध धंदे स्वार्थी इच्छेनें न चालवितां शुद्ध समाजसेवेच्या दृष्टीनें चालविणें शक्य व इष्ट आहे. आदर्श समाजामध्यें प्रत्येक कार्यक्षम स्त्री-पुरुषाला अशा तऱ्हेचें कोणतें तरी उपयुक्त काम नेमून दिलेलें असेल, व तो तें समाजाची सेवा करण्याची संधि या दृष्टीनेंच मनोभावानें करीत असेल. अशा तऱ्हेनें सेवाभावानें धंदा करणारे सज्जन आजहि हरेक पेशामध्यें आढळूं शकतात; आणि पूर्वकालींहि विणकर, चांभार, महार, माळी, कुंभार, खाटीक, इत्यादि धंदेवाईकांमध्यें—मोल-

करीण स्त्रियांमध्येंहि—अनेक जगद्वंद्य महात्मे व संत होऊन गेल्याचें आपल्याला माहीत आहेच.

सरकारी नोकरांनाहि सिव्हिल सर्व्हंट किंवा पब्लिक सर्व्हंट म्हणजे समाजसेवक, अशी संज्ञा आहे. आदर्श राज्यव्यवस्थेमध्यें ती सर्वथैव यथार्थहि आहे. आम्हां हिंदी लोकांना अनेक पिढ्यांच्या पारतंत्र्यामुळें सरकार या संस्थेबद्दलच परकेपणा, अविश्वास व अनादर वाटूं लागला आहे ही गोष्ट निराळी; परंतु सुयोग्य राज्यपद्धतीखालीं सरकारी नोकरी-सारखा समाजसेवेचा दुसरा ' राजमार्ग ' च नाहीं !

निर्दोष उपजीविका:—समाजाच्या श्रमविभागणीच्या योजनेमध्यें ज्यानें आपल्या हिश्शाचें काम बिनचूक व दुसऱ्याला यत्किंचित्‌हि उपसर्ग पोंचणार नाहीं अशा तऱ्हेनें बजावलें तो कृतकृत्य झाला, समाजा-विषयीं अनृण झाला; त्यानें आणखी समाजसेवा, उपकार, दान, इत्यादि करण्याचें प्रयोजन रहात नाहीं.

**' निर्मल कर्में स्वदेहधारण । आदिसूत्र सेवाधर्माचें ॥ '**

निर्मल, निर्दोष, निरूपद्रवी अशा मार्गांनीं दुसऱ्याचें शोषण न करतां, मी स्वतःचें पोट भरलें तरी पुरे. मग कसलेंहि ' सन्मान्य ' सेवाकार्य करण्याची माझ्यावर जबाबदारी रहात नाहीं. उलटपक्षीं भल्या-बुऱ्या कसल्या तरी ' सुलभ ' मार्गानें थोडक्या श्रमांत भरपूर संपत्ति मिळवून फावल्या वेळांत निर्वेतन समाजकार्य करणें म्हणजे अंगावर चिखल माखून घेऊन नंतर तो साबणानें धुऊन काढण्याप्रमाणें आहे, हें आपण पूर्वीं एकदां पाहिलेंच आहे.

धंद्याची निवड:—अल्पश्रमानें विपुल धनार्जन करून देणाऱ्या मार्गांमध्यें इच्छया किंवा अनिच्छया कांहीं तरी दोष, अन्याय, जुलूम, उपद्रव, शोषण हीं येऊनच जातात. आदर्श स्थितीमध्यें सर्व तऱ्हेच्या उपयुक्त श्रमांच्या एका मापाला वेतनाचेंहि एक मापच मिळेल. परंतु सध्यां या बाबतींत विषमता भरपूर प्रमाणांत आढळून येते. म्हणून सेवाशील धंदेवाईक असाच धंदा निवडील कीं ज्याच्यामध्यें परशोषण कमींत कमी असेल. तो धंदा चालविण्याची त्याची पद्धतिहि शक्य तेवढी

कमी शोषक राहील. उदाहरणार्थ स्थानिक व आवश्यक जिन्नसांच्या व्यापारांत नफा कमी असतो, परदेशी व चैनीच्या वस्तूंच्या व्यापारांत प्राप्ति अधिक होते, विमा एजंटाला अल्पश्रमानें भरपूर कमाई होते, आणि सरकारी नोकराला २५।३० वर्षें नोकरी केल्यानंतर बसून घरपोंच पेन्शन मिळतें. तर शेतकऱ्यानें साठ वर्षें शेताची मशागत केली तरीहि पुढील पावसाळ्यांत नांगर-जातें घेऊन चिखल तुडविल्याशिवाय त्याला पोटगी भेटत नाहीं. अशा आर्थिक विषमतेच्या, ओढाताणीच्या व स्पर्धाकुल परिस्थितींत सेवाशील धंदेवाईक आपल्या लायकीनुसार त्यांतल्या त्यांत निर्दोष असा धंदा निवडील, तो धंदाहि शक्य तितक्या सचोटीनें करील व त्यांतून फाजील कमाई झाल्यास ती आपल्या मालकीची न समजतां आपल्या गिऱ्हाइकांच्या मालकीची समजून त्यांच्या हितार्थच तिचा विनियोग करील. उलट पक्षीं भरपूर श्रम करून सुद्धां अपुरीच कमाई होत असेल तर त्या अन्यायाच्या निवारणार्थहि तो समदुःखी लोकांची संघटना करून झगडेल.

जगांतील विषमताः—जगांत निसर्गमूलक विषमता आहे; माणसामाणसांच्या जन्मजात शारीरिक, मानसिक व बौद्धिक शक्तींमध्यें पुष्कळ फरक पडतो; तशीच सामाजिक-कुल, वंश, वर्ण इत्यादिमूलक-विषमताहि आहे. त्याखेरीज जिला 'संयोगमूलक' विषमता म्हणतां येईल अशीहि भरपूर आहे; जन्मतः समान शक्तीच्या अशा इसमांनाहि भिन्न प्रकारच्या संधी मिळत गेल्यानें त्यांच्या भाग्योदयाच्या प्रती भिन्न होतात. उदाहरणार्थ शहरांत रहाणाऱ्या माणसाला खेड्यांत रहाणाऱ्या माणसापेक्षां अधिक वशिला प्राप्त होतो. नाक्यावर घर असलेला, ज्याच्या घराजवळून मोटारचा किंवा आगगाडीचा नवीन रस्ता बनेल असा गृहस्थ, राजधानीचा रहिवाशी, 'साहेबा' चा पट्टेवाला, विशिष्ट संस्थेचा किंवा विद्वद्वर्यांचा विद्यार्थी, थोर पुढाऱ्यांचा निकटवर्ती अनुयायी इत्यादींना अनायासें महत्त्व प्राप्त होतें. अशी विविध प्रकारची विषमता जगांत नसती तर कोणी कोणाची सेवा करण्याची आवश्यकता, किंबहुना शक्यताहि नव्हती. जगांत विषमता आहे, उच्चनीच, श्रीमंत-गरीब,

जाणते-अडाणी, पुढारलेले मागासलेले, काळे-गोरे, यांसारखे भेद मानवी कुटुंबाचा उच्छेद व ऐक्याचा उच्छेद करणारे आहेत म्हणूनच ते छेद सांधण्यासाठीं सेवेचें सिमेंटहि योजावें लागतें. एकसंधी कोरीव लेण्यांच्या काळीं सिमेंटची आवश्यकता नव्हती, म्हणूनच त्याचा शोधहि लागला नव्हता. मनुष्याचें वैयक्तिक व सामुदायिक जीवन साधें, सुटसुटीत व अल्प-शाख होतें, तोंपर्यंत समाजसेवेची विशेष आवश्यकता जाणवत नव्हती; परंतु तें अधिकाधिक व्यापक, गंभीर, बहुशाख व गुंतागुंतीचें होत जातें तसतसे सामाजिक प्रश्नहि वाढीस लागून समाजसेवेची नवीन नवीन क्षेत्रें उत्पन्न होतात.

आदर्श स्थितीमध्यें प्रत्येक धंदेवाईक हा समाजसेवक असेल व प्रत्येक इसमाला विशिष्ट धंदा नेमून दिलेला असेल, म्हणजे सारेच समाजाचे किंवा परस्परांचे सेवक असतील. अर्थात स्वतंत्र सेवकवर्गाची अवश्यकताच नसेल. परंतु तशी परिस्थिति नाहीं म्हणूनच सेवेची आवश्यकता निर्माण होते व धंदेवाईक नागरिकांव्यतिरिक्त ज्यांना आपण वर 'खडे सेवक' व 'स्वयंसेवक' अशा संज्ञा दिल्या त्या सेवकांची गरज पडते.

**आदर्श राज्यव्यवस्था:**--देशाच्या संरक्षणासाठीं ज्याप्रमाणें 'खडें सैन्य' असतें त्याचप्रमाणें खासगी धंदा न करतां केवळ सार्वजनिक कार्यालाच वाहिलेल्या अशा कांहीं सेवकांची समाजाला नेहमींच आवश्यकता असते. दैन्य, दारिद्य, जुलूम, आपत्ति यांनीं गांजलेल्या समाजांना ही जरूरी विशेष प्रमाणांत असते. समाज आदर्श परिस्थितीच्या जवळजवळ पोंचेल तसतशी ही आवश्यकता कमी कमी होत जाईल.

आदर्श राज्यव्यवस्थेमध्यें लोकसेवेचीं बहुतेक कामें सरकारच हातीं घेऊन चालवील. परंतु अलीकडे शस्त्रबळाच्या जोरावर--उलट शस्त्रबळाच्या प्रतिकारार्थसुद्धां—मोठमोठीं अवाढव्य राज्यें बनविणें आवश्यक झालें आहे. अशा अवाढव्य राज्यांमध्यें प्रजेच्या आंतरिक सुखसोयींकडे व आत्मविकासाकडे पूर्ण लक्ष देणें सरकारला शक्य होत नसतें. सध्यां सरकार ही संस्था मुख्यतः परक्याच्या प्रतिकारासाठीं, परक्यांवर आक्रमण

करण्यासाठीं, किंवा परक्यानें आक्रमण केल्यामुळें, चालू आहे. परस्पर सहकार्यानें आत्मविकास साधणें हें तिचें श्रेष्ठ कर्तव्य सध्यां उपेक्षिलें जात आहे. या श्रेष्ठ कर्तव्याला जसजसें प्राधान्य मिळत जाईल तसतशीं हरतऱ्हेच्या समाजसेवेचीं क्षेत्रें सरकारच्या कार्यवाहीखालीं येत जातील, व सरकार हाच एक व्यापक, कार्यक्षम व निःपक्षपाती असा मध्यवर्ती समाजसेवासंघ बनेल. परंतु सध्यां सरकारांची या बाबतींतील शक्ति मर्यादित असल्यानें खासगी संस्थांना व व्यक्तींना समाजसेवेचीं व सुधारणेचीं हरतऱ्हेचीं कामें आपापली अभिरुचि, आवांका, शक्ति व साधनें यांस अनुसरून हातीं घेऊन चालवावीं लागतात. सरकारी खात्यांपेक्षां अशा खासगी प्रयत्नांमध्यें कळकळ, निष्ठा, सहकार्य, कार्यक्षमता, काटकसर, दीर्घसूत्रीपणापासून मुक्तता, इत्यादि गुण अधिक साधतात; परंतु त्याचबरोबर व्यापक व सर्वस्पर्शी योजना, एकसूत्रीपणा इत्यादि सोयी चुकतात.

**खडे सेवक व उपजीविकेचा प्रश्न:**—शिवाय धंदेवाईक नागरिकांनीं आपापले धंदे समाजसेवेच्याच दृष्टीनें चालवावे हें उचित असलें तरी सारेच तसें करीत नाहींत; त्यामुळेंहि समाजसेवेला वाहिलेल्या व स्वतःच्या उपजीविकेसाठीं खासगी धंदा न करूं शकणाऱ्या 'सेवावृत्ति' अर्थात् सेवा हीच ज्यांची 'वृत्ति' म्हणजे निर्वाहाचें साधन आहे अशा, खास सेवकांची समाजाला आवश्यकता असते. येथपर्यंत आपण ज्यांचें चरित्र–लेखन केलें ते आमचे चरित्र–नायक म्हणजे विशेषतः हे खडे सेवकच होत.

आतां आमच्या या बिचाऱ्या नायकापुढें मुख्य प्रश्न आहे पोटापाण्याचा ! आमच्या नायकाची रहाणी साधी असेल, त्याच्या गरजा अगदीं मर्यादित असतील, तो सडाफटिंगहि असेल, तरी पण त्यालासुद्धां 'दुपार' आहेच, या दुपारची सोय काय ?

या प्रश्नाचें आगाऊ व सर्वसामान्य उत्तर देणें अशक्य आहे–आणि अनावश्यकहि आहे. कारण वारुळांतून मुंग्यांची रांग एकाएकीं सुरू होते त्याप्रमाणें अशा सेवकांची एकाएकीं कोठें तरी झुंड उभी होणार आहे

आणि त्यांच्या शिधापाण्याचा व त्यांच्या स्वयंपाकासाठीं लागणाऱ्या मोठमोठ्या हांड्यांचा प्रश्न उभा होणार आहे अशांतील स्थिति नाहीं. विशिष्ट प्रसंगानुसार विशिष्ट स्थळीं व विशिष्ट कार्यासाठीं एखाददुसरी किंवा थोडक्याशाच व्यक्ती सेवाकार्यासाठीं पुढें येतील. त्यांची सोय त्या त्या परिस्थितीस अनुसरून लागेलच असें धरून चालण्यास हरकत नाहीं. त्यांतूनहि सेवकावर क्वचित् उपास काढण्याचे किंवा थंडींत कुडकुडण्याचे प्रसंग आलेच तरी तो त्यांची पर्वा करणार नाहीं. प्रापंचिकावर व श्रीमंतावरहि कधीं काळीं असे प्रसंग येत नाहींत असें थोडेंच आहे?

सेवकाची कसोटी:—असे प्रसंग ही सेवकाच्या निष्ठेची कसोटी आहे. समाजानें तरी खऱ्याखोट्याची पारख न करतां स्वतःला सेवक म्हणविणाऱ्या प्रत्येक नवख्या इसमापुढें पंचपक्वान्नाचें ताट वाढून कसें चालेल? समाजामध्यें अगोदरच इतका श्रद्धाळूपणा आहे कीं त्यामुळें अनेक ढोंगबाजांचें चांगलेंच फावतें. अशा ढोंगबाजीच्या ठोकरा खाऊन लोकांनीं चिकित्साखोर बनावें व सेवेचीं नाणीं पारखूनच घ्यावीं यांत वावगें कांहीं नाहीं. असली पारख समाजाप्रमाणें सेवकालाहि श्रेयस्करच ठरल्याशिवाय रहात नाहीं. उमेदवारी किंवा तपश्चर्या प्रत्येक खात्यांत करावी लागते तशी ती सेवेच्या खात्यांतहि करावी लागल्यास नवल नाहीं, किंबहुना करावी न लागल्यास तेंच नवल म्हटलें पाहिजे, आणि विनापरीक्षेच्या प्रमाणपत्रालाच सेवकानें भ्यालें पाहिजे.

पारख कितीहि काळ चालो व मान्यता मिळण्यास कितीहि विलंब लागो, कार्यार्थी सेवक त्याची क्षिति बाळगणार नाहीं. भर्तृहरि म्हणतो त्याप्रमाणें—

महीपृष्ठीं केव्हां अवचट पलंगीं पहुडतो।
क्षुधेनें शाकान्नें अवचट सदन्नें निवटितो।
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्रीं मिरवितो।
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणि तो॥

किंवा

भोजनाच्छादनें चिंता वृथा कुर्वन्ति वैष्णवाः।
योयं विश्वंभरो देवः स भक्तान् किमुपेक्षते॥

नगर वाचनालय, सातारा.


आस्तिकांनीं अन्नवस्त्राची फिकीर करूं नये. साऱ्या विश्वाचें भरणपोषण करणारा ईश्वर स्वतःच्या भक्तांचीच काय उपेक्षा करील ?

नुपेक्षी कदा रामदासाभिमानी । रामदास.

तसाच ख्रिस्ताचाहि उपदेश आहे ( ल्यूक अध्याय १२-२४ ). कावळे पहाना. ते पेरणी, कापणी, साठवणी, कांहीं करीत नाहींत, तरी देव त्यांना खाऊं जेऊं घालतो. त्यांच्यापेक्षां तुमची किंमत कितीतरी अधिक नाहीं का ?

तीं कमळें कशीं वाढतात पहा. तीं सूत कांतीत नाहींत कीं श्रम करीत नाहींत. पण त्यांच्या तोडीचा पोशाख बादशहांनासुद्धां मिळत नाहीं.

तुम्हीं दैवी राज्य व दैवी न्याय संपादा कीं मग बाकीच्या साऱ्या वस्तु तुमचेकडे चालून येतील.

गीताः—

अनन्याश्चिन्तयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

आणि तुकाराम महाराज—

कां रे नाठविशी । कृपाळू देवासी । पोषितो जगासी एकला तो ।
तेणें काय तुझी । नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनी ॥

**सेवकाचा जुल्मः**—सेवक आपल्या अन्नवस्त्राबाबत बेफिकीर राहिला तरी दुसऱ्या एका बाबीची त्यानें फिकीर करणें आवश्यक आहे ती अशीः—

सेवक हा आपल्या व्यक्तिविशिष्ट ( सब्जेक्टिव्ह ) कल्पना, प्रेरणा, किंवा आकांक्षा यांस अनुसरून विशिष्ट कार्याला प्रवृत्त होतो व त्या कार्याकडेच आपलें तन, मन, धन लावतो. त्याच एका गोष्टीची समाजाला, किंवा जगाला, अत्यंत आवश्यकता आहे असें त्याच्या मनानें घेतलेलें असतें. परंतु हा त्याचा भ्रम असण्याचा, किंवा त्याचे विचार एकांतिक असण्याचा संभव आहे. समाजाला त्या गोष्टीचें तितकें महत्त्व वाटणार नाहीं, किंवा ती गोष्ट उलट अनिष्ट व हानिकारकहि वाटेल; सेवक हा समाजाला आपला शत्रुसा वाटेल. त्यांत समाज चुकला आहे कीं सेवक चुकत आहे तें

कालच ठरविणार. कालाचा निर्णय जाहीर होईपर्यंत सेवक व समाज यांचेमध्यें बेबनाव राहणार. त्यांत आपला पक्ष चुकीचा असूं नये एवढ्यासाठींच सेवकानें जपलें पाहिजे. सेवकाच्या मनानें घेतलेली गोष्ट समाजाला हानिकारकहि असेल, किंवा मुळांत इष्ट असली तरी तितकें महत्त्व नसेल; ती प्राप्तकाल नसेल; कांहीं कालानंतर तिची आवश्यकता जाणवणार असेल; पण आजच तिचा आग्रह धरणें अप्रासंगिक, म्हणूनच हानिकारक असल. अशा स्थितींत समाजानें सेवकाची उपेक्षाच नव्हे तर विरोधहि केल्यास सेवकानें तक्रार तर करूं नयेच, परंतु आपणच समाजावर जुलूम करतों कीं काय याचाहि पूर्ण विचार करून योग्य वाटल्यास आपला कार्यक्रम सुधारावा. "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं नो करणीयम्-चांगली गोष्टहि लोकांना मानवणार नाहीं अशा तऱ्हेनें करूं नये" ( शंकराचार्यः चर्पट पंजरिका ). सेवा व सुधारणा यांमध्येंहि सक्तीचा अंश असणें अगदीं संभवनीय असतें. शिक्षकानें विद्यार्थ्यांच्या जलद प्रगतीच्या आग्रहानें त्याचेवर सक्ती करणें जसें योग्य नाहीं, त्याप्रमाणेंच सेवकानेंहि समाजावर आपले विचार व कार्यक्रम लादण्याचा दुराग्रह धरूं नये. त्याच्या स्वतःच्या तनमनधनावर समाजाचीच मालकी असून त्या वस्तु समाजाकडून ठेव म्हणून त्याचेकडे आलेल्या आहेत, त्यांचा उपयोग त्यानें समाजाच्या हितासाठींच नव्हे तर समाजाच्या अनुमतीनेंच करावयाचा आहे. त्या बाबतींत त्यानें हितकारक सुलतानी ( बेनिव्होलंट डेस्पॉटिझम ) चालविल्यास प्रजाहि परिपत्याला उद्युक्त होईल, किमान पक्षीं त्याच्या अंमलाशीं असहकार करील.

संस्थेचें विद्यमानः—सेवकानें कोणतेंहि सेवाकार्य वैयक्तिक योजनेनें व केवळ स्वतःच्याच जबाबदारीवर चालविण्यापेक्षां एकाद्या संघाच्या किंवा संस्थेच्या विद्यमानें चालविल्यानें त्याच्या व्यक्तिविशिष्ट विचारांचा एकांगीपणा किंवा एकांतिकता यांची बऱ्याच अंशीं दुरुस्ती होऊं शकेल, त्यामुळें जनतेकडून त्याच्या योजनांना अधिक मान्यता मिळल, संस्थेच्या घटकांचें त्याला सहकार्य लाभल व संस्थेमार्फत सेवकाच्या निर्वाहाचा प्रश्नहि सुलभ रीतीनें सुटूं शकेल. नाहीं तरी सेवक एकट्यानें कोणतेंहि

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

कार्य पार पाडूं शकत नाहीं. काम सिद्धीस नेण्यासाठीं त्याला इतरांची मदत मिळवावी लागतेच. स्वतःचे विचार प्रथम कांहीं निवडक मंडळीपुढें मांडून व त्यांचें ऐकून घेऊन त्या सर्वांच्याच नाहीं तरी कांहीं जणांच्या सहविचारानें व सहकार्यानें सेवकाला काम करावें लागत असतें. म्हणजेच त्याला एक तात्पुरता व कामचलाऊ संत्र बनवावा लागत असतो. त्यापेक्षां आगाऊ प्रस्थापित असलेल्या आणि तेवढेंच कार्य नव्हे तर त्याचें किंवा तशाच स्वरूपाचें कार्य अधिक व्यापक व यशस्वी प्रकारें करणाऱ्या संघांत किंवा संस्थेंत सामील होऊन तिच्या विद्यमानें कार्य करणें अनेक दृष्टींनीं सोयीचें व फायद्याचें होऊं शकतें. संस्थेच्या प्रतिष्ठेचा, संघटनेचा व साधनांचा, अनुभवाचा व मार्गदर्शनाचा सेवकाला फायदा मिळतो. व त्याची कार्यशक्ति कितीतरी पटींनीं वाढते. संघे शक्तिः कलौ युगे या कलियुगामध्यें सामर्थ्य संघांमध्यें असतें.

**संस्थेच्या मर्यादाः**—तथापि सर्वच ठिकाणीं किंवा प्रसंगीं, सर्वच सेवकांना व सर्वच कार्यांसाठीं, संघाचा किंवा संस्थेचा आधार मिळूं शकेल असें नाहीं. संस्था म्हणजे तरी एक प्रकारचें छोटें सरकारच. सरकारप्रमाणेंच संस्थेमध्येंहि तिच्या व्यापाच्या व विस्ताराच्या प्रमाणांत कांहीं काठिन्य, ठराविक पद्धति किंवा सांचे यांचा पगडा, दीर्घसूत्रीपणा, मध्यवर्तिता इत्यादि अपरिहार्य आहेत. त्यामुळें विशेष उत्कटतेनें करावयाचीं कामें सरकारप्रमाणेंच स्थाईक संस्थांनाहि झेपत नाहींत. तसेंच सरकारचा कारभार घाऊक प्रमाणांत चालवावा लागत असल्यामुळें, स्थानिक व किरकोळ किंवा तात्पुरत्या स्वरूपाचीं कार्यें त्याच्या आटोक्याला किंवा पोंचीच्या बाहेर असतात. त्याचप्रमाणें महान् संस्थासुद्धां बारीक क्षेत्रापर्यंत किंवा कार्यापर्यंत पोंचूं शकत नाहींत. तशा स्थितींत सेवकानें एकट्यानेंच--प्रसंगोपात्त लाभणाऱ्या सहकाऱ्यांनिशीं व सहकार्यानिशीं—काम चालविणें उचित आहे.

**वेतन व शिस्तः**—संस्थेच्या विद्यमानें काम करतांना संस्थेची ऐपत असेल तर सेवकानें स्वतःला आवश्यक तेवढें वेतन घेत जावें. तसें करण्यांत त्याला कमीपणा वाटूं नये, किंवा वेतन घेतल्यानें आपण

बंधनांत पडूं यासाठीं त्यानें वेतन नाकारूं नये. खरें पहातां वेतन घेतल्यानें सेवकाचें बंधन वाढत नाहीं, कारण निर्वेतनी कार्यकर्त्यानेंहि वेतनी कार्यकर्त्याइतकेंच शिस्तीनें काम करणें आवश्यक आहे. निर्वेतन काम म्हणजे बेजबाबदार काम, मनास येईल तर केलें, नाहीं तर नाहीं, अशा तऱ्हेची अनेक स्वयंसेवकांची समजूत किंवा वृत्ति दिसून येते, ती चुकीची व कार्याला विघातक आहे. सार्वजनिक कार्यामध्यें पडणारे लोक हे बहुधा स्वतंत्र बाण्याचेच असायचे; 'कोणाची ताबेदारी नको' म्हणून तर त्यांनीं सरकारी किंवा खासगी नोकरीसारखे अधिक कमाईचे मार्ग सोडून दिलेले असतात. "स्वार्थत्यागपूर्वक पत्करलेल्या सेवाकार्यामध्यें सुद्धां ताबेदारी पत्करावी लागावी" हें त्यांना खपत नाहीं. परंतु असले कार्यकर्ते एकांडे शिलेदारच राहणार; त्यांचेकडून कसलेंहि चिरस्थायी किंवा उठावदार कार्य होऊं शकणार नाहीं. त्यांचाहि विशिष्ट प्रसंगापुरतां उपयोग होतो, नाहीं असें नाहीं, परंतु कोणतेंहि स्थायी, व्यापक व संघशक्तीनेंच साध्य असें काम करायचें तर त्या कार्याचीं बंधनेंहि स्वीकारावीं लागतात. तात्पर्य सेवकानें आपल्या कार्याबद्दल सरळ वेतन घेण्यांत संकोच मानूं नये. सेवकाला वेतन मिळावें व त्यानें तें घ्यावें हें यथायोग्यच आहे. वेतन स्वीकारल्यानें सेवकाच्या कार्यांत अधिक शिस्त लागेल व कार्यामध्यें अधिक ठामपणा व एकाग्रता येईल तर तें इष्टच आहे. कारण सेवकानें कार्याच्या यशस्वितेच्या दृष्टीनें आपल्या कार्यक्रमांना स्पष्ट मर्यादा घालून घेणें इष्ट असतें. नाहींपेक्षां त्याच्या शक्तीची मागणी व ओढाताण करणारीं नाना कामें नित्य उद्भवतच रहाणार, व प्रत्येकाच्या मागें लागतां कोणतेंच हातीं लागणार नाहीं. याबाबतींत सामान्य नियम घालून देणें अशक्य आहे. कार्यकर्त्यानें आपली शक्ति, पात्रता व वळण, परिस्थितीची व साधनांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता, आपल्या सहकाऱ्यांची संख्या व कुवत आणि त्या त्या कार्याची इष्टता, शक्यता, व आवश्यकता किंवा निकड इत्यादींचा तारतम्यानें विचार करून आपापला व्याप ठरविला पाहिजे.

**वेतनाबरोबर मत्सरः**—वेतन घेऊन काम करण्यास सेवक

नाखूष असतात त्याचीं आणखींहि कारणें संभवतात. वेतन घेतल्यानें आपल्या निःस्वार्थीपणाला बाध येईल, आणि आपला स्वार्थत्याग लोकांना दिसल्याखेरीज लोकांवर आपली छाप बसणार नाहीं व आपल्या कार्याला पाठिंबा मिळणार नाहीं, अशी अडचण कांहीं सेवकांना वाटत असते. कांहीं अंशीं ती खरीहि असते. दरिद्री, बुभुक्षित, पुरुषार्थहीन, परतंत्र अशा जनतेमध्यें नोकऱ्यांविषयीं फार आशाळभूतपणा असतो व स्पर्धा असते. सेवकाला सुद्धां ' नोकरी ' मिळाल्याबद्दल लोकांना हेवा वाटतो व त्याच्याबद्दलचा आदर किंवा सद्बुद्धि व त्याच्या कार्याला आपल्याकडून होईल ती मदत करण्याची वृत्ति यांचा लोप होतो, एवढेंच नव्हे तर प्रसंगीं तिरस्कार व विरोधाची भावना उत्पन्न होते. जनतेच्या या कृपण वृत्तीचा परिणाम कच्च्या दिलाच्या सेवकावर होणें साहजिक आहे. लोकांचीं उपमर्दकारक वचनें ऐकल्यानें अनेक तरुण उदयोन्मुख सेवक खट्टू होऊन सेवाकार्यांतून कायमचे निवृत्त होत असतात.

परंतु समाज हा सेवकाचा धनी आहे; तो बहुरूपी व बहुमुखी धनी आहे; नोकराला दुरुत्तरें बोलण्याचा धन्याला अखत्यार आहे; असें म्हणून सेवकानें आपलें मन अविचलित राखावें. त्यानें केवळ स्वतःचें मन तपासावें. आपण पोटासाठीं सेवेचा वेष चढविलेला नाहीं ना ? आपण आपलें कार्य तत्परतेनें करीत आहों ना ? त्या जागेला व कामगिरीला तयार व आपल्याहून अधिक लायक अशा अन्य इसमाला बाजूला सारून आपण ही जागा पटकावलेली नाहीं ना ? आपल्या वाजवी गरजांहून—निदान आपल्या बाजारभावाहून—अधिक वेतन आपण घेत नाहीं ना ? या व अशा प्रश्नांचा सेवकानें विचार करावा व स्वतःच्यामध्यें कांहीं सुस्ती, मिथ्याचार, इत्यादि आढळत नसतील तर जनतेच्या निंदास्तुतीविषयीं बेपर्वा नव्हे पण निश्चिंत रहावें. आपली निष्ठा सच्ची असेल तर जनता ती आज ना उद्यां मान्य करून घेईल, अशाबद्दल त्यानें खात्री बाळगावी. निःस्वार्थी कार्याचा विशेष अनुभव आला नसल्यानें आणि उलट ढोंगी स्वार्थाचा वारंवार अनुभव मिळाल्यानें, लोकांचा स्वभावच शंकेखोर बनतो. परंतु सेवकाचा सच्चेपणा एकदां जनतेच्या कसो-

टीला उतरला कीं मग पुढें जनतेकडून त्याला हरघडी उत्तेजन, सद्भावना, औदार्य, वात्सल्य, आदर, इत्यादि मिळत जातात. त्यामुळें उलट सेवकच खजील किंवा ओशाळा बनतो व लोकांच्या अकारण वात्सल्याला लायक बनण्याची त्याला ओढ लागते. त्याची सेवावृत्ति, कळकळ, तत्परता, नम्रता, कृतज्ञता व आत्मसमर्पणाची उत्कंठा हीं वाढत जातात, तसतशी जनताहि सेवकाच्या अधिकाधिक आधीन होत जाते; आणि ' जनता माझी, मी जनतेचा ' व उलट ' आमचा सेवक, आम्ही सेवकाचे ' अशा तऱ्हेचें अभेदाचें नातें दृढ होतें. जनतेनें पोसलेला, जनतेनेंच संभाळलेला हा आपला देह तिच्याच सेवेमध्यें झिजवून, अर्पून, मोकळें होण्याला सेवक उत्सुक होतो, तसतशी जनता माऊलीहि सेवकाला जरा कांहीं दुखलें खुपलें तरी कासावीस होते. अशा तऱ्हेनें प्रवेशपरीक्षा घेऊन सेवकाचें नांव आपल्या हजिरीपटावर एकदां नोंदून घेतल्यानंतर जनताच सेवकाच्या पुढील प्रगतीची चिंता वहात असते.

**अहंकारः**—आपल्या कामाबद्दल वेतन घेण्याबाबतींत सेवकाला अढी वाटण्यामध्यें अहंकाराचाहि अंश असण्याचा संभव असतो. स्वयंसेवक या नात्यानें मी वाढपी, हमाल किंवा भंगी म्हणूनहि काम करीन—मोठमोठ्या परिषदांचे प्रसंगीं अनेक उत्साही कार्यकर्ते असलीं कामें अगदीं अहमहमिकेनें करीत असतात,—त्या कामगिरीबद्दल मला प्रवासखर्च, गणवेश, जेवणखाण व नवनवलाई पहाण्याची संधि, इत्यादि रूपानें वेतन मिळविलेलें मला चालतें, नव्हे पाहिजेहि असतें, त्याखेरीज स्वयंसेवक दलांत काम करण्याची माझी ऐपत नसते; तथापि एकाद्या पाहुण्यानें मी त्याचे बोजे उचलल्याबद्दल माझ्या हातावर दोन आणे काढून ठेवले तर मात्र तोच माझा हात त्या पैसे देणाराच्या श्रीमुखावर जाऊन आदळण्यास कमी करणार नाहीं! स्वयंसेवक म्हणून भंगी काम करण्यांत अभिमान मानणाऱ्याला पगारी भंगी म्हणून काम करणें अत्यंत नामुष्कीचें वाटेल. कारण भंगी काम हें पवित्र कार्य आहे असें तो पुकारीत असला तरी तें निदर्शनापुरतेंच असतें. धंदा म्हणून तोच कार्यकर्ता 'पवित्र भंगी काम' करण्यापेक्षां अपवित्र वकिली करणेंच पसंत करील!

समाजोपयोगी व जीवनावश्यक अशा कामांबद्दल, अर्थात् निरुपद्रवी, निर्दोष किंबहुना पवित्र अशाहि कामांबद्दल, मोबदला घेण्यांत सेवकाला कमीपणा वाटतो. त्याच्या मुळाशीं कांहीं अंशीं तरी त्याचा अहंकार असतो याबद्दल तिळमात्र शंका नाहीं. तथापि या प्रश्नाची दुसरी एक बाजू विचारांत घेण्यासारखी आहे.

**मोबदल्याचा निषेध**—कांहीं अत्यावश्यक व मुळांत निर्दोष अशीं कामेंहि मोबदला घेऊन करणें समाजानें गर्हणीय मानलें आहे, त्यांत समाजाचा दीर्घानुभव व दूरदर्शीपणाच सांठविलेला आहे. उदाहरणार्थ, मेलेल्या माणसाच्या प्रेताचें दहन किंवा दफन त्वरित करणें इष्ट व आवश्यक आहे, अर्थात् त्या कामीं मदत करणें हेंहि अभिनंदनीय आहे. मग अशा स्तुत्य कामाबद्दल योग्य मोबदला घेतला तर त्यांत काय बिघडलें ? तथापि अशा तऱ्हेच्या पवित्र कामांबद्दल मोबदला घेण्याचा समाजानें तीव्र निषेध केलेला आहे. त्याला तसेंच कारण असलें पाहिजे.

प्रेतवाहन हें मुळांत निर्दोष असलें तरी त्याबद्दल मोबदला घेण्याचा रिवाज किंवा संवय पडणें अत्यंत अनिष्ट आहे. रिवाजामुळें मोबदला देण्याची व घेण्याची अपेक्षा उत्पन्न होईल ! त्यामुळें निर्धनाच्या घरचें मर्तिक, तो आधींच दुःखी कष्टी असतांना, फार अडचणीचें होऊन बसेल किंवा प्रेतवाहन हा कांहींचा धंदाच होऊन बसेल. गांवांत मृत्यूंचें प्रमाण वाढलें कीं त्यांची चलती होणार, व मृत्यू नाहीं म्हणजे त्यांचेवर बेकारीचा व उपासमारीचा प्रसंग येणार. म्हणून हे धंदेवाईक गावांत रोगाची सांथ यावी अशासाठीं देवाला नवसहि करतील ! मग हा मुडदे-फराशीचा धंदा सन्माननीय कसा म्हणतां येईल ? अर्थात् मोबदला न घेण्याच्या बंधनांनिशीं केलें तरच असलें काम सन्माननीय ठरेल.

कर्माची गति विलक्षण आहे. गोड्या पाण्याच्या प्रवाहाचें पर्यव-सान खाऱ्या समुद्रांत होतें. प्रसंगोपात केल्यास पवित्र असणारीं कार्येंहि मोठ्या प्रमाणांत किंवा वारंवार केल्यानें त्यांचेमध्यें दोष उत्पन्न होतो. परोपकारी कृत्यांना अपवित्र धंद्याचें स्वरूप येऊं नये म्हणूनच आपत्प्रसंगीं करावयाच्या सेवाकार्याबद्दल मोबदला न घेण्याचा कडक दंडक

समाजाच्या सहज बुद्धीनें घालून दिलेला आहे. उदाहरणार्थ, जुने वैद्य रोग्याकडून औषधाबद्दल पैसे किंवा कसलाहि मोबदला घेत नसत. रोग्याला औषधाचें नांवहि सांगत नसत. मग अलीकडच्या फार्मसी ( म्हणजे रोग-प्रसारक संस्था !) प्रमाणें औषधांच्या जाहिरातीवर ते खर्च कोठून करणार ! मराठीमध्यें आपण औषधपाणी म्हणतों त्याप्रमाणें ऊर्दूमध्यें 'दवादारू' शब्द आहे. दारू हें एक अकसीर औषध आहे. दवा म्हणूनच तिचा प्रथम शोध लागला असावा, पण आज या दारूवरच औषध सांपडणें मुष्किलीचें होऊन बसलें आहे! इस्लाम धर्मामध्यें कर्जावर व्याज घेण्यास बंदी केली आहे. गरजवंताला कर्ज द्यावें, मुदलाच्या फेडीची अपेक्षा करावी, परंतु व्याजाची अपेक्षा करूं नये, ऋणकोनें स्वखुषीनें दिलें तरी घेऊं नये, नाहींपेक्षा गरजवंताच्या उपयोगी पडण्याऐवजीं बिनगरजूंवरहि कर्ज लादून त्याला सबंध गिळण्याचे दीर्घोद्योग यशस्वी तऱ्हेनें चाललेले आपण काय थोडे पहातों !

शिजलेल्या अन्नाची विक्री करूं नये, गोरसाची विक्री करूं नये, अशा तऱ्हेचे त्या त्या परिस्थितीला अनुरूप असे अनेक निषेध प्रचलित असल्याचें आढळून येतें. असो.

**निषेधांतील सारासार**—अशा तऱ्हेनें विशिष्ट कामें मोबदल्या-खेरीजच करावी ही योजना योग्य असली तरीहि जीं कामें इतरांनीं आपल्यासाठीं मोहबतीखातरच नव्हे तर मोलानें केलेलीं आपल्याला चालतात किंवा आपण इच्छितों, तीं कामें आपणहि दुसऱ्यांसाठीं मोलानें करण्यांत कमीपणा मानणें अनुचित आहे. त्याचा अर्थ असा होतो कीं "मी श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य आहे. माझ्या जीवनाला आवश्यक पण जीं करणें माझ्या थोरवीला शोभत नाहीं अशीं कामें माझेसाठीं करण्याकरतां दुसरे नीच दर्जाचे लोक त्या कृपाळू ईश्वरानें निर्माण केले आहेत." पाखंड तें याहून आणखी कोणतें असणार?

सेवकानें असल्या अहंकारापासून व पाखंडापासून मुक्त रहावें व कोणतेंहि उपयुक्त किंवा नीतिशुद्ध काम करतांना वेतन घेण्यांत कमीपणा तर मानूं नयेच, पण उलट असलीं कामें वेतन घेऊन करणें हा लोक

शिक्षणाचा एक अचूक उपाय समजावा.

तसेंच जीं कामें आपण दुसऱ्यासाठीं मोलानें करूं नयेत तीं आपणहि दुसऱ्याकडून मोबदला देऊन करवून घेऊं नयेत. तसें करणें म्हणजे दुसऱ्याला गुलामाप्रमाणें वागविणें होय. समाजाच्या ज्या विशिष्ट वर्गाचा मी घटक आहें तो वर्ग जर असलीं कामें इतरांकडून करवून घेत असेल तर त्या अन्यायाच्या—किंवा विशेषत: अपमानाच्या—परीमार्जनासाठीं मीच तीं कामें स्ववर्गीयासाठीं करावीं हें योग्य आहे व तसें करतांना स्व-वर्गीयांकडून वेतन घेण्यासहि हरकत नाहीं. उदाहरणार्थ, भंग्यांना आपलें काम सध्यां ज्या किळसवाण्या पद्धतीनें करावें लागतें त्या पद्धतीनें तें करणें माणुसकीला न शोभणारें, अर्थात् निषेधार्ह आहे. भंग्यांनीं तें काम करण्यास तयार होणें जितकें अनुचित आहे, तितकेंच आम्ही तें त्यांच्याकडून करवून घेतों हेंहि अनुचित आहे. ते करण्यास तयार असले तरी आपण तें त्यांना करूं देऊं नये. त्या पद्धतींतील ओंगळपणा काढून टाकणें शक्य आहे व आवश्यक आहे. त्याचा ओंगळपणा गेल्यास त्यांतील निंद्यपणाहि निघून जाईल. तशी सुधारणा व्हावी यासाठीं, व ती होईपर्यंत, आम्हीच तें काम करावें व त्यासाठीं स्वकीयांकडून वेतनहि घ्यावें हें उचित आहे.

**वेतनाच्या मर्यादा:**—सेवकाला आश्रयभूत ऐपतदार संस्था असेल तर सेवकानें तिच्यापासून वेतन अवश्य घ्यावें एवढें येथपर्यंतच्या विवेचनावरून निष्पन्न झालें.

( १ ) हें वेतन किती असावें ? हा प्रश्न शिल्लक राहतो. त्याबाबत कांहीं सामान्य नियम सुचविणेंच शक्य आहे:—

( २ ) सेवकाच्या गरजा साध्या व कमखर्ची असाव्या, परंतु कार्यशक्तीला बाधक होणारी काटकसर खोटी काटकसर समजावी. त्याचबरोबर कार्यशक्तीच्या परिपोषाच्या दृष्टीनें आवश्यक किंवा इष्ट ठरणाऱ्या सुखसोयीहि आपल्या आसपासच्या लोकांशीं सहभागी राहूनच भोगणें सेवकाला शोभेल;

( ३ ) कुटुंबीयांच्या, म्हणजे अवलंबितांच्या, राहणीचें मानहि आपल्या पेशाला साजेसेंच ठेवण्याचा त्याचा प्रयत्न व आग्रह असला

पाहिजे. कुटुंबीयांचे त्यानें लाड करतां कामा नये. त्याबरोबरच अप्रसन्नता व गृह–क्लेश निर्माण होऊं नये यासाठींहि त्यानें जपलें पाहिजे. त्याची स्वत:ची सेवावृत्ति व साधी राहाणी सच्ची व उत्कट असली व त्यानें त्यागाच्या बाबतींत ' आधीं केलें मग सांगितलें ' असें धोरण ठेवलें म्हणजे त्याच्या स्वत:च्या आचरणाचा त्याच्या कुटुंबीयांवरहि इष्ट परिणाम घडल्यावांचून रहाणार नाहीं.

सेवकानें आपल्या कुटुंबीयांनाहि स्वावलंबी, म्हणजे उद्योगी, बनविण्याची दृष्टि ठेवावी. स्वावलंबन म्हणजे एकांडेपणा किंवा तुटकपणा नव्हे. आपल्या वाट्याची जबाबदारी उचलणारें परस्परावलंबन हेंच खरें स्वावलंबन होय. कुटुंबांतील घटकांनीं प्रत्येकीं स्वावलंबी होण्यासाठीं स्वतंत्र धंदे व स्वतंत्र कमाई करण्याची, किंवा स्वतंत्र जमाखर्च ठेविण्याचीं आवश्यकता नाहीं. शेतकरी, विणकर, कुंभार इत्यादींच्या स्त्रिया, विधवा व आठ दहा वर्षांचीं मुलेंसुद्धां आपापल्या परी स्वावलंबी–आर्थिक स्वातंत्र्यवान्‌च–असतात.

( ४ ) सेवकानें आपल्या कुटुंबीयांची, म्हणजे अवलंबितांची, संख्या उगाच वाढविण्याचा खटाटोप करूं नये; सहजप्राप्त म्हणजे औरस संबंधानें व समाजरहाटीस अनुसरून जेवढे अवलंबित लाभलेले असतील तेवढ्यांवरच संतुष्ट रहावें. मित्र, आपद्‌ग्रस्त, ' मानलेलीं ' भावंडें किंवा दत्तक मुलें इत्यादींचा बोजा वाढवीत जाऊं नये, कारण साऱ्या समाजालाच त्यानें आपले मित्र, भावंडें किंवा मुलें मानावयाचें आहे.

( ५ ) आयुष्याचा विमा हा एक द्रव्यसंचयाचा व वारसा देणगीचा प्रकार आहे. सेवकाच्या आयुष्याचा विमा स्वत: त्यानें, किंवा त्याच्यासाठीं त्याच्या संस्थेनें, उतरण्याचें कारण नाहीं. विम्याप्रमाणेंच सेवकाला ' पेन्शन ' चीहि जरूरी नाहीं. उतारवयाला झेपतीलशीं उपयुक्त कामें थोडथोडकीं नाहींत. त्यांतील आपल्याला अनुकूल तें वृद्ध सेवकानें करावें. विशेष निकामी झालेल्या सेवकाला संस्थेनें, आप्तेष्टांनीं किंवा सरकारनें पोसावें.

सेवकासाठीं प्रॉव्हिडंट फंडाची तरतूद ठराविक मर्यादेपर्यंत, करणें इष्ट आहे किंवा वावगें नाहीं. प्रॉव्हिडंट फंड हा लग्नें, घर बांधणें यां-सारख्या विशेष खर्चांसाठीं किंवा आजारासारख्या आकस्मिक उद्भवणाऱ्या खर्चांसाठीं उपयोगी पडतो.

( ६ ) सेवकानें आपल्या गरजेपुरतेंच वेतन घ्यावें; यांतून हें निष्पन्न होतें कीं आपल्या वेतनांतून त्यानें अवांतर कार्यांवर—उदाहरणार्थ, चरखा-संघाकडील वेतनांतून हरिजनसेवाकार्यावर किंवा त्याच्या उलट—खर्च करण्याचा अव्यापारेषु व्यापार करूं नये. ' गिव्ह अंटु सीझर व्हॉट इज् सीझर्स '—ज्याचें त्यालाच देऊन टाकावें हें उचित होय. म्हणून कांहीं संचय झालाच तरी तो आपल्या पोशिंद्या संस्थेलाच परत करावा.

( ७ ) सेवकानें वेतनाव्यतिरिक्त कांहीं अवांतर किंवा नियमबाह्य प्राप्तीची किंवा सोयीसवलतींची अपेक्षा करूं नये. कोणत्याहि निमित्तानें अवांतर प्राप्ति झाल्यास ती त्यानें संस्थेलाच देऊन टाकली पाहिजे.

( ८ ) उलटपक्षीं वेतनाची मर्यादा ठरविण्यांत सेवकानें अगदीं कांटेकोरपणाहि करूं नये, तर आपल्या किमान गरजांहून थोडा अधिकच पगार घ्यावा. लिहिण्याच्या कागदाला थोडी मार्जिन, घराच्या आसपास कांहीं मोकळी जागा, दिनचर्येच्या वेळापत्रकामध्यें कांहीं रिकामा वेळ, मित भोजनानंतरहि ' मुखशुद्धि ' हीं सर्व आवश्यक असतात, त्याचप्रमाणें सेवकाच्या वेतनामध्येंहि फालतू खर्चाला थोडाबहुत अवकाश पाहिजे. सेवकाला सुद्धां कांहीं अनपेक्षित खर्च करावे लागत असतात, त्याच्या योजने-बाहेरच्याहि कांहीं जबाबदाऱ्या त्याला येऊन चिकटतात. वस्तु हरवणें, खोटीं नाणीं पदरांत पडणें, आजार, पाहुणे यांसारख्या अनेक बाबी असतात, त्यांची आगाऊ तरतूद करून ठेवण्यांतच शहाणपणा आहे. परंतु याखेरीज तृप्ति ही बाबसुद्धां सेवकाच्या व त्याच्या आसपासच्या लोकांच्या सुखाच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे.

**भिक्षा संप्रदायः**—येथवर सेवकाच्या वेतनासंबंधीं विचार झाला. जेथें संस्थेचा आधार नाहीं किंवा संस्थेची ऐपत नाहीं, किंवा संस्थेचें तसें

धोरण नाहीं, त्या ठिकाणीं सेवकाच्या निर्वाहाची सोय काय ? या प्रश्नाचा सामान्य जबाब आम्ही पूर्वीं दिलाच आहे. आतां त्या बाबतींत एका परंपरागत प्रतिष्ठित अशा संप्रदायाचा विचार करावयाचा आहे तो संप्रदाय भिक्षेचा.

ब्राह्मणास मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
ओं भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥

—समर्थ रामदास

भिक्षा हा एक उदात्त व पवित्र संप्रदाय आहे. सर्व धर्मांनीं त्याला मान्यता दिलेली आहे, व त्याची शिफारस केलेली आहे. साधु, फकीर, भिक्षु, ब्रह्मचारी, संन्यासी, शंकराचार्य, रामदासी, गोसावी, इत्यादि अनेक पंथांना भिक्षाहाराची आज्ञा आहे. खरोखरच भिक्षान्न हें पवित्र आहे व तें सेवन करणारे धन्य आहेत; कारण भिक्षेमध्यें समाजशरणता, निर्भयता, नम्रता, अस्पर्धा, अपरिग्रह, निःस्पृहता, समता, सुलभता, समाधान, स्वतंत्रता इत्यादि अनेक विलोभनीय सद्गुण आहेत.

(१) समाजशरणताः—जनतेशीं तद्रूपता साधण्याचा भिक्षेसारखा दुसरा उपाय नाहीं. जनता ही आपली आई आहे, ती घालील तेंच खाऊन राहूं ही कल्पनाच फार मधुर व आकर्षक आहे.

(२) समताः—भिक्षेमध्यें समता आहे, कारण प्रत्येकाकडून मूठपसा धान्यच घ्यावयाचें आहे. राजा व रंक यांना भिक्षेकरी एकाच पातळींत आणून बसवितो. राजा लाख रुपये देत असला तरी तो तें स्वीकारणार नाहीं, मूठभर धान्यच घेईल. गरीबाकडील मूठभर दाणेहि तितक्याच कृतज्ञतेनें स्वीकारील.

(३) निस्पृहताः—फंड गोळा करणाऱ्या कार्यकर्त्यांना अनेकदां थोरांची मर्जी संभाळून कामें करावीं लागतात. अनेक मध्यस्थांच्या मदतीनें श्रीमंतांचे उंबरठे झिजवून, ते घालतील त्या अटींवर, संस्थेला त्यांचें नांव देऊन, संस्थेंत त्यांची तसबीर मांडून, त्यांच्या देणगीची शिला बसवून, नाना प्रकारें त्यांची खुशामत करून निधि जमवावा लागतो; त्यांच्या

हितसंबंधांना बाध येईल असें कांहीं करून चालत नाहीं. परंतु भिक्षेमध्यें कोणाचेंच मिंधेपण पत्करायला नको, कोणाची मध्यस्थी नको कीं कोणाचीं शिफारसपत्रें नकोत.

( ४ ) स्वतंत्रता:—संस्थेच्या निधींतून वेतन घ्यावयाचें असलें म्हणजे सेवकाला एखाद्या वजनदार पुढाऱ्याच्या आधारावर राहाण्याची संवय लागते. तो पुढारी गेला म्हणजे कार्यकर्ते उघडे पडतात. परंतु भिक्षा-हाऱ्याला कोणाचाच आधार लागत नाहीं. तो सदैव स्वयंपूर्ण आहे.

( ५ ) ग्रामप्रदक्षिणा:—भिक्षेच्या निमित्तानें ग्रामप्रदक्षिणा घडून परिचय, अवलोकन, पूसतपास, इत्यादि अनायासें घडतात हा लाभहि सेवकाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. "भिक्षामिषें लहानथोरें। परीक्षूनि सोडावीं"—रामदास.

( ६) अस्पर्धा:—परंतु भिक्षेंतील मुख्य खुबी म्हणजे अस्पर्धा होय. भिक्षेकरी हा कोणाशींहि स्पर्धा करूं इच्छित नाहीं. तो स्वतःची अशी मालमत्ता मुळींच जोडीत नाहीं. इतर लोक—जें आपलें म्हणून आपल्या कब्जांत ठेवतात त्यांतून त्यांच्या मर्जीला येईल तर प्रत्येकीं मूठमूठ व एकूण भिक्षेकऱ्याच्या पोटापुरतें त्यांनीं द्यावें अशी तो याचना करतो, सक्ती करीत नाहीं. अशा तऱ्हेनें दात्यांनीं स्वेच्छेनें, स्वखुषीनें, भीड न पडतां दिलेलें भिक्षान्न हें कष्टानें 'कमाविलेल्या' अन्नापेक्षांहि अधिक पवित्र आहे, कारण 'कमाविणें' म्हणजेहि कांहीं अंशीं हरण करणें आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेमध्यें ब्राम्हणाचा आदर्श निःस्वार्थ समाजसेवेचा होता. म्हणूनच स्मृतिकारांनीं त्याला निर्वाहाचें साधन म्हणून भिक्षा व उंच्छ—शेतकऱ्यानें शेत कापून नेल्यानंतर खालीं पडून राहिलेले दाणे वेंचून त्यावर गुजारा करणें—हे दोन प्रकार सांगितले होते. दोहींमध्यें कोणाच्याहि हितसंबंधाच्या आड न येणें हें लक्षण सामान्य आहे.

भिक्षेमध्यें हे सारे गुण असले तरी उलटपक्षीं कित्येक दोष व अडचणीहि आहेत.

( १ ) विवेकशून्यता—भिक्षादानामध्यें विवेक दुर्मिळ आहे. “दारासमोर आला म्हणून चिमूटभर दाणे घालून वाटेला लावा” एवढीच भिक्षा घालणाराची दृष्टि असते. त्यामुळें भिक्षा घालण्यामध्यें आस्था रहात नाहीं, व अपात्रीं दानहि फार मोठ्या प्रमाणांत घडत असतें. भिक्षादानामध्यें संघटना निर्माण होऊन गांवचे प्रमुख व जाणते लोक ज्याला परवाना देतील त्यानेंच भिक्षा मागावी किंवा त्यालाच गांवकऱ्यांनीं भिक्षा घालावी असें ठरविल्यास अपात्रीं भिक्षादानाचा धोका टळेल, पण मग भिक्षेंतील स्वाधीनता व स्वतंत्रता नाहींशी होऊन परवाने देण्यांत पक्षपात व वशिलेबाजी चालू होण्याची धास्ती उत्पन्न होते.

( २ ) घोडें खाई भाडें—मूठमूठ धान्य जमविण्याखालींच सेवकाची पुष्कळशी शक्ति खर्च होते, व शिवाय भिक्षान्न शिजविण्याची मेहनत केली पाहिजे. शिजविलेल्या अन्नाची भिक्षा मागावी तर योग्य वेळ साधली पाहीजे व सेवकाचे खाद्याखाद्याचे नियम पाळणें अडचणीचें होतें.

( ३ ) अपुरेपणा—भिक्षेकऱ्याच्या सर्वच शारीरिक गरजा भिक्षेनें भागणें बहुधा दुरापास्त असतें. चौरस आहारासाठीं लागणाऱ्या भिन्नभिन्न वस्तु यथाप्रमाण झोळींत पडणें अशक्यच आहे; व शिवाय कपडे, लेखनसाहित्य, दिवाबत्ती व आसरा, इत्यादींची व्यवस्था भिक्षेनें कशी लागणार ?

**वारांवर जेवणें:**—निरनिराळ्या गृहस्थांकडे जेवणास जाणें—हा भिक्षेचाच एक निराळा प्रकार आहे, व वरील गुणदोष कांहीं फरकानें त्याचेमध्येंहि आहेत. सेवकानें दोहींतील कोणत्याहि प्रकाराचा स्वीकार करण्याचें ठरविल्यास दोषांचे बाबतींत जागरूक रहावें.

**फुरसतीचा धंदा:**—खऱ्या सेवकाचाहि सर्वच वेळ किंवा सर्वच शक्ति नेहमीं सार्वजनिक कार्यांत खर्च होईल असें नाहीं. फुरसतीच्या वेळाचा सदुपयोग त्यानें कांहीं उत्पादक काम करूनच करावा हें इष्ट आहे. अशा उद्योगांतून कमाई होईल तेवढ्या प्रमाणांत सेवकाचा समाजावरील भार हलका होऊं शकेल. अर्थात्‌च हा उद्योग स्वाधीन व सुटसुटीत, केव्हांहि करतां व केव्हांहि आवरतां येईल असाच असला पाहिजे. सूत कांतणें,

कापूस पिंजणें, बटणें बनविणें, शिलाई काम, इत्यादि कामें सेवक स्वतःच्या गरजेसाठीं करूं शकेल. वेतकाम, मुद्रण, घड्याळदुरुस्ती, नाड्या व कंदिलाच्या वाती विणणें, दोऱ्या वळणें, जाळी विणणें, यांसारखे आणखीहि कांहीं सुटसुटीत उद्योग सुचवितां येतील. विद्वान् सेवक पुरोगामी वाङ्मयहि लिहूं शकेल. सार्वजनिक कार्याचा हक्क पहिला मानून त्यांतून उरणाऱ्या वेळामध्यें सेवकानें निर्दोष उद्योगानें, अल्प का होईना, कमाई करावी हें उचित आहे.

सेवकानें असे एक किंवा अधिक हुन्नर हस्तगत करून ठेवणें फार इष्ट आहे. त्यांच्या आधारानें प्रसंगीं स्वावलंबी बनण्याचीहि त्याला धमक पाहिजे. कारण त्याच्या सेवेची समाजाला मुळींच आवश्यकता नाहीं अशी स्थिति कांहीं मुदतीपुरती किंवा सेवक अष्टपैलू नसेल तर कायमचीहि उद्भवणें संभवनीय असते. अशा वेळीं या हुन्नरांचा सेवकाला आश्रय घेतां येईल, त्याची असहाय स्थिति होणार नाहीं, किंवा ‘ रिकामा न्हावी, कुडाला तुंबड्या लावी ’ या न्यायानें भलभलतीं कार्यें उकरून काढण्याचा मोह त्याला पडणार नाहीं. आपण केव्हांहि स्वावलंबी होऊं शकतों अशा तऱ्हेचा आत्मविश्वास सेवकाला नित्यहि फार फायदेशीर होईल.

सेवक व कर्ज—सेवकाच्या आर्थिक मर्यादांमुळें त्यानें कधींहि कर्ज करणें वाजवी नाहीं. कर्जामुळें मनुष्य बांधला जातो, व त्याला कर्ज फेडीसाठीं सेवाकार्य सोडून द्यावें लागतें. सेवक सार्वजनिक कार्यांत रुळा-वतो तसतशी त्याची खासगी धंदा करून द्रव्य कमाविण्याची शक्तिहि घटत जाते, त्यामुळें सेवाकार्य सोडून देऊनहि कर्जफेड करणें त्याला अवघड बनतें. यांसाठीं सेवकानें वेळींच सावध राहून कोणत्याहि सबबीवर कर्ज न करण्याची खबरदारी घ्यावी. दुसऱ्याला जामीन रहाणें म्हणजे सुद्धां एक-प्रकारें वायदेचिठीच लिहून देणें होय. जातमुचलका देणें—स्वतःलाच जामीन रहाणें--हेंहि सेवकाला शक्य नाहीं; विशिष्ट वचन पाळण्याचा तो जातीनें परिपूर्ण प्रयत्न करील, वचनभंग करण्याची त्याची बिलकुल इच्छा नसणार, परंतु त्याचा निरुपाय होऊन वचनभंग घडला तर अग्निकाष्ठें भक्षण करीन म्हणणें हें द्रव्यदंड भरीन म्हणण्यापेक्षां सेवकाला

अधिक साजेल. येथवर आपण सेवाशील धंदेवाईकांचा ‘ खऱ्या ’ सेवकांचा विचार केला.

**स्वयंसेवकः**—स्वयंसेवक म्हणजे प्रापंचिक किंवा बैठे सेवक व खडे सेवक यांच्यामधील तडजोड होय. सर्व तडजोडींप्रमाणें स्वयंसेवकांमध्येंहि दोन्ही पक्षांतील गुण साधतात त्याचप्रमाणें दोहींकडील दोषहि येण्याचा संभव असतो.

या पद्धतींतील मुख्य गुण म्हणजे स्वयंसेवक हे खासगी धंदा करून फावल्या वेळांत सार्वजनिक कार्य करणारे असल्यानें त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न उपस्थित होत नाहीं, आणि चरितार्थाच्या प्रश्नांतून उद्भवणाऱ्या हजार भानगडी अनायासें टळतात. स्वयंसेवकाला स्वतःचा निःस्पृहपणा व सारासार विवेक शाबूत राखणें वेतनी सेवकापेक्षां सुलभ असतें.

उलटपक्षीं खासगी धंदा व सार्वजनिक कार्य दोन्ही संभाळणें पुष्कळदां बिकट होतें, व एकासाठीं दुसऱ्याचा बळी द्यावा लागतो. दोन धन्यांची नोकरी करतांना कोणा तरी एकाची हेळसांड होण्याचा संभव असतो आणि स्वयंसेवकाचा ओढा ज्या धन्यापासून प्राप्ति आहे त्याच्याचकडे वळण्याचा व सेवाकार्याचीच हेळसांड होण्याचा संभव अधिक असतो. तसेंच अल्प श्रमानें किंवा अल्प वेळांत भरपूर कमाई करून आपली अधिकांश शक्ति व वेळ सेवाकार्यालाच देऊं शकतील असे दैवाचे लाल थोडकेच आढळणार.

आणखी एक धोका असा आहे कीं, या प्रकारामध्यें प्रपंच व सेवाकार्य हे दोन परस्पर भिन्नच नव्हे तर परस्परविरुद्ध व निरनिराळ्या नीतिनियमांनीं नियंत्रिलेले जीवन–विभाग बनण्याचा संभव असतो. खरें पहातां प्रपंचसुद्धां सेवेच्या भावनेनेंच चालविला पाहिजे; तो तसा चालविल्यानंतर खास सेवा म्हणून करण्याची आवश्यकता किंवा जबाबदारी रहात नाहीं, हें आपण प्रथम पाहिलें. परंतु कार्यकर्त्यांच्या वेळापत्रकामध्यें प्रपंच व सेवाकार्य हे स्वतंत्र विषय म्हणून दाखल झाले म्हणजे सेवेला वेळ मिळावा या उदात्त हेतूनेंच स्वयंसेवक इच्छा करणार कीं प्रपंचाचा

खळगा शक्य तेवढ्या थोड्या श्रमानें भरून निघेल तर बरें, मग त्यासाठीं त्याला भल्याबुऱ्या मार्गांचें अवलंबन करण्याचाहि मोह होणार. सेवाकार्यांचे नीतिनियम निराळे व धंद्याचे निराळे, खासगी जीवनाचे निराळे, व सार्वजनिक जीवनाचे निराळे, सेवाधर्माचीं बंधनें धंद्याला लागू नाहींत, अशी त्याची समजूत होणार. शिवाय धंद्यांतील पापें सेवेच्या पुण्याईनें फिटून जातील या आश्वासनामुळें स्वयंसेवक आपल्या धंद्यांत किंवा खासगी जीवनांत नीतिबंधनांविषयीं विशेषच बेपर्वा बनण्याचा संभव आहे.

हे धोके टाळून, म्हणजे कमाईचा धंदासुद्धां निर्दोषपणें चालवून उरल्या वेळांत साधेल तेवढेंच अल्प–थोर सेवाकार्य करणें ही पद्धति बिनधोक व स्तुत्य आहे. सार्वजनिक कार्याला सर्वस्वीं वाहिलेले सेवक पाहिजेतच, तथापि त्यांची संख्या मर्यादित राहणार व मर्यादितच असावी. परंतु त्यांच्याशीं आपापल्या फुरसतीच्या वेळांत विनावेतन सहकार्य करणारे पुष्कळसे स्वयंसेवक असावे हें शक्य व उचित आहे.

नगर वाचनालय
ता. ......
सातारा

## विविध मुद्दे 

१ संघनिष्ठा:—सेवकाला इष्टकार्य साधण्यासाठी अनेकांच्या साह्याची व सहकार्याची आवश्यकता असते. त्याला सहकारी किंवा जोडीदार शोधावे व जोडावे लागतात. कार्य हाच सेवकाचा प्रपंच व सहकारी हेच त्याचे भाईबंद. संघ हा सेवकाचा आधार आहे. आणि कोणतीहि संघटना मजबूत व कार्यक्षम व्हावयाची असेल तर घटक सेवकांमध्यें संघभावना, संघ–निष्ठा व संघ–शरणता असली पाहिजे.

सेवकाला सहकाऱ्यांबद्दल आत्मीयता वाटली पाहिजे; त्यांच्या विषयीं वरिष्ठपणाची, अधिकाराची किंवा अभिमानाची भावना असतां नये. आपण वरिष्ठ व इतर कनिष्ठ आपण मार्गदर्शक व इतर आपले अनुयायी आपण त्यांचे व त्यांच्या कार्यांचे आधार, अशा तऱ्हेचा अहंकार सेवकामध्यें असून चालणार नाहीं. कितीहि समर्थ कार्यकर्ता असला तरी तो संघाच्या आधाराअभावीं निर्बल व पंगु आहे. तो संघांतील प्रमुख कार्यकर्ता असला, संघवृक्षाचें खोड असला तरी शाखा–पल्लवाखेरीज खोडाला कांहींच महत्त्व नाहीं.

संघाचा तो पुढारी, अध्यक्ष, व्यवस्थापक किंवा कसलाहि अधिकारी असला तरी अधिकार म्हणजे सत्ता किंवा प्रभुत्व नव्हे, अधिकार याचा मूळ अर्थच कर्तव्य असा आहे, हें त्यानें ध्यानांत बाळगावें. पुढारी म्हणजे सेवकांचाहि सेवक. पुढाऱ्यानें सेवकांच्या शंका, गैरसमजुती, चुका, अडीअडचणी इत्यादींचा आस्थापूर्वक व नम्रतापूर्वक विचार करावा. आई ज्याप्रमाणें आपल्या बाळांची चिंता वाहते त्याप्रमाणें वडील सेवकानें धाकट्या सेवकांची चिंता वहावयाची आहे.

उलटपक्षीं पुढारी हा मध्यवर्ती कार्यकर्ता आहे. त्याला सर्व बाजू लक्ष्यांत घ्याव्या लागतात. दुय्यम कार्यकर्त्यांनीं आपापल्या हिश्श्याच्या कामापुरतें किंवा क्षेत्रापुरतें पहावें म्हणजे झालें. तसें पुढाऱ्याचें नाहीं;

त्याला सर्व बाजूंवर, मागें, पुढें व सभोंवार दृष्टि पोचवावी लागते. म्हणून तो व्यापक दृष्टीनें जें धोरण ठरवील व त्या धोरणानुसार आपल्या दुय्यमांना ज्या आज्ञा देईल त्या दुय्यमांनीं तत्काल पाळणें आवश्यक आहे. ( त्या आज्ञा नीतिविरुद्ध आहेत असे दुय्यमांना वाटेल तर गोष्ट निराळी. ) एखादा मेस्त्री मदतीला बरेच सुतार घेऊन जेव्हां एखादी वस्तु बनवीत असतो, तेव्हां मेस्त्री सांगेल त्या मापांचा व आकाराचा एकेक अवयव प्रत्येक सुताराला बनवावा लागतो, मापें व आकार अमुकच कां, तमुक कां नाहींत याबद्दल वाद किंवा चर्चा करीत राहून चालत नाहीं. तशीच स्थिति कांहीं अंशीं सांघिक कार्यांमध्यें नायक व सदस्य यांचेमध्यें असते. तपशिलाबाबत प्रत्येक वेळीं मदतनिसांची समजूत घालीत बसणें तत्काल शक्य नसतें व आवश्यकहि नसतें. सवडीनुसार मदतनिसांनाहि कामाची संपूर्ण योजना व तदनुसार तपशिलबार कार्यक्रमाची सयुक्तिकता यांची समजूत मिळणें इष्टच आहे. तसेंच कोणत्याहि कारणानें मोठ्याछोट्या कार्यकर्त्यांमधील बंधुभावनेला बाध येतां नये.

सध्याच्या कार्यकर्त्यांमध्यें आज्ञाधारकतेचा गुण फार मोलाचा आहे. आज्ञाधारकता म्हणजे आपण पत्करलेली किंवा आपल्याला नेमून मिळालेली कामगिरी बिनचूक, दृढपणें व निश्चितपणें बजाविण्याची व तेवढ्या बाबतींत पुढाऱ्याला निश्चिंत करण्याची तयारी, मोठ्या व विस्तृत कार्याची उभारणी करावयाची तर त्या कार्याचा प्रत्येक खांब मजबूत व दृढ पाहिजे. प्रत्येक कार्यकर्ता हा अशा तऱ्हेचा एकेक खांबच आहे. एक खांब लटपटला किंवा निखळला तरी सारी इमारत डळमळल्याखेरीज, कार्याची प्रगति खुंटल्याखेरीज, राहणार नाहीं. बारीकसा एक स्क्रू निसटला तरी घड्याळ बंद पडतें. म्हणून आपल्या वांट्याला क्षुल्लकसें काम आलेंसें दिसलें तरीहि सेवकानें समग्र कार्याला त्या क्षुल्लक कामाची आवश्यकता आहे हें ओळखून आपली कामगिरी बिनचूक पार पाडण्यासाठीं झटावें.

सेवकांमध्यें परस्परांबद्दल विश्वास, आदर व जिव्हाळा असला पाहिजे, परस्परांच्या सद्धेतूबद्दल व कळकळीबद्दल खात्री असली पाहिजे.

त्यासाठीं संघांत कोणाला दाखल करावें व कोणाला करूं नये, तसेंच संघांतून कोणाला काढून टाकावें तेंहि संघाच्या सर्व घटकांच्या विचारें निश्चित होणें इष्ट आहे. एकत्र काम करीत राहून एकमेकांबद्दल अविश्वास, अप्रीति, अनादर किंवा स्पर्धेची भावना बाळगणें हें ( परकी ) सरकारच्या नोकरींत शोभलें किंवा चालू शकलें, तरी सेवाकार्य करणाऱ्या सहकाऱ्यांमध्यें मुळींच चालणार नाहीं. सेवकांमध्यें परस्पर बंधुभाव व आत्मीयता असली पाहिजे; परस्परांच्या अडचणींच्या प्रसंगीं—कामाबाबतच्याच नव्हे तर खासगी किंवा घरगुती अडचणींमध्येंहि—त्यांनीं परस्परांना मनोभावानें साह्य केलें पाहिजे.

संघाच्या आश्रयामुळें प्रत्येक सेवकाची कार्यशक्ति, उत्साह, जोम, आत्मविश्वास व निश्चितता किंवा निर्धास्तपणा हीं वाढतात, त्याचबरोबर त्याची जबाबदारीची भावनाहि वाढली पाहिजे. संघाच्या कार्याची यशस्विता माझ्या दक्षतेवर अवलंबून आहे, संघाची अब्रूसुद्धां माझ्या हातीं आहे, माझ्या वर्तनावरून लोक साऱ्या संघाची परीक्षा करतील, आपल्या चुकांचे परिणाम साऱ्या संघाला व कार्याला भोगावे लागतील, ही जाणीव सेवकाचे मनामध्यें सदैव जागृत राहिली पाहिजे. ही जाणीवच सेवकाला अनेक धोक्यांपासून बचावील व त्याची अखंड प्रगति साधील.

संस्थानिष्ठाः—वरील विवेचनामध्यें संघ म्हणजे अनेक परंतु मोजक्या किंवा मर्यादित व्यक्तींचा समूह अशी कल्पना आहे. संघाची घटना व नियम तयार झाले व त्यामध्यें सामील होऊं शकणाऱ्या व्यक्तींची संख्या अमर्याद किंवा अनिश्चित झाली म्हणजे ती ' संस्था ' झाली. सेवक संस्थेतर्फे काम करीत असेल तेव्हां संस्थेचे उद्देश व कार्यपद्धति हीं त्याला मान्य असलीं पाहिजेत. पोटार्थी नोकर संस्थेच्या उद्देशांची व धोरणांची चिकित्सा न करतां सांगकाम्या म्हणून काम करूं शकला तरी सेवकानें संस्थेची आगाऊ पारख व पसंती केली पाहिजे व ती केल्यानंतर संस्थेशीं प्रतारणा करूं नये. संस्थेच्या नियमांचें व आज्ञांचें अक्षरशःच नव्हे तर त्यांतील हेतूंचेंहि पालन केलें पाहिजे. अनेक कार्यकर्त्यांमध्यें—कीं जे स्वतःच्याच नव्हे पण इतरांच्याहि खासगी मालमत्तेला मनापासून

जपतात अशांमध्यें—संस्थेची किंवा सार्वजनिक मालमत्ता, नफा, नुकसान, हितसंबंध इत्यादींबाबत निष्काळजीपणा, बेपर्वाई किंवा बेजबाबदारी दिसून येते, ती अनुचित व निषेधार्ह आहे; खासगी मिळकतीपेक्षांहि सार्वजनिक मिळकतीला सेवकानें अधिक जपलें पाहिजे.

सेवकानें जपलें पाहिजे याचा अर्थ सर्वांनींच जपलें पाहिजे; कारण सर्वांनींच सेवा वृत्ति धरावी. आमच्या साऱ्या विवेचनामध्यें सेवकाला उद्देशून अनेक विधिनिषेध आले आहेत त्याचा अर्थ जे आपल्याला समाजसेवक म्हणवून घेत असतील तेवढ्यांनाच ते बंधनकारक आहेत, जे आपल्याला सेवक म्हणवीत नसतील त्यांना वाटेल तसें वागण्याची मुभा आहे, असा नव्हे. सेवक म्हणजे सुतार लोहारांसारखा वैकल्पिक धंदा नव्हे. सेवा ही वृत्ति आहे आणि ती सर्वांसाठींच आहे. मनुष्यमात्र सेवकच आहे व सेवकाचीं कर्तव्यें मनुष्यमात्रासाठींच आहेत; ज्याप्रमाणें 'भक्तानें कोणाचा मत्सर करूं नये' याचा अर्थ सर्वांनींच मत्सराचा त्याग करावा व भक्तिभाव धरावा असाच होतो. असो.

मतभेदः—संस्थेंतील कार्यकर्त्यांमध्यें स्वभावभेद, दृष्टिभेद व मतभेद कांहीं प्रमाणांत अपरिहार्यच आहेत. तत्त्वाच्या बाबतींत जेथें एकमत असेल, तेथें तपशिलाच्या बाबतींत मिळतें घेण्याची वृत्ति सहकाऱ्यांमध्यें असल्याखेरीज कोणतीच संस्था व कोणतेंच कार्य टिकाव धरणार नाहीं. दुसऱ्याची विचारसरणी आस्थापूर्वक समजून घेण्यासाठीं निरहंकारिता, निराग्रहता व बुद्धीचा खुलेपणा असावा लागतो. तसेंच आपले विचार दुसऱ्याला पटवून देण्यासाठींहि योजकता व सोशिकपणा यांची जरूर असते. इतक्या उपरहि जे मतभेद राहतील ते निभावून घेण्यासाठीं सहिष्णुता, उदारता व बहुमताला मान देण्याची खिलाडू वृत्ति हीं सेवकामध्यें अवश्य पाहिजेत.

पुढाऱ्यावर विश्वासः—पुढाऱ्यावर विश्वास हा संघ किंवा संस्था-निष्ठेचाच भाग आहे, ज्याप्रमाणें राजाबद्दल निष्ठा हा राष्ट्रनिष्ठेचाच भाग आहे. मोठमोठीं साम्राज्यसरकारें हीं सुद्धां व्यक्तिप्रधान असतात, मग संघ किंवा संस्था या कांहीं अंशीं व्यक्तिप्रधान असतील तर त्यांत

नवल किंवा खेद वाटण्यासारखें कांहीं नाहीं. पुढाऱ्याची बुद्धिमत्ता, कळकळ व कर्तृत्व, आणि अनुयायांची त्याच्या सूचना व इषारे झेलण्याची तत्परता यांवरच कोणत्याहि संस्थेची यशस्विता बहुतांशीं अवलंबून असते. पुढारी हा संस्थेचीं ध्येयें व सिद्धता यांची मूर्ती आहे. अनुयायांनीं पुढाऱ्याची निवड काळजीपूर्वक करावी; संस्थेचे कार्यक्रम व कार्यपद्धति हीं यथाशक्य सर्व सभासदांच्या समजुतीनें व संमतीनेंच आंखण्यांत यावीं. परंतु हें सर्व करूनहि पुढाऱ्याला ' शेषाधिकार ' राहणारच, व राहिले पाहिजेत. तपशिलाच्या बाबतींत तसेंच अनपेक्षित व तांतडीच्या प्रसंगीं पुढाऱ्याचे निर्णय अनुयायांनीं निःशंकपणें स्वीकारले पाहिजेत.

संघाच्या कार्याची सफलता बऱ्याच अंशीं पुढाऱ्याचा आत्मविश्वास किंवा धमक यांवर अवलंबून असते. आणि पुढाऱ्याची धमक त्याच्या सहकाऱ्यांच्या निष्ठेवर व दृढतेवर अवलंबून असते. एकट्याहि सेवकाचा कामचुकारपणा, आज्ञाभंग किंवा बंडखोरपणा पुढाऱ्याचा अवसानघात करण्यास व सबंध कार्याला धक्का पोचविण्यास पुरेसा होऊं शकतो.

तत्त्वनिष्ठा—मात्र संघ, संस्था किंवा नेता यांचेवरील निष्ठा ही तत्त्वनिष्ठेशीं अविरोधी अशीच असली पाहिजे. तत्त्व किंवा सिद्धांत व ध्येय यांचा हक्क श्रेष्ठ असून संघ, संस्था, नेता हीं सारीं त्या सिद्धांताच्या अंमलबजावणीचीं साधनें आहेत. म्हणून पुढाऱ्याचा आदेश किंवा संस्थेची शिस्त हीं मूळ ध्येयाला, किंवा नीतिनियमांना विरोधी असतील तर त्यांचा त्याग करणें हेंहि सेवकाचें कर्तव्य आहे. तसा त्याग न करतां बाह्यात्कारी निष्ठा दाखवून गुपचूप द्रोह करण्याची रीत रूढ आहे परंतु ती गर्हणीय आहे.

बुद्धधर्मीयांचे एक ब्रीदवाक्य प्रसिद्ध आहे; ' धर्मं शरणं गच्छामि बुद्धं शरणं गच्छामि; संघं शरणं गच्छामि ''—मी धर्माला ( सिद्धान्ताला ) शरण जातों, बुद्धाला ( नेत्याला ) शरण जातों, संघाला शरण जातों. सेवकालाहि हाच नियम लागू आहे.

**निवडणुका व अधिकारपदें:**—सेवकानें अधिकाराच्या व वशिल्याच्या जागा स्वीकाराव्या कीं नाहीं? किंवा मिळविण्याचा प्रयत्न करावा कीं नाहीं?

अधिकाराच्या जागांवरून लोकसेवा करण्याची विशेष संधि मिळते हें उघड आहे. उदाहरणार्थ, राजाच्या हातीं लोकांचें बरेंवाईट करण्याची केवढी तरी सत्ता असते. सेवकालाच जर राजपद प्राप्त झालें तर तो लोकांची कितीतरी सेवा करूं शकेल. म्हणून सेवकानें राजगादीचा स्वीकार करावा का? गादीवर येण्याचा प्रयत्न करावा का? त्याच दृष्टीनें त्यानें प्रधान, व्हाइसरॉय, गव्हर्नर, कलेक्टर होण्यास संमति द्यावी का? होण्याचा प्रयत्न करावा काय?

कायदेमंडळाचा सभासद, म्युनिसिपालिटीचा सभासद किंवा अध्यक्ष, लोकलबोर्डाचा सभासद किंवा अध्यक्ष, ग्रामपंचायतीचा सभासद किंवा सरपंच, इत्यादि निवडणुकीच्या जागांची सेवकानें उमेदवारी करावी काय?

सहकारी बँका, काँग्रेसकमिट्या, हिंदुसभा, मुस्लीम लीग, चरखासंघ यांसारख्या बिनसरकारी संस्थांच्या निवडणुका त्यानें लढवाव्या का?

सरकार-नियुक्त जागा त्यानें स्वीकाराव्या का? लोकल बोर्ड म्युनिसिपालिट्यांवरील किंवा निरनिराळ्या सरकारी कमिट्यांवरील नेमणुकीनें भरण्याच्या जागा त्यानें स्वीकाराव्या का?

परंतु नेमणुकांची व निवडणुकांची संपूर्ण यादी देण्याचा हेतुच नाहीं. एवढी विस्तृत यादी देण्यांतील हेतुसुद्धां एवढाच कीं नेमणुका व निवडणुका यांचेमध्यें तत्त्वतः फरक नाहीं, तसेंच सरकारी, निमसरकारी, बिनसरकारी व सरकार-विरोधी जागा यांचेमधील भेद हाहि प्रकार भेदच आहे, तात्त्विक भेद नव्हे, हें लक्ष्यांत यावें. चरखासंघ ही जशी सेवासंस्था आहे, तसेंच सरकारसुद्धां प्रजेच्या सेवेसाठींच आहे. सेवा-संस्था चालविणें आवश्यक असेल तर कोणी तरी तिचे अधिकारी झालेंच पाहिजे, आणि सेवावृत्तीच्या लोकांनींच व्हावें हें विशेष इष्ट होय. चर्खासंघावर निवडून येण्यांत दोष नसेल तर सरकारी जागांवर निवडून येण्यांतहि दोष नाहीं.

तसेंच नेमणूक व निवडणूक यांमध्येंहि तत्त्वतः फरक नाहीं. नेमणूक थोडक्यांनीं करावयाची असते आणि निवडणूक करणारे संख्येनें अधिक असतात इतकाच फरक. नेमणुकीच्या किंवा निवडणुकीच्या जागेचा स्वीकार करणें व त्या जागेसाठीं उमेदवारी करणें यांतील फरकहि संमति मागाहून देणें व आगाऊ देणें याहून अधिक असलाच पाहिजे असें नाहीं. निवडणुकीला उभे राहणें म्हणजे 'मतदारांनीं बहुमतानें आज्ञा केल्यास काम करण्यास आपण तयार आहों' असें आगाऊ आश्वासन देणेंच होय.

अर्थात् सेवकानें नेमणुका स्वीकारण्यास किंवा निवडणुकांस उभें राहण्यास तत्त्वतः हरकत नाहीं. विचार करावयाचा मुख्य प्रश्न एवढाच आहे कीं ज्या संस्थेंतील जागा घ्यावयाची त्या संस्थेची नीति व कार्यपद्धति शुद्ध आहे कीं नाहीं?

दुसरीहि एक अडचण विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, सरकारी किंवा निमसरकारी संस्थांचा कारभार कायद्याच्या, म्हणजेच सक्तीच्या, बळावर, अर्थात् हिंसेच्या साह्यानें, चालतो. सेवकानें अशा सक्तीच्या कारभारांत सामील व्हावें का? तसेंच निवडणुकांमध्यें स्पर्धा व चुरस बहुधा येतेच. सेवकानें स्पर्धेमध्यें पडावें का?

आपण पूर्वीं एकदां पाहिलें कीं आदर्श राज-संस्थेमध्यें सरकारी नोकरीसारखा लोकसेवेचा दुसरा राजमार्गच नाहीं. परंतु या सशर्त विधानांतील शर्त, अर्थात् आदर्श स्थिति, कधींच सांपडणार नाहीं. प्रत्येक राजवटींत जुलूम, अन्याय, सक्ती, हिंसा, संघटित गुंडशाही हीं कमी-जास्त प्रमाणांत असणारच. परंतु तेवढ्यावरून सेवकानें राजसंस्थेचा समूळ बहिष्कार करण्याचें ठरवूनहि चालणार नाहीं. मनुष्य हा सामाजिक प्राणी व राजकारण हें सामाजिक जीवनाचें प्रमुख अंग असल्यानें राजकारणाचा संपूर्ण संन्यास कोणालाच शक्य नाहीं. राजसंस्थेचा राजीनामा देण्याची कोणालाहि मुभा नाहीं, त्याचप्रमाणें सरकारशीं पूर्ण असहकार करणेंहि शक्य नाहीं. परराज्य म्हटलें तरी तेंहि प्रजेच्या सहकार्याखेरीज व खुषी-नाखुषीच्या संमतिखेरीज चालत नसतें, आणि

स्वराज्यामध्येंसुद्धां एकतंत्री कारभार किंवा झोटिंगशाही मुळींच नसते असे नाहीं. तसेंच लोकमतानुवर्ती राज्यकारभारामध्येंहि राजदंडाचा प्रयोग कमीजास्त प्रमाणांत करावाच लागतो. राज्यकारभारांतील हिंसा ही प्रजेच्या मनांतील व परस्पर व्यवहारांतील हिंसेचेंच प्रतिबिंब असते. आपापसांत उठल्यासुटल्या मारामाऱ्या करणाऱ्या लोकांच्या सरकारचें पिनल कोड ( दंडशास्त्र ) प्रमाणांत ऊग्र असणें अपरिहार्य, किंबहुना इष्टहि आहे. सरकार हें लोकमताच्या पुढें फार दूरपर्यंत धांव मारूं शकत नाहीं.

तथापि सरकारां–सरकारांमध्यें तारतम्यपूर्वक फरक करून तदनुसार सेवकानें आपलें धोरण ठरवावें. परकी किंवा एकतंत्री सरकार हें लोकशाहीपेक्षां अधिक जुलमी असते; तसेंच स्वराज्याच्या खात्यांपैकींहि कांहीं खातीं इतर खात्यांहून अधिक हिंसामय असतात. पोलीस व मॅजिस्ट्रेट खात्यांचा आधार दंडा असतो तर शिक्षण, आरोग्य इत्यादि खातीं प्रमाणांत अहिंसक असतात. कांहीं खातीं सत्ताप्रधान, तर कांहीं सेवाप्रधान असतात. म्हणून राज्यपद्धति विशेष जुलमी असेल तर सेवक तिच्यापासून दूर अंतरावर राहील व त्या सरकारची नोकरी न पत्करतां फार तर सरकारच्या सेवाशील कार्यांबाबत दुरून सल्लामसलत देण्याचें काम करील. लोकमतानुवर्ती सरकारामध्यें सुद्धां तो लष्कर, पोलीस, न्याय इत्यादि खात्यांमध्यें नोकरी करण्यापेक्षां सेवाप्रधान खातींच अधिक पसंत करील. परंतु राज्यपद्धति सद्यःस्थितींत उत्तमोत्तम अशीच असेल तर तिच्याखालीं वाटेल तो उच्चनीच अधिकार घेण्यासहि त्यानें संकोच मानूं नये. कारण जो अधिकार दुसऱ्यानें चालविलेला आपल्याला चालतो, एवढेंच नव्हे तर दुसऱ्यानें चालवावा असें आपण इच्छितोंहि तो अधिकार स्वतः चालविण्यास आपल्याला स्वतःच्या अपात्रतेची अडचण जाणवल्यास वावगें नाहीं; परंतु तो अधिकार दोषमय म्हणून टाळणें शोभणार नाहीं, असो.

पुढील प्रश्न, सेवकानें निवडणुकांच्या स्पर्धेमध्यें उतरावें का ? राज्यकारभारामध्यें जुलूम व हिंसा अनिवार्य आहेत, परंतु निवडणुकां-

मध्यें स्पर्धा आलीच पाहिजे असें मात्र नाहीं. प्रचलित निवडणुकांमध्यें कमीअधिक प्रमाणांत स्पर्धा, चुरस, झगडा, वाममार्ग, इत्यादि आढळून येत असलीं तरी ज्याला केवळ सेवेच्याच हेतूनें निवडणुकीला उभें राहावयाचें आहे तो हे सारे अनिष्ट प्रकार अवश्य टाळूं शकेल. वकिलीचा धंदा सत्यास स्मरून करणें शक्य नाही, किंवा व्यापारांत खोटें बोलावेंच लागतें, हें जसे भ्रम आहेत त्याचप्रमाणें निवडणूक तत्त्वनिष्ठेनें किंवा विनयपूर्वक लढवितां येत नाहीं हाहि भ्रम आहे. निवडणूकीला उभें राहणें याचा अर्थ एवढाच असावा कीं मतदारांची आपल्याला निवडून देण्याची इच्छा असेल तर आपण काम करण्यास तयार आहों. यांत सेवावृत्तीला सोडून कांहीं नाहीं, किंबहुना लोक सांगतील तें तें काम यथाशक्ति करण्याची सेवकाची तयारी असलीच पाहिजे.

सेवार्थी उमेदवार निवडणूक ' लढविणार ' नाहीं. अर्थात् निवडून येण्यासाठीं भाडभीड, वशिले, लांचलुचपत, जातिनिष्ठा, आत्मप्रौढी, परनिंदा इत्यादि हीन साधनांचा उपयोग करणार नाहीं.

सध्यांच्या बहुतेक निवडणुकांच्या नियमांमध्यें उमेदवाराला अनामत रक्कम भरावी लागते, कीं जी फार कमी मतें मिळाल्यास जप्त होते. तसेंच निवडणुकीसाठीं इतर कांहीं खर्च करण्याची उमेदवाराला परवानगी असते. याचा अर्थ असा कीं जनतेची सेवा करण्याबद्दल जनतेनें उमेदवाराला वेतन देण्याचें दूर राहिलें, उलट उमेदवारानेंच पदरमोड केली पाहिजे; अशी पदरमोड करण्याची ज्याला झेपत नाहीं तो सेवा करण्यास पात्र नाहीं, निर्धनाला सेवेचा अधिकार नाहीं. कॉंग्रेससारख्या सेवाशील संस्थामध्येंहि वरच्या वरच्या समित्यांवर निवडून येणाऱ्या सभासदांना अधिकाधिक सभासद वर्गणी द्यावी लागतें.

हे प्रकार सेवकाकडून दंड वसूल करण्याच्या, किंवा सेवेवर कर लादण्याच्या स्वरूपाचे अर्थात् विपरीतसे दिसतात. तथापि त्यांचेंहि समर्थन कल्पितां येईल. एक तर निवडणुकींचा कारभार सुरळीत चालण्याच्या दृष्टीनें ते आवश्यक असतात. दुसरें असें कीं सेवक अपरिग्रही व निर्धन असेल तर त्याच्या उमेदवारीच्या पुरस्कर्त्यांनीं हे खर्च त्याचेसाठीं करावेत.

म्हणजे जाहीर निवडणुकांपूर्वी उमेदवार कोणी व्हावें याची पूर्व-निवडणूक खासगी तऱ्हेनें व्हावी. या पूर्व-निवडणुकींत जो निवडून येईल त्यानेंच जाहीर निवडणुकीला उमेदवार व्हावें, व त्याला पूर्व-निवडणुकींत निवडून देणारांनींच त्याच्या जाहीर उमेदवारीचा खर्च करावा.

असो. अशा तऱ्हेनें निवडणुकांना उभे राहण्यांत सेवावृत्तीशीं विसंगत असें कांहीं नाहीं, उलट तें कर्तव्यहि आहे असें ठरलें. तथापि या प्रश्नाला दुसरी बाजूहि आहे. सेवकाच्या बुद्धीच्या दृष्टीनें येथवर विचार झाला. परंतु ज्या समाजाची सेवक सेवा करूं इच्छितो त्याची मन:स्थितिहि विचारांत घ्यावी लागते. उमेदवार होण्यांत सेवकाचा इरादा कोणाशीं स्पर्धा करण्याचा नसेल, तथापि इतर उमेदवार त्याचे-विषयीं स्पर्धेची भावना ठेवतील असा संभव राहतोच. सेवकानें स्पर्धेचा 'कर्ता' होऊं नये त्याप्रमाणेंच स्पर्धेचें 'कर्म' म्हणजे पात्र होणेंहि पुष्कळदां इष्ट नसतें. त्याचा प्रतिस्पर्धी दुर्जनच असेल, सेवेच्या हेतूनें नव्हे तर मोठेपणासाठीं, अधिकारलालसेनें किंवा त्याहूनहि हीन अशा स्वार्थी काव्यानेंच निवडणुकीला उभा राहिला असेल, तर त्याच्या ईर्षेची सेवकानें फिकीर करूं नये, किंबहुना त्याला अधिकारापासून दूर ठेवण्यासाठींहि त्यानें निवडणुकीला उभें रहावें. परंतु वस्तुस्थिति नेहमींच इतकी सोयीस्कर व धोपट नसते. प्रतिस्पर्धी निखालस दुर्जनहि नसतो व सेवा-वृत्तीचा पुतळाहि नसतो; "सेवाहि घडावी, नावलौकिकहि व्हावा" अशा तऱ्हेच्या मिश्र भावना त्याच्या मनामध्यें असूं शकतील. त्याला कार्य करण्याची संधि मिळाली तर त्याची साहजिक वाढ किंवा प्रगति होऊन त्याची कार्यनिष्ठा वृद्धिंगत होईल व महत्त्वाकांक्षा मागें पडेल असा संभव असतो. अशा उमेदवाराला हिरमुसला करण्यांत सेवकाचा फायदा नाहीं. सेवकाचा तर मिळेल तेवढा एकेक नवीन सहकारी जोडण्याचा प्रयत्न असतो. मग निवडणुकीला उभें राहून कार्य करण्याची उत्सुकता दर्शविणाऱ्या सहकाऱ्याला परतवून लावणें सेवकाला कसें शोभेल ? उलट कच्च्या सहकाऱ्यांना अधिकाराच्या जागांवर स्थापित केल्यानें त्यांचें सह-कार्य अधिक पक्कें होत असतें, त्यांच्यावर कार्याची जबाबदारी लादल्या-

प्रमाणें होत असतें. या दृष्टीनें सेवकानें अधिकाराच्या किंवा निवडणुकीच्या जागा स्वत: न अडवितां त्या ठिकाणीं इतरांची योजना करावी हेंच युक्त ठरतें.

शिवाय निवडणुकांतील किंवा नेमणुकांतील स्पर्धेचें नियमन करण्यासाठीं व स्पर्धामूलक अतिरेकांचा न्याय करण्यासाठीं स्पर्धेपासून सर्वस्वी मुक्त असे कांहीं राखीव इसम पाहिजे असतात. उदाहरणार्थ, कौन्सिल निवडणुकांस कोणी उभें रहावें, तें ठरविण्यासाठीं जे स्वतः उमेदवार राहूं इच्छीत नाहींत अशाच मंडळीचें पार्लमेंटरी बोर्ड नेमावें लागतें. कॉंग्रेस कमिट्यांच्या निवडणुकांमध्यें उद्भवणाऱ्या वादांचा न्याय करण्यासाठीं अशाच इसमांचें लवादमंडळ नेमतात कीं जे कॉंग्रेसच्या कोणत्याच निवडणुकीला उभे राहणार नाहींत. अशा परिस्थितींत कॉंग्रेसचा अधिकारी बनण्यापेक्षां कॉंग्रेस निवडणुकांचा लवाद बनणें हीसुद्धां कॉंग्रेसची सेवाच आहे. म्युनिसिपालिटीचें कॉन्ट्रॅक्ट किंवा नोकरीसुद्धां सेवाभावानें करतां येणार नाहीं असें नाहीं, परंतु त्यामध्यें स्वार्थ असण्याचा संभव असतो. म्हणून म्युनिसिपालिटीच्या सभासदानें स्वतःच कॉन्ट्रॅक्ट मागूं नये, तसेंच त्यानें स्वतःच नव्हे पण त्याच्या निकटच्या आप्तांनींहि म्युनिसिपालिटीची नोकरी करतां कामा नये, असे निर्बंध घालावे लागतात.

म्हणून सेवकानें निवडणुकांस उभें रहावें कीं नाहीं या बाबतींत सामान्य नियम घालून देणें अशक्य आहे. सेवकानें एकंदर परिस्थिति, स्पर्धेचें अस्तित्व व तीव्रता, संभाव्य उमेदवारांची वृत्ति व लायकी इत्यादि गोष्टी लक्ष्यांत घेऊन त्या त्या प्रसंगीं निर्णय करावा.

**क्षत्रिय व ब्राह्मणः**—प्रजासत्ताक राष्ट्रांत बहुमतवाला पक्ष सत्ताधीश बनत असतो. त्यासाठीं प्रत्येक राजकीय पक्ष राष्ट्रांतील अधिकांत अधिक लोकमत स्वतःकडे खेचून घेण्याच्या प्रयत्नांत सदैव मग्न असतो. एक निवडणूक आटपतांच पुढील निवडणुकीची तयारी सुरू होते. साऱ्या चळवळी, समारंभ, अभिनंदनें, निषेध, गाऱ्हाण्यांची उठावणी, अन्यायाविरुद्ध तक्रारी, विशिष्ट वर्गाबद्दलचा कळवळा, वाङ्मय, वृत्तपत्रें, रंगभूमि, चित्रपट, रेडियो हीं सारीं मतें मिळविण्याच्या दृष्टीनें चालविण्यांत व सजविण्यांत

येतात. हें ' कॅनव्हसिंग ' उघड नसलें तरी हे पक्ष एकमेकांचीं वर्में अचूक ओळखूं शकतात. एवढेंच नव्हे तर जेथें कॅनव्हसिंगचा हेतु नसेल तेथेंहि तो आरोपिला जातो. त्यामुळें सारेंच सार्वजनिक जीवन शंकाकुल व स्पर्धाकुल बनतें. राजकारणांतील स्पर्धेचा संसर्ग सर्व कार्यांना बाधतो, आणि बिनराजकीय व सर्वसंमत अशा सेवाकार्यांमध्यें, भिन्न पक्षीयांमध्यें हार्दिक सहकार्य अशक्य होतें. सारेच नागरिक या ना त्या पक्षाचे अंमलाखालीं सांपडतात आणि कळत न कळत, इच्छया अनिच्छया या पक्ष–युद्धांतील सैनिक बनतात. अशा प्रसंगीं कांहीं सेवकांनीं तरी या पक्षापक्षीपासून सर्वस्वी अलिप्त रहावें हें इष्ट आहे. विशेषत: ज्यांना बिनराजकीय स्वरूपाचीं सेवाकार्यें करावयाचीं आहेत त्यांनीं कोणत्याच राजकीय पक्षाचे सभासद होऊं नये हें बरें. राजकीय पक्षांच्या पुरस्कर्त्यांना क्षत्रिय मानल्यास राजकीय सत्तेविषयीं निःस्पृह अशा ब्राह्मणांचीहि समाजाला आवश्यकता असते असें म्हणतां येईल.

सेवक व विद्यार्जन—सेवाकार्य करतांना सेवकाला अनेकदा अधिक विद्यार्जनाची आवश्यकता जाणवूं लागते. काम करतां करतां त्याची जिज्ञासा व बौद्धिक भूक वाढते. अधिक अनुभवाची, ज्ञानाची, संशोधनाची, निरीक्षणाची, प्रवासाची, वाचनाची ( म्हणजे इतरांचे अनुभव व विचार जाणून घेण्याची ) आवश्यकता जाणवूं लागते. नवीन कला, नवीन विषय शिकून व हरकसबी बनून स्वत:ची कार्यक्षमता वाढविण्याची किंवा अधिक व्यापक करण्याची सेवकाला इच्छा होते.

अशा तऱ्हेची इच्छा सेवकाच्या प्रगतिशीलतेचें लक्षण असून ती स्वागतार्ह आहे व पुरी होणें इष्ट आहे. म्हणूनच सेवाकार्य चालविणाऱ्या संस्था आपल्या कार्यकर्त्यांना आवश्यक शिक्षण देऊन अधिकाधिक कार्यक्षम करण्याची व्यवस्था करीत असतात. अर्थात् अशा तऱ्हेचें शिक्षण हें संस्थेच्या ऐपतीप्रमाणें व सोयीनुसार म्हणजे चालू कार्याला अडथळा येणार नाहीं अशा बेतानेंच साधावयाचें असतें. त्यासाठीं सेवकाला प्रथम सेवाकार्य कांहीं काळ सोडावें लागलें तरी संस्था सेवकाचा खर्च चालविते.

जेथें सेवकाला आधारभूत संस्था नसेल तेथें सेवकाच्या शिक्षणाची व्यवस्था समाजानें—अर्थात् त्या त्या प्रसंगीं ईश्वर ज्यांना प्रेरणा देईल त्या कार्यप्रेमी मित्रांनीं—करावयाची असते. सेवकानें संस्था किंवा समाज लावील त्या व्यवस्थेंत संतोष मानावा.

अल्पशक्ति तरी। अल्प उपकार॥ थोरतरी थोर। करणेंची॥

सेनापति बापट

परंतु वस्तुथिति येथेंहि नेहमींच इतकी निर्भेळ नसते. विद्यार्जनाची इच्छा केवळ कार्यचिंतनांतूनच उद्भवते असें नाहीं. विद्या हें जसें ज्ञान व कार्यक्षमता वाढविण्याचें साधन आहे तसेंच तें सेवकाची प्रतिष्ठा व दर्जा वाढविण्याचेंहि साधन असतें, व त्यासाठींहि अधिक शिक्षणाची आवश्यकता जाणवूं लागते, त्यासाठीं कोणी कॉलेजांत जातो, तर एखादा विलायतेला जाऊन तिकडची एखादी पदवी घेऊन येतो.

“ आपली छाप लोकांवर पडावी तशी पडत नाहीं, आपली किंमत लोकांना वाटत नाहीं, स्वार्थत्याग, विद्वत्ता, इत्यादि गुणांच्या लौकिकाच्या अभावीं आपले तेज पडत नाहीं, आपल्याच सहकाऱ्यांपैकीं जे अधिक शिकलेले आहेत त्यांना लोकांकडून अधिक आदराची वागवणूक मिळते व त्यांच्याकडून अधिक यशस्वी कार्य होऊं शकतें, ” इत्यादि विचारांनीं सेवक विद्यार्जनाला उत्सुक होतो.

सेवाकार्यासाठीं केवळ कळकळीची व आंगमोडीचीच आवश्यकता असते असें नाहीं, तर सेवाकार्यामध्येंहि पुढारी बनण्यासाठीं बुद्धिमत्ता, बहुश्रुतपणा, लेखन, वक्तृत्व, थोरांमोठ्यांशीं परिचय, द्रव्याची अनुकूलता, इत्यादि गोष्टी पाहिजे असतात. सैनिकांपेक्षां सेनापति व साध्या स्वयंसेवकांपेक्षां पुढारी अधिक सेवा करतो अशी सामान्य समजूत आहे. म्हणून आपल्या हातून उच्चपदावरून अधिक सेवा घडावी या हेतूनेंहि सेवक शिक्षणाकडे ओढला जातो. उच्च शिक्षण हें समाजाच्या वरच्या थरांशीं परिचय साधण्याचेंहि साधन बनूं शकतें.

परंतु नेतृत्वासाठीं विद्वत्ता व वशिला पाहिजे, त्याहून शील व निष्ठा

यांचीच अधिक आवश्यकता असते. शिवाय सर्वांसच पुढारी बनणें शक्य नाहीं; एक पुढारी झाला तर हजारांनीं अनुयायी राहिलें पाहिजे. चित्रगुप्ताच्या जमाखर्चांत सेवाकार्याच्या लांबीरुंदीला महत्त्व नसून सेवेचें नाणें खरें आहे कीं बनावट आहे यालाच महत्त्व असतें. म्हणून सेवकानें जो भाग अनायासें आपल्या वाट्याला येईल त्यांतच संतोष मानावा व तोच भाग उत्तम तऱ्हेनें बजावावा. एखाद्या महान् कार्यकर्त्याची गृहव्यवस्था आस्थापूर्वक राखणारी अशिक्षित पत्नी किंवा मोलकरीण ही त्याला सार्वजनिक कार्याकडे सर्व लक्ष्य देणें शक्य करते, ही तिचीसुद्धां देशसेवाच होय.

किंवा सेवाकार्याचा कंटाळा आल्यानें तें सोडण्यासाठीं निमित्त पाहिजे म्हणूनहि कित्येक तरुण शिक्षणाकडे वळतात. सुरवातीला अंधुक विचार असतात कीं शिक्षण घेऊन अधिक लायख बनून परत सेवाकार्यांत येऊं, परंतु पुढें ते अशिक्षित विचारच ठरतात. सुशिक्षितांचें तर्क–शास्त्र त्याला सांगतें कीं ' त्याग म्हणजेच सेवा नव्हे. गरिब्राकडूनच सेवा घडते आणि सुस्थितींत असणें हा समाजाचा द्रोह आहे असें थोडेंच आहे ' इत्यादि.

आगाऊ सेवाकार्यांत असून नंतर शिक्षणाकडे ओढा वळणाऱ्या सेवकांची ही गोष्ट झाली. शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची शिक्षणोत्तर सेवामय जीवन घालविण्याची इच्छा आहे, अशा स्थितींत त्यानें शिक्षण कोठवर घ्यावें ? याचें उत्तर पुढें कोणात्या प्रकारचें काम करण्याचा इरादा आहे व त्या कार्यासाठीं लागणारें शिक्षण घेण्याची ऐपत किंवा साधनांची ( अनुकूलता कितपत आहे त्यावर ) अवलंबून राहील. साधारणपणें एवढें खरें कीं सेवकाला—विशेषतः स्वतंत्रपणें काम करणाराला—आपल्या विषयाचें संपूर्ण ज्ञान, स्वतंत्र विचार करण्याची शक्ति, तसेंच लेखन व वक्तृत्व म्हणजे आपले विचार मांडण्याची शक्ति व जमाखर्चाची माहिती हीं कार्याच्या स्वरूपानुसार कमीजास्त प्रमाणांत आवश्यक असतात. विद्यार्जनाबाबत एक सूचना मात्र आवश्यक आहे कीं सेवाकार्य करूं इच्छिणारानें कर्ज काढून शिक्षण करूं नये. कर्जामुळें सेवक बांधला जातो व सेवाकार्यापासून दुरावतो, किंवा कर्जफेड करणें त्याला अशक्यहि होऊन जातें.

**आध्यात्मिक तळमळ:**—सेवकाला जशी बौद्धिक शिक्षणाची उत्सुकता वाटणें शक्य आहे, त्याचप्रमाणें मननशील सेवकाला सेवाकार्य करतां करतां आध्यात्मिक तळमळहि वाटूं लागणें व त्यापायीं आध्यात्मिक वाचन, चिंतन, सत्संग किंवा एकांत इत्यादि साधण्यासाठीं सेवाकार्यांतून रजा घेण्याची व प्रसंगीं कर्ममार्गाला कायमचा रामराम ठोकण्याची इच्छा होणेंहि संभवतें.

किंवा आपल्यामधील दोषांची जाणीव होऊन आपण सेवाकार्याला लायक नाहीं असेंहि वाटूं लागेल. दोष दोन प्रकारचे असूं शकतील: मानसिक व शारीरिक, किंवा दुर्विचार व दुराचार, क्रोध, अहंकार, मत्सर, कामवासना इत्यादि दुर्विचार प्रयत्नशील सेवकाच्याहि मनावर मधून मधून आक्रमण करतील. तेवढ्यानें सेवकाची नालायकी सिद्ध होत नाहीं. दुर्विचार हे दुराचाराचीं बीजें होत, व ते सेवाकार्याला बाधक आहेत यांत शंका नाहीं; परंतु त्यांच्याशीं झगडण्यासाठीं सेवाकार्य सोडून देण्याची आवश्यकता नाहीं. किंबहुना एकाग्र सेवाकार्य हा त्यांच्याशीं झगडण्याचा उपाय आहे. म्हणून सेवाकार्य न सोडतांच प्रयत्न-पूर्वक दुर्विचारांवर जय मिळविण्याचा सेवकानें प्रयत्न करावा. सेवामार्ग सिद्धासाठीं—पूर्णत्वाला पोंचलेल्यासाठीं—नसून साधकांसाठीं—अपूर्ण व दोषमय इसमांसाठींच—आहे. अर्थात् मननचिंतनाचे दृष्टीनेंहि कार्यसंन्यास अनावश्यकच आहे हेंहि लक्ष्यांत येईल. सेवकानें आत्मचिंतनामध्यें नियमितपणें कांहीं काळ दवडणें इष्टच आहे. विशेष उत्कंठा वाटल्यास कांहीं मुदत एकांतामध्यें घालविणेंहि अनुचित ठरणार नाहीं. परंतु कायमचा कार्यसंन्यास युक्त नाहीं. सत्कर्माविणें ज्ञान—भक्ति व्यर्थ होत हें आपण पहिल्या प्रकरणांतच पाहिलें आहे.

दुराचरणाची गोष्ट भिन्न आहे. पैशांची अफरातफर, व्यभिचार, यांसारखे दोष हातून घडल्यास ते लपवून सेवाकार्य पुढें चालविण्यांत मिथ्याचार आहे; त्यानें सेवेला बट्टा येईल. तरीहि असले दोष एकदां घडले म्हणून सेवकानें नाउमेद होण्याचें कारण नाहीं. कित्येकदां तर एकदां घडलेली चूक माणसाला सावध करून मोहाविरुद्ध विशेषच भक्कम

बनविते. एक ठेंच खाई तो बावन शाहाणा होई, आणि बावन ठेचा खाई तो गद्धा होई. सेवकानें आपल्या हातून घडलेले दोष आपल्या नायकांपुढें प्रांजलपणानें उघडे करावे, व त्यांचे विचारें कार्याच्या अनेक अंगांपैकीं सर्वांत कमी जबाबदारीचें व कमी धोक्याचें असें काम पत्करावें, किंवा सार्वजनिक कार्यांतून अलग होऊन खासगी उद्योगच सेवाभावानें करावा. ज्याचे हातून एकदां, किंवा अनेकदांहि, चूक झाली तो सेवाकार्याला कायमचा नालायक झाला असें मुळींच नाहीं. जनताहि तसें समजत नाहीं. ती आपल्या सेवकाचे प्रमाद पोटांत घालण्यास सदैव तयार असते. जरूरी फक्त सच्चेपणाची आहे. चुका करण्यापेक्षां चुका लपविणें हें अधिक घातुक आहे. ' जो आपले दोष उघडे करतो, त्याचे दोष लोक झांकतात; जो आपले दोष झांकूं पहातो त्याचे दोष लोक उघडे पाडतात.

**सखोल कीं विस्तृत ?:**—मर्यादित क्षेत्रांत खोल किंवा तीव्र काम करावें कीं विस्तृत क्षेत्रांत उथळ किंवा विखुरलेलें काम करावें? असा प्रश्न कांहीं वेळां कार्यकर्त्यांपुढें उत्पन्न होतो. परंतु आमच्या मतें कार्याची खोली व विस्तार हीं परस्परावलंबी व परस्परपोषकच आहेत. बहुतेक सुधारणा विचारक्रांतीवर अवलंबून असतात. रूढि, समजुती, विचारप्रवाह, श्रेष्ठ–कनिष्ठ भावना व एकंदर मूल्य–पद्धति हीं बदलावीं लागत असतात. अशा तऱ्हेची विचारक्रांति केवळ छोट्या क्षेत्रांतच प्रयत्न करून घडवून आणतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या मोठ्या तलावाच्या कांठीं राहणारा गृहस्थ " माझ्या घरासमोरील तलाव मी साफ ठेवीन " म्हणेल तर तो त्याचा प्रयत्न व्यर्थ आहे, त्याचप्रमाणें दारूबंदी, स्त्रीशिक्षण, चरखा प्रसार, शेतीसुधारणा, शिक्षण–सुधारणा यांसारखें कोणतेंहि कार्य घेतलें तरी मोठ्या क्षेत्रभर वैचारिक प्रचार केल्याखेरीज छोट्या क्षेत्रांत त्याचें भरपूर आचरण घडवून आणणें शक्य होत नाहीं. मनुष्यमात्रामध्यें स्वतःचीच सुधारणा किंवा कल्याण साधण्याच्या बाबतींतसुद्धां एक प्रकारचा आळस, सुस्ती, किंवा चेंगटपणा असतो. कदाचित् मनुष्य समाज–प्रिय असल्यानेंहि सोबतीखेरीज पुढें पाऊल टाकण्यास तो नाखूष असेल. कारण कांहीं

असो, पण एवढें खरें कीं विशिष्ट सुधारणा बुद्धीला पटली तरीहि इतर लोक ती स्वीकारीत नसतांना, सेवकानें किंवा सुधारकानें "आपल्याच एकट्याच्या मागें कां लागावें, आपण काय गुन्हा केला आहे?" अशा तऱ्हेचा त्रासीकपणा लोक दाखवितात. सारे झोपलेले असतांना मीच एकट्यानें उठणें मला रुचत नाहीं. भूपाळ्या बाल-कृष्णाला "सारें जग उठलें, तूंच एकटा किती वेळ झोपणार?" अशा तऱ्हेनें आळवून उठवूं पाहातात, त्याचप्रमाणें सेवकसुद्धां लोकांना "इतर लोकहि तुमच्याबरोबर आहेत" असें आश्वासन देऊं शकेल तर त्याचा कार्यभाग सुकर होईल.

ज्या कार्यांमध्यें विचारक्रांतीची आवश्यकता नसते, कार्याच्या इष्टतेबद्दल एकवाक्यता असते व प्रश्न फक्त कळकळीचे कार्यकर्ते मिळविण्याचाच असतो, तेथें मात्र मर्यादित क्षेत्रांत तीव्र काम करणेंच योग्य असतें. उदाहरणार्थ, रोगाची सांथ पसरलेली आहे, व तिच्या निवारणाचे उपाय करणारे व दुखणाइतांची शुश्रूषा करणारे सेवकच पाहिजे आहेत, अशा ठिकाणीं कराल तेवढी सेवा घेण्यास लोक तयारच असतात. हें काम असेंच आहे कीं अर्धवट कामाचा उपयोगहि विशेष नाहीं, सांथीचें निवारण संपूर्णपणें केलें तरच त्याचा उपयोग आहे. भूकंप, महापूर, इत्यादि आपत्तींचे प्रसंगींहि सलग काम सुलभ व आवश्यकहि असतें. परंतु त्याऐवजीं सक्तीच्या मोफत शिक्षणाचा प्रश्न घेतला तर शिक्षणाचें प्रमाण व अभिरुचि हीं सर्वत्र भरपूर वाढलीं असल्याखेरीज विशिष्ट टापूत सक्तीचें शिक्षण यशस्वी होणार नाहीं.

अशा तऱ्हेनें विस्तृत क्षेत्रांतील प्रचार मर्यादित क्षेत्रांतील कार्याला आधारभूत असतो, तर उलट कोठें तरी भरीव कार्य प्रत्यक्षपणें करून दाखविल्याखेरीज विस्तृत प्रचारालाहि बळ येत नाहीं. विस्तृत प्रचार व सखोल काम, कामाची दृष्टि व त्या बरहुकूम सृष्टि, हीं उभयतां एकमेकांना पोषक आहेत. वृक्ष वाढतो त्याला मुळें व शेंड्याची पालवी या दोहोंतूनहि पोषण मिळत असतें. सेवकांनीं परिस्थिति व आपापली ऐपत व आवड-निवड यांस अनुसरून एकेका किंवा दोन्ही दिशांनीं काम करावें.

फंड:—बहुतेक सार्वजनिक कार्यासाठीं—म्हणजे समाजाच्या हितासाठीं व समाजाच्या वतीनें करावयाच्या कार्यासाठीं—द्रव्याची जरूरी लागते; सेवकांच्या निर्वाहासाठीं द्रव्य लागतें तसेंच प्रत्यक्ष सेवाकार्या-साठींहि लागतें; व तें द्रव्य फंडाचे रूपानें लोकांकडून गोळा करावें लागतें. सार्वजनिक कार्यांचा भार उचलणाऱ्या सेवकांच्या कार्यक्रमामध्यें फंड जमविणें या बाबीला आवश्यक व महत्त्वाचें स्थान असतेंच.

आपत्तिनिवारणासारखीं कामें, कीं ज्यांचेमध्यें मतप्रचाराची आव-श्यकता नसते, तीं मोठमोठ्या धनिकांच्या घाऊक देणग्यांतून, किंवा सरकारी ग्रँटमधून, चालविण्यास हरकत नाहीं. असल्या कामांनाहि थोरांचा आश्रय पुरेसा मिळत नाहीं म्हणून गोरगरिबांकडून किरकोळ रकमांच्या रूपानें निधि उभारणें आवश्यक होत असतें. सूक्ष्म संशोधन, उच्च विद्याव्यासंग इत्यादि सारखीं कामें सरकार किंवा थोडथोडके धनिक यांच्या घाऊक मदतीनेंच चालवावयाचीं असतात. परंतु प्राथमिक किंवा प्रौढ शिक्षण, चरखाप्रसार यांसारखीं बहुजनसमाजाच्या प्रत्यक्ष हिताचीं कार्यें, तसेंच हरिजनसेवा, दलितसेवा, दारूबंदी यांसारखीं मतप्रचारावलंबी कार्यें, तसेंच किसान व मजूर यांची संघटना, हिंदु-संघटन व मुस्लीम-संघटन (हीं इष्ट किंवा विशिष्ट मर्यादेंत इष्ट मानल्यास) यांसारखीं संघटनात्मक कार्यें, किंवा थोर पुरुषांच्या सत्काराच्या किंवा स्मारकाच्या रूपानें चालवावयाचीं कार्यें किंवा सर्वस्पर्शी राष्ट्रीय कार्यें व चळवळी यांसाठीं लागणारें द्रव्य सार्वजनिक फंडाच्या रूपानें जमविणें आवश्यकच नव्हे तर इष्टहि असतें. अशा तऱ्हेनें निधिसंग्रह हा सेवाकार्यांतील एक आवश्यक व महत्त्वाचा कार्यक्रम बनतो. म्हणून त्याच्या योग्य पद्धतीसंबंधीं येथें थोडा विचार करणें इष्ट आहे.

खुषीचीं दानेंच घ्यावीं:—निधि सेवकांच्या निर्वाहासाठीं असो किंवा कार्याच्या खर्चासाठीं असो, दात्यांनीं तो कार्यप्रेमानें व स्वखुषीनेंच दिलेला असला पाहिजे, दात्यांना तो जुलूमसा वाटू नये. सेवकाची दृष्टि द्रव्याबरोबरच आशीर्वाद, लोकमताचा पाठिंबा मिळविण्याची असावी. निधीचा आंकडा हा लोकमताच्या अनुकूलतेचा निदर्शक असावा. सेवकानें

फंड जमवितांना भाडभीड, खुशामत, फुसलावणी, धाकदपटशा, थापेबाजी, रुसवा, इत्यादि अनिष्ट प्रकारांचा यत्किंचित्‌हि उपयोग करूं नये. पैशाबरोबर माणसेंहि जोडण्याची दृष्टि ठेवावी; पैसा जमविला परंतु दात्यांचीं मनें विटलीं तर सोन्याच्या अंड्यासाठीं तीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीला मारण्याप्रमाणें होईल. कार्याची इष्टता, दान देण्याचें कर्तव्य, कार्यकर्त्यांची सचोटी व कार्यकुशलता, चालू कार्याची यशस्विता व त्याला लोकांकडून मिळणारा पाठिंबा हीं यथार्थपणें सेवकानें दात्यांपुढें मांडावीं. कार्याच्या इष्टतेबरोबरच ज्यांच्या हातीं फंड सोंपवावयाचा त्यांची सचोटी, कळकळ व कार्यकुशलता यांनाहि महत्त्व असतें. त्याचप्रमाणें आपल्या दानाचें चीज होणार असेल, कार्य यशस्वी होण्यासारखें असेल, तसेंच केवळ आपल्या एकट्यावरच फंडाचा भार पडत नसून आपले शेजारीपाजारी व व्यवसायबंधु व समानशील लोकसुद्धां त्या फंडाला आपापल्या परीनें हातभार लावीत असतील तर दात्याला मदत देण्यांत विशेष उत्साह वाटतो. आपल्यावर इतरांबरोबर व इतरांचे प्रमाणांत भार पडावा ही त्याची अपेक्षा स्तुत्य नसली तरी वावगीहि नाहीं. म्हणून इतरांनीं दिलेल्या मदतीचे खरे आंकडे दात्याला दाखवावे, देणग्यांना प्रसिद्धी द्यावी, व विशिष्ट क्षेत्रांतील किंवा वर्गांतील कांहीं लोकांकडून वर्गणी घेऊन इतरांनीं मुद्दाम किंवा आळसानेंहि नव्हे तरी वेळाच्या अभावीं वगळलें असेंहि करूं नये.

दाता नाखुषीनें किंवा नाइलाज म्हणून देत आहे असें दिसून आल्यास, किंवा उडवाउडवी, चुकवाचुकव करूं इच्छितो असें दिसल्यास सेवकानें त्याला हळूच मोकळीक द्यावी. परंतु विशिष्ट कार्याचें महत्त्व तितकेंसे वाटत नसल्यानें, इतर खर्च झाला असल्यानें, सेवक कल्पितो तितकी दात्याची ऐपत नसल्यानें, अन्य कारणानें, किंबहुना सेवकाच्या कार्यक्षमतेबद्दल पुरेशी खात्री नसल्यानें, दाता सेवकाच्या अपेक्षेहून कमी दान देत असेल तर सेवकानें रुसण्याचें कारण नाहीं. तसेंच अल्पांत अल्प देणगीहि नाकारण्याचा सेवकाला हक्क नाहीं.

कार्याबद्दल नापसंती दाखवून 'केवळ तुम्ही आलां म्हणून' दाता देणगी देत असेल तर सेवकानें ती देणगी नम्रपणें, पण स्पष्टपण, नाकारावी. परंतु वहिवाटदारांच्या किंवा खुद्द फंड मागण्यास आलेल्या सेवकाच्या सचोटीविषयीं दात्यानें कसून चौकशी केल्यास, किंवा शंका दर्शविल्यास, सेवकानें अपमान न मानतां शंकिताचें समाधान करण्याचा प्रयत्न करावा, व खुद्द आपली किंवा संस्थेची सचोटी शाबीत करण्याची ती एक अमूल्य संधीच मानावी. इतर कामांच्या घाईमुळें दात्यानें सेवकाला पुन: येण्यास सांगितलें तर सेवकानें ती अपरिहार्य अडचण म्हणून मान्य करावी.

संस्थेच्या सेवकांची अल्पांश शक्तिच निधिसंग्रहाच्या कामीं खर्च होऊन अधिकांश शक्ति प्रत्यक्ष सेवाकार्यासाठीं शिल्लक राहणें अत्यावश्यक आहे. धन जमविण्याच्या कामींच सेवकाचें तनमन प्रमाणाबाहेर खर्चावें लागत असेल तर आपल्या कार्याच्या योजनेंत किंवा पद्धतींत कांहीं तरी चुकत आहे असें ओळखून सेवकानें जरूर ती सुधारणा करावी. कार्य मुळांतच अयोग्य असेल, किंवा योग्य असूनहि लोकांना आवश्यक वाटत नसेल, चालू काळ त्याला अनुकूल नसेल, किंवा कार्यकर्त्यांमध्यें कांहीं दोष असतील. सेवकांनीं आत्मसंशोधन करावें व वाटल्यास निधिसंग्रहावर कमी भर देऊन अनायासें मिळणाऱ्या द्रव्यसाह्यानिशींच आपल्या तनमनाचा उपयोग इष्टकार्याकडे अधिक एकाग्रतेनें करावा.

**आडवळणाच्या पद्धती:**—निधिसंग्रहानिमित्तानें, व निधिसंग्रहाचे बरोबरीनें, मतप्रचार व लोकसंग्रह करण्याची सेवकाची दृष्टि असावी. त्या दृष्टीनें ज्या त्या कार्यासाठीं लागणारा निधि त्या त्या कार्याच्या व कार्यकर्त्यांच्या नांवानेंच मागावा ही निधि जमविण्याची योग्य रीत होय. निधि जमविण्याच्या आडवळणी पद्धतींचा सेवकानें अवलंब करूं नये. निधीसाठीं लॉटरी काढण्याच्या रीतीचा निषेध पूर्वीं आलाच आहे. निधीसाठीं धर्मार्थ नाट्यप्रयोग मिळवून व त्यांचीं तिकिटें खपवून निधि उभारणें ही रीत लॉटरीसारखी निंद्य नसली तरी सेवाकार्याला न शोभणारी आहे. यांत आमचा नाट्यकलेला किंवा रंगभूमीला दोष

देण्याचा हेतु नसून मुख्य कामाच्या उभारणीसाठीं भलत्याच गोष्टीचा पुरस्कार करण्यांतील आड मार्गाविरुद्धच आमचा आक्षेप आहे. शिवाय त्यामध्यें खुद्द कार्याचें महत्त्व नाटकाइतकें नाहीं, अशी कबुली कार्य-कर्त्यांनींच दिल्याप्रमाणें होतें, कारण त्या कार्याला नाटकाच्या वशिल्याची गरज लागते. यामुळें कार्याचीहि हानि होते व लोकांनाहि भलताच मार्ग दाखविल्याप्रमाणें होतें. शिवाय बहुधा नाटक मंडळीला ‘ खर्चापुरती ’ म्हणून कांहीं रक्कम द्यावी लागते व त्यांचा सन्मान करावा लागतो आणि शेवटीं शीण पत्करून व अव्यापारेषु व्यापार करून निधीची भरहि बेता-बाताचीच होते.

विशिष्ट कार्यासाठीं विशिष्ट कार्यकर्त्यांना पाहिजे असलेला निधि त्या कार्याच्या व त्याच कार्यकर्त्यांच्या नांवानें न मागतां एखाद्या थोर परस्थ पुढाऱ्याच्या सत्काराच्या किंवा स्मारकाच्या नांवानें पैसे गोळा करणें—आणि तेवढ्यासाठीं त्या पुढाऱ्याचीहि मुद्दाम बढाई करणें—हेंहि कांहींसें अप्रामाणिकपणाचें आहे. पुढाऱ्याचा सत्कार किंवा स्मारक करण्याचें स्वतंत्ररीत्या ठरलें असेल तर मग तें त्या पुढाऱ्याला इष्ट असलेल्या लोकोपयोगी कार्याच्या रूपानेंच करावें अशासाठीं प्रयत्न करण्यांत मात्र कांहीं वावगें नाहीं.

**कोणाकडूनहि दान घ्यावें:**—सेवकानें भलत्या उपायांनीं फंड जमवूं नये, पण दात्यानें देऊं केलेला पैसा त्या दात्यानें कोणत्या मार्गानें मिळविलेला आहे त्याची चिकित्सा करण्याचें सेवकाला विशेष प्रयोजन नाहीं. संशयास्पद मार्गांनीं मिळविलेलें धनहि दात्यानें पश्चात्तापाच्या किंवा प्रायश्चित्ताच्या भावनेनें सत्कार्याला अर्पण करूं इच्छीत असेल तर तें धन पवित्रच आहे. म्हणून सेवकानें कोणत्याहि दात्यानें स्वेच्छेनें दिलेली देणगी नाकारूं नये. तथापि येथेंहि कांहीं अपवाद करावे लागतील. चोरीची वस्तु समजून विकत घेणें हा जसा गुन्हा आहे त्याचप्रमाणें ती दान घेणें हाहि गुन्हाच आहे. त्याचप्रमाणें दान देण्यामध्यें दात्याची पश्चात्तापाची किंवा कार्यप्रेमाची भावना नसून आपल्या दुष्कृत्यां-

वर पांघरूण घालण्याचा व तीं अव्याहत चालू ठेविण्याचाच इरादा दिसत असेल तर सेवकानें दात्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करावा. विशिष्ट दानाचा ( कारणें न सांगतां ) अस्वीकार करण्याचा संस्थेच्याच चालक मंडळाला अधिकार असला पाहिजे.

**फंडाला मर्यादाः**--संस्थेनें आपल्या ऐपतीला अनुसरून आपल्या प्रतिग्रहाला, म्हणजे दान-स्वीकाराला, मर्यादा घातली पाहिजे. कार्याच्या भुकेहून किंवा पचनशक्तीहून अधिक दान स्वीकारण्यांत हित नाहीं. सेवा-कार्यामध्येंसुद्धां अधाशीपणा बाधकच होणार. सेवकामध्यें आत्म-पावित्र्याची भावना असूं नये; तथापि तनमन हीं धनाहून श्रेष्ठ आहेत व धन हें त्यांना अंकित रहावें, त्यांनी धनाच्या आहारीं जाऊं नये, एवढी आत्मविश्वासाची भावना त्यानें अवश्य बाळगावी, व प्रतिग्रहाबाबत लांगून चालन इत्यादि प्रकारची श्वानवृत्ति न धरतां धीरोदत्त अशी केसरी-वृत्तिच ठेवावी.

**कायमनिधिः**—जरूरीपेक्षां अधिक निधिसंग्रह हानिकारक आहे, तसाच कायम फंडहि कार्याला मारक आहे. संस्थेचा कायमफंड असून त्याच्या व्याजांतून कार्य चालावें, किंवा प्रसंगीं संस्थेला लोकाश्रय मिळ-ण्याचा बंद झाला तर त्या संचयाचा उपयोग करतां यावा ही समजूत अगदीं चुकीची आहे. कायम फंडामुळें सेवकांमध्यें सुस्ती व बेपर्वाई येते आणि बहुधा संस्थेच्या ताब्यासाठीं भांडणेंहि उत्पन्न होतात. जोंपर्यंत लोकांना कार्याची आवश्यकता पटते आहे व कार्यकर्ते विश्वा आहेत तोंपर्यंत लोक संस्थेला आवश्यक तें द्रव्यसाह्य देत रहातील, आणि ज्या संस्थेनें लोकांचा विश्वास गमावला आहे तिला जगविण्याचा अधि-कारच नाहीं. कायम फंडामुळें ' सेवकाची सोय ' होण्याऐवजीं सोयीच्या मागून नामधारी सेवक ओढले जातात, व अनेक प्रकारें मिथ्याचार वाढीला लागतो. गर्भश्रीमंती प्रापंचिकांच्याहि अवनतीला कारण होते, सेवकांची तर गोष्टच बोलायला नको.

येथवर सेवाकार्याचें व सेवकाची श्रद्धा, दृष्टि, वृत्ति इत्यादींचें तात्त्विक विवेचन केलें. सेवा ही पवित्र वस्तू आहे, परंतु पवित्र वस्तूंनाच कलुषित व त्यामुळें उलट विशेषच हानिकारक बनण्याची भीति असते. म्हणून सेवामार्गावरील प्रवाशांना त्यांच्या पुढील प्रवासाबाबत कांहीं सामान्य सूचना मिळाव्या या हेतूनें हें विवेचन केलें.

आपल्या हातून कांहींतरी देशसेवा, लोकसेवा, घडावी अशी साहजिक व निखालस इच्छा असणारे अनेक तरुण ठिकठिकाणीं असतात. परंतु त्यांचें योग्य मार्गदर्शन होत नाहीं व त्यामुळें "यथासांग तें कर्म कांहीं घडेना" घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना," अशी स्थिति होते. पुढें चालणारांचा अनुभव मागून येणारांना लाभावा हेंच मनुष्यजातीच्या उत्तरोत्तर प्रगतीचें साधन आहे. वर केलेलें विवेचन संपूर्ण तर नाहींच पण बिनचूक असेल असेंहि नाहीं. तें विशेष खोल, सूक्ष्म किंवा मूलग्राही तर नाहींच. तथापि प्रस्तुत लेखकानें गेलीं २०।२५ वर्षें कधीं मुरब्बी माहितगारांना पुशीत तर पुष्कळदां चुकत ठेचाळत केलेल्या मार्गक्रमणांत त्याला आलेले अनुभव व सुचलेले विचार स्वतःच्या बुद्धीच्या व लेखणीच्या सामर्थ्यानुसार जोडीदारांच्या व मागून येणाऱ्या वाटसरूंच्या माहितीसाठीं व परीक्षणासाठीं त्यांच्यापुढें मांडणें हें कर्तव्य समजून त्यानें हा प्रयत्न केला आहे. सहधर्मीयांनीं त्यांतील सार ग्रहण करावें, असार सोडून द्यावें व दोष सुधारावे.

देशसेवेचा कार्यक्रमः—आतां "आपल्या हातून लोकांची अल्प तरी सेवा घडावी, लोकांच्या नानाविध ऋणांची अल्पतरी फेड व्हावी, जगाचा दुःखभार आपल्या वर्तनानें वाढू तरी नये आणि शक्य तेवढा हलका व्हावा, पितरांच्या म्हणजे पूर्व पिढ्यांच्या पुण्याईनें आपल्याला या जगांत हरतऱ्हेच्या

नगर वाचनालय, सातारा.

सुखसोयी, ज्ञान व सौंदर्य लाभलें आहे, तसेंच आपणहि पुढील पिढ्यांसाठीं अधिक सुखी, सुजाण, सुंदर जग ठेवून जावें" अशी उत्कंठा असणाऱ्या—आणि या उत्कंठेपासून सर्वस्वी मुक्त असा कोण आहे? — इसमांपुढें सेवेचीं किती विविध व विस्तीर्ण क्षेत्रें पसरलेलीं आहेत त्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याचा विचार आहे.

जगाची सेवा ही व्यवहारतः व स्थूलमानानें देशसेवेचेंच रूप घेते हें मागें दाखविलेंच आहे. देशापलीकडील—आंतरराष्ट्रीय— कार्यक्रम आंखण्याची स्वतः—लेखकाचीहि ऐपत नाहीं.

**मातृभूमिः**—आपला देश हिंदुस्थान. एका बाजूनें पर्वतांच्या गगनभेदीं रांगांनीं व दुसऱ्या बाजूनें अफाट महासागरानें वेढलेला, गंगा–यमुना–सिंधु, नर्मदा व गोदावरी–कृष्णा–कावेरी या सप्त नद्यांच्या पवित्र प्रवाहांनीं न्हालेला, विस्तीर्ण, प्राचीन, समृद्ध असा हा आम्हां चाळीस कोटी स्त्री–पुरूषांचा देश–राम आणि कृष्ण, बुद्ध आणि महावीर, बसव आणि नानक, तुळशीदास आणि कबीर, अशोक आणि अकबर, शिवाजी आणि प्रताप, चांदबिबी आणि अहिल्यादेवी, यांची ही भूमि. वेद–उपनिषदांसारखे तत्वज्ञानाचे सर्वोत्तम ग्रंथ सर्वांत अगोदर येथेंच निर्माण झाले. ताजमहालासारख्या अनुपम कलाकृतीला याच भूमीनें जन्म दिला. जगांतील बहुतेक धर्मांना जन्म व साऱ्या धर्मांना आश्रय याच धर्मभूमीनें दिला. या भूमीचा प्रत्येक कण वीरांच्या रक्तानें व महात्म्यांच्या पादस्पर्शानें पुनीत झालेला आहे. अशी ही आपली धन्य भूमि व तिचीं आम्ही धन्य लेकरें !

या भूमीचें आपल्यावर अपार ऋण आहे. तिच्या मातीचेच आपले देह बनले, तिच्या अन्नावर वाढले आणि शेवटीं तिच्याच उदरांत जाणार. सुखसोयी, विद्याकला, सोबत–संगत तीच आम्हांला पुरविते. म्हणून तिची म्हणजेच आमच्या देशबांधवांची–हिंदु मुसलमान–पारशी–ख्रिश्चन–शीख–जैन इत्यादि, कराची ते गौहत्ती व पेशावर ते रामेश्वरपर्यंत वसलेल्या चाळीस कोटि भावंडांची–सेवा करणें हाच आपला अधिकार, हेंच आमच्या जीविताचें साफल्य.

सेवा अनेक परींनीं करण्याची आवश्यकता आहे. सच्चे सेवकच पाहिजे आहेत. हिंदी प्रजा आजमितीला हरएक प्रकारच्या दुःखांनीं गांजलेली आहे.

**परदास्यः**--पहिला प्रश्न परदास्याचा. मूठभर इंग्रज सातासमुद्रांपलीकडून येऊन आज आम्हां चाळीस कोटी लोकांना हाकीत आहेत. हिंदुस्थानची राज्यघटना कशी असावी तें विलायतेची पार्लमेंट ठरविणार. सारी सत्ता, सारे अधिकार-अखत्यार परक्यांच्या हातीं. त्यांनीं हुकूम करावे, आम्ही निमूटपणें मानावे. आम्ही युद्ध कोणाशीं करावें व मैत्री कोणाशीं जोडावी, आमचे मित्र कोण व शत्रु कोण, आम्ही व्यापार कोणाशीं करावा, कर्ज कोणापाशीं मागावें, भाषा कोणती बोलावी, कपडे कसले घालावे, शिक्षण कसलें घ्यावें-सर्व कांहीं ते ठरविणार ! आम्हांला काय वाटतें, काय आवडतें काय पटतें, काय मानवतें, याला कांहीं किंमत नाहीं. व्यापार, उद्योग, आर्थिक व्यवहार, सारे परक्याच्या हातीं.

स्वतःच्या देशांत ही स्थिति, मग परमुलखांत आम्हांला कोण विचारणार ? पोटासाठीं परदेश सेवावे तर तेथेंहि पदोपदीं अपमान व तिरस्कार पदरीं पडतात.

राज्यसंस्था ही मनुष्याच्या सांघिक जीवनांतील प्रमुख संस्था. तीच दूषित झाल्यामुळें आमचें सारें सांघिक जीवनच दूषित झालें आहे. ' राजा कालस्य कारणम्. ' दंड्याची सत्ता अप्रतिहत चालते, प्रेमाची सत्ता मानण्यास मात्र कोणी तयार नाहीं. भ्याडवृत्ति बळावली. स्वाभिमान नष्ट झाला. आम्हांला जो तुच्छतेनें वागवील त्याच्याविषयीं आम्हांला धाक व आदर वाटेल. [ स्वाभिमानशून्य इसमापाशीं धाकावेगळा आदर संभवतो कीं नाहीं याची शंकाच आहे ] व जो आपल्याला तुच्छतेनें वागवीत नाहीं तो आम्हांला तुच्छ वाटेल. परदास्य म्हणजे स्वकीयांची अवहेलना व तिऱ्हाइतापुढें शरणागति; आपापसांत बेबनाव व तिऱ्हाइताचें आज्ञापालन. परदास्य म्हणजे स्वार्थासाठीं बंधुद्रोह, दास्य म्हणजे पुरुषार्थहीनता, परावलंबन, परधार्जिणेपणा, ऐदीपणा, करंटेपणा,

निराशावाद. दास्य म्हणजे मिथ्याचार: सामोऱ्याला दंडवत व पाठमोऱ्याला शिव्याशाप. दास्य म्हणजे शीलाचा लोप, भीतीचें राज्य आणि प्रीति व नीति यांची पायमल्ली. परदास्य म्हणजे माणुसकीचा राजिनामा.

याच्या उलट स्वराज्य म्हणजे स्वावलंबन, स्वकीयांवर अवलंबन, बंधुप्रेम, संघनिष्ठा, स्वाभिमान व आत्मविश्वास—म्हणजेच ईश्वरावर विश्वास.

पारतंत्र्यामुळें देशाचें शोषण झालें, व्यापार, उद्योगधंदे नष्ट झाले व देश दरिद्री झाला हें तर आहेच; परंतु त्याहूनहि शोचनीय गोष्ट ही कीं आमच्यांतील नागरिकत्वाची भावना, राज्यसंस्थेचे आपणहि घटक आहों, सरकार आपल्या सहकार्यानेंच चालतें, सरकारच्या कृत्यांबद्दल व आपल्या आसपास चालणाऱ्या बऱ्यावाईट प्रकारांबद्दल आपण अंशत: तरी जबाबदार आहों ही जाणीव, तसेंच अनिष्ट गोष्टींचें निवारण करणें आपल्या हातीं आहे ही धमक, आमच्यामधून नष्ट झाली. आपल्या डोळ्यांसमोर एखादा गांवगुंड गरीबांना छळीत असला तरी आम्ही म्हणतों, कीं पोलीस व मॅजिस्ट्रेट यांनीं इलाज करावा; खरी साक्ष देण्याची स्वत:ची जबाबदारीहि आम्हांला मान्य नाहीं.

खरोखरी सरकारी नोकर म्हणजे रयतेचा नोकर, परंतु परकी अमलाखालीं तो स्वत:ला प्रजेचा भक्षक व पीडक समजतो व प्रजाहि त्याला तसाच मानते. सरकारला लुबाडणें, बुडविणें, फसविणें, चकविणें यांत लोकांना कांहीं गैर दिसतच नाहीं, उलट तसें करण्यांत मोठेपणा वाटतो. ‘ सरकारची भर करणें ’ यासारखा निंद्य गुन्हा दुसरा कोणताच नाहीं ! सरकारी नोकरीची जी स्थिति तीच परंपरेनें लोकल बोर्ड, म्युनिसिपालिट्यांच्या कामाची व खासगी नोकरीचीहि झाली आहे. “ ज्याची खावी पोळी त्याची ( फक्त त्याच्यासमोर ) वाजवावी टाळी ” आणि त्याचेमागें त्याला खड्ड्यांत ढकलण्याची तजवीज योजावी, हा शिष्टाचार होऊन बसला आहे. सारें राष्ट्रीय शीलच बिघडलें आहे. लॉर्ड विलिंग्डन मुंबईचे गव्हर्नर असतांना गांधीजीपाशीं बोलले होते कीं हिंदी लोकांमध्यें ‘ नाहीं ’ म्हणविण्याचें धैर्य नाहीं. पराधीन वृत्तीचाच हा परिणाम आहे.

हीच परधार्जिणी वृत्ति आमचें शिक्षण, भाषा, रीतरिवाज, कपडेलत्ते, आपापसांतील भेदभाव इत्यादि सर्वांमध्यें दिसून येते. पारतंत्र्यामुळें आमचें आर्थिक नुकसान तर झालेंच, परंतु आमची दानत बिघडली हें अधिक गंभीर स्वरूपाचें नुकसान झालें. इंग्रज दुष्ट किंवा इतरांहून अधिक लोभी आहेत म्हणून आम्हांला त्यांची सत्ता नको असें नव्हे, तर आपणच नादान राहूं नये व इंग्रजांच्या नि जगाच्या बिघाडाला कारण होऊं नये म्हणूनच आमच्या, त्यांच्या व जगाच्या हितासाठीं आम्हांला स्वराज्य मिळविलें पाहिजे.

हें स्वराज्य हुकूमशाही नसून लोकशाही असणार हें सांगायलाच नको. केवळ इंग्रजांचें दडपण दूर झाल्यानें लोकशाही स्थापन होईल असें नाहीं. लोकशाही म्हणजे सर्वांना समान अधिकार; कोणत्याहि व्यक्तीचा, वर्गाचा किंवा प्रांताचा इतरांवर वरपगडा रहातां नये; " इतर तसे आपण व आपण तसे इतर " असें यच्चयावत् नागरिकांना जाणवलें पाहिजे.

हें ध्येय सत्य व न्यायनीति यांस धरूनच आहे; व म्हणून तें सत्य-अहिंसामय मार्गांनीं—व सत्य-अहिंसामय मार्गांनींच—मिळविणें शक्य आहे. राजकारणांतील दृष्टि पारमार्थिकच असणें आवश्यक आहे हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून लक्ष्यांत येईलच. देशभक्ति म्हणजे सामुदायिक स्वार्थ-साधूपणा नव्हे. राजकारणांत खरें खोटें, नीति-अनीति इत्यादींचा विधिनिषेध बाळगूं नये म्हणणें म्हणजे सार्वजनिक जीवनांतून नीतीची हकालपट्टी करणें होय. आणि मग घरगुती जीवनांतूनहि नीतीची हकाल-पट्टी होण्यास उशीर लागणार नाहीं. परंतु, पाण्याची सखलाकडील ओढ एक वेळ थांबवितां येईल परंतु मानवी बुद्धीची परमार्थाकडील ओढ थांबविणें अशक्य आहे.

आपल्याला पाहिजे असलेलें स्वराज्य केवळ ब्रिटिश पार्लमेन्टच्या एखाद्या कायद्यानें किंवा हिंदी-इंग्रज तहानें सिद्ध होणार नाहीं. हें स्वराज्य विलायतेंतून विमानांतून आणावयाचें नसून येथील भूमींतच रुजलें व उगवलें पाहिजे. त्यासाठीं आपल्याला हिंदुस्थानाच्याच खेड्यापाड्यां-

मध्यें दीर्घकालपर्यंत व नाना परींनीं झटलें पाहिजे. कायदा किंवा तहनामा हें त्या स्वराज्य मंदिराचें प्रवेशद्वार आहे असें म्हणण्यास मात्र हरकत नाहीं.

हें प्रवेशद्वार गांठण्यासाठींहि आपल्याला भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत. स्वराज्याची तळमळ लागलेले, स्वराज्याचें व्रत घेतलेले, त्याचाच अहर्निश जप करणारे, लक्षावधि जोगी पाहिजे आहेत. केव्हां तरी चळवळीच्या पुरांत वाहून येणारे आणि एक बुडी मारून परत देशाला कायमचेंच विसरून जाणारे वीर या कामाला पुरेसे नाहींत.

शिक्षण व संघटना:--बहुजनसमाजाला राजकीय शिक्षण दिलें पाहिजे; राजकीय जीवनाचे धागेदोरे त्यांना उकलून दाखविले पाहिजेत. आजवर झालेल्या प्रयत्नांची, देशांतील पक्षोपपक्षांची व त्यांच्या कार्यक्रमांची त्यांना माहिती दिली पाहिजे. परकी सत्तेचे आधारस्तंभ आपणच आहों याची, तसेंच स्वराज्याच्या इष्टतेची व आवश्यकतेची, स्वराज्य संपादनाच्या कर्तव्याची, तें संपादिण्याच्या उपायांची, सत्य-अहिंसेच्या श्रेष्ठतेची, कार्य पद्धतीची व सामर्थ्याची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे, लोकशाहीचा अर्थ, लोकशाहीच्या सहचारी भावना, सध्यांची राज्यघटना व राज्यकारभाराची पद्धति, मतदारांचीं कर्तव्यें, राजकीय, सामाजिक व आर्थिक समतेची इष्टता व तिची अंमलबजावणी करण्याचे कार्यक्रम, परस्परांतील बेबनाव नष्ट करून एकजूट करण्याची आवश्यकता इत्यादि गोष्टी लोकांना समजावून दिल्या पाहिजेत.

शिक्षणाबरोबर संघटनाहि केली पाहिजे. स्वराज्यसंपादनार्थ सत्य-अहिंसेला धरून असलेल्या सर्व उपायांनीं झटणारी साऱ्या हिंदुस्थानची वर्ग-जाति-निरपेक्ष अशी एक महान संस्था पाहिजे. ती संस्था हेंच आपलें खरें सरकार असें मानून तिच्याबद्दल राजनिष्ठेची व आज्ञापालनाची भावना नागरिकांमध्यें निर्माण केली पाहिजे. बलिष्ठ व जुलमी अशा परकी, तोतया, राजानें कपटाच्या किंवा शस्त्राच्या बळावर खऱ्या राजाचें सिंहासन बळकावून त्याला देशोधडीस लावलें असलें तरी त्याची राजनिष्ठ प्रजा

आपल्या त्या अभिषिक्त राजाशीं बेइमान होणार नाहीं. परक्या बलिष्ठ झोटिंगापुढें मान लवविणें ही नामुष्कीची गोष्ट तर आहेच, परंतु तो किळसवाणा राजद्रोह व देशद्रोह आहे. त्याचप्रमाणें लोकसंमत अशी जी स्वराज्य-संस्था स्थापन करण्याचा आपला निर्धार आहे ". ती आपली भावी राज्य-संस्था हाच आपला खरा अभिषिक्त राजा. आपली राजनिष्ठा त्या राजाला वाहिलेली आहे. त्या राजाला वनवासांतून परत आणून सिंहासनावर स्थापिण्यासाठीं प्रजेला संघटित करणारी अशी जी आपली स्वराज्याकांक्षी संस्था तो आपल्या राजाचा सेनापति. आपण सैनिकांनीं त्या सेनापतीच्या शिस्तींत राहून त्याचे हुकूम तत्परतेनें पाळले पाहिजेत—" ही भावना राष्ट्र-व्यापी करण्यासाठीं संख्यावंद कार्यकर्ते पाहिजेत.

**राष्ट्राची बांधणी:**—परंतु केवळ परक्याला हुसकून लावण्यानें आपलें काम पूर्ण होत नाहीं. आपल्याला आपला राजा वनांतून आणावयाचा नसून जनांतूनच उभारावयाचा आहे. 'राष्ट्रीय सरकार' स्थापन करण्यासाठीं अगोदर 'हिंदी राष्ट्र' तयार झालें पाहिजे. 'स्वतंत्र हिंदुस्थान' निर्माण करण्यापूर्वी अगोदर 'हिंदुस्थान' निर्माण केला पाहिजे.

आपलें राष्ट्रीय जीवन फार ढिलें व विस्कळित झालेलें आहे. हिंदु मुसलमानांचा बेबनाव हा तर अर्धांगाचाच झटका आहे, परंतु हिंदू-हिंदुमध्यें व मुसलमान-मुसलमानांमध्यें तरी काय कमी वितुष्टें आहेत? ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य, शिया-सुनी एवढेंच नव्हे तर मराठी-गुजराथी, आंध्र-तामील, बंगाली-बिहारी अशा नाना तऱ्हेच्या आडव्या तिडव्या छेदांनीं राष्ट्राचीं शकलें पडूं पहात आहेत. हीं शकलें सांधून एकजीव, एकतान, एकदिल असा हिंदुस्थान आपल्याला निर्माण केला पाहिजे. मी ब्राह्मण, मी मराठा, मी महार, मी लिंगायत, मी कानडी, मी कच्छी, अशा तऱ्हेचे लघु अभिमान सोडून " मी हिंदी, सारा हिंदुस्थान माझा, माझीं चाळीस कोटी भावंडें " अशा तऱ्हेचा उदात्त अभिमान आपल्या मनांत बिंबला पाहिजे. परस्पर अविश्वासास जिंकलें पाहिजे व प्रेम जोडलें पाहिजे. हिंदु, मुसलमान, पारशी, खिश्चन, शीख, जैन

या सर्वांनीं परस्परांच्या भाषा, लिपि, वाङ्मय, कला, रीतरिवाज इत्यादींचा, गुणग्रहणाची दृष्टि ठेवून, अभ्यास केला पाहिजे. अविश्वासाला मनाच्या कोतेपणाबरोबरच अज्ञान व अपरिचय हीं कारणीभूत असतात. परस्परांच्या गुणग्राही परिचयामुळें परस्परांच्या संस्कृतींतील व रीत-रिवाजांतील चांगल्या मुद्यांचें परस्पर देवाण-घेवाण होऊन सर्व-गुण-संपन्न अशी सामुदायिक संस्कृति निर्माण होईल.

परस्परांच्या धर्मांच्या अभ्यासानें सर्वधर्मसमभाव दृढ होईल. " आपला तेवढाच धर्म व बाकीचे ते अधर्म " ही वेडी व घातुक समजूत दूर होऊन इतर धर्म या आपल्या धर्मांच्याच नव्या जुन्या आवृत्ति आहेत, एकाच वक्त्याच्या एकाच विषयावरील भिन्न भिन्न व्याख्यानांमध्यें ज्याप्रमाणें प्रतिपादनाची भिन्नता असूं शकते पण विरोध नसतो, उलट भिन्न व्याख्यानें एकमेकांचीं पूरकच असतात, त्याप्रमाणें भिन्न धर्म त्या त्या परिस्थितीला अनुसरून भिन्न मांडणी करीत असले तरी त्यांचीं प्रतिपाद्य तत्त्वें एकच आहेत हें लक्ष्यांत येऊन अन्य धर्मांच्या शेजारामुळें विषाद न वाटतां उलट त्यांच्या सोबतीचा आनंद वाटूं लागेल.

यासाठीं परस्परांच्या धर्म, वाङ्मय, कला, इत्यादींचा सद्भावनेनें अभ्यास करून स्वत:ला होणारा लाभ इतरांनाहि वाटून देणारे वाङ्मयसेवक व कलोपासक पाहिजेत.

आपल्या सार्वजनिक संस्थाः--शाळा, छात्रालयें, वाचनालयें, धर्मशाळा, अनाथालयें, भोजनगृहें, क्लब, क्रीडांगणें, इत्यादि सर्व राष्ट्रीयांस खुल्या व सर्वांचा समावेश करणाऱ्या अशा असल्या पाहिजेत. आपलें सार्वजनिक जीवन एकराष्ट्रीय असलें पाहिजे. परस्परांना साह्य करण्याची वृत्ति बळावली पाहिजे व त्यांत आपण दुसऱ्याला साह्य करीत नसून स्वत:-लाच साह्य करीत आहों हें लक्षांत आलें पाहिजे. थोडक्यांत, आपली अस्मिता राष्ट्र-विस्तृत झाली पाहिजे.

सामाजिक समताः—आपल्याला देशाचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. राष्ट्राचें कोणतेंहि अंग उपेक्षित, खुरटें किंवा कुंठित

रहातां नये. त्यासाठीं पहिली आवश्यकता सामाजिक समतेची आहे: जन्मानें कोणीहि उच्च किंवा नीच नाहीं हा सिद्धांत मान्य होऊन प्रत्येकाला उंच माथें करून हिंडण्याचा व आपापल्या कर्तबगारीनें पूर्ण चीज करून घेण्याचा इतरांचे बरोबरीनें अधिकार असला पाहिजे. "मी जन्मतःच श्रेष्ठ दर्जाचा" अशी प्रौढी कोणी मानूं नये, त्याचप्रमाणें 'मी नीचच' अशी आत्म-द्रोही कल्पनाहि कोणाला वाटतां नये. नाना प्रकारच्या अस्पृश्यतेची व जातींजातींमधील विविध उच्चनीचतेची संपूर्ण हकालपट्टी झाली पाहिजे.

परधर्मीयांबद्दलहि आत्मपावित्र्याच्या भावनेनें कमी-अधिक प्रमाणांत अस्पृश्यता पाळिली जाते. तिचेंहि निर्मूलन झालें पाहिजे. जन्ममूलक विषमता हें पाखंड आहे, माणुसकीचा अपमान आहे, उच्च-नीच उभयतांच्या विकासावरील भारी दडपण आहे, सामाजिक व राजकीय संघटनेच्या मार्गांतील मोठें विघ्न आहे. ज्या मुलखामध्यें प्रवासांत आपल्याला कोठेंहि आदरातिथ्य, किंवा थारासुद्धां, मिळत नाहीं, त्या देशाबद्दल

"आनंद कंद ऐसा। हा हिंद देश माझा॥ किंवा
"अयि मातृभूमि तेरे। चरणोंमें शिर नमाऊं॥
मन और देह तुझपर। बलिदानमें चढाऊं॥"

अशा तऱ्हेचे भाव हरिजनांच्या किंवा मुसलमानांच्या हृदयांतून कसे उमटूं शकणार!

उलटपक्षीं सामाजिक समतेचा साक्षात्कार झाल्यानें दलित वर्गाच्या अनेक सुप्त शक्ती जागृत होऊन त्यांच्या ताज्या दमाच्या कर्तृत्वाला सार्वत्रिक बहर येईल व त्याचा सुगंध देशदेशांतरीं दरवळेल!

या सामाजिक समतेच्या स्थापनेसाठींहि स्वराज्यस्थापनेच्या बरोबरीनेंच सायास करावे लागतील. अस्पृश्यतेचे व विषमतेचे नाना प्रकार आहेत. भेटीबंदी, रोटीबंदी, शाळाबंदी, मंदिरबंदी, हॉटेलबंदी, न्हावी-धोबी-बंदी, धंद्याची बंदी, पोशाखाची बंदी, पक्वान्नांची बंदी, इत्यादि; त्या प्रत्येकाशीं

युक्तिप्रयुक्तीनें झुंझावें लागेल. परकी सत्तेशीं झुंजण्यापेक्षां समाजाशीं झुंजण्यास जास्त धैर्य, सोशिकपणा व योजकता पाहिजे असते.

आर्थिक समता:—आर्थिक समता सुद्धां तितकीच महत्त्वाची आहे. शारीरिक कष्ट करणारांच्या, व त्यांतूनहि किळसवाणीं कामें करणारांच्या, वांट्याला सामाजिक हीनतेबरोबरच दैन्य व दारिद्य हींहि येतात; ही स्थिति अन्याय्य व सामुदायिक हिताच्या दृष्टीनें हानिकारकहि आहे. शेतकरी, मजूर, कुंभार, महार, भंगी यांसारख्या उपयुक्त व आवश्यक कामगिरी बजाविणाऱ्या घटकांचें बुद्धिजीवी व ऐतखाऊ वर्गाकडून मोठ्या प्रमाणांत शोषण होत आहे हें नाकबूल करतां येणार नाहीं. जमीनदार व कारखानदार वर्ग श्रमिकांकडून अपुऱ्या मोबदल्यानें कामें करून घेतात, व्यापारीसुद्धां गरीब किरकोळ गिऱ्हाइकांकडूनच विशेष नफा घेतात व सावकार गरीब ऋणकोकडूनच जबर व्याज घेतात. पिढ्यान् पिढ्या आर्थिक टंचाईंतच गेल्यामुळें हे श्रमजीवी (कीं श्रमभुके !) वर्ग दैववादी, अल्पसंतुष्ट व आकांक्षाहीन बनले आहेत. त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला अधिक मिळावा, तसेंच खंड, नफा व व्याज ही सुसह्य व्हावीं यासाठीं चळवळ, संघटना व कार्यक्रम यांची आंखणी झाली पाहिजे. देशाची एकूण संपत्ति केवळ तिची समान विभागणी झाल्यानेंहि अनायासें वृद्धि पावेल. कारण संपत्ति म्हणजे नाणींच नव्हे, किंवा उपभोगाच्या वस्तुसुद्धां नव्हेत, तर त्या वस्तूंच्या उपभोगापासून होणारी प्राणशक्तीची वाढ किंवा मानसिक समाधान म्हणजे संपत्ति होय. दहा लाडू एका इसमाला दिले व दहा इसमांना प्रत्येकीं एकेक लाडू दिला तर दुसऱ्या प्रकारांतील दहा लाडवांचें मोल पहिल्या दहा लाडवांच्या किती तरी पटीनें ठरेल. त्याचप्रमाणें राष्ट्राची वट्ट मालमत्ता तेवढीच राहिली तरीहि तिच्या समान विभागणीनें राष्ट्राची प्राणशक्ति व सुखशांति आपण वाढवूं शकूं; असा हा फुकाचा, सुखाचा व अचूक उपाय आहे.

आणि राष्ट्राच्या पाठीच्या कण्याच्या ठिकाणीं असलेला हा महान् श्रमिक वर्ग त्याचा सामाजिक दर्जा व आर्थिक स्थिति सुधारल्यानें स्वाभिमानी, समंजस, भारदस्त व शक्तिशाली बनून साऱ्या राष्ट्राची इभ्रत

वाढविण्यास बहुमोल मदत करील. त्याला तसा समर्थ बनविण्यासाठीं कळवळयाच्या सैनिकांची सेना पाहिजे आहे.

**उत्पादनाची वाढः**—समान वांटणीबरोबरच राष्ट्राची उत्पादनशक्ति वाढविण्याकडेहि लक्ष्य पुरविणें आवश्यक आहे. दारिद्र्य हा आज हिंदुस्थानच्या समोरचा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. कसलें तरी निकस अन्न पोटाची पिशवी तुडुंब भरेपर्यंत पोटांत कोंबणें म्हणजे पोटभर जेवण नव्हे; तर "चौरस आहार," कीं ज्याचेमध्यें भात, भाकर, डाळ, तेल, भाजी, फळें व दूधतूप किंवा मटण–मासळी यथाप्रमाण असतील व ज्याच्या सेवनानें मनुष्य सशक्त, निरोगी व दीर्घायु होईल, तेंच पोटभर जेवण. असें जेवण हिंदुस्थानांतील कोटयवधि लोकांच्या वांटयाला कधीं-काळींच येत असेल. पालटण्यास वस्त्र नाहीं म्हणून रात्रीच्या काळोखांत नग्न किंवा नग्नप्राय स्थितींत स्नान करून परत मूळचेंच वस्त्र नेसणाऱ्या स्त्रिया, व उबदार पांघरूण नाहीं म्हणून हिंवाळयांत शेकोटीच्या उबेनें झोपणारे लोक देशांत किती तरी आहेत. सात्त्विक आहाराच्या अभावीं हिंदी लोकांचें आयुर्मान फार घटलें आहे. बालमृत्यूचें प्रमाण खूप वाढलें आहे, रोगराई फैलावत आहे आणि क्षयरोगाचा प्रसार तर बेसुमार झाला आहे. या आपत्तींच्या निवारणासाठीं केवळ आर्थिक समतेवर विसंबून भागणार नाहीं. राष्ट्राची उत्पादनशक्ती शक्य तितकी वाढविली पाहिजे. आळस व सुस्ती, अल्पसंतुष्टता, बेकारी व निरुद्योगीपणा यांचेंहि निर्मूलन झालें पाहिजे. तसेंच सध्यांच्या अवजारांत व उद्योगांच्या पद्धतींत सुधारणा केल्या पाहिजेत. देशांत कोणीहि निरुद्योगी राहूं नये, व उपासहि काढूं नये असा आपला रोख असावा.

शेतीच्या धंद्यांत सुधारणा झाली पाहिजे. बियाण्यांची योग्य निवड गांवठी सेंद्रिय खतांचा संग्रह व सदुपयोग, अवजारांची सुधारणा, जमिनीची धूप थांबविणें, गाई-बैलांची जोपासना, पिकाच्या शत्रूंचा संघशक्तीनें नायनाट करणें, इत्यादि उपायांनीं पैदास वाढविली पाहिजे. शेतकऱ्याला सोयीचे होतील असे जोडधंदेहि चालू केले पाहिजेत, व नष्ट होण्याच्या मार्गावर असलेले धंदे टिकवून धरले पाहिजेत. गांवठी उद्योग

व अवजारें यांमध्यें साध्या व सर्वसुलभ अशा सुधारणा शक्य तेवढ्या केल्या पाहिजेत. अखिल भारत चरखा संघानें चरख्याचा सुलभ व पुरवठ्याचा उद्योग पुनरुज्जीवित करून हजारों खेड्यांतील लक्षावधि स्त्री-पुरुषांना आपापल्या प्राप्तींत थोडीफार वाढ करण्याचें साधन पुरविलें आहे. अ. भा. ग्रामोद्योग संघानेंहि कागद, साबण, तेल घाणा, जातीं इत्यादि उद्योगांमध्यें बारीकसारीक कितीतरी सुधारणा केल्या असून त्या उद्योगांची संघटनाहि केली आहे. या संस्थांतर्फे अनेक बुद्धिमान व कुशल कार्यकर्त्यांनीं आपल्या शोधक बुद्धिनिशीं सूक्ष्म प्रयोग व तपश्चर्या करून त्यांचा फायदा आज जनतेला मिळेल असें केलें आहे, परंतु याच दिशेनें आणखी किती तरी प्रयत्न व्हायला पाहिजे आहेत. हिंदुस्थानच्या सात लाख खेड्यांची उद्यमशीलता व कुशलता वाढविण्यासाठीं लक्षावधि कळकळीचे कार्यकर्ते पाहिजेत.

**उद्धार कार्यः**— सामाजिक व आर्थिक अन्यायांखालीं चिरडलेल्या वर्गांना केवळ अत:पर न्याय दिल्यानें आपलें कर्तव्य संपत नाहीं. आजवर त्यांची झालेली हेळसांड भरून काढण्यासाठीं, अर्थात् त्यांची प्रगति विशेष झपाट्यानें होऊन त्यांनीं इतर वर्गांच्या बरोबरीला यावें यासाठीं, सरकारनें व पुढारलेल्या वर्गांनीं त्यांचेसाठीं विशेष प्रयत्न केले पाहिजेत. हरिजन, मागासलेले वर्ग व आदिवासी यांजकडे सरकार व समाजसेवक यांचें लक्ष्य वेधलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे, परंतु त्यांच्या उद्धाराचें कार्य चालविण्यासाठीं निष्ठावान् सेवकांची अधिक मोठ्या प्रमाणांत आवश्यकता आहे. प्रौढशिक्षण, बालशिक्षण, धंदेशिक्षण, पिढीजात धंद्यांची सुधारणा व त्यांबद्दल अधिक मोबदला मिळेल अशी व्यवस्था, सामाजिक व धार्मिक अनिष्ट रूढींचें निवारण, स्वच्छ व नीटनेटकी रहाणी, व्यसननिवृत्ति इत्यादि सुधारणा साधण्यासाठीं त्यांच्यांत जाऊन राहणारे व निरपेक्ष सेवेनें त्यांचा विश्वास संपादन करणारे सेवक हवेत.

**स्त्रियांचा आत्मविकासः**—स्त्रिया हेंहि समाजाचें उपेक्षिलेलें व अवमानिलेलें अंग आहे. स्त्रियांचा सामाजिक दर्जा हीन मानला गेला

आहे. त्यांना स्वातंत्र्य नाहीं, व पुरुषांच्या बरोबरीचे हक्क नाहींत. त्या जणू पुरुषांच्या दासी किंवा मालकीच्या वस्तु असाव्या अशा तऱ्हेची वागणूक त्यांना अनादि कालापासून मिळत आली आहे. आजवर सर्व धर्मसंस्थापक व सुधारक यांनीं स्त्रियांचा समाजांतील दर्जा वाढविण्याचाच प्रयत्न केलेला आहे, व त्याच दिशेनें काम करण्यास अद्याप केवढें तरी क्षेत्र मोकळें आहे. स्त्रियांचा सामाजिक दर्जा पुरुषांपेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें हीन असतां नये, सध्यांच्या विषमतेमुळें व उपेक्षेमुळें स्त्रियांवर येणाऱ्या नाना प्रकारच्या आपत्तींचें निवारण झालें पाहिजे, व स्त्रियांच्या आत्मविश्वासाला भरपूर वाव मिळून त्यांच्या कर्तृत्वाचा राष्ट्राला परिपूर्ण लाभ मिळेल असें केलें पाहिजे. या कार्यासाठीं स्त्री–सेविकाच जितक्या पुढें येतील तेवढ्या पाहिजे आहेत. परंतु पुरेशा सेविका मिळेपर्यंत निष्कलंक चारित्र्यवान् पुरुष सेवकांचेंहि तें कर्तव्य आहे.

साक्षरताप्रसारः—अज्ञान, वेडग्या समजुती, अडाणी पद्धति, वगैरे घालविण्यासाठीं सुशिक्षित, कर्तबगार आणि विशेषतः कळकळीच्या कार्यकर्त्यांनीं खेडयापाडयांत राहून खेडवळांच्या सुखदुःखाशीं तद्रूप होऊन त्यांच्यासह उन्नतीचा मार्ग आक्रमिण्याची आकांक्षा धरली पाहिजे.

साक्षरताः—लिहितां वाचतां येणें–हा सर्व प्रकारच्या सुधारणेचा पाया आहे. आपण ज्या जगांत राहतों त्या जगाचें ज्ञान मिळविण्याचें व अज्ञान आणि अडाणीपण घालविण्याचें, साक्षरता हें सुलभ साधन आहे. सध्यांच्या विस्तृत व गुंतागुंतीच्या मानवी जीवनामध्यें तर ज्याला लिहितां वाचतां येत नाहीं तो बहिरा व मुकाच आहे—ज्याप्रमाणें मुंबईंत राहणाराला टेलिफोन वापरतां न येणें म्हणजे बहिरे--मुकेपणाच आहे. माणूस विद्येनें श्रेष्ठ बनतो, व साक्षरता हा विद्यार्जनाचा मूलाधार आहे. म्हणून जनतेचा सुजाणपणा, बहुश्रुतता, कौशल्य व कर्तव्य हीं वाढविण्यासाठीं सार्वत्रिक साक्षरताप्रसार फार आवश्यक आहे. हा मुलांमध्यें तसा प्रौढांमध्यें, पुरुषांमध्यें तसा स्त्रियांमध्येंहि केला पाहिजे. प्रत्येक खेडयाला मुलांची शाळा व प्रौढसाक्षरता वर्ग पाहिजे व देशांतील यच्चया-

नगर वाचनालय सातारा

वत् लोकांना साक्षर बनविलें पाहिजे. हें फार खर्चाचें काम आहे. तो खर्च देशाला झेंपण्यासाठीं शक्य तितक्या काटकसरीच्या योजना बनविल्या पाहिजेत. व केवळ पगारासाठीं नव्हे तर समाजसेवेच्या भावनेनें अध्यापन कार्याला उद्युक्त होणारे शिक्षक मिळाले पाहिजेत. शिक्षणामुळें शेतकऱ्यांचीं मुलें अंगमेहनतीचा कंटाळा शिकणार नाहींत व आनुवंशिक पेशांना नालायक न बनतां उलट अधिक कर्तबगार बनतील असेंच शिक्षणाचें ध्येय, शिक्षकाचें वर्तन व शाळेचें एकंदर वातावरण राहिलें पाहिजे. शाळेचीं सत्रें किंवा मुदती व दैनिक वेळापत्रक हीं कामधंदेवाल्या गरीब लोकांच्या मुलांना सोयीस्कर होतील अशीं ठेविलीं पाहिजेत, व ग्रामीण जीवन जेणेंकरून समृद्ध बनेल अशाच तऱ्हेचे पाठ व अभ्यासक्रम असले पाहिजेत. या सर्व सुधारणा साधण्यासाठीं अनुभव, चिंतन, प्रयोग व योजना यांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. परंतु इतकें केल्यानंतर सुद्धां साक्षरतेचा सार्वत्रिक प्रसार केवळ सक्तीच्या जोरावर करतां येणार नाहीं. त्यासाठीं निरक्षर वर्गांमध्येंच शिक्षणाबद्दल उत्सुकता निर्माण झाली पाहिजे. राजकीय, सामाजिक व आर्थिक समता, व त्यामुळें प्रत्येक हृदयामध्यें उसळणारी माणुसकीच्या जाणिवेची लाट, जागृत स्वाभिमान, स्वतःचा दर्जा वाढविण्याची किंवा स्वतःच्या उच्च दर्जाला लायक बनण्याची उत्कंठा व नवीन उच्च जीवनाची ओढ या सर्वांतूनच साक्षरतेबद्दल उत्सुकता व निरक्षरतेबद्दल शरम हीं उत्पन्न होतील.

तसेंच साक्षरता किंवा शालेय शिक्षण म्हणजे शिक्षणाची केवळ सुरवात आहे. शाळा–शिक्षणाउपरांत खेडवळांना समजेल अशा सोप्या पद्धतीनें विविध विषयांचें विवेचन करणारीं पुस्तकें व चोपडीं छापून तीं स्वस्त किंमतींत लोकांना मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

**रुग्णपरिचर्याः**—सांसर्गिक रोगांचा—विशेषतः महारोग व क्षय या प्राणघातकच नव्हे तर सर्वस्व–घातक रोगांचा हिंदुस्थानांत बेसुमार फैलाव झाला आहे. अशा रोगांचा बंदोबस्त ज्या त्या रोग्यानें किंवा त्याच्या कुटुंबीयांनींच करावयाचा नसून इतरांनीं स्वतःच्या बचावासाठींच या रोगांना आळा घातला पाहिजे. दुखणाइतांना वेगळें काढून तेथें

त्यांची काळजीपूर्वक शुश्रूषा केली पाहिजे. योग्य जतन न झाल्यामुळेंच हे रोग तीव्र होतात व प्रसार पावतात. महारोग्यांची व क्षयरोग्यांची शुश्रूषा हें भूतदयेचें व सोशिकपणाचें व तितकेंच समाजाच्या दृष्टीनें आत्मसंरक्षणाचें कार्य आहे. हिंदुस्थानांत आजवर तें परकी ख्रिश्चन मिशनरीच करीत आहेत, त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. परंतु तें कार्य पुष्कळच विस्तृत प्रमाणावर झालें पाहिजे व त्यासाठीं देशांतूनच सेवक व सेविका पुढें आल्या पाहिजेत.

वेडे:—वेड हें सुद्धां पुष्कळदां दारिद्र्य व कमपोषण यांचाच परिणाम असतें. वेड्यांच्या उपचारासाठीं केवळ तुरुंगाच्या पद्धतीचे 'पागलखाने' चालवून भागणार नाहीं. प्रेमानें, सहानुभूतिपूर्वक व हळुवारपणें शुश्रूषा केल्यास वेडे अधिक संख्येनें व अधिक त्वरित बरे होऊं शकतील. येशू ख्रिस्त वेड्यांच्या अंगावरून हात फिरवून त्यांना बरे करीत असे अशा कथा आहेत, ते ईश्वरी अवताराचे चमत्कार मानण्याचें कारण नाहीं; ते प्रेम व वात्सल्य यांचेच चमत्कार होते. अमेरिकेमध्यें वेड्यांची शुश्रूषा करणारीं 'कुटुंबें' पागलखान्यांऐवजीं असतात व त्यांची उपयुक्तताहि अनुभवसिद्ध आहे.

पतितपरावर्तन:—हा प्रश्नहि फार महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा आहे. ज्यांना आपण गुन्हेगार म्हणतों व तुरुंगांत डांबतों नी राबवितों ते बहुधा जन्मतः गुन्हेगार नसतात, ( गुन्ह्यांकडे जन्मसिद्ध प्रवृत्ति नसतेच असें म्हणतां येत नाहीं, परंतु ती फारच विरळा. ) तर परिस्थितीच्या दडपणामुळें, संगतीनें, संस्कारांमुळें, जगांतील कर्कशपणामुळें, समाजानें त्यांचेवर केलेल्या सूक्ष्म आघातांमुळें, उपासमारीमुळें, वैतागानें व अशाच अन्य कारणांनीं गुन्ह्याला प्रवृत्त होत असतात. त्यांना समाजाचे अपराधी म्हणण्यापेक्षां समाजालाच त्यांचा अपराधी ठरविणें कांहीं अंशीं उचित ठरेल. या गुन्हेगारांमध्येंहि पुष्कळ कोमल मनाचे, दिलदार वृत्तीचे व असामान्य बुद्धीचे लोक असतात, परंतु समाज आपल्याच आडमुठेपणामुळें त्यांच्या सेवेला पारखा होतो; एवढेंच नव्हे तर त्यांना शत्रुपक्षांत हाकून लावतो.

अशा लोकांशीं विशेषच प्रेमानें, आदरानें, आस्थेनें व हळूवारपणें वागलें पाहिजे असतें. कोवळ्या वयाच्या गुन्हेगारांचे बाबतींत ही दृष्टि सरकारलाहि मान्य झाली आहे. प्रौढ गुन्हेगारांचे बाबतींत सुद्धां तशीच सुधारणा होणें आवश्यक आहे. तुरुंगांना इस्पितळांचें किंवा गुरुकुलांचें स्वरूप आलें पाहिजे. तुरुंगांतून बाहेर पडणाऱ्या कैद्यांना पुढील आयुष्य प्रामाणिक श्रमानें घालविण्यास मदत करणें आवश्यक आहे.

परंतु सरकारच्या शक्तीला मर्यादा आहेत. सरकारचे कितीहि सद्धेतु असले तरी केवळ पगारार्थी लोकांकडून असलीं नाजूक कामें पार पडणें अशक्य असतें; त्यासाठीं बिनसरकारी परोपकारी सेवक–संस्था पाहिजे असतात.

एका युरोपियन मिशनरी बाईची गोष्ट आहे. १९१९ सालीं ती गांधीजींच्या साबरमती येथील सत्याग्रहाश्रमांत कांहीं दिवस राहण्यास आली होती. त्याच वेळीं मद्रासकडील एक हिंदु तरुणहि आश्रमांत राहण्यास आला होता. एके दिवशीं तो कोणाला कळूं न देतां पळून गेला. त्या मिशनरी कुमारिकेचें सोन्याचें घड्याळहि नापत्ता झाल्याचें त्याच वेळीं तिला आढळून आलें. अर्थात् तो तरुणच तें चोरून पळाला असावा अशी शंका घेण्यास भरपूर जागा होती. लगेच ती बाई त्या तरुणाच्या शोधार्थ मद्रासकडे रवाना झाली. चोराला पकडण्यासाठीं ? नव्हे, नव्हे, त्या मुलाला भेटून "तें घड्याळ मी तुला बक्षीस दिलें आहे असें समज" असें सांगण्यासाठीं. "आपल्या श्रीमंतीच्या दिमाखामुळें, किंवा घड्याळ उघडें टाकून जाण्याच्या गफलतीमुळें, त्या मुलाला तें घड्याळ चोरण्याचा मोह झाला. तरी त्याच्या अधिक पतनाला तरी आपण कारणीभूत होऊं नये" एवढ्यासाठींच ! पुढील परिणाम कळलेला नाहीं, परंतु अकृत्रिम वात्सल्य काय करूं शकणार नाहीं ?

पतित स्त्रियांचा प्रश्न हा तर हृदय असलेल्या माणसाच्या हृदयाला दंशच करणारा आहे. स्त्रिया एकजात पापाच्या पलीकडे आहेत असें म्हणण्याचा हेतु नाहीं, त्याहि मानवीच आहेत व मानवमात्र स्खलनशील

आहे. परंतु समाजाचीच बेपर्वाई, जुलूम व कोंडमारा यांच्यापायीं एखादीचें वांकडें पाऊल पडलें तर तिच्याच अग्रेसर हिस्सेदाराला अगदीं मोकळा सोडून तिला एकटीला मात्र जन्माची पतित ठरविणें ही निष्ठुरपणाची व अन्यायाची पराकाष्ठा आहे. अशा किती 'पतितां'चे, विधवांचे व केवळ 'जन्म घेतला' एवढ्याच गुन्ह्याबद्दल देहांत शासन भोगणाऱ्या अर्भकांचे शाप आपल्या समाजाच्या माथ्यावर असतील कोण जाणे!

व्यसन-निवृत्तिः—दारू, अफू, गांजा यांसारखीं व्यसनें हा समाजाला जडलेला महान् व्याधि असून त्याचें निराकरण झाल्यास मनुष्यजात किती तरी सुखी होऊं शकेल. दारिद्र्य, गुन्हे, रोगराई इत्यादींच्या निवारणाचा व्यसन-निवृत्ति हा फार परिणामकारक उपाय आहे. सरकारच्या सहकार्याखेरीज संपूर्ण व्यसनबंदी शक्य नाहीं; परंतु सरकारहि एकट्यानें तें कार्य करूं शकणार नाहीं. कायद्यानें दारूबंदी करण्याइतकी सत्ता आपल्या हातीं येईपर्यंत, व ती आल्यानंतर कायद्याच्या जोडीला, उपदेश, पहारा, मनोरंजनाचे सात्त्विक प्रकार इत्यादि उपायांनीं आपण मद्यबंदीसाठीं झटलें पाहिजे.

सर्वसाधारण सुधारणाप्रमाणें मद्यबंदीची सुधारणासुद्धां मद्यावर केवळ सामोरा हल्ला केल्यानें साध्य होणार नाहीं. पायावरील गळूं हा शरीरभरच्या रक्तदोषाचा परिणाम असतो, त्याचप्रमाणें दारूची तलप हीसुद्धां जीवापाड मेहनत व तीपासून येणारा शीण, गलिच्छ, कोंदट व गर्दीची रहाणी, संसारांतील कर्कशपणा व त्यापासून उद्भवणारे मानसिक क्लेश, निराशा किंवा हताश स्थिति इत्यादींचा परिणाम आहे. अर्थात् तिच्यावरील उपाययोजनाहि तशीच विविध व व्यापक पाहिजे. उदाहरणार्थ, आठ आठ मण वजनाचीं धान्याचीं किंवा साखरेचीं पोतीं दिवसभर वाहून दोन तीन रुपये कमविणाऱ्या हमालांना संध्याकाळीं त्यांतील अर्धी कमाई गुत्त्यांत घालविल्याखेरीज गत्यंतर नसतें. हमालांची दारू बंद करायची तर बंगाली मणाहून अधिक वजनाच्या पोत्यांना कायद्यानें बंदी केली पाहिजे.

नगर वाचनालय, सातारा.

अंधशाळाः—आंधळे व बहिरेमुके यांच्या शिक्षणाच्या बाबतींत ख्रिस्ती मिशनऱ्यांनींच पुढाकार घेतलेला आहे. त्यांना पहातां किंवा ऐकतां आलें नाहीं तरी त्यांचीं इतर इंद्रियें व बुद्धि हीं विशेष तीव्र असतात. त्यांचा विकास घडवून आणल्यास ते समाजाचे स्वावलंबी व उपयुक्त घटक बनतील.

भिकाऱ्यांचा प्रश्न हाहि फार बिकट परंतु महत्त्वाचा प्रश्न आहे. साधु, फकीर, इत्यादीसह हिंदुस्थानांत एकूण ५६ लाख भिकारी आहेत म्हणे! यांपैकीं जे धार्मिक प्रतिष्ठावाले असतील त्यांच्या वाटेला जाणें धोक्याचें आहे! जे दुबळे किंवा लुळे पांगळे असतील किंवा महारोगासारख्या व्याधीनें ग्रस्त असतील त्यांना दारोदार हिंडावें न लागतां—आणि महारोग्यांना हिंडू न देतां—त्यांची बसल्या जागीं सुखसंगोपनाची व्यवस्था होणें रास्त आहे. परंतु जे धडधाकट किंवा कसलें तरी काम करण्याच्या लायकीचे असतील त्यांना भिक्षेची बंदी होऊन त्यांच्या त्यांच्या लायकीचें काम पुरवून त्याबद्दल मेहनताना देण्याची व्यवस्था होणें आवश्यक आहे.

असो. अज्ञान, दैन्य, दारिद्य, व्यसनें, वितुष्टें, पारतंत्र्य, इत्यादींचें निवारण व्हावें, हिंदुस्थानच्या यच्चयावत् रहिवाशांच्या सुप्त शक्तींचा विकास व्हावा आणि सुखी, सुजाण, समृद्ध, सुशील, समर्थ अशा हिंदुस्थानानें स्वत:चें कल्याण साधून जगाच्या प्रगतीलाहि मदत करावी यासाठीं अनेक मार्गांनीं जे प्रयत्न झाले पाहिजेत त्यापैकीं कांहीं ठळक प्रकारांचा येथवर संक्षेपानें उल्लेख केला. सेवकांना प्रत्यक्ष कामाला लागल्यानंतर आणखी कितीतरी प्रकार सुचत जातील. सेवकांसाठीं खोळंबून राहिलेलीं किती विस्तृत क्षेत्रें चारी बाजूंवर पसरलेलीं आहेत त्याची कल्पना करून देण्याचाच येथें हेतु होता.

सेवाशील संसारः—या कार्यासाठीं नि:संग सेवक जितके पुढें येतील तेवढे पाहिजेच आहेत, परंतु नि:संग सेवा म्हणजे सर्वस्व नव्हे; किंवा निःसंग झाल्याखेरीज सेवा करतांच येत नाहीं असें नाहीं. आम्हांला

संसारी सेवकहि पाहिजे आहेत. गृहस्थाश्रम हाच समाजाच्या शक्तीचें कोठार आहे. तोच सेवाशील बनणें इष्ट आहे. लोकांनीं आपापला संसार सेवाभावानें व देशहिताकडे नजर देऊनच चालवावा, आपापला स्वार्थ देशहितानुवर्ती व देशहिताचा अंकित करावा. देशहितपर असेच उद्योग, धंदे, व्यापार करावे; देशविघातक धंदे व कृत्यें वर्ज्य करावीं. संसारी इसमालाहि दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे, संकट प्रसंगीं धावून जाण्याचे अन्यायाशीं झगडण्याचे, प्रसंग हरघडी येत असतात. अशा प्रसंगीं त्यानें आपल्या कर्तव्यास चुकूं नये.

आईबापांनीं मुलांना देशभक्तीचें वळण लावावें, शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासांत तरबेज करून समाधान न मानतां ते समाजाचें शीलवान्, सुजाण, कळकळीचे, कर्तव्यतत्पर व कर्तबगार घटक बनतील असें शिक्षण द्यावें. लेखक, कवि, यंत्रशास्त्रज्ञ, वैद्य–डॉक्टर, इत्यादींनीं आपापली सेवा बहुजन समाजाला–समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत–कशी पोंचेल याची चिंता करावी. सरकारी नोकरांनीं सुध्दां प्रजा हाच आपला खरा धनी आहे व आपल्या हाताखालच्या कामगारांचेंहि आपण स्वामी नसून सेवकच आहों हें ध्यानांत बाळगावें. सारें वातावरण अशा तऱ्हेनें कर्तव्यतत्पर, सेवाशील व राष्ट्रनिष्ठ बनल्याखेरीज कोणत्याहि देशाचा अभ्युदय होत नसतो.

**सेवक संस्था पाहिजेतः**—सेवकांनीं देशसेवेसाठीं व्यक्तिशःच पुढें सरलें पाहिजे, तथापि अशा सेवकांना आधार देण्यासाठीं तसेंच त्यांची योजना व त्यांचें मार्गदर्शन करण्यासाठीं सेवा–संस्थांचीहि जरूरी आहे. कारण रवींद्रनाथ म्हणतात त्याप्रमाणें ( स्वदेशी समाज : पान २३ ) " आज जर एखाद्या तरुणाला म्हटलें " जा व समाज सेवेला वाहून घे– तर तो गोंधळांत पडेल. त्यानें कोणतें काम करावें, कोणाच्या जोरावर करावें ? त्यानें काय खावें, कोठें रहावें ? असे अनेक प्रश्न त्या तरुणाच्या डोळ्यासमोर उभे रहातील. आपल्या कार्याची योजना एका व्यक्तीस करतां येणार नाहीं; त्यासाठीं संघटना हवी; एखादा आश्रम

हवा. ” पुन्हांहि ते लिहितात ( पान ५८ ) “ अशा वेळेस मध्यवर्ती आश्रमासारख्या संस्थेची अत्यंत आवश्यकता असते. त्या मध्यवर्ती शक्तीसभोंवतीं सर्वांचें एकीकरण झालें पाहिजे. तेथें विचारवंत विचार देतील, श्रम करणारे श्रम करतील, उदारांच्या देणग्या तेथें येतील. शिक्षण, वाङ्मय, कला, उद्योगधंदे—आपल्या कल्याणाचीं सारीं कार्ये त्या मुख्य केंद्राभोंवती उभी रहातील. आणि जें रामराज्य निर्माण करण्यासाठीं देशभक्त झटत आहेत, तें सर्वांचें समृद्ध असें रामराज्य निर्माण होण्यास त्या केंद्रांतून मदत होईल. ”

अशा संस्था किंवा आश्रम जिल्हावार असावे, जिल्हा संस्थांचें एकीकरण करणाऱ्या प्रांतिक संस्था असाव्या व त्यांचेंहि एकीकरण करणारी अखिल भारतीय संस्था असावी.

**स्वयंसेवकहि पाहिजेत:**—धंदेवाईकांनीं आपापला धंदा देशास स्मरून करावा हें तर आहेच, परंतु त्याखेरीज त्यांनीं आपल्या फुरसतीच्या वेळांत आपापल्या अभिरुचीला व परिस्थितीच्या मागणीला अनुसरून कोणत्या तरी सार्वजनिक कार्यामध्यें नियमितपणें भाग घ्यावा. आपली नोकरी किंवा धंदा जितक्या जबाबदारीच्या जाणीवेनें, आस्थेनें व शिस्तीनें आपण करतों, तितक्याच जबाबदारीनें, आस्थेनें, शिस्तीनें व कर्तव्यबुद्धीनें हें निर्वेतन कार्यहि केलें पाहिजे. ‘ सर्वसंग परित्याग ’ करता आला नाहीं—व सर्वांनींच तो करून चालावयाचेंहि नाहीं—तरी आपापलें मुख्य किंवा निर्वाहाचें काम करूनहि वेळ काढून पुष्कळ तऱ्हेचीं देशकार्यें करतां येण्यासारखीं आहेत; निर्धार पाहिजे व योजकताहि पाहिजे.

**नियमित द्रव्यदान:**—देशसेवेचा आणखीहि एक प्रकार आहे. तो द्रव्यदानाचा. सेवाकार्यासाठीं व सेवकाच्या निर्वाहासाठीं द्रव्याची जरूर असतेच. धनिकांनीं आपापल्या पसंतीच्या कार्याला व कार्यकर्त्याला नियमितपणें व कर्तव्यबुद्धीनें द्रव्याचा पुरवठा केला तरी पुष्कळ केल्या-

सारखें होईल. स्वतःच्या खासगी संसाराप्रमाणें देशाचा संसारहि आपल्या शिरावर आहे; कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांना किंवा भावांना आपण दरमहा पैसे पाठवितो, तसाच विशिष्ट कार्यकर्ता हाहि आपला भाऊच आहे, किंवा आपला प्रतिनिधी म्हणूनच आपण विशिष्ट कार्यांत गुंतविला आहे; सरकारी देशकार्यासाठीं ज्याप्रमाणें आपण इच्छया–अनिच्छया कर देतों त्याचप्रमाणें बिनसरकारी देशकार्यासाठींहि स्वेच्छेनें कर देणें आवश्यक आहे; अशा भावनेनें आपल्या उत्पन्नाचा विशिष्ट हिस्सा विशिष्ट कार्याला —तो हिस्सा आपला नव्हेच, त्या कार्याचाच आहे अशा ठाम बुद्धीनें— अर्पण करणें हाहि देशसेवेचा एक भरीव व महत्त्वाचा प्रकार आहे यांत बिलकुल शंका नाहीं.

**मिशनऱ्यांचें शिष्यत्व:**—अलीकडच्या काळांत आमच्या देशांतील अनेक प्रकारच्या सेवाकार्यांचे संस्थापक ख्रिस्ती मिशनरी आहेत हें कृतज्ञतापूर्वक मान्य केलें पाहिजे. मोठमोठीं कॉलेजें व शिक्षण संस्था, आधुनिक साधनांनीं सुसज्ज अशीं हॉस्पिटलें, अनाथालयें इत्यादि त्यांनींच काढलीं व तेच चालवितात. महारोग्यांची शुश्रूषा व आंधळ्या बहिऱ्यांचें शिक्षण त्यांनींच सुरू केल्याचा पूर्वीं उल्लेख आलाच आहे. छापखाने प्रथम त्यांनींच काढले. उद्योगधंद्यांत अनेक सुधारणा त्यांनीं आम्हांला शिकविल्या. दुष्काळ निवारणाचें काम त्यांनीं अनेक प्रसंगीं केलेलें आहे. हरिजन, आदिवासी, इत्यादींच्या उद्धाराचें कार्य त्यांनींच सुरू केलें, व अद्याप मोठ्या प्रमाणांत चालविलें आहे. स्त्रीशिक्षणाचा पायाहि त्यांनींच घातला.

मिशनऱ्यांप्रमाणेंच गोऱ्या लोकांनीं काढलेल्या व जगभर चालविलेल्या सॅल्व्हेशन आर्मी, बॉयस्काऊट, रेड क्रॉस यांसारख्या जगद्व्यापी संस्थांच्या शाखोपशाखा हिंदुस्थानामध्येंहि पसरलेल्या आहेत, या त्यांच्या सर्व उपकारांबद्दल आपण कृतज्ञ राहावें. सेवाकार्यामध्यें आपण कोता देशाभिमान आणूं नये. तथापि हीं सारीं कार्यें व आणखीहि अनेक कार्यें आमचीं आम्हीच करणें शोभेल. समाजसेवेच्या बाबतींत आपण गोऱ्यांकडून धडा घेतला पाहिजे.

**परंपरागत सेवावृत्तिः**—आपल्यामध्यें कौटुंबिक क्षेत्रांत सेवावृत्तीचा प्रकर्ष दिसून येतो. आपली अविभक्त कुटुंबपद्धति हा तरी सेवावृत्ती-चाच परिपाक आहे. अपत्यसंगोपन, मातापित्यांची सेवा, बंधुप्रेम, पातिव्रत्य हे उत्कट सेवावृत्तींचेच नमुने आहेत, एवढेंच नव्हे तर आते, चुलती, मावशी, मेव्हणी, भाचे, पुतणे यांसारख्या आप्तेष्टांना धर्माचा नव्हे तर हक्काचा आश्रय आपल्या कुटुंबपद्धतीमध्यें होता; अद्याप पुष्कळ कुटुंबांतून आहेहि. अतिथिसेवा हेंहि गृहस्थाचें आवश्यक कर्तव्य होतें. दानधर्माची जबाबदारीहि प्रत्येक गृहस्थावर होती. आपल्या घरगुती जीवनाचीं हीं अंगें निःसंशय स्पृहणीय व संग्रहणीय आहेत. मनुष्य जन्मास येतांना देवांचें, पितृंचें, ऋषींचें व समाजाचें ऋण घेऊनच येतो, किंवा गृहस्थानें देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्य–यज्ञ व ब्रह्मयज्ञ असे पंचमहायज्ञ प्रत्यहीं केले पाहिजेत या कल्पनांमध्यें सेवाधर्मच प्रतिबिंबित झालेला आहे.

वर्णव्यवस्था हीसुद्धां परस्परांच्या सेवेच्या व सहकार्याच्या धोरणानेंच रचलेली होती. ब्राह्मण हा निःसंग समाजसेवक होता, त्यामुळें ब्राह्म-णाला दिलेलें दान सहजींच अखिल समाजाला व समाजकार्याला पोंचत होतें. वैश्य हा ‘ संसारी सेवक ’ व क्षत्रिय हा ‘ स्वयंसेवक ’ होता असेंहि म्हणतां येईल. पूर्वकाळचे दानधर्मांचे प्रकार रस्ते, घाट, तलाव, धर्मशाळा, मंदिरें, इत्यादि बांधणें, वडा–पिंपळांना पार बांधणें, अशा स्वरूपाचे म्हणजे यच्चयावत् माणसांनाच नव्हे तर गुरें, पशुपक्षी, इत्यादींनाहि उपकारक असे असत; त्यामुळें आर्थिक विषमतेचें मुळांतच किंवा जेथल्या तेथें निरसन होत होतें. त्या काळीं ‘ शूद्र ’ हे मात्र ‘ समाजा ’ वेगळेच मानले जात होते असें दिसतें.

परंतु आतां जमाना पालटला आहे. जुनी कुटुंबपद्धति विस्कळीत झाली आहे आणि वर्णव्यवस्थेचा तर संपूर्ण लोप झाला. लोकशाहीच्या चालू युगांत स्त्रियाशूद्रांसुद्धां सारेच लोक नांवापुरतेच नव्हे तर खरोखरी ‘ राजश्रिया विराजित ’ झाले आहेत. पाश्चात्य पद्धतीचें आपण अनेक

बाबतींत अनुकरण करीत आहों. सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव व सामाजिक जीवन पद्धतींचे निर्माते आमचे आम्हींच आहों हा आत्म-विश्वास, आपण आपल्या राजकर्त्यांपासून उचलणें आवश्यक आहे.

स्वर्गाला पृथ्वीवर आणा:—आपल्यामध्यें स्वार्थत्यागाची किंवा परमार्थ वृत्तीची उणीव आहे असें नाहीं. परंतु आमच्यामध्यें जो स्वार्थाला विटला तो सरळ विरक्त होऊन ईश्वरभजनाला—परलोकाच्या-शोधाला—लागला. उपनिषत्कारांनीं आपल्याला **ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्** - हें सर्व जग ईश्वरानें व्यापलेलें आहे, असा संदेश दिला. समर्थ रामदासांनींहि **जनीं थोरला देव तो चोरलासे** ( लपलेला आहे ) व " **नारायण असे विश्वीं । त्याची सेवा करीत जावी । त्या कारणें तोषवावी । कोणो तरी काया ॥** " अशा प्रकारचा उपदेश केलेला आहे. तथापि असल्या तुरळक उपदेशाचा आपल्या सामाजिक जीवनावर पुरेसा ठसा उमटलेला दिसत नाहीं. आपला ईश्वर जगावेगळाच राहिला व आमचा स्वर्ग सूर्य-चंद्र-ताऱ्यांपलीकडे कोणत्या तरी अज्ञात ठिकाणींच दडून राहिला आहे. स्वर्गाला पृथ्वीवर आणणाऱ्या व ईश्वराला सृष्टींत संचरविणाऱ्या कर्मयोगाची शिकवण आपण आत्मसात् करावयास पाहिजे आहे.

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत—
उठा, जागे व्हा, थोरांचें मार्गदर्शन संपादून सुबुद्ध व्हा.

——

# पद्यावली

## पद्यकारः--सीताराम पटवर्धन

### १ प्रेम--मदिरा. ( चालः-नियम पाळावे )

प्रेम रसाची । लागली चटक मद्याची ॥ धृ.
लज्जत एकचि वेळ चाखिली । नित्यचि परि ती अंतरिं ठसली ।
संगत सद्गुरुचीच भोंवली । संतजनाची ॥ १ ॥
एकचि रस हा निशिदिनिं व्हावा । पिउनि स्वयें अन्या पाजावा ।
धनगेहाची नुरली पर्वा । जनलज्जेची ॥ २ ॥
भेद निमाला स्वपरजनाचा । उच्च यातिचा चांडाळाचा ।
काळा गोरा पीतहि अमुचा । प्राणसखाची ॥ ३ ॥
निजसत्तेची कवडी नुरली । तनु परसेवा कर्मी खपली ।
परान्न खातां वृत्तिहि जिरली । अभिमानाची ॥ ४ ॥
झालें मातेरें जन्माचें । भय तरि मग कैचें मृत्यूचें ।
करूं अवज्ञा हस्तें वाचे । दुःसत्तेची ॥ ५ ॥
निजदेहाचें भान विसरलों । पीतांबर कीं चिंधी ल्यालों ।
राजभुवनिं कारागृहिं दडलों । खंत न त्याची ॥ ६ ॥
ओळख नाहीं स्त्रीभगिनीची । किति वर्णावें निजजननीची ।
तरुणी वृद्धा निजपर गृहिंची । मम माताची ॥ ७ ॥
ममता केली स्त्रीपुत्रांशीं । देश-बांधवां निजयातीशीं ।
चटक भुलविण्या शक्ति न तिजशीं । या कैफाची ॥ ८ ॥

---

टीपः—प्रेम म्हणजे ममता नव्हे तर विश्वबंधुत्व; त्याचे परिणाम दारूसारखेच होतात !

ता.
सातारा.

## २ सेवक

सेवक आम्ही हिंदभूचे । हिंदद्वारें विश्वजनाचे ॥ धृ० ॥
अल्पबलें सेवक देशाचे । चिंतू ना परि वैर पराचें ॥ १ ॥
वर्ण धर्मगत भेदां नेणू । मुस्लिम हिंदुसम सखे अमुचे ॥
हरिजन मुस्लिम भिल्ल खिस्ती । सम अधिकारी स्वातंत्र्याचे ।
दीनां दलितां भावें सेवूं । चरणचि ते जनजनार्दनाचे ॥ ४ ॥
प्रेम अंतरीं सत्कर्म करी । सुखवुं परांतर मृदु-मधुवाचे ॥५॥
कष्ट स्वमनीं अन्यां दूषण । बाह्य लक्षण दुर्बलतेचें ॥ ६ ॥
विद्या तनुबल नमवी दासा । देणें सेवेस्तव देवाचें ॥ ७ ॥
सेवक निःस्पृह निज-पर-देहीं । कारण नच त्या परपीडेचें ॥८॥
दुष्ट-दास्य दंडभयें लोभें । साधन उभयांच्या दुर्गतिचें ॥९॥
पर-स्व-हरणें निजजन रक्षण । नच सेवा तें चौर्य साचें ॥१०॥
जीवन-उपकारी कर्माचा । अंगि न आळस लव दासाचा ॥११॥
निर्मल कर्में स्वदेहधारण । आदिसूत्र सेवाधर्माचें ॥१२॥
सेवक अनुदिनि भिक्षाहारी । भय मोठें त्या संग्रहाचें ॥१३॥
सेवक निर्मम निर्गृह तद्भर । मस्तकिं जनताजनार्दनाचे ॥१४॥

---

## ३ संसाराचें सार ( अभंग )

### पद्यकार....सेनापति बापट

सार संसाराचें । पर-उपकार । त्यावीण असार । सर्व कांहीं ॥ १ ॥
देहा कष्ट होतां । देह रडे रडो । उपकार घडो । निश्चयो हा ॥ २ ॥
मना दुःख होतां । मन रडे रडो । उपकार घडो । निश्चयो हा ॥ ३ ॥
देह दिला देवें । उपकारासाठीं । उपकारासाठीं । दिलें मन ॥ ४ ॥
अल्पशक्ति तरी । अल्प उपकार । थोर तरी थोर । करणेंचो ॥ ५ ॥
उपकारीं वेंचा । तनमनधन । मोक्षासी साधन । दुजें नाहीं ॥ ६ ॥

---

# ४ सेवेचा हव्यास

## पद्यकारः....नाना बर्वे

आमुचा सेवेचा हव्यास । आम्हां नच सत्तेचा अभिलाष ॥ धृ.॥

देवासम मानुनियां सेवा करूं सर्वांची खास ।
सेवामार्गें सर्व जनाचा संपादूं विश्वास ॥ १ ॥

अपुल्यासम सकलांसहि आत्मा आहे हा विश्वास ।
तोचि एक पुरुषोत्तम उत्तम सेव्य असे सकलांस ॥ २ ॥

सकल चराचरिं ज्याची सत्ता तोचि प्राप्त आम्हांस ।
म्हणुनि दुज्यावरि सत्ता करण्या न धजे मन हें खास ॥ ३ ॥

तत्सत्तेनें सर्व चाललें मान्य असे आम्हांस ।
म्हणुनिच त्या सर्वांवरि अमुचा अखेरचा विश्वास ।

त्या सर्वांतहि समान गमतो नियम जसा जो ज्यास ।
त्याचि स्वनियमें सर्व चलावें मान्य असे आम्हांस ॥ ५ ॥

याच स्वनियमें चालण्यास जो विरोध ये कोणास ।
विरोध तो हरण्यास्तव योजूं अमुची सेवा खास ॥ ६ ॥

अविरोधानें सेवा साधे या मार्गें आम्हांस ।
म्हणुनिच सर्वोत्तम सुख तेंची आम्हां लाधे खास ॥ ७ ॥

याच सुखांतुनि सर्व सुखांचें श्रेय पावतें खास ।
म्हणुनिच अन्य सुखाची वांछा नुपजे ती आम्हांस ॥ ८ ॥

सुखदुःखांतहि समान सेवा व्हावी हा हव्यास ।
या हव्यासें सेवा अमुची पावे पैलतिरास ॥ ९ ॥

वाचनालय ता. सातारा

---

८८५००
१००५
५ ०१/०८
नगर वाचनालय
ता.........
सातारा
आ५१२८३



# अभंग

पद्यकारः ...श्री. रामचंद्र विष्णु गोडबोले

लोक-सेवा-व्रत आचरिती भावें ।
तयांतें मानावें भाग्यवंत ॥ १ ॥
लोकसेवेसाठीं सत्यातें स्मरून
करिती ते दान सर्वस्वाचें ॥ २ ॥
त्याचि सेवा-व्रतें तोषे जगन्नाथ ।
शुद्ध करी चित्त सेवकाचें ॥ ३ ॥
होतां चित्त-शुद्धि लाभे आत्म-ज्ञान ।
जनीं जनार्दन प्रकटतो ॥ ४ ॥

सत्याचें दर्शन घडावें संपूर्ण ।
ध्येय हें लक्षून जीवनाचें ॥ १ ॥
प्रेम-अहिंसेचें घेउनियां व्रत ।
लोक-सेवा-रत राहे सदा ॥ २ ॥
शस्त्राविण करी दुष्टाचा प्रतिकार ।
न घेई माघार प्राणान्तीं हि ॥ ३ ॥
जनीं जनार्दन होउनी प्रसन्न ।
आत्म-समाधान देई तया ॥ ४ ॥

आणिकांचें सुख देखुनि जो सुखी ।
होय धन्य लोकीं तोचि संत ॥ १ ॥
आणिकांचें दुःख देखोनियां डोळां ।
येई कळवळा तोचि संत ॥ २ ॥
आणिकांचे दोष आणीना जो मनीं ।
गुणांतें वाखाणी तोचि संत ॥ ३ ॥
लोक-कल्याणार्थ वेंची जो जीवित ।
धन्य तो महंत पुण्यवंत ॥ ४ ॥

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत